# श्यामची पत्रे

साने गुरुजी

पुणे मराठी ग्रंथालय
पुणे ३०.

साधना प्रकाशन पुणे

क्र. ३, ४, ५
व
क्र. १८, १९, २० आणि २१
ही पत्रे या आवृत्तीत
नव्याने समाविष्ट करण्यात
आलेली आहेत.

प्रथमावृत्ती
साने गुरुजी जयंती
डिसेंबर २४, १९६४
पुनर्मुद्रण
फेब्रुवारी १९६८
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार, पुणे
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार, पुणे
© साधना ट्रस्ट
किंमत
**सहा रुपये**

# श्यामच्या पत्रांचा थोडा इतिहास

१९४० सालच्या डिसेंबरातली गोष्ट. नाशिक जिल्ह्यांतील काँग्रेसवादी युवकांची परिषद चांदवडला भरली होती. स्वातंत्र्याच्या भावनेने वातावरण विद्युन्मय झालेले होते. परिषदेसाठी साने गुरुजींना पाचारण केले होते. युवकांच्या हाकेसरशी आजारी असूनही साने गुरुजी धावून आले. जिल्हाभर त्यांनी दौरा केला. अति ओजस्वी अशी त्यांची भाषणे झाली. युवक त्या भाषणांनी भारावून गेले. युवक परिषदेला मोठ्या संख्येने ते हजर राहिले. सेवा दलाची संघटना तेव्हा नव्याने पुन्हा सुरू झाली होती. राष्ट्रीय शाळा बंद झाल्यानंतर तरुणांना राष्ट्रीय संस्कार देण्याचा तो नवा प्रयत्न होता. सेवा दल वाढले तर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेने अभिमंत्रित झालेले विधायक पुरुषार्थाची जिद्द बाळगणारे आणि सर्व संकुचितपणा झडझडून टाकणारे असे हजारो तरुण उभे राहतील, आणि भारताला 'मानवांचा महासागर' या पदवीला पोचवण्याचे आपले इतिहासदत्त कार्य पार पाडण्याला समर्थ होतील असे स्वप्न साने गुरुजींच्या नजरेसमोर दिसत होते. देशातील दास्य, दैन्य, दारिद्र्य, अज्ञान आणि पारतंत्र्याच्या आश्रयाने पोसले जाणारे दुर्गुण यांचा निरास करण्यासाठी अशी नवतरुणांची सेना जागजागी उभी राहिली पाहिजे, अशी तळमळ त्यांना लागली होती. पारतंत्र्याचा परिपाक म्हणजे दुर्गुणांची वाढ हे जसे खरेच, तसे दुर्गुणांचा परिणाम म्हणजे पारतंत्र्य हेही खरे. त्यामुळे दास्याच्या निर्दालनासाठी उभे राहतानाच नवमूल्यांची स्थापना व संवर्धनही करावे लागते. नवमूल्यांनी समाज प्रज्वलित झाला तर पारतंत्र्याचा अंधार क्षणात नाहीसा होईल. हे राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य तासाभराची सेवा दलाची शाळा करून दाखवील, अशी साने गुरुजींची श्रद्धा होती. 'सेवा दल हा माझा प्राणवायू आहे' असे भावस्पर्शी उद्गार त्यांच्या याच तळमळीतून बाहेर पडले होते.

परंतु काँग्रेस संघटनेतील बडी मंडळी हव्या तेवढ्या उमद्या दृष्टीने सेवा दलाकडे पहात नव्हती. हिंसा – अहिंसा, गांधीवाद – समाजवाद यांसंबंधीच्या काथ्याकुटात या संघटनेची काहीशी उपेक्षाच होत होती. गांधीजींपेक्षाही त्यांचे अनुयायी म्हणवणारे, अहिंसेबद्दल सोवळेपणा दाखवीत होते! 'संघटना

ही स्वभावतःच हिंसेकडे झुकणारी असते' अशा वचनांचा आधार घेतला जात होता. उलट गांधीजी सांगत होते की, "निःशस्त्र लढा करायचा तर अधिक बलवत्तर संघटना असली पाहिजे." खुदाई खिदमतगारांची संघटना त्यांच्यासमोर असे.

साने गुरुजींचे आईचे वात्सल्य त्यामुळे स्वाभाविकच सेवा दलाकडे ओढ घेत असे. सेवा दलाची उपेक्षा करण्याच्या काँग्रेसजनांच्या करंटेपणाने ते अस्वस्थ होत. उद्या स्वातंत्र्याचा लढा आला तर त्यात सर्वस्वार्पणाने पडायला हजारो-लाखो तरुण पुढे आले पाहिजेत; आणि तसे व्हायचे तर सेवा दले गावोगाव उभी झाली पाहिजेत, अशी आंतरिक तळमळ त्यांना होती. स्वातंत्र्याचा महान लढा येणार हे त्यांच्या प्रतिभानेत्रांना दिसत होते. प्रकृती बरी नसतानाही ते चांदवडच्या युवक परिषदेसाठी धावून आले ते या ऊर्मीने. त्या वेळी त्यांचा झंजावाती दौरा जिल्हाभर झाला आणि गावोगावच्या सेवादलांना संजिवनी मिळाली.

चांदवडच्या काँग्रेसवादी युवक परिषदेत अनेक ठराव झाले. त्यांत सर्वांत महत्त्वाचा ठराव सेवा दलाचा होता. त्या ठरावाला पाठिंबा देणारे अतिशय कळकळीचे भाषण साने गुरुजींनी केले. या वेळीं ते असे भावोत्कटपणे बोलले की ऐकणारे आपल्या सर्वेन्द्रियांचे कान करून ऐकत राहिले! सेवा दलाचे त्यांनी रेखाटलेले चित्र अतिशय लोभस आणि भव्य असे होते. नवभारताची घडण करणाऱ्या सेवा दलाची उपेक्षा केल्याबद्दल अनुतापाने अनेकांना शरमिंदे वाटले. त्या वेळी गुरुजींच्या भावनांची तीव्रता अशी काही वाढली, अशा पातळीला पोचली की, त्यांच्या तोंडून शब्द उमटेना. कंठ रुद्ध होऊनच ते खाली बसले. सभा चित्रासारखी तटस्थ बसून राहिली. किती तरी वेळ ती सृजनशील, स्फूर्तिदायक शांतता कायम होती. युवक परिषदेतून लोक परतले ते नवा उत्साह, नवा संदेश घेऊन. सेवा दलाच्या शाखा गावोगाव निर्माण करण्याच्या निश्चयाने.

युवक परिषद आटोपली आणि गुरुजींचे पकड वॉरंट पाठलाग करू लागले! गुरुजींची त्या वेळची भाषणे ज्यांनी ऐकली त्यांना त्यांची अटक

अपरिहार्य दिसू लागली. शेवटी कुलाबा जिल्ह्यातून अटक करून त्यांना नाशिकला आणले. साने गुरुजींच्या मनात सेवा दलाशिवाय दुसरा विचार त्या वेळी नव्हता. नाशिक जिल्ह्यात सर्वत्र चांदवडच्या युवक परिषदेचा संदेश निनादत होता. सेवा दलाच्या कामाला चालना मिळाली होती. सेवा दलाच्या शाखा चालवण्याचे शिक्षण देणाऱ्या कार्यकर्त्यांची मागणी ठिक-ठिकाणाहून येत होती. त्याचबरोबर कॉंग्रेस विरोधकांच्या आक्षेपांनाही तोंड द्यावे लागत होते. महाराष्ट्रातील मध्यम वर्गाचा गांधींना कधीच पाठिंबा मिळाला नाही. हा बोलघेवडा वर्ग गांधीजींना समजून घेण्याऐवजी आपला भूतकाळ कवटाळण्यासाठी त्यांच्या विरोधातच उभा राहिलेला दिसत होता! त्यामुळे इथे कॉंग्रेसविरोधक आपल्या बुद्धिवैभवाच्या गज-मस्तीत, कॉंग्रेस आणि सेवा दल यांच्यावर तुटून पडणार हे उघड होते. खंबीर बौद्धिक बैठक आणि सातत्याने कुमारांना एकत्र करणे या दोन पंखांनीच ध्येयाकाशात सेवा दल भराऱ्या मारू शकणार होते. साने गुरुजींना अटक करून नाशिकला आणले आणि त्या वेळी त्यांना सेवा दलाच्या कार्य-कर्त्यांनी विनवले व सेवा दलाच्या बौद्धिक बैठकीचे विवेचन करणारी ही पत्रे साने गुरुजींनी लिहिली. ह्या पत्रांचे भाग्य असे की, तुरुंगातल्या अनेक सत्याग्रहींनी ती त्या वेळी नकलून घेतली.

ही पत्रे खरे तर त्याच वेळी प्रकाशित व्हायची. त्यांचे हस्तलिखित बाहेर आलेही होते. चारदोन पत्रे छापूनही झाली होती. परंतु एकाएकी त्यांची छपाई थांबली! पुढे राजकीय वातावरण एकसारखे तापत गेले. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याचे आवाहन इतके उलट होत गेले की, आपो-आपच सेवा दलाच्या शाखा फोफावत गेल्या. सरकारी दडपशाही वाढत होती आणि तितक्याच जिद्दीने सेवा दलाच्या रूपाने बाहेरची जागृती टिकवून धरण्याचाही प्रयत्न सुरू होता. साने गुरुजी प्रभृती नेते भूमिगत होऊन कार्य करीत होते. स्वातंत्र्याची भावना प्रदीप्त करणारे त्यांचे लिखाण भूमिगत पद्धतीने सर्वत्र पोचत होते! ‘क्रान्तीच्या मार्गावर’ हे त्यांचे संपूर्ण पुस्तकच सायक्लोस्टाइल होऊन तरुणांच्या हाती पडले होते. आणि ते वाचण्यात, प्रसृत करण्यात अनेकांना बहादुरी वाटत होती. त्या पुस्तकाने न कळतच स्वातंत्र्याच्या ऊर्मी फोफावत होत्या.

साने गुरुजी प्रभृतींना भूमिगत अवस्थेतच अटक झाली, आणि नाशिकच्या तुरुंगात ते स्थानबद्ध झाले. त्यांचा आवडता पुतण्या बसंता तोही तुरुंगात होता. त्याला महाराष्ट्रातील तरुणांच्या जागी कल्पूनच साने गुरुजींनी ही पत्रे लिहिली होती. त्याच्याबद्दल गुरुजींना मोठ्या आशा होत्या. परंतु नियतीने वसंताला उचलून नेले! गुरुजींवर मोठाच आघात झाला. पुढे साने गुरुजी सुटले तोवर देशातले सारे वातावरण पार बदलून गेले होते. स्वातंत्र्य दृष्टिपथात आले होते. वाटाघाटींनी, देवाणघेवाण करून स्वातंत्र्य मिळवण्याकडे काँग्रेस नेत्यांचा कल दिसू लागला होता. त्यामुळे 'श्यामची पत्रे' प्रकाशात आलीच नाहीत. ही पत्रे प्रकाशित करण्याचा उत्साहच साने गुरुजींना राहिला नाही. स्वातंत्र्य मिळाले, पण ते निष्कलंक नव्हते. स्वातंत्र्याच्या उदयकाली अनेकांच्या मनांत वेदना होत्या. संमिश्र भावनेने त्यांनी स्वातंत्र्याचे स्वागत केले.

नेहरू, वल्लभभाई, राजेंद्रबाबू, मौ. आझाद यांनी व्यवहारवादी भूमिका घेतली आणि काँग्रेसने साठ–पासष्ट वर्षे ज्या जीवनमूल्यांची उपासना केली त्या मूल्यांबाबतच काहीशी तडजोडवादी भूमिका स्वीकारली. मुस्लिम लीगवाल्यांच्या अत्याचारी व उद्दाम नेतृत्वाला पायबंद घालण्याचा एकच पर्याय त्यांना दिसू लागला. देशाची फाळणी पत्करूनही देशाचे स्वातंत्र्य हस्तगत करावे, असे काँग्रेसनेत्यांना वाटू लागले. रक्तपाताला आणि जातीय विखाराला संघटित जनशक्तीच्या बळावर तोंड देता येईल, असा आत्मविश्वास त्यांना वाटेना. जातीय दंगे आणि माथेफिरूपणाला बळी पडणारे लोकसमूह काबूत आणायचे तर शासकीय दंडशक्तीच केवळ उपयोगी पडेल असे त्यांना वाटू लागले. जातीयतेची आग काबूत आणायची तर सर्व शासनसत्ता हाती घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते आणि फाळणी हा एकच मार्ग शीघ्र फलदायी होता. काँग्रेस नेत्यांच्या या निर्णयामुळे गांधीजी एकाकी झाले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व स्वातंत्र्यवीरांची आघाडी बनलेल्या काँग्रेस संस्थेचे विसर्जन करून तिचे लोकसेवक संघात रूपान्तर करावे व स्पष्ट अशा कार्यक्रमांच्या आधारे नवे राजकीय पक्ष तयार करावे आणि देशाचे राजकारण चालवावे, अशी गांधीजींची इच्छा होती. देशात निकोप राजकीय जीवन सुरू होण्याच्या दृष्टीने ही गोष्ट आवश्यक होती. परंतु गांधीजींचा हा

निर्देश त्यांच्या एके काळच्या अनुयायांनी मानला नाही. कॉंग्रेस संघटना त्यांनी तशीच चालू ठेवली. त्यामुळे त्या संघटनेला एका निवडणूक-यंत्राचे स्वरूप आले. सत्तासंपादन हे सर्वोपरी मूल्य ठरले. साने गुरुजीं-सारख्यांच्या मनात आदर्श रूपाने वास करणारी कॉंग्रेस नाहीशी झाली! मरताना 'कॉंग्रेस, कॉंग्रेस' असे शब्द आपल्या ओठांवर यावे, अशी आकांक्षा बाळगणारे साने गुरुजी स्वातंत्र्योत्तर कॉंग्रेसबद्दल विरक्त झाले. त्यांच्या लेखी कॉंग्रेस हे मूल्योपासनेचे एक नाव होते, पण आता कॉंग्रेस म्हणजे सत्तास्पर्धेसाठी जमवलेला शंभुमेळा बनला! श्यामच्या ह्या पत्रात कॉंग्रेस ज्या मूल्यांची प्रतीक कल्पिली होती ती कॉंग्रेस त्यांना दिसेना. त्यामुळेही ह्या पत्रांचे प्रकाशन तसेच राहिले. दोन तपे ही पत्रे तशीच अप्रकाशित राहिली!

या पत्रांना दुहेरी महत्त्व आहे असे वाटते. ऐतिहासिक दृष्टीने ही पत्रे महत्त्वाची आहेत. त्या काळाच्या चैतन्यमय वातावरणाचे प्रतिबिंब या पत्रांच्या शब्दाशब्दात पडलेले आहे. साने गुरुजींसारख्यांच्या मनाचा मागोवा ह्या पत्रांतून घेता येतो. दुसरी गोष्ट अशी की, परिस्थितिनिरपेक्ष शाश्वत असेही या पत्रांत काही आहेच. त्या काळातील कॉंग्रेस ही काही मूल्यांच्या उपासनेचे प्रतीक होती. स्वातंत्र्य मिळाले तरी त्या मूल्यांची उपासना केलीच पाहिजे. त्या मूल्यांची आपण उपेक्षा करू तर आजचे स्वातंत्र्य धोक्यात येईल. १९६२ सालच्या चिनी आक्रमणाने व नंतरच्या पाकिस्तानी आक्रमणाने पुन्हा एकदा तीव्रपणे त्या गोष्टीची जाणीव करून दिली आहे. हा देश श्रमनिष्ठ झाला, येथे आर्थिक–सामाजिक समता निर्माण झाली, विज्ञानाचे वरदान मिळवून येथे समृद्धी निर्माण झाली, भावनात्मक एकतेच्या सूत्रात उभा-आडवा हा देश गुंफला गेला तरच या देशाचा तरणोपाय आहे. "विधायक कार्याची परिपूर्ती म्हणजे स्वराज्य" असे गांधीजी म्हणत. देशात राजकीय स्वातंत्र्य आले आहे. पण स्वराज्य निर्माण व्हावयाचे तर अधिक निष्ठेने विधायक कार्य हाती घेतले पाहिजे. त्यामागील विचारांची बैठक व भावना जाणून ते हाती घेतले पाहिजे: भावनांचा स्वातंत्र्यात बहर आला पाहिजे. भावना म्हणजेच कार्याचे बळ असते. बुद्धि दिशा दाखवते, भावना त्या दिशेने अथक घोड-

दौड करण्याची प्रेरणा देतात. भाव-बुद्धीने समृद्ध अशा सेवकांची सेना, स्वयंप्रेरित संस्थांच्या मार्फत नवभारताच्या निर्मितीच्या कार्याला पुढे सरसावून येईल तेव्हाच स्वातंत्र्याचे रक्षण होईल आणि लोकशाही-समाजवादी समाज अस्तित्वात येईल. ह्या पत्रांत हाच संदेश साने गुरुजींनी अतिशय कळकळीने दिला आहे. परिस्थिती बदलली तरी हा भाग अद्यापही अतिशय आवश्यक असाच आहे. सेवा दलांनीच नव्हे तर एकूणच तरुण वर्गाने या पत्रांत अनुस्यूत असलेला हा संदेश घेतला पाहिजे. ह्या पत्रांचे हे महत्त्व ध्यानात घेऊन काहीशी कालबाह्य वाटणारी ही पत्रे आज प्रकाशित केली जात आहेत. अधिक सावधानतेने आणि परिस्थितीचा बदललेला संदर्भ ध्यानात घेऊन ही पत्रे वाचावी, पत्रांतील शब्दांपेक्षा त्यांतील मूलभूत आशयाची अधिक दखल घेतली जावी.

या पत्रांच्या साने गुरुजींच्या हातच्या वह्या मिळू शकल्या नाहीत. त्यांच्या वह्यांवरुन केलेली एक नक्कल हाती आली. ही नक्कल साने गुरुजींनी स्वतः नजरेखालून घातली होती, ही एक त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट.

ही पत्रे प्रकाशित करण्याबाबत गुरुजी अतिशय विरक्त होते. किंबहुना त्यांना ती प्रकाशित होऊ नयेत असेच जणू वाटत होते. वसंताचे निधन आणि बदललेली परिस्थिती हेच त्याचे कारण असावे. परंतु त्यांनी लिहिलेले सर्व साहित्य वाचकांना उपलब्ध असणे इष्ट ठरेल, या कल्पनेने, लेखनानंतर दोन तपांनी आणि गुरुजींच्या निर्वाणानंतर एक तप लोटल्यावर ही पत्रे प्रकाशात येत आहेत.

साने गुरुजींचे धाकटे बंधू व राष्ट्रीय पारितोषिकाचे मानकरी शिक्षक श्री. अप्पा साने यांच्या सहकार्यामुळे ही पत्रे वाचकांना उपलब्ध होत आहेत. त्यांना खास धन्यवाद.

थोड्याशा कालावधीतच पहिली आवृत्ती संपून दुसरी आवृत्ती काढण्याचा योग येत आहे यावरून कालबाह्य वाटणाऱ्या या पत्रांचे मोल किती आहे हे ध्यानी यावे. या आवृत्तीत गहाळ पत्रांचाही समावेश करता येत आहे ही एक समाधानाची गोष्ट– अशी एकूण ७ पत्रे यांत आहेत. वाचक या आवृत्तीचेही स्वागत करतील याची खात्री वाटते.

**प्रकाशक**

# कधी पाहीन मी ते दृश्य बरे !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तू मागे पुण्याच्या त्या सभेच्या वेळेस अकस्मात मला भेटलास. सभा संपली होती. काही तरुण विद्यार्थी माझ्याभोवती जमले होते. त्यांतील बरेचजण केवळ स्वाक्षरीसाठी उत्सुक होते. स्वाक्षरी घेऊन ते गेले. परंतु तू घुटमळत उभा होतास. तुझ्या डोळ्यांत एक प्रकारची उत्कटता होती, उत्सुकता होती. मी तुझ्याकडे पाहात होतो. तू माझ्याकडे पाहात होतास. जणू डोळ्यांआड लपलेले परस्परांचे रूप आपण पाहू इच्छित होतो. तुझी-माझी पूर्वीची ओळख ना देख. परंतु त्या एका क्षणी तुझी-माझी ओळख झाली. कायमची ओळख ! आणि मी तुला प्रश्न केला, " तुम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघात आहात का ? " तू खाली मान घातलीस. तू काही बोलेनास. तुझे डोळे कसे तरी दिसले. आणि थोड्या वेळाने पुन्हा तू वर बघितलेस. त्या बघण्यात किती तरी भाव होते !

तू म्हणालास, " होय. मी त्या संघात आहे. परंतु माझ्यावर रागावू नका. माझी कीव करा. माझी चूक मला आज कळली. तुमच्या व्याख्यानाने नवीन दृष्टी मिळाली. माझा एकांगीपणा गेला."

तुझे ते शब्द ऐकून मी सद्गदित झालो होतो. तुझा हात मी हातात घेतला. तुझ्याकडे आशावादी दृष्टीने मी पाहिले. तुझ्या पाठीवरून मी हात फिरविला व म्हटले " वसंत, आता माझ्या काँग्रेसच्या झेंड्याखाली ये. तू काँग्रेसचा हो. तिची सेवा कर; भक्ती कर. काँग्रेसची सेवा म्हणजे भारताची

सेवा. भारताची पवित्र परंपरा जर कोणी चालवीत असेल, त्या परंपरेतील चांगले घेऊन जर कोणी पुढे जात असेल तर ती काँग्रेस होय. भारताचा आत्मा जर कोणी ओळखला असेल तर तो काँग्रेसने. भारतीय इतिहासातील सोनेरी धागा हाती घेऊन जर कोणी नवीन इतिहास घडवीत असेल तर ती काँग्रेस होय."

वसंता, त्या सभेनंतर तुझी-माझी भेट परत झाली नाही. तुझा पत्ता मिळेना. परंतु तू माझ्या डोळ्यांसमोर अनेकदा येत असस. आणि आज अकस्मात पत्र मिळाले. जणू हरवलेले निधान सापडले. पत्र वाचून किती आनंद झाला! तुझी मूर्ती पुन्हा डोळ्यासमोर आहे असे वाटले. तू राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सोडून दिलास, हे वाचून अपार समाधान झाले. भ्रामक जाळ्यातून मुक्त झालास. डबक्यातून बाहेर पडलास. मला भीती वाटत होती. हा दिलदार व उदार वृत्तीचा तरुण मुलगा जातीय चिखलात फसतो की काय, अशी शंका मनात येई. परंतु तुझी ती त्या वेळची कावरी-बावरी वृत्ती आठवून पुन्हा वाटे की हा तरुण सत्पथावर येईल. मी ईश्वराची प्रार्थना करीत असे की माझा वसंत संकुचित वृत्तीचा न होवो. देवाने का ती प्रार्थना ऐकली?

वसंता, मी देवाची एकच प्रार्थना करीत असतो की "या देशातील तरुणांस सद्बुद्धी दे. अखंड भारताचे सारे सच्चे उपासक होवोत. हिंदु-मुसलमान एक होवोत. क्षुद्र भेद नष्ट होवोत. तरुण लोक अनुदार व संकुचित वृत्तीचे न होवोत. माझ्या काँग्रेसला यश येवो. कारण ती सर्वांचे कल्याण करू पाहात आहे. तिच्या झेंड्याखाली नवभारत उभा राहू दे आणि जगाचे डोळे दिपू देत."

तू राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सोडलास एवढ्याने तुझे कर्तव्य पुरे झाले असे नाही. आपण वाइटाचा त्याग केलाच पाहिजे. परंतु त्याचबरोबर सत्कर्माचाही आरंभ केला पाहिजे. तू संघ सोडलास; ठीक. परंतु एवढ्याने भागणार नाही. पूर्वी तू ज्या तळमळीने संघाची सेवा करीत होतास, त्याच तळमळीने तू आता काँग्रेसची सेवा कर. तू म्हणशील, मी कोणती सेवा करू? सेवा अनेक प्रकारची पडली आहे. महात्मा-

जींनी सेवेची अनेक क्षेत्रे उघडी केली आहेत. त्या महापुरुषाने जीवनाच्या सर्व क्षेत्रांत प्रकाश पाडला आहे. ख्रिस्त एकदा लोकांना म्हणाला, "अरे इकडे या. कोळी जाळे टाकतो व मासे पकडतो. परंतु मी माणसे पकडतो. माणसे कशी पकडावी ते मी दाखवतो, या इकडे." महात्माजी जणू तसे सांगत आहेत. त्या महापुरुषाच्या प्रतिभेला अंत नाही. नवीन नवीन कामे, नवीन नवीन उद्योग ते दाखवीतच आहेत. हे काम नसेल आवडत तर ते घ्या असे ते सांगत आहेत. खादीचे काम घ्या; हरिजनसेवा करा; साक्षरता-प्रसार हाती घ्या; स्वच्छतेचे धडे द्या; राष्ट्रभाषा सर्वत्र न्या; हिंदु-मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते बना; दारुबंदी करा; ग्रामोद्योग उचला; मधुसंवर्धन विद्या शिका; वर्धा शिक्षण पद्धतीचे प्रयोग करा; शेतकऱ्यांची- कामगारांची काँग्रेसला अविरोधी अशी संघटना करा. एक का दोन, अनेक कामे आहेत.

परंतु वसंता, यांतील एखादे काम घेऊन तू बसावेस असे सध्या मला वाटत नाही. महात्माजींनी सेवेची अनेक क्षेत्रे दाखविली आहेत. परंतु सेवकांची उणीव आहे. आपापल्या आवडीची सेवेची कामे उचलतील असे हजारो तरुण दृष्टीस पडत नाहीत. सेवकांचा पुरवठा कसा होईल हा माझ्यासमोर प्रश्न आहे. आज काही कष्टाळू थोर सेवक ठायी ठायी ही सेवेची कामे करीत आहेत. सेवेचे स्थिर असे नंदादीप ठायी ठायी लावीत आहेत. ती महत्त्वाची गोष्ट आहे यात शंका नाही. जनतेत सेवेच्या द्वाराच सर्वांनी गेले पाहिजे. समज, एखाद्या जिल्ह्यात दहा कार्यकर्ते दहा ठिकाणी कोणती तरी एक सेवा हाती घेऊन तेथे पाय रोवून उभे आहोत. याचा काय परिणाम होईल? मी एका खेडेगावात एक काम घेऊन बसलो आहे. रोज लोकांशी संबंध येत आहे. मी त्यांच्यात उठत आहे, बसत आहे. आजारीपणात सेवा करीत आहे. मुलांना शिकवीत आहे. अन्यायाची दाद लावीत आहे. तर हळूहळू माझ्याभोवती पाचपन्नास माणसे निष्ठेची जमा होतील. त्यांचे माझे निकट संबंध येतील. एक भ्रातृमंडळ जणू निर्माण होईल. आणि उद्या चळवळ झाली तर माझ्या पाठोपाठ ही सारी मंडळी येईल. मी म्हणजे पन्नास माणसे, दहावीस कार्यकर्ते जिल्ह्यात असतील तर त्यांच्या पाठी-

मागे हजार सेवक, हजार सैनिक उद्या येतील. महाराष्ट्रात असे शंभर कार्यकर्ते जर स्थिरतेने कार्य करतील तर दहा हजारांची सत्याग्रही सेना ते उभी करतील. अर्थात हे शंभर सेवक निष्ठेने निरहंकारपणे सेवा करीत राहिले तर.

असे सेवक ही मोठी शक्ती आहे. परंतु सेवेला सर्व वेळ देणाऱ्या अशा सेवकांना साथ द्यायला शेकडो हजारो दुय्यम सेवक उभे राहिले पाहिजेत. सेवेचे वातावरण, सेवेचा ध्यास, ध्येयवादित्वाची हवा, राष्ट्रीयत्वाचा विचार सर्वत्र नुसता भरून राहिला पाहिजे. आणि हे कशाने होईल ?

सेवा दलासारख्या संस्थेच्या प्रसाराने हे कार्य होईल असे वाटते. कॉंग्रेसच्या सेवा दलाची प्रचंड संघटना उभी केली पाहिजे. सेवा दल सर्वत्र सेवेची आवड उत्पन्न करील. खेळ खेळता खेळता, कवाइत करता करता राष्ट्रीयत्वाची अमर भावना सर्वांना शिकवील. आपण काही तरी फावल्या वेळात केले पाहिजे, ही भावना सेवा दल सर्वांच्या मनावर बिंबवील. सेवा दल सेवकांचा पुरवठा करील. आणि मुख्य म्हणजे व्यापक व उदार अशी खऱ्या राष्ट्रीयत्वाची कल्पना नवतरुणांच्या मनात रुजवील, नवीन तरुणांच्या हृदयांत शुद्ध राष्ट्रीयतेची सर्वसंग्राहक अशी विशाल दृष्टी नसेल तर उद्या नवभारत कसा उभा रहाणार ?

वसंता, म्हणून तुला मी कॉंग्रेसच्या सेवा दलास वाहून घे, असे सांगत आहे. तू राहतोस तेथे नाही ना शाखा ? कर सुरू. आरंभी अडचणी येतील. मुले मिळणार नाहीत. परंतु अडचणीतूनच जावे लागते. आपल्या श्रद्धेची अशा वेळेसच कसोटी असते. श्रद्धेचे चार लोक एकत्र आले तर ते शेवटी जगाला भारी होतात. विवेकानंद म्हणत असत, " मला श्रद्धेची एक हजार माणसे द्या. सिंहाच्या छातीची एक हजार माणसे द्या. साऱ्या हिंदुस्थानचा मी कायापालट करून दाखवितो. "

जगांत ज्यांनी ज्यांनी प्रचंड संघटना केल्या, त्या काही एकदम नाही उभ्या राहिल्या. मोठी कार्ये हळूहळूच वाढतात. दोनतीन मुली

घेऊन कर्मवीर कर्वे यांनी स्त्रीशिक्षणास आरंभ केला. आज स्त्रियांचे विद्यापीठ उभे आहे! श्रद्धेचा मनुष्य उभा राहतो. ध्येयावर दृष्टी ठेवून पहिले पाऊल टाकतो! महाराष्ट्रातील इतिहास-संशोधक मंडळ आहे ना? आज त्याचा व्याप खूप वाढला आहे. परंतु ते स्थापन करताना एकटे राजवाडेच होते! तेच अध्यक्ष, तेच चिटणीस, तेच सर्व काही. एके दिवशी विश्वनाथ काशिनाथ राजवाडे एका खोलीत बसले, आणि इतिहाससंशोधक मंडळ त्यांनी सुरू केले! त्यांनी त्या दिवशी एक निबंध वाचला. त्यांनी स्वतःच तो ऐकला. ऐकायला दुसरे कोण होते? तेथील भिंती होत्या. आणि ज्या पूर्वजांनी पराक्रमी व वैभवशाली इतिहास निर्माण केला ते स्वर्गस्थ पूर्वज कदाचित गुप्त रूपाने तेथे येऊन ऐकत असतील. वसंता, श्रद्धेची माणसे अशा रीतीने कर्मप्रवृत्त होत असतात. अरे, दह्याचा एकच थेंब, परंतु तो मणभर दुधाचे दही करतो! परंतु तो थेंब आंबट हवा. त्याप्रमाणे कडव्या वृत्तीचा, अढळ श्रद्धेचा, एकच मनुष्य, परंतु तो सर्वांना वेड लावतो, ध्यास लावतो, ध्येयाकडे खेचतो.

वसंता, तू करशील का सेवा दल सुरू? काँग्रेसच्या सेवा दलात हजारो लाखो तरुण मी कधी बरे पाहीन? हाच एक ध्यास मला आहे. माझ्या काँग्रेसला कोणत्याही बाबतीत कमीपणा नसावा. 'तुमच्या काँग्रेसच्या सेवा दलात किती तरुण आहेत?' असा जर कोणी प्रश्न विचारला तर 'लाखो' असे उत्तर देता आले पाहिजे. परंतु असे कधी होईल, खरेच कधी बरे होईल?

काँग्रेसचा आज साठ वर्षांचा इतिहास आहे. काँग्रेसचा इतिहास हे पुस्तक तू वाचले असशील. आरंभी काँग्रेस किती लहान होती, परंतु ती आज किती महान झाली आहे! इतक्या वर्षांत काँग्रेसने स्वयंसेवक दले स्थापण्याचे प्रयत्न का कधी केले नाहीत? केले. असे प्रयत्न अनेकदा केले. परंतु परकी सरकारचा पुनःपुन्हा या संघटनावर रोष होई. पुनः-पुन्हा या संघटना नष्ट होत. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळेस १९०६ ते १९०८ सालच्या काळात स्वयंसेवक दले स्थापण्याचे पहिले प्रयत्न झाले.

व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालचे दोन तुकडे केले म्हणून प्रचंड चळवळ सुरू झाली होती. त्याच काळात जपानने रशियाचा पराभव केला होता. आज जपान म्हणजे सत्तान्ध असे एक सैतानी राष्ट्र झाले आहे. परंतु त्या वेळच्या जपानी विजयाने पौर्वात्य देशात एक प्रकारचे नवजीवन संचरले. आपणही पाश्चिमात्यांचा पराजय करू शकू, असा आत्मविश्वास आला. हिंदी चळवळीवर जपानी विजयाचा असाच परिणाम झाला. एक प्रकारचे नवतेज राष्ट्रात आले. बंगालमध्ये पुलिनबाबूंनी तरुणांची मोठी संघटना उभी केली. पुलिनविहारी उंच होते. त्यांचे डोळे अत्यंत तेजस्वी होते. ते शिंग फुंकीत, बिगुल वाजवीत ते दहा मैलांवर ऐकू जाई ! महाराष्ट्रातही त्या वेळेस कवायती सुरू झाल्या होत्या. परंतु सरकारी दडपशाहीचा वरवंटा फिरू लागला. साऱ्या कवायती थांबल्या. साऱ्या संघटना बेकायदेशीर ठरविण्यात आल्या.

त्यानंतर १९२० चा काळ आला. महात्माजींची पहिली असहकाराची चळवळ सुरू झाली. शाळा-कॉलेजे सोडून विद्यार्थी बाहेर पडले. विदेशी मालावर विरोध करण्याकरता स्वयंसेवक पथके उभी राहू लागली. सरकारने स्वयंसेवक दले बेकायदा ठरवली तेव्हा काँग्रेसने " स्वयंसेवक दलात सर्वांनी सामील व्हा " असा आदेश दिला. स्वयंसेवकांना तुरुंगातून डांबण्यात आले. बावीस हजारांवर लोक तुरुंगात गेले ! काही ठिकाणी फटकेही मारण्यात आले. आणि पुढे नागपूरचा झेंडा सत्याग्रह सुरू झाला. त्यासाठी सर्व हिंदुस्थानातून स्वयंसेवक येऊ लागले. अशा या चळवळीतून संघटना उभी राहात होती. परंतु तिला व्यवस्थित स्वरूप नव्हते.

स्वयंसेवकदलास संघटित स्वरूप देण्याचे काम डॉ. हर्डीकर यांनी प्रथम सुरू केले. डॉ. हर्डीकर पूर्वी अमेरिकेत होते. तेथे लाला लजपतराय यांचे ते सहकारी होते. हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी ही तरुण संघटना हाती घेतली. हर्डीकर व हिंदुस्थानी सेवा दल यांचा अविभाज्य असा संबंध आहे. ही संघटना वाढत असतानाच हिंदुस्थान स्वराज्यास लायक आहे की नाही हे पाहण्याकरिता सायमन कमिशन हिंदुस्थानात आले. १९१७-१८

मध्ये ज्या वेळेस मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा प्रथम जाहीर झाल्या, त्या वेळेस दर दहा वर्षांनी हिंदुस्थानच्या लायकीची परीक्षा घ्यायची असे ब्रिटिश पार्लमेंटने ठरविले होते! हिंदुस्थान स्वराज्यास लायक आहे की नाही हे का ब्रिटिशांनी ठरवावयाचे? एडमंड बर्क म्हणून एक मोठा ब्रिटिश मुत्सद्दी होऊन गेला. त्याने सरकार चांगले की वाईट हे ठरविण्याच्या दोन कसोट्या सांगून ठेविल्या आहेत—

१ देशाचे उत्पन्न वाढले असेल व जनतेची आयुर्मर्यादा वाढली असेल तर ते सरकार चांगले.

२ देशाचे उत्पन्न घटले असेल व आयुर्मर्यादा कमी झाली असेल तर ते सरकार वाईट.

हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीस ही कसोटी आपण लावून पाहू तर काय दिसेल? लोकांचे सरासरी उत्पन्न दीड ते दोन आणे आहे. आणि हिंदुस्थानातील सरासरी आयुर्मर्यादा २२ वर्षांची आहे. एडमंड बर्क म्हणे, "हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवट कुचकामी आहे!"

आणि इतर अनेक दृष्टींनी पाहू तरी हेच दिसेल. धंदे बुडाले. बेकारी वाढली. कर वाढले. भांडणे व भेद माजले. शेकडा ९० लोक निरक्षर. असा हा ब्रिटिशांनी निर्मिलेला हिंदुस्थान आहे! आणि अशांनी पुन्हा हिंदुस्थान स्वराज्यास लायक आहे की नाही हे पहायला येणे म्हणजे दुःखावर डागणी देणे होते. जखमेवर मीठ चोळणे होते.

सायमन कमिशनवर कॉंग्रेसने बहिष्कार घातला. काळी निशाणे हातांत घेऊन "सायमन, चालते व्हा" अशा घोषणा करीत प्रचंड मिरवणुका निघाल्या. लाला लजपतराय, जवाहरलाल, गोविंद वल्लभ पंत अशासारख्यांवर लाठ्यांचे हल्ले झाले. लालाजी या मारानेच पुढे मरण पावले. ते म्हणाले, "माझ्यावर पडलेला प्रत्येक घाव म्हणजे ब्रिटिश सत्तेच्या शवपेटिकेला ठोकलेला खिळा होय!" देशात पुन्हा चैतन्य आले. आणि पुढे कॉंग्रेसने स्वातंत्र्याचा ठराव केला. १९३० च्या २६ जानेवारीस सर्व हिंदुस्थानभर हा स्वातंत्र्यदिन पाळला गेला. तेव्हापासून आपण दर वर्षी तो पाळतो. आणि पुढे महात्माजींनी दांडी-यात्रा सुरू

केली. त्यांनी मिठाचा कायदेभंग केला. हिंदुस्थानभर कायदेभंग सुरू झाला. ठिकठिकाणी सत्याग्रही छावण्या सुरू झाल्या. तेथे कवायती होऊ लागल्या. डॉ. हर्डीकरांच्याजवळची शिकलेली मंडळी सर्वत्र उपयोगास आली. पुढे १९३१ च्या प्रारंभी सरकारने कॉंग्रेसजवळ मिळते घेतले. आणि ३१ च्या कराची कॉंग्रेसनंतर स्वयंसेवक दलास पुन्हा जोर चढला! डॉ. हर्डीकर, जवाहरलाल वगैरेंनी पुढाकार घेतला. कवायतीची हिंदी भाषा ठरली. महाराष्ट्रातील काही तरुण कर्नाटकात डॉ. हर्डीकर यांच्या छावणीत शिक्षण घेण्यासाठी गेले. पुढे ३१ च्या डिसेंबरात विलेपार्ले येथे सेवा दलाची छावणी सुरू झाली. परंतु इतक्यात महात्माजी इंग्लंडहून मुंबईस आले. लगेच त्यांना अटक झाली. आणि या छावणीतील सैनिक त्वरेने आपापल्या जिल्ह्यात परत गेले. स्वयंसेवक दले पुन्हा बेकायदा झाली.

१९३४ पर्यंत कॉंग्रेसचा लढा सुरू होता. नंतर लढा थांबला. पुढे १९३६ मध्ये फैजपूर येथे कॉंग्रेस भरायची होती. तिच्यासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी स्वयंसेवक तयार करावे लागले. पुढे कॉंग्रेस मंत्रिमंडळे आली. स्वयंसेवक दलांची संघटना आता वाढेल असे वाटले. ह्या काळात कॉंग्रेसने जर निष्ठेने व आपुलकीच्या भावनेने ही संघटना हाती घेतली असती तर किती छान झाले असते! संयुक्त प्रान्तात एक लक्ष कॉंग्रेस स्वयंसेवक तयार करण्याची योजना केली गेली. परंतु महाराष्ट्रात काय होते? आमच्याकडे चालू झालेली स्वयंसेवक दलेही थंडावली. याचे कारण काय?

पुण्यासारख्या शहरातून कॉंग्रेसची स्वयंसेवक दले सुंदर रीतीने सुरू झाली होती. परंतु एक गोष्ट होती. ही स्वयंसेवक दले चालविणारे कार्यकर्ते पुष्कळ वेळा समाजवादी असत. महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांस या गोष्टीची भीती वाटली. ही तरुण संघटना पुढेमागे समाजवादी तरुणांच्या हाती जाईल, असे त्यांना वाटले. अशी समाजवादी संघटना काय कामाची? यापेक्षा संघटना नसली तरी चालेल, असे त्यांना वाटले. स्वयंसेवक दलास उत्तेजन देण्याचे त्यांनी बंद केले. परंतु

तरुणांना—विद्यार्थ्यांना कोणती तरी संघटना हवी होती. कवाईत, खेळ, एकत्र येणे, गणवेश, बँड या गोष्टी त्यांना आकर्षित होत्या, आणि या गोष्टी जेथे त्यांना दिसल्या तेथे ते जाऊ लागले. काँग्रेसची सेवा दल संघटना जवळ जवळ बंद पडली आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या जातिनिष्ठ संघटना फोफावल्या. महाराष्ट्रातील काँग्रेसचे सूत्रधार भ्रमात राहिले. जातीय संघटना वाढत होती तरी त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. काँग्रेसच्या सेवा दलात समाजवाद थोडा फार आला असता तर काय बिघडले असते? जातीयवादापेक्षा का समाजवाद वाईट आहे? काँग्रेस हळूहळू समाजवादाकडेच जात आहे. महात्माजींनीसुद्धा एके ठिकाणी लिहिले, "या वरिष्ठ वर्गांना मी कंटाळलो. त्यांच्या बाबतीत मी निराश झालो. ब्रिटिशांचे ते आधारस्तंभ आहेत. ते आपले हे स्वरूप सोडतील अशी आशा नाही. तेव्हा या पुंजीपतींच्या स्तंभाखालची आधारभूत अशी बहुजनसमाजाची शक्ती ती आता मी उठवतो, म्हणजे ब्रिटिशांचे हे हिंदी आधारस्तंभ कोलमडून पडतील व ब्रिटिश सत्ताही गडगडेल."

काँग्रेस हळूहळू का होईना समाजवादाकडेच जात आहे. जवाहरलालां-सारखे पुढारी हे सांगत आहेत. महात्माजींनी एकदा त्रावणकोर दरबारला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते की, "सर्वच्या सर्व समाजवाद काही वाईट नाही." तसेच श्री. महादेवभाईंनी एकदा हरिजनमध्ये लिहिले होते की, "उद्या समजा निवडणुका आल्या; जमीनदारी नष्ट करू; जमीन वाटून देऊ; मोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करू, असा निवडणुकीचा जाहीरनामा जाहीर करून जर एखाद्या पक्षाने निवडणुकीत बहुमत मिळविले व पुढे कार्यक्रमाप्रमाणे तो पक्ष कायदे करू लागला तर त्यात आक्षेपार्ह काय आहे?"

वसंता, आजच या पत्रात मी फार खोल जात नाही. सांगायचे एवढेच की, महाराष्ट्रात समाजवादाच्या भ्रामक भीतीने काँग्रेसच्या चालकांकडून सेवा दल संस्थेची उपेक्षा केली गेली. परंतु आज जातीय संघटनेचा शहरोशहरी प्रचंड जोर पाहून महाराष्ट्रातील काँग्रेस कार्य-कर्त्यांची दृष्टी निवळली आहे आणि सेवा दलाकडे पुन्हा लक्ष दिले

जात आहे. भाई एस्. एम्. जोशी या कामासाठी सर्वत्र हिंडू फिरू लागले आहेत. सेवा दलाच्या छावण्या ठायी ठायी सुरू होत आहेत. शिक्षण दिले जात आहे. ही संघटणा वाढणार, फोफावणार असे माझ्या दृष्टीस दिसत आहे.

वसंता, तूही आरंभ कर. तुझ्या भोवती तरुण जमतील. तुझ्यात तो गुण आहे. तू दुसऱ्यांची मने ओढून घेशील. तू मनमिळाऊ आहेस. बोलका आहेस. गोष्टी सांगतोस. गाणी म्हणतोस. दुसऱ्यांच्या उपयोगी पडतोस. तुझे सेवा दल उत्कृष्ट चालेल.

आणि मरतुकडे सेवा दल नको. सेवा दलास सर्व काही हवे. बँडही हवा. मुलांना हे सारे हवे असते. यासाठी पैसे हवेत. कोठून आणायचे पसे ? सारी सोंगे आणता येतात, परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही. मला पुष्कळ वेळा वाटते की, २६ जानेवारीला आपण स्वातंत्र्य-दिन पाळतो. त्या दिवशी हजारो ठिकाणी आपण सभा घेतो. त्या सभांतून त्या दिवशी सेवा दलासाठी मदत गोळा करावी. आधी जाहीर करून ठेवावे की प्रत्येकाने जास्तीत जास्त मदत सेवा दलासाठी आज आणावी. एक चादर पसरून ठेवावी. सर्वांनी तिच्यावर आणलेली मदत टाकावी. किंवा सेवा दल स्थापनेचा दिवस पाळावा. आणि त्या दिवशी दलातील प्रत्येकाने जास्तीत जास्त मदत आणून द्यावी. काँग्रेसच्या सेवा दलाविषयी ज्यांना ज्यांना म्हणून आपलेपणा वाटत असेल त्या सर्वांनी त्या दिवशी देणगी द्यावी. काँग्रेसविषयी जनतेत अपार श्रद्धा आहे. स्वातंत्र्यासाठी पुनःपुन्हा वनवास भोगणारी, आगीतून जाणारी थोर काँग्रेस संस्था ! त्या काँग्रेसचेच सेवा दल हे अत्यंत महत्त्वाचे असे एक अंग आहे. हे अंग अतःपर मरता कामा नये. त्याची उपेक्षा होता कामा नये. जनतेने सेवा दल मरू देऊ नये. ते वाढीस लावावे. पालकांनी या सेवा दलातच मुले पाठवावी. मदत द्यावी. होईल, असे होईल. "सत्य संकल्पाचा दाता भगवान ! " ही माझी श्रद्धा आहे. सेवा दल वाढणार यात शंका नाही. महाराष्ट्रभर ठायी ठायी सेवा दलाच्या शाखा होणार. माझ्या डोळ्याला ते दिव्य दृश्य दिसत आहे. खरी निर्दोष राष्ट्रीयता सर्वत्र जाईल. जातीयतेचा अंधार दूर होईल.

वसंता, आज पुरे. किती तरी वेळ हे पत्र मी लिहीत आहे. बाहेर बरीच रात्र झाली आहे. दूरच्या स्टेशनावरील घंटा ऐकू येत आहे. जणू दूर असलेल्या ध्येयाची हाकच कानी येत आहे. ऊठ, कामास लाग, असे जणू ती सांगत आहे. ज्याला ध्येयाची हाक ऐकू येते तो धन्य होय. ती हाक ऐकून जो कार्यार्थ प्रवृत्त होतो, त्या ध्येयाला गाठण्यासाठी सर्वस्व द्यायला तयार होतो, तो धन्यतर होय. वसंता, तू असा एक ध्येयार्थी तरुण हो. तू होशील अशी मला आशा आहे. आणखी काय लिहू ? तुझ्या सर्व लहान मोठ्या मित्रांस माझे सप्रेम प्रणाम.

तुझा
**श्याम**

पत्र दुसरे

# भारताला महान प्रयोग करायचा आहे !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तू सेवा दलाची लहानशी का होईना शाखा सुरू केलीस, हे वाचून किती तरी आनंद झाला ! तुझ्या पत्राची मी वाटच पाहात होतो. परंतु काही तरी प्रत्यक्ष कार्यास आरंभ केल्याशिवाय उगीच कशाला लिहा पत्र, असे जे तू मनात ठरविले होतेस त्यामुळे आतापर्यंत तुझे पत्र आले नाही. खरे आहे. आपण खंडीभर चर्चा करतो; परंतु प्रत्यक्ष कार्य आरंभणे सदैव दूरच राहते. तू तसा नाहीस ही चांगली गोष्ट आहे.

सेवा दलातील मुले तुला नाना प्रकारचे प्रश्न विचारतात. त्या मुलांना वाचून दाखविण्यासाठी तुला काही हवे आहे. तू या गोष्टीची मागणी केली आहेस. वसंता, मी तसे फार वाचलेले नाही. कोणत्या विषयाचा गाढ अभ्यास मी केलेला नाही. बहुधा खेडेगावातून हिंडत असल्यामुळे शहरातील बौद्धिक वातावरणाशी माझा संबंध येत नाही. नवीन नवीन ग्रंथ पाहावयास मिळत नाहीत. थोर थोर पुढाऱ्यांचा प्रत्यक्ष परिचय मला नाही. वादविवाद, चर्चा फारशा ऐकल्या नाहीत. या अशा परिस्थितीमुळे मी विचारांची मोलवान भेट तुला कशी पाठवणार? माझी तितकी लायकी नाही. परंतु जे लायक आहेत ते जोपर्यंत स्वस्थ आहेत तोपर्यंत माझ्यासारख्यांनींच जे थोडेफार देता येईल ते दिले पाहिजे. माझ्याजवळ ज्ञान फारसे नाही. परंतु या देशाचे भले व्हावे असे सारखे वाटते. तरुणांनी उदार व थोर दृष्टीचे व्हावे असे फार वाटते. ही जी

तळमळ, तिच्यामुळे जे काही मला सुचेल, स्फुरेल ते मी तुला लिहीत जाईन.

मला एक लहानसा सुंदर पक्षी समोर दिसत आहे. त्याचे निळसर पंख आहेत. तो आकाशात उडत आहे. स्वच्छ हवा व प्रकाश लुटीत आहे. वसंता, मीही त्या पक्ष्याप्रमाणे आहे. कॉंग्रेसच्या ध्येयाच्या निर्मळ आकाशात माझा आत्मा उड्डाण करीत असतो. तसे पाहिले तर कॉंग्रेस या संस्थेत का दोष नसतील ? संस्था या व्यक्तींच्याच असतात. व्यक्तींचे गुणदोष संस्थेतही येतात. मी व्यक्तींच्या गुणदोषांकडे फारसे बघत नाही. त्या गुणदोषांच्या पाठीमागे संस्थेचा जो ध्येयवाद असतो, त्याच्याकडे माझी दृष्टी असते. ते ध्येय म्हणजे संस्थेचा खरा आत्मा. संस्था ज्याच्यासाठी जन्मली व ज्याच्यासाठी मरणार ते त्या संस्थेचे ध्येय.

कॉंग्रेस कशासाठी जन्मली ? या हिंदुस्थानचा संसार सुखाचा करावा म्हणून. आरंभी आरंभी कॉंग्रेसच्या समोर ध्येयाची सुस्पष्ट अशी कल्पना नव्हती. परंतु आपण जसजसे उंच जातो, तसतसे अधिक दूरचे दिसू लागते. कॉंग्रेस अशा रीतीनेच स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे आली. काही क्षुद्र लोक विचारीत असतात की तुमच्या कॉंग्रेसने काय केले ? परंतु आईने मुलासाठी काय केले असे विचारण्यासारखेच हे आहे. कॉंग्रेस जणू लोकमाता आहे. आई ज्याप्रमाणे मुलाला पाजते, पोसते, त्याला चालावयास बोलावयास शिकविते, त्याप्रमाणे कॉंग्रेसने केले आहे.

ब्रिटिशांच्या अमदानीत हिंदुस्थानचे सर्वांत मोठे नुकसान कोणते झाले असेल तर ते हे की, राष्ट्राचा आत्माच जणू मेला. आपण केवळ भेकड बनलो. एक पोलीस पाटील साऱ्या गावाला जरबेत ठेवतो. एखादा पोलीस दिसताच सारे घाबरतात. कॉंग्रेसने ही वस्तुस्थिती बऱ्याचशा अंशाने दूर केली आहे. राष्ट्रात आज किती तरी निर्भयता आली आहे. कॉंग्रेसने ज्या प्रचंड चळवळी केल्या त्यामुळे हे झाले आहे.

१९०४–५ सालापर्यंत कॉंग्रेसने प्रत्यक्ष अशी चळवळ कधी केली नव्हती. परंतु कर्झन साहेबांनी बंगालचे तुकडे केले; आणि या वंग-

भंगामुळे बंगाली जनता जागृत झाली. रवीन्द्रनाथांसारखे महाकवी राष्ट्रगीते निर्मू लागले. वंदे मातरम्‌चा मंत्र घोषिला जाऊ लागला. १९०५ मधल्या बनारस येथे भरलेल्या काँग्रेसचे नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे अध्यक्ष होते. गोखले नेमस्त पक्षाचे. परंतु त्यांनीही आपल्या भाषणात करबंदीची चळवळही सनदशीर असते अशी घोषणा केली! त्यामुळे टाइम्स गोखल्यांच्यावर रागावला होता. आणि पुढे १९०६ साली कलकत्ता काँग्रेस झाली. महर्षी दादाभाई नौरोजी अध्यक्ष होते. आणि 'स्वराज्य' हा शब्द जन्माला आला. कलकत्ता काँग्रेसने ध्येय दिले व साधने दिली. स्वराज्य हे ध्येय; आणि स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही साधने. या चार गोष्टींना चतुःसूत्री असे म्हणतात. स्वदेशीची देशभर प्रचंड लाट उसळली. परंतु बहिष्काराचे काय? बहिष्कार म्हणजे परकी मालावर बहिष्कार एवढाच का अर्थ? तो अर्थ तर स्वदेशीत यतोच. बहिष्कार म्हणजे सरकारवर बहिष्कार, म्हणजे संपूर्ण असहकार. महात्मा गांधींनी पुढे जो असहकार सांगितला तोच लोकमान्य टिळक बहिष्कार या शब्दांत पहात होते. सरकारी गाडा संपूर्णपणे बंद पाडणे. परंतु लोकमान्यांचा हा अर्थ पुष्कळांना मानवेना, रुचेना, पचेना. कोणी म्हणू लागले, बंगालच्या बाबतीत सरकारने अन्याय केला आहे तर बंगालनेच फक्त बहिष्कार हाती घ्यावा. परंतु ही संकुचित दृष्टी लोकमान्यांना कशी सहन होणार? त्यांनी खणखणीतपणे सांगितले की, "बंगालचे दुःख सर्व हिंदुस्थानचे आहे!" हिंदुस्थानात सरकारी अन्याय कोठेही होवो, त्याची सर्व हिंदी राष्ट्रास चीड आली पाहिजे. पायाला काटा बोचला तर डोळ्यांना टचकन पाणी येते. डोळा असे म्हणत नाही की मी पायांपासून दूर आहे, तर कशाला रडू? हात असे म्हणत नाहीत की खाली वाकून आम्ही तो काटा कशाला काढू? साऱ्या देहात एकच प्राण असतो. एकच रक्त खेळत असते. त्याप्रमाणे सर्व राष्ट्रात एकात्मतेची खरी जाणीव हवी. लोकमान्य अशा व्यापक अर्थाने पहात होते. "अशा व्यापक दृष्टीने पहा, खऱ्या राष्ट्रीय दृष्टीने पहा." अशी शिकवण ते देत होते.

बंगालचे दुःख दूर होईना. त्यामुळे तरुण लोक दहशतवादाकडे वळले. बाँब, पिस्तुले यांचे आवाज होऊ लागले. हुतात्मे फाशी जाऊ लागले. लोकमान्य टिळकांनाही सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली! कॉंग्रेसमध्ये चैतन्य राहिले नाही. दहशतवादही थंड पडला. आणि १९१४ मध्ये ते महायुद्ध आले. त्या वेळेस देशात गदर चळवळ झाली. गदर म्हणजे बंड. देशाला स्वतंत्र करण्याचा काही उत्कट वृत्तींच्या देशभक्तांचा तो प्रयत्न होता. अनेक तरुण हुतात्मे झाले. महाराष्ट्रातील समर्थ विद्यालयाचा विद्यार्थी श्री. विष्णु गणेश पिंगळे या गदर चळवळीतच फाशी गेला!

आणि लोकमान्य टिळक सुटले. त्यांनी व डॉ. ॲनी बेझंट यांनी स्वराज्याची चळवळ सुरू केली. सरकार अडचणीत होते. 'लौकरच सुधारणा देणार आहोत' असे सरकारने जाहीर केले. कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांचे ऐक्य झाले. कॉंग्रेसचे शिष्टमंडळ विलायतेस गेले. परंतु सुधारणेचे असे वातावरण सर्वत्र असतानाच सरकारने एक नवीन कायदा केला. त्याला रौलेट बिल असे म्हणतात. महायुद्धाच्या काळात बंगालमधील शेकडो तरुण सरकारने विनाचौकशी डांबून ठेवले होते. शेवटी सरकारने एक चौकशी कमिटी नेमली. या कमिटीचे अध्यक्ष रौलेट साहेब होते. 'देशात कट करणारे तरुण सर्वत्र आहेत' असा त्यांनी शोध लावला! आणि सरकारने या रौलेट साहेबांच्या सूचनांनुरूप एक नवीन बिल पास केले. म्हणून याला रौलेट बिल म्हणतात. महायुद्धात हिंदुस्थानने मर्यादेबाहेर मदत केली. रौलेट बिल हे बक्षीस मिळाले! या बिलामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येत होती. पोलिसांना वाटेल ते अधिकार देण्यात आले होते. राष्ट्राचा हा अपमान होता. स्वातंत्र्य मिळणे तर दूर राहिले. अधिकच बेड्या घट्ट झाल्या. लोकमान्य इंग्लंडातच होते. आणि इकडे महात्मा गांधी उभे राहिले. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाचा मोठा लढा त्यांनी लढविला होता. १९१४-१५ मध्ये ते हिंदुस्थानास परत आले. साबरमतीस आश्रम काढून तपस्या करीत होते. मधून मधून सत्याग्रहाचे प्रयोग करीत होते. चंपारण्याचा सत्याग्रह त्यांनी केला. खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सत्याग्रह चालविला. विरमगाव येथे जकातीचा

फार त्रास होई, तेथे जाऊन तो त्यांनी बंद पाडला. असे प्रयोग ते करीत होते. आणि आता अखिल भारतीय प्रयोग त्यांनी आरंभिला. या रौलेट बिलाविरुद्ध त्यांनी सत्याग्रह सुरू केला. देशभर हरताळ, मिरवणुकी, उपवास यांचा त्यांनी कार्यक्रम दिला. आणि सरकारने निरपराधी जनतेचे रक्त सांडले. दिल्लीत गोळीबार झाले. हुतात्मा श्रद्धानंद यांनी गुरख्याच्या बंदुकीसमोर आपली विशाल छाती उघडी केली! आणि जालियनवाला बागेतील ते पाशवी हत्याकांड झाले. लष्करी कायदा पुकारला गेला. विटंबनेस सीमा राहिली नाही. लोकांचे पाणी बंद केले गेले. उजेड बंद केला गेला. उघड्यावर शकडोंना फटके मारण्यात आले. रस्त्यावरून सरपटत जायला लावण्यात आले. नको,– ती आठवण नको!

आणि या अपमानातूनच पुढे असहकाराची प्रचंड चळवळ झाली. १९२० च्या १ ऑगस्टला लोकमान्य मरण पावले. महात्मा गांधींनी राष्ट्राची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. देशबंधू दास, मोतीलाल नेहरू, लालाजी सारे गांधीजींना येऊन मिळाले. प्रचंड चळवळ झाली. अमीर फकीर झाले. वकीलांनी वकिल्या सोडल्या. विद्यार्थी बाहेर आले. पुढे महात्मा गांधींना सहा वर्षांची सजा झाली. असहकाराची चळवळ थांबली. वर्ष दीड वर्षाने महात्माजी आजारी म्हणून सुटले. त्यांनी विधायक कार्याकडे सारी शक्ती लावली. खादीची प्राणप्रतिष्ठा केली. ठायी ठायी सेवाश्रम सुरू झाले. सेवेला वाहून घेतलेले लोक खेड्यापाड्यातून जाऊ लागले. गावातून स्वच्छता करू लागले. उद्योगधंदा देऊ लागले. एकदा नेहरू-रिपोर्टाचा विचार करण्यासाठी अलाहाबादेस, मला वाटते, वर्किंग कमिटीची बैठक होती. महात्माजींना बोलावण्यात आले. परंतु महात्माजींनी लिहिले, "तुम्ही स्वराज्याची जी मागणी करणार आहात, तिच्या पाठीमागे मी शक्ती उभी करीत आहे. तुम्ही तुमचे काम करा."

आणि त्या शक्तीचा प्रभाव दाखविण्याची वेळ आली. काँग्रेसने स्वराज्याची मागणी केली. महात्माजींनी अकरा गोष्टींची मागणी केली होती. परंतु सरकार ताठर होते. आणि ३० सालचा तो अभूतपूर्व असा कायदेभंगाचा लढा झाला! ३१ साली थोडा वेळ थांबला. महात्मा

गांधी विलायतेत गोलमेज परिषदेला गेले. परंतु रिक्त हस्ताने त्यांना परत यावे लागले. ते परत यताच पुन्हा लढा सुरू झाला तो ३४ सालपर्यंत सुरू होता. या प्रचंड चळवळीमुळे खेडीपाडी जागृत झाली. स्वातंत्र्याचा संदेश सर्वत्र गेला. आणि पुढे सनदशीर राजकारण आले. कौन्सिलांचे राजकारण आले. जेधे–गाडगीळ यांची ती ऐतिहासिक निवडणूक झाली. आणि पुढे प्रान्तिक निवडणुकी झाल्या. काँग्रेसला अपार यश मिळाले. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी जनता अधिक तयार करता येईल, या हेतूने काँग्रेसने मंत्रिमंडळे बनविली. ' गव्हर्नर मंत्र्यांच्या कारभारात पदोपदी हात घालणार नाही ' अशी कबुली घेऊन काँग्रेसने हे काम सुरू केले. सरकारशी झगडून सत्याग्रही शेतकऱ्यांच्या जप्त जमिनी परत देवविल्या. कर्ज-निवारण कायदा, कूळ-कायदा, दारूबंदी, वर्धा शिक्षण पद्धती, साक्षरता-प्रसार, खादी-ग्रामोद्योगास उत्तेजन असे बहुविध कार्य केले. मंत्र्यांनी केवळ ५०० रुपाये पगार घेतला. कारण कराची काँग्रेसच्या ठरावात जास्तीत जास्त ५०० रुपये पगार स्वराज्यात द्यावा असे होते. काँग्रेस शब्दाप्रमाणे वागणारी. काँग्रेसचा असा कारभार चालू असता पुन्हा हे महायुद्ध आले. एका शब्दानेही जनतेच्या प्रतिनिधीस न विचारता हिंदुस्थानही युद्धात सामील आहे, असे जाहीर करण्यात आले. आम्ही केवळ गुलाम आहोत, याची तीव्र जाणीव पुन्हा झाली ! काँग्रेसच्या मंत्र्यांनी राजीनामे दिले. युद्धासंबंधी ते ऐतिहासिक पत्रक काँग्रेसने प्रसिद्ध केले. ' युद्धाचे हेतू काय ? ' असे काँग्रेसने विचारले. ' युरोपातील देशांचे स्वातंत्र्य ' असे पार्लमेंटमध्ये चेंबर्लेन म्हणाले. काँग्रेस आता काय करणार ? वैयक्तिक सत्याग्रह करणार की प्रचंड चळवळ पुन्हा करणार ? बघू या. तेजस्वी दिवस येत आहेत. सर्वांनी तयार राहिले पाहिजे.

वसंता, काँग्रेसचा असा हा पन्नास-साठ वर्षांचा धावता इतिहास तुला मी सांगितला. महात्माजींच्या चळवळीने जर सर्वांत मोठे कोणते कार्य केले असेल तर ते निर्भयता देण्याचे. बंगालमधले एक मोठे पुढारी एकदा म्हणाले, " १९१९–२० सालापूर्वी स्वराज्याची चर्चा करायची झाली तर ती आम्ही तिसऱ्या मजल्यावर बसून करीत असू. परंतु

गांधीजी आले व दिवाणखान्यातील राजकारण रस्त्यावर आले. 'हे सरकार आम्हांस नको' असे रस्त्यातील सर्वसामान्य लोकही निर्भयपणे म्हणू लागले."

महात्माजींचे हे सर्वांत मोठे कार्य. त्यांनी निर्भयतेचे वातावरण आणले. त्यांनी भिक्षांदेहीला आळा घातला. त्यांनी स्वावलंबनाचा व सत्याग्रहाचा मार्ग दर्शविला. जनतेचे व जनतेच्या पुढाऱ्यांचे तोंड सरकारकडे असे, ते महात्माजींनी दरिद्रनारायणाकडे वळविले. जनतेत जा, जनतेची सेवा करा, तिला निर्भय बनवा, असे ते सांगू लागले. जनतेला स्वतःच्या शक्तीचा साक्षात्कार घडविणे हे महान कर्म होते. ते गांधीजींनी केले.

गांधीजींनी साधेपणा पुढाऱ्यांस शिकविला, अब्बास तय्यबजी हे थोर पुरुष एकदा म्हणाले, "पूर्वी मी खेडेगावात गेलो तर लोक माझ्यापासून दूर रहात. परंतु आता साधा खादीचा पोषाख घालून जाऊ लागलो. लोक माझ्याजवळ येऊ लागले. मी त्यांच्यातीलच एक असे त्यांना वाटू लागले. ते आपली सुखदुःखे सांगू लागले. गांधीजींनी आम्हांला आमच्या कोट्यवधी बंधूंची भेट करून दिली. त्यांचे हे उपकार."

वसंता, तुला बंगालमधील उल्हासकर दत्त कदाचित ऐकून माहीत असेल. त्याने स्वतःच्या स्मृती लिहिल्या आहेत. उल्हासकर मोठे क्रान्तिकारक होते. ते कोमिल्लाचे राहणारे. १९०७-८ सालातील दहशतवादी चळवळीत ते होते. ते अंदमानातून सुटून आले. ते सुंदर लिहितात. महात्माजींवर असहकाराच्या चळवळीत जो खटला भरण्यात आला व ज्यात त्यांना सहा वर्षांची सजा झाली, त्यासंबंधीची एक स्मृती उल्हासकरांनी एकदा दिली होती. महात्माजींनी त्या खटल्यात "मी एक शेतकरी आहे. माझा विणकामाचा धंदा आहे." असे सांगितले होते. महात्माजींच्या खटल्याची हकीकत वर्तमानपत्रांतून येत होती. उल्हासकरांच्या तेथला एक गरीब मुसलमान नोकर वर्तमानपत्र वाचून रडत होता. "काय रे, काय झाले?" असे त्यांनी विचारले. तो

म्हणाला, " महात्मा गांधींना सहा वर्षांची सजा झाली. वाईट वाटते." " तुला का वाईट वाटते ? " त्यांनी विचारले. " का म्हणजे ? अहो, ते आमच्यातलेच एक आहेत. आमची स्थिती सुधारावी म्हणून झगडत आहेत. ते एक शेतकरी व विणकर आहेत. " असे म्हणून त्याने डोळे पुसले. ही आठवण लिहून उल्हासकर लिहितात, " या अहिंसक महात्म्याने जशी क्रान्ती केली आहे तशी कोणी केली आहे ? जनतेशी असा एकरूप झालेला दुसरा कोण आहे ? महात्माजी क्रान्तिकारकांचे मुकुटमणी आहेत. ह्यांना अनंत प्रणाम."

आपल्या ह्या महाराष्ट्रात असे काही पंडित आहेत की ते अद्यापही गांधीजींना व कॉंग्रेसला शिव्या देतात. महात्माजींनी एक कोट टिळक फंड जमविला, परंतु त्या फंडाने टिळकांचे राजकारण मारले, असे काही करंटे महाराष्ट्रीय मुत्सद्दी म्हणत असतात. यांना मुत्सद्दी म्हणावे की महामूर्ख म्हणावे तेच समजत नाही ! " मला एक हजार लोक द्या, मी बंड करतो." असे म्हणणारे ते लोकमान्य ! " डोकी तापायलाच हवीत. डोकी थंड ठेवण्याची ही वेळ नव्हे. " असे म्हणणारे ते लोकमान्य ! " येथल्या मुसलमानांच्या हाती सारी सत्ता गेली तरी चालेल; परंतु सहा हजार मैलांवरचे हे परके आधी जाऊ देत." असे तळमळीने म्हणणारे ते लोकमान्य ! त्यांचे राजकारण या दळभद्र्यांना समजते तरी की नाही देव जाणे. त्या एक कोटी फंडातील पुष्कळशी रक्कम निरनिराळ्या कार्यार्थच देणाऱ्यांनी दिली होती. कोणी गुजरात विद्यापीठासाठी म्हणूनच १० लाख दिले. ते त्या कामात गेले. खादीच्या कामात २५ लाख घातले गेले. देशभर ज्या राष्ट्रीय शाळा, महाशाळा सुरू झाल्या त्यांना त्या फंडातून मदत दिली गेली. कोणी स्वदेशी स्टोअर काढले, त्यांना मदत दिली गेली. या एक कोटी फंडापैकी काही रक्कम आलीच नाही. कारण दिलेली अभिवचने पुरी केली नाहीत ! असा हा एक कोटीचा इतिहास आहे. तरी बेटे पदोपदी म्हणत असतात की टिळकांच्या नावाने फंड काढून टिळकांचे राजकारण यांनी मारले. टिळकांचे राजकारण म्हणजे तेल्यातांबोळ्याचे राजकारण, दरिद्र-नारायणाचे राजकारण. या दरिद्री जनतेत ज्यांनी प्राण ओतला, या

दारिद्री जनतेला ज्याने झुंजार बनविले, त्याने का टिळकांचे राजकारण मारले? मागील महायुद्धाच्या वेळचे लोकमान्यांचे लेख वाचा आणि आजचे महात्माजींचे लेख वाचा. जणू लोकमान्यच लिहीत आहेत असे वाटते. इतके भाषेत व विचारात साम्य आहे. महात्माजींनी केलेल्या प्रचंड चळवळी पाहून लोकमान्य वरून आनंदाश्रू ढाळीत असतील.

महाराष्ट्रातील हे कोत्या दृष्टीचे पुढारी म्हणत असतात की "१९२० ते ३५ पर्यंतचा काळ काँग्रेसने वनवासात दवडला. काँग्रेसने कायदेमंडळांवर उगीच बहिष्कार घातला." आणि पुढे ३४ साली काँग्रेसने जेव्हा निवडणुका लढवायच्या असे ठरविले तेव्हा हे लोक म्हणू लागले की "आता गाडी रुळावर आली. आम्ही वीस वर्षे जे सांगत होतो ते आज बरोबर ठरले!" जणू यांच्या तुणतुण्यामुळेच काँग्रेसने कायदेमंडळात जाण्याचे ठरविले! कायदेमंडळात केव्हा जावे व केव्हा जाऊ नये ते काँग्रेस जाणते. ज्या वेळेस आपल्याजवळ भरपूर कार्यकर्ते नसतात, ज्या वेळेस जनतेत राजकीय जागृती झालेली नसते, त्या वेळेस ते थोडेसेही कार्यकर्ते जर कायदे मंडळात गेले तर जनतेत कार्य कोणी करायचे? कायदेमंडळांतील कामाला तेव्हा महत्त्व आहे जेव्हा तुमच्या पाठीमागे जनतेची शक्ती उभी आहे. तोपर्यंत सारे फोल आहे.

महाराष्ट्रात इतिहासाचार्य राजवाडयांहून अधिक थोर इतिहासज्ञ दुसरा कोणता आणायचा? परंतु पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी चित्रमयजगतमध्ये एक लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात, "आपल्या पाठीमागे जनतेची संघटित शक्ती असल्याशिवाय कायदेमंडळांतून जाण्यात अर्थ नाही. नामदार गोखले दिल्लीच्या कौन्सिलात जात. सुंदर बोलत. साहेब मान डोलवीत. परंतु गोखल्यांच्या टीकांचा काय उपयोग होई? गोखल्यांच्या शब्दापाठीमागे कोट्यवधी जनतेची जागृत शक्ती नव्हती. बहुजनसमाजाला तिकडे काय चालले आहे याची दादही नसे. पुढारी व जनता यांच्यात एकजीव नव्हता. जोपर्यंत संघटित असे जागृत राष्ट्र पाठीशी नाही तोपर्यंत कौन्सिलातील राजकारणात अर्थ नाही."

अशा आशयाचे राजवाड्यांनी लिहिले होते. राजवाड्यांचे हे मत वाचून काँग्रेसच्या धोरणाचा विचार करावा. काँग्रेसने २० साली, ३० साली, ३२ साली राष्ट्रव्यापक प्रचंड चळवळी केल्या. कायदेभंग, सत्याग्रह हे शब्द दऱ्याखोऱ्यांतून गेले. अशी राष्ट्रव्यापी चळवळ दोन-तीनदा केल्यावर निवडणुका लढविणे योग्य होते. शिवाय १९३५ च्या कायद्याने मतदारसंघ वाढला होता. साडेतीन कोटी मतदार झाले होते. जनता कोणाकडे आहे हे इंग्रजांना दाखवून द्यायला हवे होते. बहुजन-समाज कोणाच्या पाठीमागे आहे पहा, हे निवडणुकीने दाखवण्याची वेळ होती. कार्यकर्तेही वाढले होते. काहींना कायदेमंडळात पाठवूनही बाहेरचे कार्य करावयास भरपूर होते. आणि म्हणून जनता जागृत करून, भरपूर कार्यकर्ते निर्मून, काँग्रेस निवडणुकीस उभी राहिली. प्रचंड विजय तिला मिळाला. मंत्रिमंडळेही बनविली. परंतु पुन्हा ती आज फेकली. सरकारची बाहुली होऊन बसण्यासाठी काँग्रेसचे मंत्री नाहीत. सरकारच्या धोरणाविरुद्ध जरा जाताच हकालपट्टी करून घेण्यासाठी काँग्रेसचे मंत्री नाहीत. या महायुद्धाच्या काळात जर खरी सत्ता हाती नसेल तर तेथे मंत्री म्हणून राहण्यात काय अर्थ? ती का नुसती शोभा आहे? या महायुद्धाच्या काळात सारे आर्थिक धोरण युद्धानुरूप होणार. चलन वाढणार. भराभरा नोटा छापल्या जाणार. महागाई होणार. अन्नान्नदशा होणार. याला आपल्या हाती सत्ता असल्याशिवाय काय करता येणार आहे? आज युद्धानंतर प्रान्तिक लोकसत्ता म्हणजे फार्स झाला आहे. काँग्रेसने आधीच हे ओळखले व स्वाभिमानपूर्वक त्या खुर्च्या फेकल्या.

परंतु काही आशाळभुतांना काँग्रेसचे हे असे करणे म्हणजे आड-रानात जाणे, वनवासात जाणे वाटते. त्यांना हा काळ फुकट गेला असे वाटते. १९२० ते ३५ सालापर्यंतचा काळ का फुकट गेला? हा काळ फुकट नाही गेला. सार्थकी लागला. राष्ट्र-संवर्धनाचा हा काळ होता. या काळात नवे राष्ट्र तयार झाले. शहरे व खेडी एकजीव झाली. पूर्वी धडाला मुंडके नव्हते, मुंडक्याला धड नव्हते! परंतु महात्माजींनी धडा-मुंडक्यांची भेट घातली आणि राष्ट्र सजीव होऊन उभे राहिले.

आपल्या महाराष्ट्रातले ब्राह्मणब्राह्मणेतर वाद कमी झाले. सत्यशोधकी गावे सत्याग्रहात आली. ३०–३२ सालच्या चळवळीत हे वाद मेले. बहुजनसमाज चळवळीत आला. कॉंग्रेस आपली, असे त्याला वाटू लागले. तुरुंगात एके ठिकाणी कामे करू लागले. एकाच चक्कीला, एकाच मोटेला ब्राह्मण, मराठा, न्हावी, धोबी यांचे हात लागले. ते एकमेकांस म्हणाले, "आपण उगीच अलग राहून भांडत होतो. परंतु आता सेवेसाठी एकत्र आलो."

इंग्लंडमधील प्रतिगामी मुत्सद्दी सॅम्युअल होअर लिहितो, "गांधींशी माझे मतभेद आहेत. परंतु एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे. गांधींनी हिंदुस्थानचा दर्जा वाढविला. गांधींच्या चळवळी होण्यापूर्वी हिंदुस्थानाकडे तुच्छतेने आम्ही पाहात असू. परंतु आता आदराने बघतो."

वसंता, ज्या काळात अशी गोष्ट घडली, ज्या काळात राज्यकर्त्यांच्या अहंकारी दृष्टीतही हा असा फरक पडला, तो काळ का वाया गेला? आणि होअर साहेबांसारख्यांस हिंदुस्थानविषयी हा आदर का वाटू लागला? कारण अन्यायाविरुद्ध सारे राष्ट्र झगडण्यासाठी उभे राहिले. निःशस्त्र राष्ट्रही उठावले. नसले शस्त्र म्हणून का अन्याय मुकाट्याने सहन करायचे? आणि शस्त्रास्त्रे झाली तरी काही लोकच ती वापरू शकतात. परंतु गांधीजींच्या अहिंसक लढ्यात सर्वांची गती होती. रामनाम ज्याप्रमाणे कोणीही उच्चारावे, तसा हा गांधीजींचा मार्ग होता. स्त्रिया, पुरुष, मुले सारी या चळवळीत सामील झाली. सर्वांचा आत्मा जागा झाला.

हिंदुस्थानातील लोकांस कोणी बकऱ्या म्हणे, कोणी उंदीर म्हणे. परंतु या देशात माणसे राहतात, ही गोष्ट महात्माजींनी जगाला दाखविली. अन्यायाविरुद्ध जो झगडत नाही तो का माणूस? गांधीजींनी अन्यायाविरुद्ध झगडायला शिकविले. दुसऱ्यास मारू नका, परंतु अन्यायही सहन करू नका असे शिकवून इतर राष्ट्रांतील मारकुट्या माणसांपेक्षा अधिक श्रेष्ठ प्रकारची माणसे या देशात आहेत असे गांधीजींनी जगाला दाखविले.

गांधीजींची चळवळ आली व चुलीजवळ बसणाऱ्या आया-बहिणीही कायदेभंग करू लागल्या. स्त्रिया लाठीमार खाऊ लागल्या. मुंबईच्या आझाद मैदानावर घोड्यांच्या टापांखाली त्या चिरडल्या जाऊ लागल्या. मुंबईच्या रस्त्यावरून समुद्राचे बेकायदा पाणी स्वातंत्र्याची गाणी गात आणू लागल्या. मीठ करू लागल्या. परदेशी मालावर, दारुगुत्त्यांवर त्या निरोधने करू लागल्या. कर्मवीर कर्वे एकदा म्हणाले, "स्त्रियांची ती जागृत झालेली शक्ती पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले!" ज्या महर्षीने सारे आयुष्य स्त्रियांच्या उद्धारार्थ दिले त्यालाही महात्माजींच्या चळवळीतील ती दिव्यता दिसली, "सत्याग्रही शिबिरात एक स्वयंसेवक व्हावे असे मला वाटले" असे म्हणाले. परंतु आमच्यातील अहंकारग्रस्तांना वाटले की हा सारा काळ फुकट जात आहे! त्यांच्या बुरसलेल्या बुद्धीला वाटले की १९२० ते ३५ पर्यंतचा काळ वांझ गेला!

वसंता, महाराष्ट्राच्या इतिहासात एक गोष्ट आहे. ज्याच्या नावाने आपण महाराष्ट्रात कालगणना करतो, ज्याच्या नावाने शक चालवतो, तो शालिवाहन राजा तुला माहीत असेल. या शालिवाहन राजाने शक नावाच्या लोकांचा पराजय केला आणि त्या विजयाची खूण म्हणून गुढीपाडवा सुरू केला. शालिवाहन राजाने हा जो विजय मिळविला त्यासंबंधी एक आख्यायिका आहे. शालिवाहनाने कुंभाराच्या मडक्यांचे घोडेस्वार बनविले व शत्रू जिंकले, अशी दंतकथा आहे. परंतु दंतकथांत अर्थ असतो. या दंतकथेचा काय अर्थ? अर्थ इतकाच की त्या वेळी महाराष्ट्रीय जनता मातीप्रमाणे पडलेली होती. डोकी जणू मडकी झाली होती! परंतु या मडक्यांत शालिवाहन राजाने प्राण ओतला. त्याने फुंक मारली, चैतन्य ओतले. आणि मातीप्रमाणे पडलेल्यांना त्याने झुंजार राऊत बनविले! श्री शिवछत्रपतींनी तेच केले. साधेभोळे लंगोटे मावळे. परंतु छत्रपतींनी त्यांच्यात चिल्कळा ओतली. आणि मावळे दिल्लीला जाऊन भिडले. अटकेवर त्यांनी झेंडे रावले. भीमथडी घोड्यांना सिंधू गंगांचे पाणी पाजले. महात्माजींनीही तोच चमत्कार केला. सारे राष्ट्र पडलेले होते. या राष्ट्राला महात्माजींनी नवजीवन दिले. अमृतधारा दिली. आणि

लहान कोवळी मुले मध्यरात्री हातात झेंडा घेऊन घरातून पळून जात व सत्याग्रह करीत! वंदे मातरम्‌ची गर्जना करीत करीत त्यांनी फटके खाल्ले. गुजरातमधील बोरसद गावी लाठीमार होत होता, ढोपरे फुटली तरी स्त्रिया रस्त्यातून उठल्या नाहीत! कोणी केला हा चमत्कार? कोळशांना उष्णता देऊन त्यांचे हिरे कोणी केले? ही महात्माजींची तपश्चर्या. त्यांनी खेडीपाडी जागविली. सारे राष्ट्र प्राणमय केले.

आणि म्हणून ज्ञानकोशकार डॉ. केतकर म्हणाले, "एक कोट लोकांना महात्माजींनी असहकार, कायदेभंग हे शब्द शिकवले असतील तर एक कोट टिळक फंड सार्थकी लागला!" या फंडाने टिळकांचे राजकारण मारण्यात आले असे म्हणणाऱ्यांची कीव येते. वसंता, तू महात्माजींचे दिव्य कर्म ओळख व त्यांना कोटी प्रणाम कर. ज्याने राष्ट्राला माणुसकी दिली, त्याचे उपकार कोण कसे फेडणार? कोट्यवधी जनतेस त्यांनी त्यागाची दीक्षा दिली. राष्ट्राचा गाडा ओढण्यासाठी हजारो सेवक त्यांनी पुढे आणिले. निरनिराळ्या वृत्तीची प्रखर माणसे. परंतु त्यांना त्यांनी एकत्र नांदवून राष्ट्रनिर्मितीचे महान कार्य केले. राजेन्द्र-प्रसाद, सरदार वल्लभभाई, पंडित जवाहरलाल ही का एकाच वृत्तीची माणसे? परंतु गांधीजी सर्वांना सांभाळतात. ही थोर माणसे केवळ परप्रत्ययनेयबुद्धी नाहीत. गांधींचे ते आंधळे अनुयायी नाहीत. त्यांना स्वतंत्र बुद्धी आहे. ते वाद करतात, चर्चा करतात. गांधीजी त्यांना पटवतात. मिळतेजुळते घेतात. आणि महात्माजींच्या अशा दिव्य नेतृत्वाखाली राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढण्यात त्यांना प्रतिष्ठा वाटते.

वसंता, महाराष्ट्रातील काही संकुचित बुद्धीच्या लोकांनी महात्मा-जींची व काँग्रेसची सदैव नालस्तीच केली. अजूनही करतात. 'अफगाणि-स्थानला गांधीजी हिंदुस्थान विकीत होते' असले हीन आरोप करायला व ते छापायलाही त्यांना काही वाटले नाही! "यांनी हिमालयासारख्या चुका केल्या, यांनी हिमालयात चालते व्हावे" असे हिणवून म्हणतात. परंतु या पाप्यांच्या लक्षात येईना की हिमालयासारखी चूक करून ती कबूल करणाराजवळ हिमालयाची हिम्मत असावी लागते!

या राष्ट्रासाठी गेली पन्नास वर्षे अहोरात्र हाडे झिजविणारा दुसरा कोण आहे? आणि आज आयुष्याच्या सायंकाळी सर्वांच्या पुढे जाऊन तेच उभे आहेत. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ते नुसते तडफडत आहेत. वसंता, महाराष्ट्रातील काही क्षुद्रांनी या महापुरुषावर आग पाखडली तरी महाराष्ट्राचे हृदय शाबूत आहे. महाराष्ट्रातील बालगोपाळ, महाराष्ट्रातील बहुजनसमाज महात्माजींभोवती, काँग्रेसभोवती उभा आहे. आजपर्यंत महाराष्ट्राने काँग्रेसची अब्रू सांभाळली. ते काम अधिकच नेटाने पुढे झाले पाहिजे. तू तुझ्या तरुण मित्रांच्या मनावर ही गोष्ट बिंबव. त्यांना मोठी दृष्टी घेण्यास सांग. ज्या महात्म्याने हिंदी राष्ट्राची मान उंच केली, त्याच्यासमोर मान लववायला त्यांना सांग. कृतज्ञता दाखवायला सांग.

आज आता पुरे. मी पत्र लिहायला घेतले तेव्हा आकाशात अभ्रे होती. हवा जरा चमत्कारिक होती. परंतु आता समोर स्वच्छ प्रकाश पडला आहे. अभ्रे कोठल्या कोठे गेली! त्याप्रमाणे आपल्या राष्ट्रावरची अभ्रेही जातील. स्वच्छ विचारांचा निर्मळ प्रकाश येईल. भारताचे भवितव्य उज्ज्वल आहे यात शंका नाही. हे महान् राष्ट्र हजारो वर्षे का उगीच जगले? लिन यूटांग या प्रख्यात चिनी लेखकाने लिहिले आहे की "चीन जुने नाही झाले. म्हातारे नाही झाले. काही राष्ट्रांची वाढ फार हळू होते. ज्यांची लौकर होते ती लौकर मरतात. चीनला अजून वाढायचे आहे. त्याचे तारुण्य आता कोठे सुरू झाले आहे!" हिंदुस्थानाविषयी मला असेच वाटते. खरी अखिल भारतीय दृष्टी आता येते आहे. सारा भारत अंतर्बाह्य एक ही भावना वाढत आहे. आता कोठे आपण डोळस होत आहोत. नवीन प्रकाश घेत आहोत. वाढते वय आहे. हिंदुस्थान म्हातारा नाही, नवजवान आहे. त्याला भरपूर कार्य अद्याप करावयाचे आहे. सर्व धर्म व संस्कृती एकत्र नांदवण्याचा महान प्रयोग त्याला करावयाचा आहे.

वसंता, तुला अधूनमधून मी काही ना काही लिहीत जाईन. तुझ्या सेवा दलातील मुलांना ते वाचून दाखवीत जा. मी जणू त्यांना माझे

हृदयच पत्ररूपाने पाठवीत जाईन. दुसरे मी काय देऊ, काय पाठवू? मी जे लिहून पाठवीन ते त्यांना आवडेल की नाही ते मी काय सांगू? माझ्या लिहिण्यात नवीन काही असेल असे नाही. त्यांच्या सर्व शंका-आशंका माझ्या लिहिण्याने फिटतील असेही नाही. परंतु तरुणांबद्दल आशा बाळगणाऱ्या एका माणसाचे हे तडफडणारे हृदय आहे एवढे त्यांना कळले तरी पुरे. सर्वांस प्रणाम.

तुझा

**श्याम**

# दारिद्र्याच्या रखरखाटात खादीची टवटवी

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तुला माझे मागील पत्र आवडले हे वाचून मला आनंद झाला. तुझ्या सेवा दलातील मुलांनाही ते पुनःपुन्हा वाचून पहावेसे वाटले. ठीक तर. त्या मुलांसाठी आणखीही लिहून पाठवीत जाईन. त्यांच्या शंका मला कळवीत जा. माझ्या बुद्धीप्रमाणे त्या शंकांचे निरसन करण्याचा मी प्रयत्न करीन.

तू आज आपल्या पत्रात खादीविषयी विचारले आहेस. काँग्रेसने खादीचे एवढे स्तोम का माजवावे ? मागे तर सर्वांनी सूत कातावे अशी अट होती. ती अट आज नाही. परंतु जे जे पदाधिकारी आहेत त्या सर्वांनी खादी वापरली पाहिजे असे आज बंधन आहे. परंतु खादी वापरणे म्हणजेच का काँग्रेसचे पाईक होणे ? खादीचा राजकारणाशी सबंध काय ? हे गांधीजींचे वेड आहे व ते काँग्रेसने गळ्यात अडकवून घेतले आहे. वसंता, तू असेच मला मोकळेपणाने प्रश्न विचारीत जा. तू विचारतोस त्या सर्व शंका तुझ्याच असतील असे नाही. दुसऱ्यांच्याही मनात ज्या शंका असतील त्याही तू विचारीत असशील. मुले किंवा गावातील तरुण तुला प्रश्न विचारीत असतील; व त्यांची तुला उत्तरे पाहिजे असतील. नाही का ?

आज आपणावर परसत्ता आहे. स्वराज्य मिळावयाचे आहे. मिळेल तेव्हा मिळेल. तोपर्यंत लोकांना जगविले पाहिजे. कसे जगवावयाचे ?

गांधीजी रात्रंदिवस विचार करीत होते. जास्तीत जास्त लोकांना सहज रीतीने कोणता धंदा देता येईल? आपणा सर्वांस अन्न व वस्त्र यांची प्रथम जरूर आहे. अन्न व वस्त्र सर्वांना हवे. अन्न आपण निर्माण करीत आहोत. वस्त्रही आपणच निर्माण केले तर? निदान वस्त्र निर्मिण्याचा धंदा काही बेकारांना देता आला तर? असा प्रश्न गांधीजींसमोर उभा राहिला असेल. पूर्वी खेडोपाडी बाया सूत कातीत. विणकर ते विकत घेत. परंतु गिरण्या आल्यापासून विणकर गिरणीचेच सूत वापरू लागले. हजारो लाखो बायांचा धंदा गेला. खानदेशातील बायका सांगत की पूर्वी सूत कातून मीठ-मिरचीचा खर्च बाहेर पडे. माहेरी येणाऱ्या मुलींना काही लहान दागदागिना त्यातून करून देता येई. घर खर्चाला वर लागणारा पैसा चरखा चालवून मिळविला जाई. परंतु सारी परिस्थिती बदलली. खेडोपाडी दीन झाली!

हिंदुस्थानातील तीन-चार कोटी लोक अर्धपोटी असतात. ही गोष्ट खोटी नाही. शहरात वावरणाऱ्या लोकांना ही गोष्ट खोटी वाटते. मागे एकदा पुण्याचे एक मोठे देशभक्त कर्नाटकात गेले होते. त्या देशभक्तांना गांधी जे जे करतील ते ते आवडत नसे! कर्नाटकातील एका थोर गांधीनिष्ठ सेवकाने या पुणेरी देशभक्ताला सूत कातणाऱ्या लोकांतील काही गरीब बायका दाखविल्या. सूत कातून दीड-दोन आणे मिळाल्यामुळे त्या बायकांना केवढे समाधान लाभते ते त्या पुणेरी देशभक्ताला दाखविण्यात आले. तेव्हा मग हे वावदूक देशभक्त म्हणाले, "इतके का दारिद्र्य खेड्यातून आहे? आम्हांला हे माहीतच नव्हते! आता मी अवश्य खादी वापरीन."

जरा पावसाने डोळे वटारले तर खेड्यात हाहाःकार उडतो. मागच्या वर्षी पाऊस पडेना तर लोकांनी चार-चार आण्यांस आपली मुले मिशनरी लोकांस विकली!– ही अतिशयोक्ती नाही. ही सत्यकथा आहे. तसेच एखादे वेळेस पावसाची झड सुरू झाली म्हणजे शेतीमजुरांस काम करता येत नाही. खेड्यातील मजूर अशा वेळी उपाशी राहतात. तीन तीन चार चार दिवस त्यांच्या घरातून चूल पेटत नाही. अशी उदाहरणे मी प्रत्यक्ष

पाहिली आहेत. अशांचा प्रश्न कसा सोडवावयाचा? स्वातंत्र्य मिळाल्यावर सोडवू असे म्हणून भागणार नाही.

तिकडे हिंदी मध्यप्रांतात अनंतपूर वगैरे गावांत खादीला वाहून घेतलेले श्री जेटालाल भाई काम करीत. त्या भागात दुपारी दोन-तीनच्या सुमारास एकदाच जेवणारे लोक आहेत! ते लोक एकदाच जेवतात. लौकर जेवले तर रात्री भूक लागते. म्हणून ते दोन तीन वाजता जेवतात. सकाळी व सायंकाळी भाजलेले चिंचोके खातात! अनंतपूरकडे जशी ही परिस्थिती तशीच सर्वत्र. सावली वगैरे मध्यप्रांतातील काही भागांतून लोक चिंचेचा पाला शिजवून खातात व कसे तरी जगतात. अशा या दरिद्री नारायणांकडे महात्माजींचे लोक चरखा घेऊन गेले. त्यांना दीड-दोन आणे मजुरी मिळू लागली. आणि हे दरिद्री लोक चरख्याला "चरखा भगवान!" म्हणू लागले.

परंतु या सुताची खादी कोण घेणार? खादी थोडी महाग पडते. इलाज काय? साधा हिशोब घे. कातणारा रोज जास्तीत जास्त १२ ते १४ नंबरचे सूत अदपाव कातती. एक शेर सूत कातावयास आठ दिवस त्याला लागतील. समजा, आठ तास कातून रोज त्याला दोनच आणे आम्ही दिले, तर १० एक शेर सूत कातून घ्यायला एक रुपया मजुरी झाली. ही सुताची मजुरी. कापूस, त्याची पिंजाई, पेळू करणे वगैरेंची किंमत निराळीच. एक शेर कापसाची किंमत, तो पिंजून त्याचे पेळू करण्याची किंमत या सर्वांची आपण कमीत कमी १२ आणे किंमत धरू या. म्हणजे एक रुपया बारा आणे झाले. आता विणाई. एक शेर सुताचे २७ इंची पन्ह्याचे कमीत कमी ६ ते ७ वार कापड धरू या. एक वार विणायला कमीत कमी एक आणा धरला तरी हे जवळ जवळ सात आठ आणे झाले. म्हणजे एक शेर कापूस घेऊन त्याचे कापड करायला एकंदर दोन अडीच रुपये लागले. त्यात धुलाई मिळवा, रंगाई मिळवा. म्हणजे जवळ जवळ सात आठ वार कपडा करायला अडीच ते पावणे तीन रुपये लागतात. म्हणजे २७ इंच पन्ह्याची खादी पाच आणे सहा आणे वार पडली. तशीच तर ती मिळते. आणि हे सारे कमीत कमी खर्चे

धरून केले. विणकरांना पुष्कळ वेळा वारी सव्वा ते दीड आणाही द्यावा लागतो. कपाशीचे भावही उतरतात-चढतात. कातणाऱ्या बायांना रोज तीन आणे द्यावयाचे म्हटले तर आणखी किंमत वाढेल. म्हणून खादी महाग असते. खादी महाग विकून चरखा संघाला नफा मिळवावयाचा नसतो. कोणी कोणी स्वस्त खादीची दुकाने काढली आहेत. हिंदुस्थानातील जनता अगतिक आहे. रोज अर्धा आणा मिळाला तरीही लोक काम करतील; कातून देतील. आणि अशी पिळवणूक करून चरखा संघाला प्रतिस्पर्धी अशी भांडारे काढतील. परंतु गरिबांच्या अगतिकपणाचा फायदा चरखा संघ घेऊ इच्छित नाही. कमीत कमी आठ तास काम करून तीन चार आणे तरी कातणाऱ्यास मिळावे असे चरखा संघाचे मत आहे. महात्माजी तर आठ आणे द्यावे असे म्हणतात. अशी ही खादी जरा महाग असते. परंतु लोक म्हणतात, चरखा संघ नफा कमवीत आहे. धन्य या महाराष्ट्रीयांच्या अनुदार बुद्धीची!

बुडालेला खादीचा धंदा महात्माजींनी उभा केला. हिमालयासारखे प्रयत्न करून हा बुडालेला धंदा त्यांनी पुन्हा वर काढला. टिळकफंड जो मागे त्यांनी काढला, त्यातले जवळ जवळ २५ लाख रुपये या कामात त्यांनी घातले. आणि जवळ जवळ १ कोटींची खादी आता दरसाल निर्माण होऊ लागली आहे. हिंदुस्थानातील गिरण्यांतून जवळ जवळ ५० ते ६० कोटी भांडवल गुंतलेले आहे. एवढ्या भांडवलावर किती माणसांस काम दिले जाते? जवळ जवळ चार लाख लोकांना. ५० कोटींचे गिरण्यांतील भांडवल ४ लाख बेकारांना काम देते, परंतु खादीतील पाव कोटींचेच भांडवल लाख दीड लाख लोकांना काम देत आहे. खादीच्या धंद्यात काम करणाऱ्यास मिल मजुरीइतकी मजुरी नाही ही गोष्ट खरी. परंतु त्यांना आपल्या गावातल्या गावात राहून थोडा आधार मिळतो. पावसाचे चार थेंब पडले तरी जमीन हिरवी हिरवी दिसते, त्याप्रमाणे दारिद्र्याने रखरखीत झालेल्या या भारतीय संसारास खादीमुळे थोडी टवटवी येते.

परंतु ही महाग खादी घेणार कोण? खादी खपली नाही तर हे लोक जगणार कसे? लोकांना आज जगवावयाचे आहे. म्हणून महात्माजींनी

काँग्रेसमधल्या लोकांवर खादीचे बंधन घातले. वास्तविक हे बंधन नाही, हे बंधन दरिद्रनारायणाशी जोडीत आहे. उद्या स्वराज्याच्या कामी या बंधनाचा उपयोग होईल. खादी हे निर्जीव वस्त्र नाही. खादीमुळे यथील लोकांना घास मिळू लागला. ते लोक काँग्रेसशी जोडले जातील. काँग्रेसचा संदेश त्या त्या गावी जाईल. खेडी जागृत होतील. खादी घास देईल व स्वातंत्र्याचा विचारही देईल.

आज आपणास देशभक्ती सक्तीने जणू शिकवावी लागते आहे. काँग्रेसने जणू कायदाच केला की तिच्यात कार्य करणाऱ्या सर्वांनी खादी वापरलीच पाहिजे. असे नसते केले तर? आम्ही आपण होऊन खादी वापरली नसती. गरिबांसाठी बद्धपरिकर असणाऱ्या काँग्रेसमधील लोकांनी तरी खादी वापरलीच पाहिजे, असा दंडक केला तर त्यात बिघडले कोठे?

मागे १९०६ मध्ये कलकत्ता काँग्रेसच्या वेळेस स्वदेशीचा ठराव झाला. पुढे सुरतला काँग्रेस भरली. महाराष्ट्रातील एक निष्ठावंत सेवक श्री. हरिभाऊ फाटक त्या वेळची एक गोष्ट सांगतात. सुरतच्या काँग्रेसला आलेले एक प्रतिनिधी विलायती पोषाखात आले होते. हरिभाऊ त्यांना म्हणाले, "तुमच्या अंगावर स्वदेशी वस्त्र नाही. कलकत्त्यास तर ठराव झाला आहे." ते प्रतिनिधी एकदम म्हणाले, "शक्य तो स्वदेशी वापरा असा ठराव आहे. ॲज फार ॲज पॉसिबल असे शब्द आहेत. मी सध्या टाक देशी मिळाला तो वापरायचा असे ठरविले आहे!" ते शब्द ऐकून हरिभाऊ चकितच झाले! कलकत्त्याच्या स्वदेशीच्या ठरावाची ती विटंबना होती.

असे हे पूर्वीचे अनुभव आहेत. म्हणून महात्माजींनी खादीच वापरावी असा नियम केला. त्यात गुलामगिरी कसली? आपणास सर्वत्र गुलामगिरीच दिसते. शंभर वर्षे गुलामगिरीत राहिल्यामुळे सर्वांनी खादी वापरावी असे म्हणताच त्यातही आपणास गुलामगिरी दिसते! अरे, तुझे उपाशी भाऊ जगविण्यासाठी खादी वापरणे म्हणजे का गुलामगिरी?

आज आपल्या हातात स्वराज्य नाही. स्वराज्य म्हणजे जे मनात येईल ते करण्याची शक्ती. आज आपण सर्वत्र गिरण्या काढू म्हटले तरीही शक्य नाही. आज लोकांना जगवायचे आहे. स्वराज्य मिळाल्यावर खादी नको असे बहुमताने ठरले तर ती नाहीशी करू. परंतु तो प्रश्न आज नाही. स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थान कसे बनवायचे ते ठरविण्यासाठी काँग्रेसने "नॅशनल प्लॅनिंग कमिटी" नेमलीच आहे. उद्याच्या हिंदुस्थानात उद्योगधंदे कसे असावेत, ते ती समिती ठरवीतच आहे. स्वतंत्र हिंदुस्थान यंत्रमय करावयाचा, की ग्रामोद्योगमय करावयाचा, की दोहोंचा समन्वय करावयाचा, ते स्वातंत्र्य आल्यावर जसे बहुमत ठरेल त्याप्रमाणे करू. आज या घटकेचा प्रश्न एवढाच आहे की, या उपाशी लोकांना जगवायचे आणि म्हणून खादी वापरणे हा आजचा धर्म आहे. निदान काँग्रेसमधल्या कार्यकर्त्यांत तरी आहे.

खादी घेऊन आज या क्षणाला लोक जगवावयाचे आहेत हा एक प्रश्न. दुसरा प्रश्न असा आहे की, खादी आज स्वातंत्र्याचे प्रतीक बनली आहे. गांधीजींनी खादीभोवती संघटना उभारली. १९२४ ते ३० सालापर्यंत ठिकठिकाणी आश्रम निघून त्यांच्या द्वारा खादीचा प्रसार व प्रचार होऊ लागला. तीस सालच्या चळवळीत असा अनुभव आला की जेथे जेथे खादी अधिक गेली होती, तेथे तेथे चळवळ अधिक पेटली. ज्या वर्धा जिल्ह्यात पूज्य विनोबाजी बसले होते, त्या एका जिल्ह्यातून म्हणे ५०० स्त्रिया तुरुंगात गेल्या! सरकारच्या डोळ्यांत म्हणून खादी सलू लागली. खादीतील सामर्थ्य सरकारला जाणवले. ही साधी शुभ्र गांधी टोपी गोऱ्या माणसास सहन होईना. सरकारी नोकर खादी वापरीत ना, गांधी टोपी घालीत ना. का बरे? आम्ही महाराष्ट्रातील, टिळक टोपी, गांधी टोपी असले क्षुद्र भेद करू लागलो. ही काही पुढाऱ्यांच्या नावाची स्पर्धा नाही. गांधी टोपी पाहून टोपीवाले चिडले म्हणून तिला महत्त्व. ३०-३२ सालच्या चळवळीत हातात टकळी घेऊन मिरवणुकी काढणाऱ्यांवर सरकारने लाठीहल्ले चढविले. ठिकठिकाणी सरकारने आश्रम जप्त केले. चरखे जाळले. सुताला आग लावली. सरकारने असे का केले? सोलापूरला लष्करी कायदा पुकारला गेला. गांधी टोपी घालणारांवर जणू सूड

धरण्यात आला. का? तर त्या साध्या खादीच्या जाड्या-भरड्या टोपीत स्वातंत्र्याची ज्वाला होती. खादीभोवती पावित्र्य, त्याग, संघटना, स्वराज्य ही झळकत होती. पांढरी स्वच्छ खादी सरकारने जनतेच्या निष्पाप रक्ताने रंगविली. ब्रिटिश सरकारला स्वातंत्र्यप्रेम देणारी खादी नको होती. आपणही ती नको म्हणणे याचा अर्थ ब्रिटिशांच्याच हाताला आपण हात लावीत आहोत असे नाही का?

कोणी म्हणतात की, "आम्ही खादी वापरली तर महात्माजींचे सारे तत्त्वज्ञान आमच्यावर लादले जाते. खादी वापरतोस व असे कसे बोलतोस असे म्हणतात. म्हणून आम्ही खादी वापरण्याचे सोडून दिले!" अशा लोकांना माझे सांगणे आहे की लोक तुमच्यावर लादू लागले तर तुम्ही लादून घेऊ नका. तुमची अहिंसेवर अढळ श्रद्धा नसेल. अहिंसेने प्रश्न न सुटला व हिंसेने सुटणार असला तर तुम्ही हिंसेचाही आश्रय कराल. लोक म्हणतील तुम्ही संपूर्ण अहिंसक नाही. मग खादी का वापरता? त्यांना सांगा, "आज लोकांना जगविण्यासाठी मी खादी वापरीत आहे. स्वातंत्र्याची एक खूण म्हणून ती वापरीत आहे. खादी वापरणे म्हणजे महात्माजींचे सर्व तत्त्वज्ञान स्वीकारणे नव्हे" असे उत्तर द्यावे. असे उत्तर देण्याऐवजी खादीच सोडणे हे योग्य नव्हे. लोक वाटेल ते म्हणतात. लोकांच्या म्हणण्याला कितपत महत्त्व द्यावयाचे ते आपण ठरविले पाहिजे.

वसंत, मी एकदा बोरीबंदरवर होतो. खादीचा पोशाख केलेला एक गृहस्थ दुसऱ्या वर्गाच्या डब्यात चढला. मजजवळ उभा असलेला एक मित्र म्हणाला, "खादी वापरतात व सेकंड क्लासमध्ये बसतात हा दंभ आहे!" मी त्यास म्हटले, "अरे, सेकंड क्लासमध्ये बसूनही खादी वापरण्याची त्यांना लाज वाटत नाही, त्यात कमीपणा वाटत नाही असे का म्हणत नाहीस? खादीभोवती अहिंसा, सत्य, साधेपणा, गरीबांविषयी आस्था, त्याग, हिन्दू-मुस्लिम ऐक्य वगैरे गुणांचे वातावरण आपण गांधीजींच्यामुळे मानतो. परंतु सारेच या दृष्टीने खादी वापरीत असतील असे नाही. गरिबांना दोन घास मिळतील एवढ्याच हेतूने पुष्कळजण खादी वापरीत असतील. त्यांच्यावर दुसऱ्या गोष्टी तुम्ही का लादता?

कोणत्याही मिषाने खादी घेतलीत तरी गरिबाला घास मिळणार आहे ही गोष्ट खरी. खादी गरिबाचा आधार आहे. ती लौकर मळते, लौकर फाटते, जड असते, महाग पडते अशा सबबी सांगू नका. वसंता, खादी हे जिवंत वस्त्र आहे. त्यात गरिबांची सुखदुःखे ओतलेली आहेत. एखादा खादीचा सदरा लौकर फाटला तर मनात म्हणा, सूत कातणाऱ्या मातेचे हृदय फाटलेले असेल. तिच्या हृदयाला दुःखाचा पीळ पडलेला असेल. म्हणून कातताना तिचे लक्ष लागले नसेल व तिच्या सुताला नीट पीळ बसला नसेल. खादी लौकर मळत असेल, परंतु दारिद्र्याने मलिन झालेल्या मुखांना ती उजळ करते. खादी लौकर फाटत असेल, परंतु दुःखाने व दारिद्र्याने ज्यांचे संसार फाटले आहेत त्यांना ती आधार देते. खादी महाग असेल, जड असेल; परंतु तो भार आपण सहन करू या. आपणास इतर शेकडो वायफळ खर्च कमी करता येतील. त्यातून खादीमुळे होणारा अधिक खर्च भागवता येईल. धर्मकर्मात, श्राद्धपक्षात, तीर्थयात्रांत होणारा खर्च खादीत करावा व सर्व पुण्य पदरी पडेल असे म्हणावे. श्रमणाऱ्या माणसाला त्याने निर्माण केलेली वस्तू घेऊन पोटभर अन्न देणे याहून थोर धर्म कोणता? खादीत अन्नदान आहे. नकळत गुप्तदान आहे. कोणी खादी निर्मिली, कोणी सूत कातले? आपणास त्याचे नाव माहीत नाही. कोणी खादी विकत घेतली व आपणास घास मिळाला, त्याचेही नाव घास मिळणाऱ्याला माहीत नाही. परंतु मदत तर येऊन राहिली आहे. असा हा रोकडा धर्म आहे. त्यासाठी करा थोडा त्याग. थोडीशी महाग व थोडीशी जाड असणारी खादीही स्वातंत्र्योन्मुख राष्ट्राने घेऊ नये का?

स्वातंत्र्यासाठी अपरंपार किंमत द्यावी लागते. कष्टांचे डोंगर उचलावे लागतात. नवतुर्कस्तानाचा निर्माता जो थोर केमालपाशा त्याला स्वातंत्र्य-युद्धात म्हाताऱ्या तुर्की स्त्रियांनी मदत केली. त्या तुर्की स्त्रिया डोक्यावर दारूगोळ्याच्या टोपल्या घेत. दऱ्याखोऱ्यातून तो बोजा डोक्यावर घेऊन त्या चढत उतरत. केमालच्या सैन्यास दारूगोळा नेऊन देत. ते अपरंपार कष्ट त्या सहन करीत. ते करणे, डोक्यावर दारूगोळ्याच्या टोपल्या भर-भरून नेणे त्यांना जड वाटले नाही. परंतु आम्हांला साधी खादी जड वाटते, जाड वाटते. ती महाग वाटते. एवढासाही त्याग करावयास का

आपण तयार नसावे? इतर राष्ट्रांचे त्याग पाहिले म्हणजे आपण खाली मान घातली पाहिजे. आम्हांला तुरुंगात जाणे अशक्य वाटते. महाग, जरा जाडी भरडी खादी घालणे अशक्य वाटते. आम्हांला सदैव गुलामगिरीत खितपत पडणे हेच एक शक्य आहे! वसंता, स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या राष्ट्राने अशक्य शब्द विसरून गेले पाहिजे.

आज एवढेच पुरे. तू मला दिवाळीत बोलावले आहेस. परंतु मला येता येणार नाही. आपल्या हृदय-मंदिरात गरिबांविषयीच्या भक्तीचे दिवे पाजळू या! तरच ती दिवाळी. खरे ना? रागावू नको. आपण केव्हा भेटू ते मला तरी काय माहीत? मनोमय भेट हीच खरी भेट. तिच्यातील गोडी अपूर्व आहे. मला तरी पुष्कळ वेळा मनोमय भेटीच आवडतात. प्रिय मित्रांना मी माझ्या हृदयमंदिरात वाटेल तेव्हा वाटेल तितका वेळ भेटतो. रागावू नकोस. तुझ्या सर्व मित्रांस माझे सप्रेम प्रणाम किंवा आशीर्वाद.

तुझा
**श्याम**

पत्र चौथे

# झेंडा म्हणजे राष्ट्राचा गौरव

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तुझी प्रकृती बरी नव्हती हे वाचून वाईट वाटले. प्रकृती बरी नसता नाही तू सेवा दलात जात होतास. प्रकृतीची काळजी घेणे हेही एक कर्तव्य नाही का? तू म्हणतोस तेही खरे की सेवा दलास नुकताच आरंभ झालेला. त्यात लगेच खंड पडणे बरे नव्हते. आरंभीच जपावे लागते. रोपटे लहान आहे तेव्हाच अधिक काळजी घ्यावी लागते. परंतु प्रकृतीची हयगय करू नकोस. मी तेथे असतो तर बरे झाले असते.

आज तुला मी काय लिहू? आता येता रविवार हा या महिन्यातील शेवटचा रविवार. महिन्यातील शेवटच्या रविवारी झेंडावंदन होत असते. हिंदुस्थानात शेकडो ठिकाणी त्या दिवशी सकाळी ८ वाजता झेंडावंदन होते. तुझ्या सेवा दलाच्या वतीने तू तो उपक्रम सुरू कर. आपल्या झेंड्याविषयी आज तुला दोन शब्द लिहीत आहे. ते तुझ्या सेवा दलातील मित्रांस वाचून दाखव.

हिंदुस्थान हे सांस्कृतिक दृष्ट्या प्राचीन काळापासून जरी एकराष्ट्र असले तरी राजकीय दृष्ट्या ते एक कधी झाले नव्हते. फार प्राचीन काळापासून या देशात लहान लहान अशी शेकडो राज्ये होती. त्या त्या राजाचा विशिष्ट असा ध्वज असे. वंशपरंपरा एकच ध्वज असे, असे नाही. पित्याचा एक ध्वज तर पुत्राचा दुसरा. तो ध्वज सर्व जनतेचा

नसे. त्या त्या राजाची जणू ती आवड असे. अर्जुनाला कपिध्वज असे म्हणतात. त्याच्या ध्वजावर वानराचे चिन्ह आहे. कृष्णाच्या झेंड्यावर गरुडाचे चिन्ह आहे. तसेच मयूरध्वज, ताम्रध्वज वगैरे राजांची नावे आपण त्या काळात वाचतो. ताम्रध्वज हा मयूरध्वजाचा मुलगा. बापाच्या झेंड्यावर मोर होता, तर मुलाचा लाल बावटा होता! असे हे निरनिराळ्या राजांचे ध्वज असत. त्या ध्वजांमध्ये सर्व राष्ट्राचे जीवन ओतलेले नसे. तो तो ध्वज त्या व्यक्तीपुरता असे.

अशोकाच्या काळात हे हिंदुस्थान एका सत्तेखाली आले. अशोकाचा ध्वज कसा, कोणता होता ते मला माहीत नाही. मुसलमानांच्या कार-कीर्दीत त्यांचा हिरवा अर्धचंद्राचा झेंडा आला. पुढे मराठी साम्राज्य आले. त्यांचा भगवा झेंडा व जरीपटका होता. असे हे झेंडे आले व गेले. परंतु सर्व भारतीयांचा असा एक झेंडा निर्माण झाला नव्हता. कारण राजकीय दृष्ट्या आपण सारे एक ही भावनाच नव्हती.

आज आपण राजकीय दृष्ट्या एक होत आहोत. मुसलमान आज पाकिस्तानची भाषा बोलून या एका राष्ट्राचे दोन तुकडे करू पहात आहेत. पाकिस्तानात ते आपले अर्धचंद्राचे हिरवे निशाण रोवणार. हिंदु-महासभावाले भगवा झेंडा रोवू पाहणार. परंतु काँग्रेसने जो झेंडा निर्मिला आहे तो अखंड भारताचा; भारतातील सर्व जाती–जमातींचा समन्वय करणारा असा आहे. भारताच्या राजकीय ऐक्याचा तो झेंडा आहे. या झेंडयाचे पुढे काय होईल ते मला माहीत नाही. परंतु आज तरी काँग्रेसचे ते मुख्य प्रतीक आहे. आजचा झेंडा ही महात्माजींची निर्मिती आहे.

आजचा झेंडा मला वाटते पहिल्या असहकारितेच्या चळवळीत निर्माण झाला. निर्माण होताच त्याला झगडावे लागले. नागपूरचा झेंडा सत्याग्रह तुला माहीतच असेल. सर्व हिंदुस्थानातून त्या वेळी सत्याग्रही तेथे गेले होते. पूज्य विनोबाजी, सरदार वल्लभभाई, राजगोपालाचारी वगैरे तेथे आले होते. परंतु त्या वेळचा ३१ साली पुन्हा बदलला. पूर्वी लाल, पांढरा व हिरवा असे तीन रंग होते. त्याऐवजी केशरी, पांढरा, व हिरवा असे रंग ३१ साली आले. लाल रंगाच्याऐवजी केशरी आला. शीख लोकांच्या

समाधानासाठी हे करण्यात आले. आजचा झेंडा भारतातील सर्व धर्मांचा समन्वय करीत आहे. स्वतंत्र हिंदुस्थानात सर्व धर्म गुण्यागोविंदाने नांदतील असे तो सुचवीत आहे. उद्याचे स्वातंत्र्य एका विशिष्ट धर्माचे नसून सर्वांचे ते आहे असे हा राष्ट्रीय झेंडा उद्‌घोषीत आहे.

केशरी रंग हा शीख धर्माचा, हिरवा रंग हा मुसलमान, बंधूंचा शुभ्र रंग हा हिंदू धर्मीयांचा. इतर जे धर्म असतील ते शुभ्र रंगात येऊन गेले. कारण शुभ्र रंगात सारे रंग असतात. सूर्याच्या स्वच्छ किरणांत सप्तरंग असतात असे शास्त्रज्ञ सांगतात, त्याप्रमाणे या धवल रंगात वास्तविक सारे येऊन गेले.

या तीन रंगांत सर्व धर्मांच्या ऐक्याची ही अशी कल्पना आहे. या रंगाचा निराळाही अर्थ बसवितात. केशरी रंग त्यागाची भावना दर्शवितो. हिरवा रंग शांतीची भावना देतो. हिरवा रंग पाहून डोळ्यांना समाधान होते, हिरवी सृष्टी पाहून डोळे निवतात. विशेषतः अरबस्थानातील वालुकामय प्रदेशात हिरवळीची जागा दृष्टीस पडणे म्हणजे केवढा आनंद ! म्हणून हिरव्या रंगाला त्यांनी प्राधान्य दिले. इस्लाम या शब्दाचा अर्थही शांती. अशा रीतीने हिरवा रंग शांतीचा सूचक आहे आणि शुभ्र रंग पावित्र्य दाखवितो. हा झेंडा निष्कलंक राहील. दुसऱ्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य हा हिरावून घेणार नाही, दुसऱ्या राष्ट्रांची पिळवणूक करणारा हा साम्राज्यवादी झेंडा नाही. साम्राज्यवादी राष्ट्राचे झेंडे दुसऱ्यांच्या रंगांत रंगलेले आहेत. त्यांनी अन्य देशीयांचे रक्तशोषण चालविले आहे. परंतु भारतीय झेंडा दुसऱ्याचे रक्तशोषण करणार नाही. हा झेंडा निर्मल राहील. जगात शांती ठेवण्यासाठी तो झटेल. जगात सारे स्वतंत्र असावेत यासाठी त्याग करील.

काँग्रेसच्या झेंड्याच्या तीन रंगांचे वरती दोन अर्थ मी सांगितले. मला तिसराही एक अर्थ त्या रंगांत दिसतो. हा झेंडा धर्मसमन्वय करणारा आहे, त्याचप्रमाणे वर्ग समन्वयही करणारा आहे, असे मला वाटते. काँग्रेस सर्वोदय करू पहाते. ती कोणाला वगळू इच्छित नाही. वर्गयुद्धाचे तत्व अद्याप तिने स्वीकारलेले नाही. सर्व वर्गांचा मेळ ती घालू पहात आहे. वर्गसलोखा ती घडवू पहात आहे. या प्रयत्नांत तिला कितपत यश येते ते पहावयाचे आहे. या संबंधी अधिक मी पुढे लिहीन.

कोणताही समाज घेतला तर त्यात तीन वर्ग दिसून येतील. एक शेतकऱ्यांचा वर्ग, दुसरा मजुरांचा वर्ग, तिसरा पांढरपेशांचा व धनिकांचा वर्ग. या तीन वर्गांमिळून समाज होत असतो. काँग्रेस ह्या सर्वांना एकत्र नांदवू पहात आहे. शेतकरी सर्व सृष्टी हिरवी हिरवी करतो. ओसाड जमीन तो नटवतो. शेले हा महाकवी म्हणत असे की "सर्वांत मोठा कलावान् कोण? तर शेतकरी!" एखादा चित्रकार कागदावर हिरवे रंगवील. परंतु शेतकरी शेकडो कोस जमीन हिरवी करतो. म्हणून राष्ट्रीय झेंड्यांतील हा जो हिरवा रंग तो शेतकऱ्याचा समजू या आणि केशरी रंग तो कामकऱ्याचा. कामगारांचा आंतर राष्ट्रीय झेंडा लाल रंगाचा आहे. काँग्रेसचे अहिंसेचे ब्रीद आहे. लाल रंगात अहिंसा मिसळली तर तो लाल रंग जरा सौम्य होईल. तो केशरी होईल. म्हणून हा केशरी रंग मी कामकऱ्यांचा मानतो. आणि उरला पांढरा रंग हा पांढरपेशांचा, भांडवलदारांचा, स्वतःला प्रतिष्ठित समजणाऱ्यांचा, ज्यांना प्रत्यक्ष फारशी मेहनत करावी लागणार नाही, जे स्वतःला बुध्दिजीवी समजतात अशांचा हा रंग. स्वराज्यांत हे पांढरपेशे लोक कामगार व शेतकरी ह्यांच्या विरुद्ध जाणार नाहीत. खाली शेतकऱ्यांचा पाया, वर कामगारांचा कळस, मध्ये हे पांढरपेशे. श्रमणाऱ्या जनतेच्या कल्याणासाठी म्हणून हा वर्ग राहील. तसे तो न करील तर वरचा केशरी रंग व खालचा हिरवा रंग-शहरातील कामगार व खेड्यातील शेतकरी एक होतील व पांढरपेशे नष्ट होतील, पुंजिपती विलयाला जातील. परंतु तसे या भारतात न होवो. भारतीय भांडवलवाले गरिबांचे रक्तशोषण करायचे थांबवोत, युगधर्म ओळखोत. काँग्रेसची ही इच्छा आहे. काँग्रेसचे हे ध्येय आहे.

वसंता, हा तिसरा अर्थ अर्थात् माझ्या मनातील. शब्दांत किंवा प्रतीकात अर्थ असतो तो अनंत असतो. शब्दांतील अर्थाचा विकास होत असतो. यज्ञ या शब्दाचा फार प्राचीन काळी 'एखादा तरी बळी देणे' एवढाच अर्थ होता, परंतु पुढे एक ऋषी म्हणू लागला, "यज्ञ म्हणजे काय? यज्ञ म्हणजे कामक्रोधांचे हवन. आत्मा हा यजमान; श्रद्धा ही पत्नी व वासनाविकार हाच तर पशू!" गीतेत तर यज्ञाचा अर्थ आणखी वाढवला. यज्ञ ह्या शब्दाचा अर्थ एकमेकांची झीज भरून काढणे असा झाला. किंवा

स्वराज्य हा शब्द घे. स्वराज्य ह्या शब्दाचा अर्थ काय? केवळ आपल्या देशाचा किंवा आपल्या धर्माचा राजा असणे म्हणजे 'स्वराज्य' नव्हे, स्वराज्य म्हणजे गोरा कलेक्टर जाऊन काळा कलेक्टर येणे नव्हे! स्वराज्य म्हणजे भांडवलदार वर्गाच्या हाती सत्ता असणे नव्हे, ते खरे स्वराज्य ज्यात कोणी कोणाची पिळवणूक करित नाही, जेथे सर्वांच्या विकासासाठी वाव आहे. अशा रीतीने शब्दांमधील अर्थ वाढत असतो. मीही तिरंगी झेंड्यांतील तीन रंगांत नाना अर्थ पहात आहे. सारे अर्थ एकप्रकारे खरेच आहेत.

अशा रीतीने काँग्रेसचा हा झेंडा सर्व धर्मसमन्वय व सर्ववर्गसमन्वय करू पहात आहे. आणि त्या झेंड्यावर चिन्ह कोणते आहे? चरखा. चरख्याचा काय अर्थ? चरखा हे अविरोधी श्रमाचे प्रतीक आहे. आज जगात सर्वत्र स्वार्थ बोकाळला आहे. स्पर्धा चालली आहे. बाजारपेठा काबीज करण्यासाठी अट्टाहास चालला आहे. यंत्रामुळे पैदास बेसुमार वाढली आहे. हा पैदा झालेला माल खपविण्यासाठी वसाहतींची जरूरी भासू लागली. त्या वसाहतीतील उद्योगधंदे मारायचे व आपला माल तेथे खपवावयाचा. आज यंत्र म्हणजे गुलामगिरीचे प्रतीक झाले आहे. दुसऱ्या राष्ट्राचे रक्तशोषण केल्याशिवाय साम्राज्यशाहीतील यंत्ररूप राक्षस जगू शकत नाही! रशियात निराळा एक प्रयोग चालला आहे. परंतु सध्यातरी यंत्रे गुलाम करीत आहेत.

काँग्रेसचा झेंडा पिळवणूक करू इच्छित नाही. स्पर्धेत शिरू इच्छित नाही. जगाला गुलाम करू इच्छित नाही. चरखा यंत्र-विरोधी आहे असे नाही. ते यंत्र आम्हास पाहिजे आहे जे पिळवणूक करणार नाही, जे माणसाला बेकार करणार नाही. एक गिरणी काढली तर हजारो बेकार होतात. यंत्र हजारोंचे काम करते. माणूस कर्मशून्य होतो. मनुष्य हेही यंत्र आहे. या यंत्राला बेकार ठेवल्याने हे यंत्र सडून जाईल, गंजून जाईल.

चरखा सांगतो की भारतीय उद्योगधंदे दुसऱ्याची लूटमार करणार नाहीत. उद्याच्या स्वतंत्र हिंदुस्थानात यांत्रिक उद्योगधंदे उभारले तरी तेथे कामगारांची पिळवणूक होणार नाही. हे कारखाने जणू आपले असे

त्यांना वाटेल. उद्याचे शहरांतील यांत्रिक उद्योगधंदे खेड्यांना मारणार नाहीत. खेडीही टवटवीत राहतील. ग्रामोद्योग व नगरोद्योग ह्यांच्यात शक्यतो अविरोध निर्माण करण्याची आम्ही खटपट करू.

राष्ट्रीय झेंड्यात आपल्या छातीवर चरखा लावला आहे. याचा अर्थ हा की काँग्रेस गरीबाला हृदयाशी धरील, दरिद्रनारायणासाठी हा झेंडा आहे. समता या शब्दाचा अर्थ काय? जो आजपर्यंत उपेक्षिला गेला त्याची अधिक काळजी घेणे म्हणजे समता. ज्याची अधिक झीज झाली त्याची झीज भरून काढणे म्हणजे समता! काँग्रेस सर्वांचे कल्याण करू इच्छिते. परंतु जे रात्रंदिवस राबतात, ज्यांची आजपर्यंत कोणी काळजी घेतली नाही, ज्यांचे संसार धुळीस गेले, जे कर्जात बुडाले आहेत, दारिद्र्यात खितपत पडले आहेत, ज्यांना कला व ज्ञान यांचा आनंद चाखावयास अवसर नाही, अशांची ती आधी बाजू घेईल. जो कालपर्यंत उपाशी होता त्याला अधिक खायला देईल. जे फारसे झिजले नाहीत त्यांना अधिक झिजावयास लावील. काँग्रेस पददलितांसाठी, गरिबांसाठी उभी आहे.

काँग्रेसच्या झेंड्याखाली उभ्या राहणाऱ्या हृदयात गरिबांबद्दलची आस्था हवी. मारुतीच्या हृदयात प्रभुरामचंद्राची मूर्ती होती, त्याप्रमाणे काँग्रेस सेवकाच्या हृदयात गरिबाची मूर्ती हवी. जो काँग्रेसचा झाला त्याने हरिजनांना जवळ घेतले पाहिजे. शेतकऱ्याची लूट त्याने थांबविली पाहिजे. जो काँग्रेसचा झाला तो भरमसाट व्याज घेणार नाही. कामगारांची उपासमार होऊ देणार नाही. काँग्रेसच्या झेंडयाखालचा जमीनदार शेतकऱ्यास आधी खायला आहे की नाही ते पाहील. काँग्रेसच्या झेंडयाखालचा सावकार शेतकऱ्याच्या घरादारावर नांगर फिरवणार नाही, त्याची अब्रू घेणार नाही. काँग्रेसचा झेंडा मानणारा कारखानदार कामगारासाठी नीट चाळी बांधील. त्यांना पगारी रजा देईल. त्यांना पुढे पेन्शन देईल. काँग्रेसच्या झेंडयाखाली येणे म्हणजे पिळवणूक थांबविणे, गरीबांची, श्रमणारांची सेवा करणे. हा सारा अर्थ झेंडयाच्या रंगात आहे. चरख्याच्या खुणेत आहे. हा अर्थ समजून जर आपण वागू तर या देशात रक्तपात होण्याची जरूरी पडणार नाही. सारे प्रेमाने व गुण्यागोविंदाने एकत्र नांदू, परंतु हे होईल का? आपण आशा राखू या.

वसंता, झेंडा म्हणजे त्या त्या राष्ट्राची खूण. त्या लहानशा झेंड्यात साऱ्या राष्ट्राची प्रतिष्ठा असते. झेंडा म्हणजे संरक्षण. समुद्रावर आपआपल्या राष्ट्राची निशाणे लावून गलबते निर्भयपणे जात असतात. झेंडा नसणे म्हणजे संरक्षण नसणे. झेंडा म्हणजे राष्ट्राचे सौभाग्य. लहानसे ते फडके असते, परंतु राष्ट्राचा सारा गौरव, सारी अब्रू सारा ध्येयवाद त्यात असतो. अत्तराच्या एका थेंबात शेकडा फुलांचा अर्क असतो. त्याप्रमाणे ह्या लहानशा झेंड्यात कोट्यवधी लोकांचा आत्मा असतो. वामनाच्या एका पावलात सारी सृष्टी सामावली त्याप्रमाणे ह्या लहानशा झेंड्यांत सर्व राष्ट्राचा संसार जणू साठविलेला असतो. झेंडा म्हणजे सर्व राष्ट्राची खूण, राष्ट्रात जे जे चांगले आहे त्याची त्याची खूण.

अशा ह्या झेंड्यासाठी सर्वस्व अर्पावे लागते. या झेंड्याला कमीपणा येईल असे काहीही आपल्या हातून होता कामा नये. हा नवीन ध्येयात्मक झेंडा आपण निर्मिला आहे. तो स्वराज्यावर नेऊन रोवावयाचा आहे. त्यासाठी जे जे बलिदान करावे लागेल ते ते आपण आनंदाने केले पाहिजे. वसंता, झेंड्यासाठी आपण सरळ खांब उभा करतो. पुष्कळ वेळा बांबूची सरळ काठी घेतो. त्या काठीवर हा झेंडा फडकतो. त्याचा अर्थ काय? ती काठी, तो खांब म्हणजे काय? तुलसीरामायणात लक्ष्मण रामाला म्हणतो. "रामा, तुझे यश फडकत राहील. तुझ्या यशोध्वजाला लक्ष्मण हा दंड शोभेल!" यश रामाचे, त्यासाठी लक्ष्मणाने सर्वस्व द्यावयाचे. त्याचा मुका त्याग! जशी ती बांबूची काठी सरळ उभी असते, मोडेल पण वाकणार नाही, त्याप्रमाणे काँग्रेसच्या झेंड्याखाली आपण उभे असले पाहिजे. आपला देहदंड म्हणजेच ती काठी. आपले देह ह्या झेंड्याखाली सरळ उभे राहतील. हे देह मरतील, परंतु वाकणार नाहीत. अन्यायाला, जुलुमाला शरण जाणार नाहीत. राष्ट्राच्या झेंड्यासाठी आम्ही सर्वस्वाचे आनंदाने समर्पण करू. गाजावाजा न करता सर्वस्व देऊ. आम्ही कोणी नाही, हा झेंडा म्हणजे सर्व काही. हा झेंडा फडकत राहो. आमचे शून्य होवो. वसंता, किती तरी असे भाव मनात येतात. परंतु आता पुरे. सर्वांस स. आशीर्वाद.

तुझा

श्याम

## पत्र पाचवे

# गांधींचा मार्ग शूरांचा, परमवीरांचा

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तुझी प्रकृती आता चांगली झाली हे वाचून बरे वाटले. पुन्हा आजारी पडू नकोस. कार्यकर्त्याने आजारी नाही पडता कामा. इटलीतील थोर देशभक्त मॅझिनी म्हणाला, "जगाला माझी जरुरी असता मी आजारी कसा पडू शकेन! आजारी पडणे म्हणजे पाप आहे." आपण अधिक खाल्ले असेल नाहीतर कमी खाल्ले असेल, फार जागरण केले असेल वा फार झोप घेतली असेल, फार काम केले असेल किंवा मुळीच केले नसेल. आजारी पडणे म्हणजे सृष्टिनियमाविरुद्ध वर्तन. कार्यकर्त्याने आपले जीवन संयमी व प्रमाणशील राखले पाहिजे. म्हणजे अखंड सेवा करता येईल. जे कोणते लहान वा मोठे काम हाती घेऊ ते हातून नीट होत जाईल. हे मी लिहीत आहे म्हणून रागावू नकोस. तू आता मला परका वाटत नाहीस म्हणून हे लिहित आहे. शरीर निरोगी व निकोप राखणे हा पहिला धर्म.

तू अहिंसेविषयी विचारले आहेस. काँग्रेसने आज अहिंसाधर्म आपलासा केला आहे. त्यात मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध असे काही नाही. अरे आपले रोजचे व्यवहार अहिंसेमुळेच चालले आहेत. हाच अहिंसेचा विजय आहे. आपल्या जीवनात आपण खोल पाहिले तर तेथे अहिंसा आहे असे दिसेल. सृष्टीचे तत्त्व परस्पर संहार नसून परस्पर सहकार्य आहे.

एक डॉक्टर होते. ते काँग्रेसच्या अहिंसेला हसायचे. अहिंसेने चालणार नाही असे ते म्हणावयाचे. ते सदैव हिंसेचे समर्थन करावयाचे. परंतु त्यांचा

प्रत्यक्ष व्यवहार अहिंसात्मक असे! रोगी आला तर ते गोड बोलावयाचे. त्याला धीर द्यावयाचे. एकदम त्याच्या मनावर आघात होईल असे ते काही सांगत नसत. बरा होशील हो, अशी आशा द्यावयाचे. त्यामुळे त्यांच्याकडे अधिक रोगी यावयाचे. हा डॉक्टर फार चांगला, असे सारे म्हणावयाचे. स्वतःच्या अहिंसामय वृत्तीमुळेच ते डॉक्टर सर्वांना प्रिय झाले होते. ते फार डिडिसफिडीस करत नसत. परंतु ज्या अहिंसेमुळे ते सर्वांना हवे हवेसे झाले होते ती अहिंसा ते उपहासीत! परंतु त्यांच्या न कळत जणू त्यांच्या वृत्तीत अहिंसा प्रकट होई.

तू म्हणशील की आपण रोज अहिंसक असतो. पण प्रश्न उत्पन्न होतो तो तेव्हा जेव्हा दुसरा एकादा आपल्यावर चालून येतो, दुसरा एखादा मारायला येतो. ते डॉक्टर रोज अहिंसक वागत असत, परंतु जर कोणी त्यांच्यावर चालून येता, त्यांचे घर लुटायला येता, त्यांच्या पत्नीच्या अंगावर कोणी धावून येता तर ते अहिंसात्मक मार्ग न स्वीकारता हिंसेचा स्वीकारते. आपल्या समोर हिंसक शत्रू उभा राहिला असता आपण कसे वागावयाचे, हा मुख्य प्रश्न आहे. रोज आपण कसे वागतो हा नाही.

हिंसेचा हिंसेने प्रतिकार करावयाचा हा मार्ग अनादिकालापासून चालत आला आहे; परंतु त्यामुळे हिंसेचा अंत झाला नाही. हिंसेने हिंसा कमी न होता उलट वाढतच चालली आहे. सुधारणा म्हणजे का हिंसेची शस्त्रे बदलणे? दगडाधोंड्यांची हत्यारे गेली व बाण आले. बाण जाऊन बंदुका आल्या. आता तोफा व बॉंबगोळे आले. पुढे मागे मारक असे किरण निघतील. परंतु याने मानवाची सुधारणा ती काय झाली? जोपर्यंत मनुष्याचे हृदय मोठे झाले नाही, कायदे उदार झाले नाहीत, तोपर्यंत सुधारणा शून्य आहे.

महात्माजी म्हणतात, युद्धाने युद्ध बंद करण्याचा प्रयोग आजपर्यंत दहा हजार वर्षे चालला, परंतु युद्धे बंद झाली नाहीत! तात्पुरते तह होतात. परंतु त्या तहातच पुढील युद्धाची बीजे असतात. मानवजातीचा हा प्रयोग फसला. आपण आता दुसरा प्रयोग करू या. त्याच जुनाट मार्गाने

जाणे हा काही शहाणपणा नव्हे. मनुष्य बुद्धिमान प्राणी आहे. त्याने स्वतःची बुद्धी वापरली पाहिजे. दहा हजार वर्षे त्याच त्या मार्गाने मानव जात आहे. आता निराळा मार्ग स्वीकारू या.

साधुसंतांनी आपल्या व्यक्तिगत जीवनात अहिंसेचा प्रयोग केला. त्यांनी हिंसेसमोर अहिंसा ठेवली. बुद्ध, ख्रिस्त वगैरेंनी हा मार्ग दाखविला. तो मला मारायला आला तर मीही त्याला मारू बघणे यात विशेषसे ते काय ? मारायला येणाऱ्या समोर शांतपणे उभे राहून "मला मारायचे असेल तर मार, परंतु मी तुला मारणार नाही. तू चुकत आहेस. मग तुला पश्चात्ताप होईल. एक दिवस तुझे हृदय-कपाट उघडेल. त्यात प्रेमाचा प्रकाश येईल. तुझे हृदय उघडावे, तुझ्या जीवनाचा विकास व्हावा म्हणून मी माझे बलिदान करतो. तुझ्या गंजलेल्या हृदयाला माझे रक्त लावतो!" मनुष्याला सुधारण्याचा हाच मार्ग आहे. हा शास्त्रीय मार्ग आहे.

पूर्वी शाळांतून मुलांना नानाप्रकारच्या शिक्षा देत. त्यांना फटके मारीत. उलटे टांगीत. परंतु तो रानटी प्रकार होता. 'छडी वाजे छमछम, विद्या येई घमघम' हे पूर्वीचे शिक्षणशास्त्रातील सूत्र आज मागे पडले आहे. छडी मारणाऱ्या शिक्षकाला आज उत्कृष्ट शिक्षक म्हणत नाहीत. शाळांतील शिक्षणशास्त्रात जशी ही क्रांती झाली आहे तशीच जगाच्या विशाल शाळेत झाली पाहिजे. एरव्ही मनुष्यस्वभाव सुधारणार नाही. त्याने मला मारले, मी त्याला मारले, यात पुरुषार्थ तो काय ? ही झटपट गोष्ट झाली. तेथे ना विवेक ना काही. मनुष्यस्वभाव म्हणजे इतकी साधी वस्तू नाही. फार गुंतागुंतीचा हा स्वभाव आहे. ऊठ व घाल घाव, इतके सोपे समीकरण हे नाही.

गांधीजी म्हणतात, "साधुसंतांनी जे वैयक्तिक जीवनात केले ते मी सामुदायिक जीवनात आणू पाहतो." एकनाथांच्या अंगावर कोणी १०८ वेळा थुंकला. एकनाथ तितक्यांदा स्नान करून आले. ते रागावले नाहीत. थुंकणाऱ्याच्या अंगावर उलट थुंकले नाहीत. किंवा त्यांच्या थोबाडीत मारली नाही. ते पळूनही गेले नाहीत. ते निर्भयपणे, शांतपणे

प्रतिकार करत राहिले. एकनाथांच्या ह्या गोष्टीचे आपण कौतुक करतो. ता मूर्खपणा मानीत नाही. उलट उच्च मानवतेचा आदर्श म्हणून त्या गोष्टीस आपण संबोधितो.

महात्माजी 'अन्यायाचा प्रतिकार करू नका' असे कधीच सांगत नाहीत. त्यांना जेव्हा एकदा प्रश्न विचारण्यात आला की "तुम्ही का जगता? जगावे असे तुम्हास का वाटते?" त्या वेळेस त्यांनी उत्तर दिले की "जगात जे असत्य आहे, जो अन्याय आहे, जो अंधार आहे, जे पाशवी प्रकार आहेत, त्यांच्याविरुद्ध झगडणे हा माझा आनंद, त्यासाठी मी जगतो." महात्मा बुद्ध, टॉलस्टॉय किंवा ख्रिस्त यांच्या शिकवणीपेक्षा महात्मा गांधींची शिकवण निराळी आहे. टॉलस्टॉय किंवा येशू ख्रिस्त यांनी प्रतिकार करावयास सांगितले नाही. महात्माजींनी बुद्धाच्या, ख्रिस्ताच्या किंवा टॉलस्टॉयच्या शिकवणीत प्रतिकार ओतला. महात्माजींनी अहिंसा सामर्थ्यवती केली. टॉलस्टॉयला जर कोणी म्हणता की येथून ऊठ तर टॉलस्टॉय दुसरीकडे जाऊन बसता. तेथून ऊठ कोणी म्हणता तर तिसरीकडे बसता. परंतु उगीचच्या उगीच शिरजोरपणे महात्माजीस कोणी ऊठ म्हटले तर ते म्हणतील मी उठणार नाही. न उठल्यामुळे तो मनुष्य अत्याचारास प्रवृत्त झाला तर गांधीजी ते सारे शांतपणे सहन करतील.

महात्माजींच्या शिकवणीचा पुष्कळ वेळा विपर्यास करण्यात येतो. झेक लोक अहिंसक राहिले, त्यांनी लढा केला नाही. काय झाले त्यांचे? असे प्रश्न विचारण्यात येतात. परंतु झेक लोक अहिंसक प्रतिकार न करता स्वस्थ राहिले! महात्माजी स्वस्थ रहा असे नाही सांगत. प्रतिकार करा, परंतु अहिंसक मार्गाने करा, असे सांगतात. त्या प्रतिकारासाठी ज्या हाल-अपेष्टा भोगाव्या लागतील त्या भोगा, असे महात्माजींचे म्हणणे आहे. १९३० साली मिठाचा सत्याग्रह झाला. त्या वेळी प्रथम प्रथम स्वयंसेवक मुठीतील मीठ पोलिसांनी मागताच देत असत. परंतु महात्माजींना हे आवडले नाही.

त्यांनी लिहिले, "मूठ सोडू नका. मुठीत मीठ घट्ट धरून ठेवा. पोलीसास तुमच्या रक्तबंबाळ हातातून घेऊ दे." महात्माजींची अहिंसा

ही अशी आहे. प्रत्येक पाऊल ते अहिंसक रीत्या लढतील. अहिंसा म्हणजे शरणागती नव्हे. कर्मशून्यता नव्हे. स्वस्थ बसणे नव्हे. महात्माजी ही लढाई देऊ पाहतात. अहिंसक लढाई! झेक लोकांचे कारखाने जर्मन घेऊ लागले तर झेक लोकांनी अहिंसक रीत्या प्रतिकार करावयाचा. आमच्या मुडद्यांवरून आत जा, परंतु आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत तुम्हाला जाऊ देणार नाही, असा हा मार्ग आहे. गांधीजींचा मार्ग मेकडांचा नव्हे. तो शूरांचा, परम वीरांचा मार्ग आहे.

गांधीजींनी ही गोष्ट शतदा सांगितली आहे. मागे मोपल्यांच्या चळवळीच्या वेळेस त्यांनी लिहिले होते : "तुमच्या पत्नीवर बलात्कार करण्यासाठी कोणी आला तर तुम्ही शांतपणे प्रतिकार करावयास उभे रहा. तुमच्या मुडद्यावरून त्याला तुमच्या पलीकडे जाऊ दे. परंतु हा मार्ग तुम्हास पसंत नसेल तर त्यांना मारायला उभे रहा. पळून जाणे हे सर्वस्वी त्याज्य!" मागे एकदा आंध्र प्रांतातील लोकांना हिंदु – मुस्लिम प्रश्नाच्या बाबतीत सल्ला देताना महात्माजींनी लिहिले होते. "भीतीने हिंदू घरात बसत असतील तर ती अहिंसा नव्हे. त्यांनी खुशाल बाहेर पडावे व लढाई करावी. घरात भीतीने बसणे हे सर्वस्वी निंद्य होय!" अन्यायाला शरण जाणे किंवा अन्यायाच्या बाबतीत उदासीन राहणे या गोष्टीला गांधीजींच्या तत्त्वज्ञानात स्थान नाही.

युद्धातील मरण मरण्यात एक प्रकारची वीरता असते. शूरांचे, मर्दांचे आपण पोवाडे गातो. परंतु अहिंसेत का शौर्य नाही? अलेक्झांडर एका संन्याशाकडे गेला. संन्यासी निश्चितपणे बसला होता. जगज्जेत्या अलेक्झांडरकडे पाहून त्याने प्रणाम केला नाही किंवा तो उठून उभा राहिला नाही. अलेक्झांडर त्याला म्हणाला, "संन्याश्या, ह्या तलवारीने मी तुला छाटून टाकीन!" तो संन्यासी खदखदा हसला. संन्याशाच्या त्या हसण्यात का वीरता नव्हती? तरवार घेऊन दुसऱ्याच्या अंगावर धावणारा तेवढा का वीर? आणि मारकाच्या तरवारीसमोर निर्भयपणे हसणारा, मरणाला जिंकून घेणारा तो का कमी प्रतीचा वीर?

स्वामी श्रद्धानंदांनी गुरखा शिपायांसमोर आपली विशाल छाती उघडी केली व "चलाव तेरी गोली" असे सांगितले. त्या प्रसंगात का वीरता

नाही ? दिव्यता, भव्यता नाही ? तरवारीसमोर तरवार नेण्यापेक्षा तरवारी समोर छाती उघडी करणे, हे अधिक वीरतेचे आहे, असे मला तरी वाटते.

साधुसंतांनी अशी ही शूरता वैयक्तिक जीवनात दाखविली. म्हणून त्यांना आपण थोर मानतो. तेही वीरपुरुष होते. परमार्थात भित्रेपणाला स्थान नाही. विवेकानंद स्वामी रामकृष्णांविषयी एकदा म्हणाले की, "रामकृष्ण हे संन्यासी होते की वीर शिरोमणी होते, ते सांगता यणे कठीण आहे." महात्माजींनी हिंदुस्थानला दुबळे बनविले नाही. एका उच्च भूमिकेवरून लढणारे असे नवे झुंजार राष्ट्र त्यांनी बनविले. या भेकड राष्ट्राला गांधीजींनी जर अधिक भ्याड बनविले असते तर हिंदी राष्ट्राविषयी का जगाला आदर वाटला असता ? अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रातील स्त्रीपुरुष, म्हातारे-कोतारे, मुलेबाळे ज्याने उभी केली त्याने का राष्ट्राला भ्याडपणाचे पाठ दिले ? गुजराथमध्ये बोरसद येथे रक्तबंबाळ झाल्या तरी स्त्रिया जागेवरून उठल्या नाहीत. त्या स्त्रिया का भेकड ?

महात्माजींनी हा एक नवीन सामुदायिक अहिंसक प्रतिकाराचा मार्ग जगासमोर ठेवला. एक तर हा मार्ग माणसास शोभणारा आहे, शिवाय हिंसेशी आपण हिंसेने लढू म्हणू तर ते शक्यही नाही. आज लष्करी हिंसेचे शास्त्र इतके पुढे गेले आहे की साम्राज्य-सत्तेसमोर त्या लढाईत आपण कसे टिकू ? पोलंड नवशस्त्रांनी सज्ज होते. परंतु त्याचे काय झाले ? आपण तर अजून मागे आहोत. आपणाजवळ न शस्त्र ना शास्त्र. लाठी घेऊन काय करणार ? तरुणांची अशी दिशाभूल करण्यात अर्थ नाही. बंदुकाही आता निरुपयोगी होतील. आता हवाई लढाई करण्याचे दिव्य शास्त्र सारखे पुढे जात आहे. आपण त्यात कसे टिकू ?

परंतु गुलाम राहणे तर युक्त नव्हे. योग्यही नव्हे. अशा परिस्थितीत अहिंसात्मक लढाईचा मार्ग गांधीजी दाखवित आहेत. दक्षिण आफ्रिकेत महात्माजींनी हा माग चोखाळला. तेथील अन्याय्य कायदा महात्माजींच्या सत्याग्रहामुळे रद्द झाला. युरोपमध्येही या मार्गाचे मधून मधून अनुकरण केलेले कोठे कोठे आढळते. १६०१ ते १९०५ या काळात फिनिश लोकांनी रशियाच्या झारच्या जुलमांविरुद्ध अहिंसक प्रतिकाराचा मार्गच उचलला

होता. फिनिश लोकांना यश मिळाले. १९०७ मध्ये त्यांच्यावरील सक्ती रद्द करण्यात आली. हंगेरीतील अनत्याचारी प्रतिकाराचा नेता डीक याने १८६७ मध्ये हंगेरीला याच मार्गाने यश मिळवून दिले होते. १८४८ मध्ये हंगेरीत अत्याचारी क्रांती करण्याचा प्रयत्न झाला. परंतु ती क्रांती यशस्वी झाली नाही. त्या क्रांतीचा नेता कोसूथ हा होता. कोसूथ हा सत्ताप्रिय, महत्त्वाकांक्षी असा एक लष्करी सरदार होता. परंतु त्याच्या लष्करी क्रांतीला यश आले नाही. डीक हा सत्तालोलुप नव्हता. त्याने सत्ता मिळत असताही ती नाकारली. त्याला स्वतःला मानमरातब नको होता. रक्ताचा एक थेंबही न सांडता त्याने हंगेरीची स्वातंत्र्यघटना आस्ट्रियास मान्य करावयास लावली. डीक नाव हंगेरीतील लोकांनाही आज माहीत नाही! विजयी डीकचे लोकांना विस्मरण पडले, परंतु अपेशी कोसूथचे पोवाडे अद्यापही ऐकू येतात! तरवारीचे शौर्य लोकांना आकर्षक वाटते, परंतु तरवारीसमोर निःशंक उभे राहण्यात जे शौर्य असते ते अद्याप लोकांना समजू लागले नाही. जर्मनीतसुद्धा दोनदा अनत्याचारी चळवळी झाल्या. बिस्मार्क हा जो जर्मनीचा पोलादी सेनापती, त्याच्याविरुद्ध त्या दोन्ही चळवळी झाल्या. रोमन कॅथॉलिकांनी संस्कृति-संरक्षणार्थ एक चळवळ केली आणि १८७१ मध्ये कामगारांनी केली. सोशल डेमॉक्रॅटिक पक्षास मान्यता मिळावी म्हणून कामगारांचा तो अनत्याचारी उठाव होता. हल्लीच्या इजिप्तमध्येही ब्रिटिश सत्तेविरुद्ध या अनत्याचारी प्रतिकाराचीच कास धरण्यात आली होती. चीनमध्येही ब्रिटिश मालावर बहिष्कार—हा पंथ स्वीकारण्यात आला होता. अनत्याचारी प्रतिकारात बहिष्कार हे एक प्रभावी साधन असते. खुद्द इंग्लंडमध्येही १९२० मध्ये ब्रिटिश कामगारांनी या अहिंसात्मक बहिष्काराचा अवलंब केला होता. त्या वेळेस महायुद्ध नुकतेच संपले होते. रशियात क्रान्ती झाली होती. पोलंडची व रशियाची लढाई सुरू झाली होती. फ्रेंचांनी पोलंडला मदत पाठवली. इंग्लंडही मदत पाठवणार होते. परंतु त्या गोष्टीला ब्रिटिश कामगारांनी संघटित विरोध केला. त्यांनी ऑगस्टच्या ९ तारखेस आपले 'कौन्सिल ऑफ कॉमन्स' नेमले व ब्रिटिश सरकारला कळविले की, "जर रशियावर हल्ला करण्यासाठी पोलंडमध्ये सैन्य पाठविण्यात येणार असेल तर आम्ही

सर्वत्र संप करू. लष्कराची ने-आण करणे, दारूगोळा पाठवणे वगैरे कामात आम्ही सहकार्य करणार नाही. रेल्वे बंद पडतील. गोदीतील कामगार कामाला हात लावणार नाहीत. सारा व्यवहार आम्ही बंद पाडू. या युद्धावर संपूर्ण बहिष्कार घालू." लॉईड जॉर्ज त्या वेळी मुख्य प्रधान होता. त्याला पोलंडमध्ये सैन्य पाठविण्याचा विचार बाजूला ठेवावा लागला.

असा हा अहिंसात्मक प्रतिकाराचा मार्ग आहे. या मार्गातही शिस्त लागते. पूर्ण अहिंसक वृत्ती लागते. कारण हिंसा आली तर प्रतिपक्षी आनंदतो. हिंसेचे निमित्त करून तो ताबडतोब सारी चळवळ दडपून टाकतो. मग पाऊल पुढे पडण्याऐवजी मागे जाते. १९३० साली सोलापूरला लष्करी कायदा पुकारला गेला. त्या वेळेस जी एक दहशत जनतेस बसली आहे, ती अजूनही गेले नाही! म्हणून पाशवी सत्तेला आपल्या सत्तेचे प्रदर्शन करण्यास आपल्याकडून तरी शक्यतो संधी मिळू नये, अशी दक्षता अहिंसक लढ्याचा सेनापती घेत असतो. चौरीचुऱ्याच्या अत्याचारामुळे १९२१ मध्यं महात्माजींनी लढा थांबविला होता.

महात्माजींचा मार्ग नवीन आहे. त्याची फलद्रूपता पाच सहा महिने तुरुंगात गेल्यावरून अजमावू नका. ज्याप्रमाणे हिंसेच्या लढ्यात लाखो लोक सामील होतात, त्या प्रमाणे या लढ्यातही लाखो अहिंसक सैन्य सामील झाले पाहिजेत. जगात युद्धाशी युद्ध हा प्रयोग दहा हजार वर्षे झाला, महात्माजींच्या प्रयोगालाही तितकी वर्षे द्या. निदान पाच सहा महिने तुरुंगात गेलेत एवढ्यावरून पाहू नका.

उद्या हिंदुस्थान देश स्वतंत्र झाला तर लष्कर ठेवावे लागेल की नाही? मागे महात्माजींनी लिहिले होते की "पाच हजार वर्षे तरी लष्कर वगैरे ठेवावे लागेल. लष्कर ठेवावे लागणार नाही अशी परिस्थिती इतक्या लौकर येणार नाही." जरी महात्माजी हे पाहू शकतात तरी ते ध्येयाचा ध्यास घेऊनच राहणार. सूर्य जेव्हा कोट्यवधी मेणबत्त्यांच्या उष्णतेने जळतो तेव्हा कोठे तुम्हा-आम्हाला जगण्यापुरती उष्णता मिळते. महात्माजी इतका अट्टाहास धरतात तेव्हा कोठे तुम्ही आम्ही थोडे तरी पुढे जातो.

काँग्रेसला ही गोष्ट माहीत आहे. काँग्रेस मर्यादा ओळखते. इंग्रजांशी आज आम्हास लढावे लागले तर अहिंसेशिवाय उपाय नाही, हे काँग्रेस ओळखते. जर इंग्रजांनी आम्हास स्वराज्य दिले तर त्यांच्या युद्धात आम्ही हिंसात्मक मदतही करू, असे काँग्रेसने सांगितले होते. इंग्रजांशी हिंसात्मक लढा देणे आम्हास अशक्य आहे. परंतु आमचे स्वराज्य मान्य केल्यावर इंग्रजांच्या हिंसक शक्तीत आम्हास जी काही हिंसक शक्ती मिसळता येईल ती आम्ही मिसळू, तेथे आम्हास एकाकी कोणाजवळ लढा करावयाचा नाही. इंग्रजांच्या शक्तीत भर घालता येईल, ती कशी घालावयाची, एवढाच प्रश्न. काँग्रेसने जेव्हा ही भूमिका स्वीकारली तेव्हा ध्येयवादी गांधीजी काँग्रेसपासून दूर झाले. पुण्यास जेव्हा ठराव झाला तेव्हा सरदार वल्लभभाई, राजगोपालाचारी वगैरे म्हणाले, "गांधीजी संत आहेत. आम्ही व्यवहारी आहोत. गांधीजी फार दूरचे पहातात. आम्ही आजचे पहातो. गांधीजींचे राष्ट्रावर अनंत उपकार आहेत. ते आम्ही कृतज्ञ-पणे स्मरू. परंतु जर इंग्रजांनी राष्ट्रीय सरकार आज आम्हास दिले तर आम्ही त्यांच्या युद्धात सहकार्य करू."

परंतु ब्रिटिशांनी राष्ट्रीय सरकार दिले नाही. आम्हाला इंग्रजांच्या शत्रूशी म्हणून झगडण्याचे कारण उरले नाही. आम्हाला इंग्रजांशीच झगडणे प्राप्त आहे. इंग्रजांशी अहिंसेने लढणे हाच मार्ग आहे व तोच काँग्रेसने आज स्वीकारला आहे. अर्थात या अहिंसेत मोडतोड येते की नाही ते मी काय सांगू? परंतु स्वातंत्र्य-युद्धात आम्ही प्राणांची हिंसा केली नाही, हे सर्वांना कबूल करावे लागेल.

महात्माजींचे अहिंसा तत्त्व दुबळे नाही. महात्माजींनी राष्ट्राला भेकड बनविले नाही. शिवाय या हिंदुस्थानात एकदा हिंसेच्या मार्गाने झगडायचे ठरविले तर किती अनर्थ होतील याची कल्पना करा. हरिजन म्हणतील सनातनींना ठोका. सनातनी म्हणतील हरिजनांना बडवा. कामगार म्हणतील कारखानदार दूर करू या. कारखानदार म्हणतील कामगारांना गोळ्या घालू या. कुळे म्हणतील जमीनदार व खोत गाडून टाकू या. जमीनदार व खोत म्हणतील कुळांवर अत्याचार करू या. हिंदू म्हणतील मुसलमान

शेफारले, त्यांची जिरवली पाहिजे. मुसलमान म्हणतील, आम्हीही हात सरसावून उभे आहोत. या हिंदुस्तानात अत्याचाराचा मार्ग सुरू होण्याचा अवकाश, मग सर्वत्र यादवी माजेल. सर्वत्र रक्तपात होईल. काँग्रेसचा स्वातंत्र्यसंग्राम आज अहिंसक आहे म्हणून तर दंगे कोठे झाले नाहीत.

गांधीजी अहिंसेसाठी जगतात. तरी तेही अहिंसेची मर्यादा ओळखतात. हे जीवन अपूर्ण आहे. ज्या वेळेस बोरसद तालुक्यात प्लेग फैलावू लागला व लोक उंदीर मारू देत ना, तेव्हा सरदार वल्लभभाई महात्माजींस म्हणाले, "प्लेगने लोक मरत आहेत. उंदीर मारा असे लोकास तुम्ही सांगा. लोक माझे ऐकत नाहीत" महात्माजींनी पूर्वी लिहिले होते, "माझ्या इतकाच एखाद्या घुंगुरट्यासही जगण्याचा अधिकार आहे." परंतु सरदारांच्या आर्त उद्‍गारांनी त्यांचे हृदय द्रवले. माणसे का वृथा मरू द्यायची ? त्यांनी लिहिले, "मला माणसाबद्दल अधिक प्रेम वाटते, हा वाटल्यास माझा दुबळेपणा म्हणा, पण उंदरांना मारून प्लेगच्या तडाक्यातून माणसे बचावली पाहिजेत." महात्माजी स्वतः बोरसद तालुक्यात त्या वेळेस जाऊन राहिले.

गीतेने म्हटले आहे की, कर्मात थोडा तरी दोष यावयाचाच. कमीत कमी दोष कर्मात आणणे एवढेच आपले काम. समोर वाघ आला तर काय करायचे ? साप-विंचू मारायचे की नाही ? भाजी खाणे म्हणजे हिंसा नाही का ? असे प्रश्न लोक विचारतात. परंतु ते अवघड प्रश्न जरा बाजूला ठेऊ या. निदान रोजच्या जीवनात आपण प्रेमाने वागू या. हरिजनांना जवळ घेऊ या. शेतकरी-कामकरी यांचे जीवन सुखी करू या. हिंदू-मुसलमान एकमेकांजवळ जाऊ या. आत्यंतिक गोष्टींची चर्चा कशाला ? वांगे भाजून भरीत करतो म्हणून का डुक्कर जिवंत भाजून ते खायचे ? सारासार विवेक म्हणून काही वस्तू आहे. महात्माजींनी तर सांगितले होते, "समोरून वाघ आला तर निःशंकपणे मी त्याच्या अंगावरून जाईन. वाघाला खायचे असेल तर तो मला खाईल !" "तुम्ही अहिंसक रहाल, परंतु हिंस्र शत्रू तुम्हास मारील. मग काय उपयोग ?" असे कोणी टिंगल करीत म्हणतात. परंतु त्यांच्या म्हणण्यात काही अर्थ नाही. मरण कोणा-

लाच टळत नाही. सर्वांनाच एक दिवस मरायचे आहे. परंतु आपण ज्या ध्येयासाठी मेलो ते ध्यय जगात उरत असते. तुम्ही अत्याचारावर प्रति-अत्याचार करण्यासाठी जगलेत की अपकाऱ्यावरही उपकार करण्यात स्वतःचे बलिदान केलेत, ही गोष्ट महत्त्वाची आहे. मनुष्य कशासाठी जगला, कशासाठी मेला, ही गोष्ट महत्त्वाची आहे. मरणे फुकट जात नसते. ज्या ध्येयासाठी आपण मेलो ते ध्येय त्या त्यागाने वाढत जाते. आपल्या जगण्याने आपण ध्येयवृक्षास पाणी घालीत असतो. जीवनाचा घडा एक दिवस फुटणार आहे. रँलर परांजप्यांसारखे लोक म्हणत असतात की, " हिटलर असता तर गांधींना गोळी घालून मारण्यात आले असते ! " रँलरांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. गांधी मारले गेले तरी ज्या तत्त्वासाठी त्यांनी बलिदान केले ते तत्त्व का मारले जाणार आहे ? त्या तत्त्वाला कोण मारील ?

कराची काँग्रेसच्या वेळेस गांधीजींवर काही लाल डगलेवाले रागावले होते. भगतसिंगांना फाशी देण्यात यऊ नये म्हणून गांधीजींनी खटपट केली नाही, असा त्यांचा गांधीजींवर आरोप होता. गांधीजींनी तर व्हाइसरॉयांकडे शक्य ती खटपट केली होती. परंतु त्या उमद्या लाल डगले-वाल्यांस, खुदाई खिदमतगारांस ती गोष्ट माहीत नव्हती. त्यांनी गांधीजींना काळी फुले दिली. गांधीजींनी ती स्वीकारली. आणि एके दिवशी रात्री गांधीजी त्या सर्वांसमोर बोलण्यासाठी निघाले. " तुम्ही जाऊ नका. लोक खवळले आहेत " असे त्यांना सांगण्यात आले. परंतु गांधीजी निर्भय पुरुष. ते व्याख्यानासाठी गेले. ते अमर व्याख्यान त्यांनी दिले. रात्रीची वेळ होती. स्वच्छ चांदणे पडले होते. गांधीजी उंच व्यासपीठावरून बोलत होते. त्या भाषणाने सारे विरघळले. त्या भाषणात गांधीजी म्हणाले, " मी तुम्हास नको असेन तर तुम्ही मला दूर करू शकाल. ही माझी मूठभर हाडे तुम्ही सहज नष्ट कराल. परंतु लक्षात ठेवा. गांधीचे शरीर मारता येईल, परंतु ज्या तत्त्वासाठी गांधी जगत आहे ती तत्त्वे जाणार नाहीत ती अमर आहेत."

वसंता, मी किती तरी लिहिले. आज सारे जग मारण-मरणात गुंतले आहे. माणसे अद्याप माकडेच आहेत. वृकव्याघ्रांच्याच जातीची आहेत.

अशा या काळात गांधीजींनी सारे जग हातभर उंच उचलले. त्यांच्या संदेशाची जगात टर होत आहे. उपेक्षा होत आहे. तरी त्यांना फिकीर नाही. ते सत्याचे उपासक आहेत आणि त्यांच्या नेतृत्वाखाली ही भरतभूमी जगाला अहिंसेचा उंच दिवा प्रत्यक्ष कृतीने दाखवीत आहे.

वसंता, आपण धन्य आहोत. जग जुनाट मार्गाने जात असता गांधीजी इतिहासात एक नवीन आरंभ करीत आहेत. हिंदुस्तान दुनियेच्या इतिहासात सर्वस्वी निराळी अशी मोलवान भर घालीत आहे. युरोपने मारणमरणाच्या विद्येत व शास्त्रात भर घातली. गांधीजींनी निराळीच एक भर घातली. निःशस्त्र व पददलित लोकांना एक अभिनव मार्ग गांधी दाखवीत आहेत. निःशस्त्रांचे राजकारण या पुस्तकात डॉ. केतकर लिहितात, "गांधीजींनी असहकार, कायदेभंग, हे शब्द शिकविले. एक कोटी टिळक फंडाचे सार्थक झाले! असहकार हा एक नवीन शब्द गांधीजींनी शिकविला; त्याची किंमत एक कोटी रुपयांहून अधिक आहे! कारण महात्माजींनी निर्भयता दिली. त्याची किंमत कोण करणार?"

वसंता, अहिंसा पेलत नसेल तर हिंसेनेही जा, असे गांधीजी सांगतात. भेकड राहू नका; एवढेच त्यांचे म्हणणे. हिंसेचा स्वीकार नम्रपणे आपली मर्यादा ओळखून करा. हिंसेचे स्तोम माजवू नका. हिंसा परमधर्म करू नका. इतकेच त्यांचे सांगणे. हिंसेचे पोवाडे गाणे, हिंसेचे उपनिषद् करणे ही गोष्ट निराळी आणि अद्याप आपण अहिंसा पेलण्याइतके निर्भय झालो नाही, विकसित झालो नाही, असे प्रांजलपणे कबूल करून हिंसेचा निरुपाय म्हणून स्वीकार करणे ही गोष्ट निराळी.

असो. या विषयाबद्दल पुष्कळ लिहिले. विषय फार गहन आहे. तो समजावून घ्यायला हवा. गांधीजींचे लिखाण त्यासाठी वाचले पाहिजे. आज तरी अहिंसा हाच एक व्यवहार्य मार्ग आपल्याला आहे.

सर्वांस स. आशीर्वाद.

तुझा

**श्याम**

# सबसे ऊँची प्रेम सगाई

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद

तुझे पत्र नाही म्हणून काळजी वाटते. पुन्हा आजारी तर नाहीना पडलास? तुझ्या वैनीची प्रकृतीही बरी नव्हती. ती अधिक नाहीना बिघडली? तुला घरात अधिक काम पडत असेल. स्वयंपाक करावा लागत असेल. वडिलांना साडेआठ वाजताच कामावर जायचे. तुला पुन्हा लौकर शाळेत जायचे. वसंता, तूही माझ्याप्रमाणे लौकर मातृहीन झालास. आई नसणे म्हणजे संसारातील, या जगातील एका महान् सुखाला आंचवणे होय! असो. तू धैर्याने सर्व काही करीत असशील, अशी मी आशा राखतो. तुझ्या वैनीला लौकर आराम पडो, अशी मी देवाची प्रार्थना करतो. प्रार्थनेशिवाय दुसरे मी येथून काय करणार?

आज तुझ्या सेवा दलातील मुलांसाठी कोणता खाऊ पाठवू! कोणत्या विचारांचा मेवा पाठवू? माझी पत्रे त्यांना आवडतात असे तू मागे लिहिले होतेस म्हणून मी 'खाऊ, मेवा' असे शब्द वापरीत आहे, अहंकाराने नव्हे. आज मी अस्पृश्यतेसंबंधी थोडे लिहीत आहे.

हिंदूत ही अस्पृश्यता कशी आली ते देव जाणे! अस्पृश्य हे येथील मूळचे रहिवाशी असावेत, नाग जातीचे ते असावेत असे कोणी म्हणतात. परंतु अस्पृश्यांच्या तोंडावळ्यावरून, डोळे-नाक वगैरेंवरून ते आर्य असावेत असेही कोणी म्हणतात. या मूळच्या नाग लोकांस आर्यांनी जिंकले. आर्य व नाग ह्या दोहोंचे रक्त अस्पृश्यात

असेल असे वाटते. लोक जितांविषयी कसा अस्पृश्यभाव दाखवितात ते सर्वत्र दिसते. प्रत्येक समाजात प्रत्येक संस्कृतीत असे लाजिरवाणे प्रकार आहेत. ग्रीक लोकांची संस्कृती कळसास पोहोचली होती. परंतु त्यांनी गुलामांचा एक वर्ग राखला होता. हे गुलाम सदैव राबत. संस्कृतीसाठी फुरसत हवी. वरच्या वर्गांना संस्कृतिविकासासाठी वेळ मिळावा म्हणून हे गुलाम राबत असत! या गुलामांना कलांची उपासना करता येत नसे. त्यांना ज्ञानाचे दरवाजे बंद होते. त्यांनी सदैव वरच्यांची सेवा करावी. आपल्याकडेही ताच प्रकार. त्रैवर्णिकांची सदैव सेवा करणे हेच अस्पृश्यांचे काम राहिले.

ही अस्पृश्यता कशीही आली असो, ती नष्ट करणे हे एक काम आहे. आजच्या काळात ती शोभत नाही. श्रेष्ठकनिष्ठपणाची थोतांडे फार प्राचीन काळापासून आहेत. या श्रेष्ठ-कनिष्ठपणाविरुद्ध जर कोणी प्रथम उठला असेल तर तो श्रीकृष्ण होय. त्याच्या काळात ब्राह्मण व क्षत्रिय यांना फार प्राधान्य होते. हे दोन वर्ण काय ते श्रेष्ठ, बाकीचे तुच्छ. स्त्रियांनाही महत्त्वाचे स्थान नव्हते. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार नाही, असे म्हणू लागले होते. स्त्रियांना गुलाम ठेवायचे असेल तर त्यांना ज्ञानहीन ठेवणे हाच मार्ग होता.

परंतु श्रीकृष्णाने, स्त्रिया, वैश्य शूद्र सर्वांना मान्यता दिली. समाजसेवेचे कार्य करणारे सारे पवित्र आहेत, असे त्याने प्रतिपादले. ज्याने त्याने आपल्या गुणधर्माप्रमाणे सेवा करावी. कोणी श्रेष्ठ नाही. कोणी कनिष्ठ नाही.

श्रीकृष्णाचा हा संदेश आम्ही विसरून गेलो. उपनिषदातील संदेश आम्ही विसरून गेलो. जेथे पिकते तेथे विकत नाही. हीच गोष्ट खरी. त्यानंतर साधुसंतांनी पुन्हा या दुष्ट रूढीवर हल्ले चढविले. परंतु साधुसंतांचाही छळ झाला. जो जो कोणी समाजाला नवीन प्रकाश देतो त्याचा समाजांत छळ होतो. आद्य शंकराचार्यांनी दक्षिणेतील निरनिराळ्या देवतांची उपासना करणाऱ्यांत भांडणे होत ती मोडण्याकरता पंचायतन–पूजा रूढ केली. सारे देव एकाच परमेश्वराची रूपे

आहेत असे प्रतिपादिले. अद्वैत जीवनात आणा, असे त्यांनी सांगितले. परंतु त्यांचा छळ झाला. ते आपल्या आईला मरताना भेटायला गेले म्हणून त्यांच्या मृत आईचा देह न्यावयास कोणी येईना! शंकराचार्यांना एकट्याला तो देह नेववेन. त्यांनी त्या देहाचे तीन तुकडे केले. एकेक तुकडा स्मशानात नेला. मलबारच्या बाजूला मृत मनुष्याचा देह स्मशानात नेताना त्याच्या देहावर भस्माच्या तीन रेघा ओढतात. ती खूण राहिली आहे!

साधुसंतांनी संस्कृतातील ज्ञान बहुजनसमाजाच्या भाषेत आणण्याची खटपट केली. यामुळे त्यांचा छळ झाला. ज्ञान ही कोणा एका वर्गाची मिरासदारी नसावी. ज्याप्रमाणे हवा सर्वांना हवी, ज्याप्रमाणे सर्वांना प्रकाश हवा, सर्वांना अन्नपाणी हवे, त्याप्रमाणे ज्ञानही सर्वांना हवे. ज्ञान सर्वांना समजेल असे केले पाहिजे. संतांनी ज्ञानाच्या बाबतीतील अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ज्ञानाचे दरवाजे सर्वांना मोकळे केले. परंतु ही क्रांती करणाऱ्या संतांचा सनातनी मंडळींनी छळ केला. ज्ञानेश्वरांसारख्यांवर त्यांनी बहिष्कार घातला. एकनाथांचे भागवत गंगेत बुडवायला निघाले. तुकारामांचे अभंग इंद्रायणीत फेकले. असा छळ केला. परंतु संत आपल्या मार्गापासून परावृत्त झाले नाहीत. आणि आता महात्मा गांधींनी त्याच्यापुढचे पाऊल टाकले आहे. लोक म्हणत असतात की आजच कुठले हे खूळ गांधींनी काढले आहे. हे खूळ आज नाही निघाले. हे खूळ प्राचीन काळापासून आहे आणि श्रीकृष्ण भगवानपासून मानवजातीचे सारे उपासक अशा अन्यायां-विरुद्ध लढत आहेत.

अस्पृश्यता ही धार्मिक वस्तू नाही. हा एक वरिष्ठांचा अधिकार आहे. धर्म आम्ही सोयीप्रमाणे बदलतो. उत्तर हिंदुस्थानात जेथे पाणी लांब असते तेथे ते आणावयाला हरिजन नोकर ठेवतात! तेथे पाण्याला विटाळ नाही. आमच्याकडे पाण्यालाही विटाळ आहे. तेथे पाणी आणणे कठीण आहे म्हणून विटाळ नाही. त्यांनी सोय पाहिली, दुसरे काय?

अस्पृश्यतेसाठी शास्त्रे पहाण्याची आम्हाला जरूरी नाही. साधी माणुसकी ज्याला कळते तो कधीही अस्पृष्यता पाळणार नाही. एक काळ असा होता की हरिजनांची छाया पडणे म्हणजेही विटाळ मानीत. अद्यापही कोठे कोठे असे प्रकार आहेत. काही काही ठिकाणी हरिजनांनी अमवयाच रस्त्यांनी गेले पाहिजे असे निर्बंध आहेत. मंदिरावर हरिजनांची सावली पडून देऊळ बाटायचे एखादे! म्हणून हे निर्बंध.

आम्ही हिंदुधर्माच्या बाहेरचे लोकही ओटीवर घेतो. त्यांना पान-सुपारी देतो आणि त्यात वाईटही काही नाही. परंतु आमच्याच धर्मांतील बंधूना आम्ही दूर ठेवले आहे. सार्वजनिक विहिरीवर मुसलमान पाणी भरतात! परंतु हरिजन पाणी भरू शकत नाहीत. मुसलमान अस्पृश्य नाहीत; परंतु आमचेच धर्मबांधव अस्पृश्य असे का बरे?

कारण मुसलमानांनी येथे राज्ये केली. ते येथे सत्ताधारी होते. त्यांना कोण मानणार अस्पृश्य? सरकार व सरकारच्या जातीचे लोक सदैव पवित्र असतात!! आज साहेबलोक नाही का आमची मंदिरे पाहू शकत? व्हाईसरॉयसाहेब दक्षिणेकडची प्रचंड मंदिरे आत जाऊन पहातात. मंदिराचे चालक साहेबांना ती मंदिरे मोठ्या नम्रतेने दाखवितात याचा अर्थ काय? याचा अर्थ एकच की आम्ही सत्ता ओळखतो. सत्तेला आम्ही देव मानतो. आम्ही सत्य-देव नसून सत्तादेव आहोत. मामलेदार, कलेक्टर, गव्हर्नर, व्हाईसरॉय हे आमचे देव आहेत.

न्यायमूर्ती रानडे एकदा रेल्वेतून जात होते. सेकंड क्लासमध्ये त्यांचा बिस्तरा होता. ते प्लॅट फॉर्मवर हिंडत होते इतक्यात एक साहेब त्या सेकंड क्लासच्या डब्यात शिरला. त्याला इंडियन मनुष्याचे ते सामान सहन झाले. नाही. त्याने ते प्लॅटफॉर्मवर फेकले. न्यायमूर्ती रानड्यांनी ते निमूटपणे उचलून दुसरीकडे नेले. त्यांना एक मित्र म्हणाला, "तुम्ही या साहेबावर फिर्याद का करीत नाही?" न्यायमूर्ती म्हणाले, "आपण आपल्या कोट्यवधी बंधूना याच तऱ्हेने वागवीत आहोत. कोणत्या तोंडाने मी साहेबावर फिर्याद करू?"

वसंता, आपण आज स्वराज्य मागत आहोत. जोपर्यंत आपण आपल्याच भावाबहिणींस साधे माणुसकीचे हक्क देत नाही, तोपर्यंत स्वराज्याचा अर्थ तरी आपणास कळला असे मानता येईल का? विवेकानंदांहून हिंदूधर्म अधिक कोणाला समजत होता? परंतु हरिजनांची दीन दशा पाहून ते रडत. महाराष्ट्रातील ज्ञानमूर्ती ब्रह्मचारी नारायणशास्त्री मराठे–वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक–त्यांच्याहून हिंदुधर्माचा अधिक आत्मा कोणाला कळला? परंतु हिमालयात जाणाऱ्या एका तरुणास ते म्हणाले, "देव हिमालयात नाही. हरिजनांची सेवा कर तुला देव मिळेल."

एक वेळ तुमच्या घरांत हरिजनांना नका येऊ देऊ, परंतु मंदिरात तरी त्यांना जाऊ दे. देवाजवळ तरी त्यांना जाऊ दे. देव सर्व जगाची माता ना? आपण सारी त्या देवाची लेकरे ना? असे तोंडाने पुटपुटता ना? देवळातील ती मूर्ती जर खरोखर भगवंताची असेल तर सर्व मानव प्राणी तेथे नको का जायला? आमच्या मंदिरात कुत्री बसतात. कावळे बसतात. चिमण्या नाचतात. परंतु हरिजन मात्र तेथे शिरू शकत नाहीत. देवळात जर शाळा असली तर तेथे हरिजन मुले जाऊ शकत नाहीत. ज्या देवाजवळ त्याची सारी लेकरे जाऊ शकत नाहीत ती का देवाची मूर्ती? नाशिक शहरात बालाजी व भद्रकालीच्या देवळांतून सभा होतात, प्रवचने होतात. परंतु हरिजन त्या देवळात येऊ शकतात का? ज्या रामाने शबरीची बोरे खाल्ली, जटायू पक्षाचे श्राद्ध केले, वानरे प्रेमाने हृदयाशी धरली, त्या रामाच्या मंदिरात हरिजन जाऊ शकतात का? धर्माच्या व संस्कृतीच्या बेटे गप्पा मारतात, परंतु धर्माचा व संस्कृतीचा स्वतः वध तर करीत आहेत.

ईश्वरासमोरही आमचा अहंकार गळून जात नसेल तर तो आता गळायचा तरी कोठे? प्रभूच्या मूर्तीसमोरही जर मी नम्र होत नसेन तर मी नम्रता शिकणार तरी कोठे? मुसलमान बादशहा औरंगजेब–ज्याला आपण नावे ठेवतो–तो एकदा जुम्मा मशिदीत जरा उशिरा गेला. तो आला असे पाहताच मशिदीतील लोक त्याला जागा करून देऊ

लागले. त्या वेळेस औरंगजेब म्हणाला, "आपण मशिदीत आहोत. येथे मी बादशहा नाही. आपण सारे समान आहोत. देवासमोर तरी भेदभाव नको." अद्वैत तत्त्वज्ञान ज्या हिंदूधर्माने दिले, त्या हिंदूंच्या देवळांत आहे का हा प्रकार? समानतेची वचने आम्ही ओठावर खेळविली, परंतु कृती मात्र कृत्रिम भेदभावाची ठेविली.

अतःपर तरी अस्पृश्यतेसारखी दुष्ट चाल आपण गाडून टाकली पाहिजे. कोणी फाजील लोक म्हणतात, "आज हरिजनांना जवळ घ्या म्हणता. उद्या त्यांच्याशी लग्न लावा असे म्हणाल." त्यांना उत्तर एवढेच की ज्या इतर जातीजमातीस आपण आपल्या ओटीवर बसवतो, त्यांच्याशी का लगेच आपण लग्ने केली? ब्राह्मण, मराठे, न्हावी, धोबी, कुणबी, मुसलमान वगैरे सारे एकमेकांच्या ओटीवर येतात? त्यांच्याशी काय आपण सोयरिकी जोडल्या? हरिजनांना जवळ घ्या असे म्हणताच असले प्रश्न तुम्ही का विचारता? हा चावटपणा आहे.

कोणी शहाणे म्हणतात, "अहो, आता हळूहळू हे सारे होणारच आहे, विटाळ आपोआप कमी होत आहे. मुद्दाम तुम्ही चळवळी कशाला करता?" आपोआप एक दिवस सारे होईल म्हणून का आपण गप्प बसावयाचे? काळ आपणास करायला लावीलच. परंतु काळाची गती ओळखून शहाणपणाने आधीच आपण तसे वागणे योग्य नाही का? आपणाला एखादी जखम झाली तर ती काही दिवसांनी आपोआप बरी होतेच. परंतु आपण औषध लावून ती जखम लौकर बरी व्हावी म्हणून नाही का खटपट करीत? त्याप्रमाणेच युगधर्म ओळखून आपण नको का कृती करायला? जे होणार आहे ते आधीच करू या. आपणाला काळ ओढून नेईलच. परंतु आपण होऊन आधीच करू तर त्यात प्रतिष्ठा आहे.

तिसरे कोणी म्हणतात, "हरिजन मृतमांस वगैरे खातात. त्यांना कसे जवळ येऊ द्यावयाचे" ही तर दुःखावर डागणी आहे! हरिजनांची स्थिती तर पहा. त्यांना ना शेत ना भात. ते खाणार काय? मृत मांस त्यांना मिळाले तर ते तेच खातात. ताजा बकरा, ताजी कोंबडी त्यांना

मिळत नाही. हा का त्यांचा दोष ? त्यांची आर्थिक स्थिती सुधारली तर ते तुमच्याप्रमाणे ताजे मांस खातील. दही, दूध, तूप खातील. आणि आज किती तरी हरिजनांनी मृतमांस खाणे सोडून दिले आहे. त्यांना तरी घेता का जवळ ? हरिजनांमध्ये हजारो वारकरी आहेत. वऱ्हाडच्या बाजूस हजारो हरिजन वारकरी आहेत. त्यांनी मद्यमांस सोडलेले आहे. परंतु त्यांना पंढरपूरच्या देवळात येते का जाता ? तुमच्या मंदिरावर अशी पाटी लावा की आंघोळ केलेल्या लोकांनी आत जावे. हातपाय धुवून आत जावे. विडी न ओढणाराने आत जावे. परंतु 'हरिजनांनी आत जाऊ नये', असे म्हणणे अर्थहीन आहे. तुम्ही काही वागणुकीचे नियम करा. ते नियम पाळील तो जाईल. ते नियम न पाळणारा ब्राह्मण असला तरी त्याला मज्जाव करण्यात येईल, असे करा ना.

चौथे कोणी म्हणतात, "हरिजनांची राहणी गलिच्छ असते." परंतु हरिजनांची राहणी सुधारावी असे वाटत असेल तर त्यांच्यात जा. मुलाच्या नाकाला शेंबूड असेल तर तो आपण काढला पाहिजे. आणि हरिजनाची राहणी गलिच्छ असते त्यालाही कारण त्यांचे दारिद्र्य हेच आहे. त्यांच्या बायका कोठून लावतील केसांना तेल ? त्यांच्या कपड्यांना कोठून मिळणार साबण ? आंघोळीला कोठूण मिळणार पाणी ? पिण्यासही ज्यांना पाणी मिळत नाही, त्यांनी कपडे कोठे धुवावे, अंगे कोठे धुवावी ? हरिजनांची मुले शाळेत तुमच्या मुलांबरोबर बसू देत. हरिजन तुमच्याकडे जाऊयेऊ देत. तुम्ही त्यांच्यात जाये करा. त्यांची आर्थिकस्थिती सुधारा. त्यांना शिक्षण द्या. म्हणजे तुमच्यासारखे ते दिसतील.

लहान मुले अकपट असतात. त्यांना कोठे धर्म माहित असतात ! आपण त्यांना खोटे धर्म शिकवितो. मी माझ्या बहिणीच्या लहान मुलींना विचारले, "हरिजनांची मुले तुमच्या घरी आणली तर तुम्हांस चालेल का ?" त्या मुली म्हणाल्या, "ती घाणेरडी असतील. ती मुले गलिच्छ असतात." मी सांगितले, "आपण त्यांना नीट आंघोळ घालू.

त्यांच्या अंगाला तेल लावू. सावण लावू. मग त्यांना जवळ घ्याल की नाही?" त्या मुली म्हणाल्या, "हो." त्या लहान मुलांना पटकन समजले. परंतु आम्हां वयाने वाढलेल्यांना कोण अहंकार!

कोणी पंडित विचारतात, "पूर्वीच्या काळी अस्पृश्यता होती म्हणून का हिंदुस्थान श्रीमंत नव्हता? अस्पृश्यता होती तरी का शिवाजी-महाराजांना स्वराज्य स्थापता आले नाही?" या प्रश्नांना काय अर्थ? चोऱ्या करून मनुष्य श्रीमंत होतो म्हणून का चोरी समर्थनीय ठरते? अस्पृश्यता ठेवूनही पूर्वी श्रीमंत होते म्हणून का आज अस्पृश्यता ठेवायची? जी गोष्ट अन्याय्य आहे असे कळले तिचा त्याग केलाच पाहिजे. श्री शिवछत्रपतींनी स्वराज्य मिळविले. परंतु ते पुढे तसेच गेले. का गेले? आमचा पायाच खंबीर नव्हता. आमच्यात उच्चनीचपणा होता. पुढे पुढे तर ग्रामण्ये वगैरेनांच ऊत आला. शिवाशिवी म्हणजे राजकारण झाले! 'मराठे व इंग्रज' या पुस्तकात तात्यासाहेब केळकर लिहितात, "राज्य टिकवावे असे कोणासच वाटेना. हे राज्य आपले आहे असे जनतेस वाटेना."

आणि पूर्वी अमूक एक गोष्ट होती म्हणून आजही ती असू दे असे म्हणणे वेडेपणाचे आहे. धर्माचा आत्मा बदलत नसतो, परंतु धर्माचे शरीर बदलत असते. मनुस्मृतीच्या वेळचे समाजाचे कपडे आज चालणार नाहीत. त्या वेळच्या चालीरीती आज कशा राहतील? थंडीत जे कपडे आपण वापरतो ते उन्हाळ्यात चालणार नाहीत. सकाळी जे कपडे वापरू ते भरदुपारी नकोसे वाटतील. "बदल करा नाही तर मरा" असा सृष्टीचा कायदा आहे. हजारो वर्षांपूर्वीच्या नियमांचे जू आमच्या मानेवर बसवू नका. मृताची सत्ता आमच्यावर कशाला? माणुसकीला साजेल ते करू या.

आज सारे जग आम्हांला अस्पृश्य मानीत आहे. एडिंबरोच्या हॉटेलात हिंदी लोकांना प्रवेश मिळत नाही. आफ्रिकेत आमच्यावर अन्याय होत असतात. अशी परिस्थिती आहे. तरीही आम्ही आपसात एकमेकांस तुच्छ मानीत आहोत. जगात आम्ही गुलाम ठरलो तरी

त्याची आम्हांस शरम नाही. शेणातील किड्यांनी एकमेकांस नावे ठेवावी तसेच हे आहे.

पापे फळावयास कधी कधी हजारो वर्षे लागतात. अस्पृश्यतेसारखी पापे करूनही देशात भाग्य होते. परंतु त्या भाग्यवृक्षाला आतून भुंगा लागलेला होता. तो दिसला नाही आणि आज आता झाड कोलमडून पडले. तुम्हांला पूर्वीचे भाग्य दिसले, परंतु त्या भाग्याला लागलेली कीड दिसली नाही. अहंकारात राहिलेत, आज जगात पै किंमतीचे झालेत.

आम्ही आमची दैवते पाहू तरीसुद्धा अस्पृश्यता दूर करावी असे वाटेल. आमच्या देवांना पशुपक्ष्यांची वाहने आहेत. गणपतीसमोर उंदीर आहे. शंकरासमोर नंदी आहे. विष्णुसमोर गरुड आहे. रामासमोर वानर आहे. सरस्वती मोरावर आहे. ब्रह्मदेव हंसावर आहे. देवांनी सारी सृष्टी जणू जवळ घेतली आहे. आणि शंकराचेच रूप पहा. त्यांच्या अंगावर कातडे आहे. हातात कपालपात्र आहे. अंगाला राख आहे. शंकराचे रूप म्हणजे हरिजनाचे रूप आहे. परंतु स्मशानवासी, व्याघ्रांबरधारी शंकराची आम्ही पूजा करतो. आणि मृत पशू नेऊन त्याचे कातडे काढून समाजाची सेवा करणारा, गावाबाहेर राहणारा हा मनुष्यदेहधारी शिवशंकर आम्ही तुच्छ मानतो. शंकराच्या देवळात कशाला जाता ?

आणि दत्तात्रेयाच्याजवळ तर कुत्री आहेत. ती चार कुत्री म्हणजे चार वेद असे म्हणतात. मला तर त्याचा इतकाच अर्थ दिसतो की कुत्र्यांनाही जा जवळ घेईल, ज्यांना आपण हडहड म्हणून हाकलतो, तरीही जी प्रामाणिक असतात अशा कुत्र्यांना जो जवळ घेईल त्याच्याजवळ वेद आहेत. अपमानिताचा जो कैवार घेतो तोच खरा थोर.

आम्ही आमच्या लोकांस दूर ठेवले. परधर्मीयांनी त्यांना जवळ केले. मुसलमानी धर्म समानता शिकवितो. मशिदीत सारे समान. ज्यांना आपण दूर ठेवले ते परधर्मात गेले. मुसलमानांची या देशात लोकसंख्या वाढली, ती सारीच काही बाटवाबाटवीने वाढलेली नाही. हिंदूधर्मातील जुलुमाला कंटाळूनही लाखो लोक गेले असतील. कोट्यवधी लोक केवळ

जुलुमाने परधर्म घेत नाहीत. स्वधर्मात ज्यांना मान नाही, ते सत्ताधारी परधर्मीयाच्या धर्मात शिरताच आम्ही हिंदू त्याना मान देतो! एखाद्या हरिजनाला पाणी देणार नाही. परंतु तोच ख्रिश्चन होऊन शिकून अंमलदार होऊन आला की त्याला आम्ही मेजवानी देऊ!

मुसलमानांची लोकसंख्या वाढली म्हणून आम्ही बोंबलत असतो. परंतु बोंबलून काय होणार? त्रावणकोर संस्थानात लाखो लोक ख्रिश्चन झाले. असे का झाले? काही विचार करा. मिशनरी लोकांवर रागावण्यात अर्थ नाही. हजारो मैलांवरून हे मिशनरी येतात. आपली भाषा ते शिकतात. ज्यांना आपण दूर ठेवले अशा भिल्ल, गोंड, कातकरी वगैरे लोकांत ते जातात. त्यांना औषधे देतात, ज्ञान देतात. त्यांना अन्नवस्त्र देतात. त्यांच्यामध्ये जाऊन चित्रपट दाखवितात. हार्मोनियम वाजवितात. त्यांच्या मुलांना चित्रे देतात, खाऊ देतात. रात्रीबेरात्री कोणी स्त्री बाळंत होताना अडली तर तिच्या सुटकेसाठी जातात. त्यांनी शेकडो शाळा चालविल्या आहेत. शेकडो दवाखाने घातले आहेत. महारोग्यासाठी हिंदुस्थानात फक्त मिशनऱ्यांचे दवाखाने आहेत. आम्ही काय करतो आहोत?

परंतु महात्माजींना धर्मबुडव्ये म्हणून, मुसलमानधार्जिणे म्हणून नावे ठेवणारे, हिंदु समाजाची महात्माजींनी केवढी सेवा केली आहे ते विसरून जातात. परधर्मात गेलेला एक मनुष्य स्वधर्मात आणला म्हणजे आमचे काही लोक टिऱ्या बडवतात. परंतु महात्माजींनी परधर्मात हजारो हिंदु जात, त्याला त्यांची सेवा करून आळा घातला. गुजरातेतील भिल्ल समाजातच ठक्करबाप्पासारखे सेवक वर्षानुवर्षे सेवा करीत बसले. महाराष्ट्रातील मामा फडके गुजरातेत नडियादचे बाजूस भंगीसमाजात काम करीत आहेत. खानदेशात श्री. नानासाहेब ठकार भिल्लांत काम करीत आहेत. त्यांना हिंदुस्थानभर महात्माजींचे श्रद्धावान अनुयायी या उपेक्षित बंधूंची सेवा करीत आहेत. त्यांना प्रेम देत आहेत. यामुळे मिशनरी चळवळीस केवढा तरी आळा बसला आहे. महात्माजींची ही सेवा थोर नाही का? निरभिमानपूर्वक केलेली, परधर्मास शिव्याशाप न देता केलेली ही स्वधर्मीयांची सेवा देवाघरी रुजू नसेल का?

ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचा काळ संपला. आता स्पृश्यास्पृश्यवाद सुरू होईल अशी भीती वाटते. पण स्पृश्यांना हळूहळू त्यातील वैय्यर्थ कळेल. सार्वजनिक ठिकाणी शिवाशिवी मानणे अन्याय आहे, हे स्पृश्य शेतकऱ्यासही कळेल. काही दिवस विरोध होतील. परंतु ते जातील. महाराष्ट्रात भाऊराव पाटलांसारख्यांनी जी बोर्डिंगे चालविली आहेत, त्यातून सर्व जातींची मुले एकत्र शिकत आहेत. मराठे, माळी, कुणबी, मांग, चांभार, महार, कैकाडी, वडारी सर्व मुले शिकत आहेत. हे तरुण उद्या आपआपल्या जातींना सांगतील की " ही शिवाशिव काढून टाका. खोटे धर्म नष्ट करा. "

हरिजनांनी आपली लग्नाची मिरवणूक घोड्यावरून नाही काढता कामा. त्यांच्या बायकांनी अंगावर दागिने नाही घालता कामा. त्यांनी स्पृश्यांसारखा पोषाख नाही करता कामा. त्यांनी गव्हाची पोळी वगैरे नाही खाता कामा. एक का दोन, शेकडो प्रकारचे अन्याय हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात चालू आहेत. देवास वगैरे संस्थानांतून तर पूर्वी फार भयंकर चाली असत. कोणाकडे समारंभ वगैरे असला तर हरिजन स्त्रियांच्या पोटावर वाद्ये वाजवावयाची असे प्रघात होते. एकदा एक गरोदर हरिजन भगिनी अशामुळे मरण पावली. ही रूढी आता बंद झाली आहे. आम्ही ही पापे कोठे फेडणार ?

हरिजन म्हणजे जणू स्पृश्यांच्या हातातील हरकाम करणारी गुलामांची जात. हरिजन जर सुशिक्षित झाले, ते स्पृश्यांप्रमाणे जर वागू लागले, त्यांची माणुसकी जर जागी झाली तर हे हातचे कायमचे बंदे नोकर नाहीसे होतील, अशी स्पृश्यांना भीती वाटत आहे. अस्पृश्यता म्हणजे धर्म नाही, हे का त्यांना समजत नाही ? परंतु हातातील सत्ता जाईल, हाक मारताच जोहार करीत येणारा, 'भाकरी वाढा हो माई' म्हणणारा नोकर नाहीसा होईल, ही भीती स्पृश्यास वाटत आहे. आर्थिक पिळवणूक त्यांना कायम ठेवायची आहे. हा धर्म नसून आर्थिक प्रश्न आहे.

परंतु आता हरिजनांचा आत्मा जागा झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वाभिमानाची ज्योत त्यांच्यात पेटवली आहे. ज्या स्मृती-

मुळे आम्ही अस्पृश्यता मानतो, त्या स्मृतींचा येथे अभ्यास होतो, त्या कॉलेजचे डॉक्टर आंबेडकर प्रिन्सिपॉल होते! हरिजन कोणत्याही बौद्धिक गोष्टीत मागे राहाणार नाहीत, हे डॉक्टरसाहेब दाखवीत आहेत. हरिजनांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. आम्हा पांढरपेशांचीच बुद्धी आता निकस होत चालली आहे. हजारो वर्षे आमच्या बुद्धीचा कस जात आहे. परंतु हरिजनांची मनोभूमी पडित आहे. तिच्यातून आजवर पीक घेतले नाही. या पडित वावराची आता मशागत होऊ लागली आहे. बुद्धीचे भरपूर पीक निघेल. मागे एकदा मनमाडच्या रेल्वेच्या हायस्कुलात हरिजन विद्यार्थ्यांनी संस्कृत घेतले, परंतु ब्राह्मण वगैरे विद्यार्थ्यांनी संस्कृत कठीण म्हणून सोडून दिले, असे तिथले एक शिक्षक मित्र मला सांगत होते. हरिजन विद्यार्थी सर्व क्षेत्रांत जातील. त्यांची बुद्धी सर्वत्र चमकेल.

मागे एक मित्र एकदा मला म्हणाले, "तुम्ही समानतेच्या गप्पा मारता मग हरिजनांनाच आर्थिक शिष्यवृत्त्या का देता? असे प्रश्न कोणी कोणी विचारतात. परंतु समानता याचा अर्थ काय? ज्यांची आजपर्यंत उपेक्षा झाली त्यांना अधिक देणे म्हणजे समानता. म्हणून हरिजनांना अधिक सवलती दिल्या पाहिजेत. त्यांना गोडी लावली पाहिजे.

ज्यांच्यावर हजारो वर्षे आपण अन्याय केले, ज्यांच्या जवळून भरपूर सेवा घेऊन त्यांना पशुसम स्थितीत ठेवले, त्यांच्या बाबतीत कर्तव्य करावयास नम्रपणे आता तरी आपण उभे राहू या. तोंडदेखली सहानुभूती नको. तोंडपाटीलकी करण्यात आपला हातखंडा आहे. परंतु प्रत्यक्ष कृतीच्या नावाने शून्याकार! येताजाता या उपेक्षित बंधूंची स्मृती आपण ठेवू या. जास्तीतजास्त मदत त्यांच्या उद्धारार्थ करू या. आपण भांडे बाहेरून घासतो, परंतु आत काळे असते. तसे आपले होता कामा नये. वरून प्रेम नको, आतही प्रेमाचा प्रकाश भरू दे. हरिजन आपल्या घरी आणा. त्यांना तुमच्या घरी शिकण्यासाठी ठेवा. त्याच्या शिकण्याची व्यवस्था करा. हरिजन नोकरचाकर घरात हिंडू देत. वावरू देत. 'शिवू नको धर्म' पुरे झाला. माणुसकीचा प्रेममय धर्म आणू या.

आणि सेवा करून काही अपेक्षा धरू नका. थोडी सेवा करून लगेच "हे हरिजन तर काँग्रेसचे सभासद होत नाहीत" असे म्हणू नका. आज आपली सत्त्वपरीक्षा आहे. हजारो वर्षे केलेले अन्याय दहा पाच वर्षांच्या अल्पशा सेवेने हरिजन कसे विसरणार? तुमची ही सेवा वरपांगी, तात्पुरती, राजकीय कामापुरती आहे असे त्यांना वाटले तर त्यांचा काय दोष? तुमची सेवा जिव्हाळ्याची आहे की नाही याची कसोटी ते घेतील. डॉ. आंबेडकर हरिजनांना कायमचे निराळे करू पहात होते. ब्रिटिश सरकारचे धोरण फाटाफुटी पाडण्याचे. त्यांनी त्याप्रमाणे करावयाचे ठरविले. परंतु महात्माजींनी प्राणांतिक उपोषण करावयाचे ठरवून ब्रिटिश राजनीतीला हिंदुधर्माची ही दोन शकले करू दिली नाहीत. परंतु आताच तर खरी परीक्षा आहे. वास्तविक डॉ. आंबेडकरांना इतर सर्व पक्षांपेक्षा काँग्रेस अधिक जवळची वाटावी. परंतु ते इतर सर्व वर्गांना, इतर सर्व पक्षांना जवळ करतील आणि काँग्रेसला शिव्याशाप देतील. हरिजनांना दूर ठेवणाऱ्यासही ते हरिजनांची मते देववतील, परंतु हरिजनांसाठी इतर सर्वांहून अधिक काम करणारी जी काँग्रेस तिच्या उमेदवारास पाडण्याची ते खटपट करतील!

अशा वेळेस जर आपण त्रासून म्हणू, "आपण यांच्यासाठी सहानुभूती दाखवावी, आपण यांच्यासाठी स्वतःच्या आप्तेष्टांपासून दूर व्हावे, तर याचे आपणास अधिकच शिव्याशाप! काय करायचे यांची सेवा करून? हे कृतघ्न लोक आहेत." जर असे आपण म्हणू तर परीक्षेत नापास होऊ. याच गोष्टीची श्री. आंबेडकर वाट पहात आहेत. ते मग लगेच दुनियेला सांगतील, "पहा यांची सेवा थांबली. यांची तात्पुरती वरपांगी कळकळ होती. आम्ही व हे कधीही जवळ येऊ शकणार नाही. आम्ही अलग असणेच बरं."

वसंता, म्हणून आपण कंटाळता कामा नये. हजारो वर्षे आपण अन्याय केले त्याची आपण कल्पना करावी. हरिजनाच्या मनात केवढी अढी असेल ते मनात आणावे. ते मनात आणून ती पूर्व पापे स्मरून,

कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता सर्व शिव्याशाप सहन करून प्रायश्चित्तरूप सेवा आपण केली पाहिजे, तरच हरिजन एक दिवस प्रसन्न होतील. हे दूर झालेले भाऊ प्रेमाने भेटतील. आज कोठे कोठे असे अनुभव येतात की हरिजनासाठी एखादे मंदिर उघडले तर महार बंधू वगैरे येत नाहीत. परंतु त्यामुळे आपण रागावू नये. लहान मूल प्रथम आईने घ्यावे म्हणून रडत असते. परंतु मग आई घ्यायला आली तर ते उलट रागावते व आईचा हात झिडकारते. त्यामुळे आईला राग का येतो? ती अधिकच कळवळते. किती वेळ मी मुलाला ओरडत ठेवले. असे तिच्या मनात येते. तसेच हे हरिजन आजपर्यंत जवळ घ्या असे म्हणत होते, परंतु आता आपण त्यांना जवळ घ्यायला गेलो तर ते दूर जातात. परंतु त्यामुळे आपण रागावता कामा नये. त्यांना अधिकच प्रेम दिले पाहिजे. खऱ्या आस्थेने त्याना जवळ घेतले पाहिजे. हरिजन वर्ग हा समाजातील सर्वांत खालचा वर्ग. विद्वत्ता, पैसा, किंवा समाजजीवनातील त्याचे स्थान, या साऱ्याच दृष्टीने त्यांना जणू वाळीत टाकलेले. अशा समाजाची सुधारणा म्हणजे केवळ सुधारणा नाही, तर ती एक प्रचंड क्रांती आहे. केवळ स्वातंत्र्याची चळवळ नाही पुरेशी पडणार त्याच्या उद्धाराला! क्रान्ती म्हणजे सर्वांगीण क्रान्ती. केवळ सत्तेची आलटापालट नव्हे तर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, तत्त्वज्ञानिक अशी क्रान्तीच हरिजनांच्या उपयोगी पडेल. जीवनाची मूल्येच नवी उभारली पाहिजेत. जुनी मूल्यमापने उपयोगी पडणार नाहीत. अशी क्रान्ती समाजवादीच क्रान्ती असेल. खरा समाजवादी पक्षच ती करू शकेल.

वसंता, या लहानशा पत्रात मी किती लिहू? तुझ्या सेवा दलातील मुले हरिजनवस्तीत जाऊ देत. तेथे स्वच्छता करू देत. हरिजन मुलांना पुस्तके, कपडे वगैरे जी मदत देता येईल ती गोळा करून देऊ देत. कीव म्हणून नव्हे तर कर्तव्य म्हणून. संक्रान्त, दिवाळी वगैरे सणांच्या दिवशी त्यांच्यात जात जा. त्यांना तिळगूळ द्या. दसऱ्याला त्यांना सोने द्या. प्रेम वाढवा. सहकार्य वाढवा. ‘सबसे उँची प्रेम सगाई’ हे प्रेमाचे नाते सर्वांत श्रेष्ठ मानावे. हरिजनात मित्र जोडा. त्याना औषधे वगैरे नेऊन द्या. तुमचे सेवा दल आहे. नुसत्या लाठ्या काठ्या फिरवणारे

तुमचे दल नाही. लाठी फिरवून हात मजबूत करा, परंतु तो मजबूत हात दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी झिजो.

स्पृशास्पृश्य, श्रेष्ठकनिष्ठ, हिंदुमुसलमान सारे जवळ येण्याची खटपट करू या. भारतमातेचे तोंड उजळ करू या. प्रेमाने फुलवू या. असो. तुझ्या वैनीस सप्रेम प्रणाम. तुझ्या वडील बंधूंस व वडिलांस कृतानेक प्रणाम. तुझ्या भावास, रामास व सेवा दलातील सर्वांस सप्रेम प्रणाम.

तुझा

**श्याम**

पत्र सातवे

# भारताचा स्वधर्म ओळखा

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

मी मागे एकदा एका खेडेगावात गेलो होतो. रात्रीची वेळ होती. गावातील लोक कसली तरी पोथी वाचीत होते. मी त्यांना नम्रपणे म्हटले, "आज काँग्रेसची पोथी वाचावयास मी आलो आहे. आजच्या दिवस तुमची पोथी राहू दे. आज माझी ऐका." त्यांनी ऐकले. मी माझे काँग्रेसचे आख्यान सुरू केले. काँग्रेस म्हणजे माझे दैवत. देवाजवळ कोणाला मज्जाव नाही. देव सर्वांचा. त्याप्रमाणे काँग्रेसजवळ सर्वांना वाव आहे. सर्वांना तेथें अवसर आहे. काँग्रेस म्हणजे माझे रामनाम. मरताना माझ्या तोंडातून 'राम राम' असे शब्द कदाचित् नाही येणार. परंतु 'काँग्रेस काँग्रेस' असे शब्द येतील. आणि त्यात काय बिघडले? काँग्रेस सर्वांचें कल्याण करू पहात आहे. म्हणून काँग्रेस हे देवाचेच नाव. महात्माजी एकदा म्हणाले होते, "चरका हे माझ्या देवाचे नाव." देव तरी शेवटी कोठे आहे? तुकाराम महाराजांनी सांगितले आहे 'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले ।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा ।।' आज देव माझ्या काँग्रेसजवळ आहे. कारण ती कोणत्याही एका वर्गासाठी, एका धर्मासाठी नाही. ती सर्वांसाठी आहे. तिच्याजवळ भेदभाव नाही. जातगोत नाही. म्हणून तर मला काँग्रेसचे वेड आहे. म्हणून तिच्यासाठी जगावे व मरावे असे मला वाटते. सर्वत्र माझ्या काँग्रेसची सेवा सुरू होवो. तिचा झेंडा

गावोगाव जावो, हृदयाहृदयात जावो, असे मला वाटते. कबीराने म्हटले आहे—

'अंदर राम बाहर राम
जहाँ देखो वहीं रामहि राम'

त्याप्रमाणे मनात काँग्रेस, जनात काँग्रेस, शहरात काँग्रेस, खेड्यात काँग्रेस, सर्वत्र काँग्रेस,–काँग्रेस व्हावे असे मला वाटते. "पायी बांधू घुंगर। हाती घेऊ विणा। मुखाने विठ्ठल गाऊ हो। नाचत पंढरी जाऊ हो." असे पूर्वीच्या साधुसंतांनी म्हटले. त्यांनी देवाचे नाव सर्वत्र नेले. ज्ञानेश्वरीत म्हटले आहे, "अवघे जगचि दुमदुमित। नामघोषे भरले." साधुसंतांनी प्रभूचे नाव दशदिशांत नेले. त्याप्रमाणे काँग्रेसचे नाव सर्वत्र व्हावे असे मला वाटते. मला वाटते तसे सर्वांस वाटो. तुझ्यासारख्या लाखो तरुणांस वाटो. शेवटी आजच्या तरुणांच्या स्वप्नातूनच उद्याचा भविष्यकाल उत्पन्न होणार आहे. एका रशियन लेखकाने म्हटले आहे, "Give me the songs of the young and I shall tell their future –तरुणांची गाणी मला सांगा म्हणजे त्यांचे भवितव्य मी सांगेन." वसंता, तुमच्या तरुणांच्या ओठावर कोणती गाणी आहेत? तुमच्या पोटांत कोणत्या संस्थेविषयी प्रेम आहे? मी तर आशा बाळगतो की सर्वांचे कल्याण पहाणाऱ्या, सर्व वर्ग व सर्व धर्म ह्यांना एकत्र गुण्यागोविंदाने नांदवण्याचा महान प्रयोग हिंमतीने व श्रद्धेने करणाऱ्या माझ्या काँग्रेसची गाणी तुझ्यासारख्या तरुणांच्या ओठांवर असतील, त्या संस्थेविषयी प्रेम तुमच्या हृदयात असेल.

काँग्रेस भारताचा आत्मा ओळखते. ज्याप्रमाणे व्यक्तीला स्वधर्म असतो, तसा राष्ट्रालाही एक स्वधर्म असतो. गीतेमध्ये सांगितले आहे की "स्वधर्मे निधनं श्रेयः। परधर्मो भयावहः" हिंदुस्थानचाही एक स्वधर्म आहे. केवळ परकीयांचे अनुकरण करणे हा स्वधर्म नाही. जर्मनीने ज्यूंची हकालपट्टी केली तशी आम्ही मुसलमानांची करू, असे काही हिंदू तरुण म्हणत असतात. जर्मनीचा स्वधर्म असेल. भारताचा नाही.

आम्ही नेहमी म्हणत असतो की इतर प्राचीन राष्ट्रे काळाच्या पोटात गडप झाली. इतर प्राचीन संस्कृती नामशेष झाल्या. परंतु हिंदुस्थान

अद्याप राहिला आहे. परंतु हा देश का राहिला? हिंदुस्थान का नाही नष्ट झाला? हिंदुस्थानचा प्राण कशात आहे?

हिंदुस्थान सर्वसंग्राहक आहे म्हणून जगला आहे. पाऊस पडला नाही तरी समुद्र आटत नाही. कारण तो सर्व प्रवाहांना जवळ घेत असतो. त्याप्रमाणे सर्व मानवी प्रवाहांना हिंदुस्थानने जवळ घेतले आहे. म्हणून हिंदुस्थान जगला आहे.

या देशात प्राचीन काळापासून नाना जातिजमाती आल्या, भांडल्या व पुन्हा गुण्यागोविंदाने राहू लागल्या. ज्याप्रमाणे आगगाडीचा डबा असतो तसे हे आहे. आपण आगगाडीच्या डब्यात बाहेरचे कोणी आत घेत नाही! परंतु धक्काधक्की करून ते बाहेरचे आत येतात. क्षणभर वातावरण गरम असते. मग पुन्हा सारे एकत्र बसतात. चौकशी करतात. पानसुपारी खातात. ते एक होतात. पुढच्या स्टेशनवर पुन्हा तोच प्रकार! अशा प्रकारे सर्व प्रकारचे लोक घेऊन तो डबा मुक्कामावर पोचतो. भारतवर्षात नाना धर्म आले आहेत, नाना संस्कृती आल्या आहेत. यांचे झगडे झाले नाहीत असे नाही. परंतु झगड्यांतून आम्ही ऐक्य निर्माण करीत होतो.

हिंदु व मुसलमान भांडभांड भांडले. परंतु ते नवसंस्कृती निर्मित होते. अकबरच्या कारकीर्दीत परस्पर संस्कृतींची देवाणघेवाण सुरू झाली. आम्ही अरबी ग्रंथ भाषांतरिले· मुसलमानी उपनिषिदे, रामायण, महाभारत यांची भाषांतरे केली. परस्परांच्या संस्कृतींचा अभ्यास केल्याने हृदये जवळ येतात. मुसलमानांतील सुफी कवीची कविता तर आपल्या संत-वाङ्मयासारखी अद्वैत शिकवणारी आहे. परंतु आपला कोठे आहे त्या वाङ्मयाशी परिचय?

आपण हिंदुस्थानचे जे इतिहास शिकतो ते बहुधा इंग्रजांनी लिहिलेले असतात. इंग्रजांनी या देशाचे विकृत असे इतिहास लिहिले. ‘भारत अंग्रेजी राज’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये येथे मुसलमानांचे संबंध कसे चांगले होते ते पंडित सुंदरलाल यांनी दाखवले आहे. किती तरी मुसलमान. राजांनी हिंदु कवींना, कलावंतांना आश्रय दिला आहे. परंतु मुसलमानांच्या

चांगल्या गोष्टी आम्हांस माहीत नाहीत. हिंदुस्थानावर इंग्रजांना राज्य चालवावयाचे आहे. आरंभापासूनच भेदनीतीचा त्यांनी अवलंब केला. या देशातील जनतेची मने परस्परविरुद्ध राहतील अशी कोशीस ब्रिटिश सरकार सदैव करीत असते. आमच्यात त्यांनी सवते सुभे उभे केले. अलगपणाचे विष पेरले. परसत्ता म्हणजे शाप आहे.

परंतु हिंदुमुसलमान नवसंस्कृती निर्मित होते. हिंदू-दैवतांना मुसलमान नवस करीत, तर मुसलमानी पीरांना हिंदू भजत. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे. त्यांचे शहाजी हे नाव कोठून आले? एका मुसलमान फकीराचे ते नाव होते. 'शहाजी' या शब्दाचाच अर्थ 'फकीर' असा आहे. ब्लंट या इंग्रज इतिहासकाराने हिंदुमुसलमान परस्परांविषयी इतकी प्रीती दाखवतात याचे आश्चर्य मानले आहे. ही प्रीती नष्ट करणे हे तर या इंग्रज इतिहासकारांचे काम होते व तसे इतिहास त्यांनी लिहिले.

नावातूनसुद्धा इतिहास कळतो. शेवटी भांडणामधूनही भले कसे निर्माण होत असते ते नावावरूनही कळते. शैव व वैष्णव एके काळी भांडत होते. परंतु पुढे दोन्ही दैवतांची नावे एकत्रित करून आपले पूर्वज आपल्या मुलाबाळांना ती नावे ठेवू लागले. शिवनारायण, हरिहरराव वगैरे नावे ऐक्य-सूचक आहेत. हे ऐक्य निर्मिणाऱ्या पूर्वजांवर त्या वेळेस दगडधोंडे मारण्यात आले असतील. खुदाबक्ष, रामबक्ष अशा नावांतूनही हिंदुमुस्लिम ऐक्याचाच प्रकार दिसतो.

भारतीय शिल्प, चित्रकला, संगीत इत्यादी कलांमध्ये हिंदुमुसलमान दोघांनी भर घातली. हिंदू गवयी मुसलमान वस्तादांचे चरणी बसून शिकतात तर मुसलमान गवयी हिंदू गायनाचार्यांजवळ धडे घेतात. तानसेन मरण पावला तेव्हा मुसलमान म्हणाले हा आमचा आहे. हिंदू म्हणाले हा आमचा आहे. दोघांना तो आपला वाटला. कबीर मरण पावले तेव्हा हिंदू म्हणाले हा आमचा आहे, मुसलमान म्हणाले हा आमचा आहे. कबीराच्या अंगावरील वस्त्र दूर केले तो तेथे तुळशीही सापडल्या व सबजाही सापडला. बुक्काही सापडला, अबीरही सापडला.

मराठीत शेख महंमद वगैरे साधू झाले. त्यांनी सुंदर काव्य-रचना केली. बंगालमध्ये मुसलमान कवींनी गंगेवर स्तोत्रे लिहिली! बंगाली मुसलमान बंगाली भाषाच बोलतात. मुसलमान मायबहिणी हजारो खेड्यापाड्यांतून जात्यावर दळताना ज्या ओव्या म्हणतात त्या ओव्यांतून हिंदुमुस्लिम ऐक्य दिसून येते. गंगाजमनांची सुंदर वर्णने त्या ओव्यांतून आहेत.

मुसलमान राजांनी हिंदू देवस्थानांस देणग्या दिल्या. हिंदू राजांनी मशिदींस व पीरांस देणग्या दिल्या. पेशव्यांचे गुरू कायगावकर दीक्षित यांची दिल्लीच्या बादशहांनीही पूजा केली! कायगावकर दीक्षितांना निजाम स्टेटमधून जहागीर आहे. चिंचवडच्या देवस्थानास निजाम स्टेट-मधून देणगी आहे असे कळते. अशा प्रकारे रहावयास आपण शिकत होतो. खरा धर्म आचरीत होतो. धर्म तोडणारा नसून जोडणारा आहे, हे शिकत होतो. हिंदूंच्या धर्मग्रंथांतून शेवटी ॐ शांतिः शांतिः शांतिः असाच घोष असतो आणि मुसलमानही शांतीचे पुरस्कर्ते आहेत. इस्लाम या शब्दाचा अर्थच मुळी शांती. दोन्ही धर्म शांतीचा अनुभव यथे घेऊ लागले.

हैदरअल्ली मुसलमान होता. परंतु गाय मारणाऱ्याचा हात तोडण्याची शिक्षा त्याने दिली. बाबर बादशहानेही लिहिले होते की, "आपण गाय मारता कामा नये." अकबराचे मानसिंग वगैरे हिंदू सुभेदार होते. औरंगजेबाने शिवाजीवर कोणास पाठविले? जयसिंगाला. इतकेच काय, तर गझनीच्या महंमदाचेही हिंदू सेनापती होते. ज्या संयुक्त प्रांतात मुसलमानांनी आठशे वर्षे राज्य केले तेथे मुस्लिम लोकसंख्या आज शेकडा १४ फक्त आहे. सारीच बाटवाबाटवी असती तर असे झाले असते का? हिंदू-मुस्लिम नीट वागू लागले होते. नवरात्राचा सण हैदरच्या दरबारात पाळला जाई. दसऱ्याला दरबार भरे. मुसलमान राजे नवरात्रोत्सव करीत तर हिंदू राजे डोले उभारीत. बडोदे वगैरे शहरांत सरकारी डोले असतात! हिंदू राजे मुसलमानी प्रजेचे मन सांभाळीत. मुसलमानी राजे हिंदू प्रजेला दुखवीत नसत. हैदरअल्लीने हिंदूंचे मुख्य गुरू जे शंकराचार्य

त्यांना नजराणे पाठविले. दहा हजार सोन्याची नाणी पाठविली. टिपू सुलतान हिंदू दैवतांना नवस करी. त्याने उत्कृष्ट संस्कृत हस्तलिखितांची लायब्ररी ठेवली होती.

आपण व्यक्तींवरून एकदम धर्म वाईट ठरवू नये. औरंगजेब वाईट होता. दुष्ट होता. तो स्वतःच्या भावांच्याही बाबतीत क्रूर होता. परंतु त्यावर सारे मुसलमान असेच, असे म्हणू नये. एखादा चर्चिल वा ॲमेरी साम्राज्यवादी निघाला म्हणून का सारे ख्रिश्चन वाईट व दुष्ट असे आपण म्हणतो? मुस्लिम धर्म व संस्कृती एखाद्या औरंगजेबावरून परीक्षू नये.

निरनिराळ्या सुंदर रूढी आपण पाडीत होतो. खानदेशातील अमळनेरच्या श्रीसंत सखाराम महाराजांच्या रथाला पहिली मोगरी देण्याचा मान मुसलमानांचा आहे. मुसलमानांना नारळ प्रसाद म्हणून देण्यात येतो. जळगावजवळ कमळदे म्हणून गाव आहे. तेथे मशीद आहे. त्या मशिदीजवळ वारकऱ्यांची दिंडी थांबली पाहिजे व त्यांनी भजन केले पाहिजे, असा मशिदीचा हक्क होता ! मुसलमान म्हणत, "आमच्या मशिदीजवळ थांबा व भजन करा. कारण शेवटी परमेश्वर एकच आहे. त्याला राम म्हणा की रहिम म्हणा." पुणे जिल्ह्यात बारामती गावी हिंदू-मुसलमानांत किती ऐक्य आहे ते जाऊन पहा. पीरासमोर हिंदू शाहीर हिंदू पुराणांतील कवने व पोवाडे म्हणतात आणि मुसलमान ती कवने आनंदाने ऐकतात.

अशी ही संस्कृती आपण निर्मित होतो. गुलाब व कमल एकत्र आणीत होतो. राम व रहिम एकत्र आणीत होतो. मशीद व मंदिर जवळ आणीत होतो. अबीर व बुक्का एकत्र करीत होतो. इतिहासातही या गोष्टी आहेत. हिंदुस्थानातील मुसलमानांस आपण परके असे समजतनासे झालो. शिवाजी महाराजांच्या आरमारावर मुसलमान अधिकारी होते. शिवाजी महाराज अफझलखानाच्या भेटीस गेले तेव्हा त्यांच्या बरोबर जे शरीररक्षक होते त्यांत एक मुसलमान बंधूही होता. नादीरशहाने दिल्लीवर स्वारी केली तर बाजीराव दिल्लीपतीस लिहितो, "तुमच्या मदतीसाठी मी मजल दरमजल येतो. बाहेरच्या शत्रूस काढून

देऊ." दिल्लीचे बादशहा व मराठे यांचे भांडण असे, परंतु बाहेरचा शत्रू आला तर दिल्लीचा बादशहा हा किती झाले तरी हिंदुस्थानचा, ही भावना होती. पानपतच्या लढाईत मराठ्यांकडे इब्राहीमखान गारदी दहा हजार मुसलमान घेऊन होता. तो शत्रूला वश झाला नाही. धारातीर्थी तो मेला ! निजामाच्या दरबारात हिंदू मंत्री असत. त्याच्या पदरी हिंदू सैन्यही होते. आम्ही आपसांत लढाया केल्या तरी सारे हिंदुस्थानचे ही भावना होती. मुसलमान बाहेरचे, परके ही भावना नष्ट झाली होती. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातही हिंदू-मुसलमान खांद्याला खांदा लावून लढले.

आपण आपसांत भांडलो नाही असे नाही, परंतु ही भांडणे आपसांतील होती. म्हणजे आपण एक होतो. भांडणातून आपण भव्य निर्माण करीत होतो. नवसंस्कृती निर्मित होतो. अरे नवीन अशी राष्ट्रभाषाही आपण निर्मिली होती. हिंदूंनी केवळ संस्कृतप्रचुर अशी आपली भाषा दूर केली. मुसलमानांनी केवळ अरबी व पर्शियन शब्दांनी भरलेली अशी आपली भाषा सोडली. दोघांच्या सल्ल्याने एक नवीन, संमिश्र, दोघांना समजणारी अशी नवभाषा निर्माण केली गेली. परंतु असे महान प्रयोग होत असता हे इंग्रज आले. यांनी येथले उद्योगधंदे मारले. कर्तृत्वास वाव उरला नाही. त्यांनी या देशात भांडणे लाविली. नोकरीशिवाय धंदा उरला नाही. म्हणून त्या नोकऱ्यांसाठी भांडणे सुरू झाली. नोकऱ्यांसाठी प्रत्येकाला अलग रहावे असे वाटू लागले. म्हणजे आपआपल्या जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळतील हा हेतू. ब्राह्मणेतर अलग झाले. अस्पृश्य अलग झाले. मुसलमान अलग राहू लागले. 'आम्हांला इतक्या नोकऱ्या द्या.' याशिवाय दुसरे मागणेच नाही ! तुकड्यासाठी कुत्री भांडू लागतील तसे आपण भांडू लागलो. कोंबडी झुंजवतात त्याप्रमाणे ब्रिटिश सरकार हिंदी जनतेला परस्परात झुंजवू लागले. केवढे हे पाप ! आणि त्यांच्या कारवायांस बळी पडणारे आपणही किती पापी व करंटे !

वसंता, परकी सत्ता जर आपल्यात भेद पाडीत असेल तर आपले सर्वांचे काम हे आहे की ते भेद मिटविण्यासाठी वाटेल ती किंमत देणे.

आपली जी ऐक्यनिर्मितीची परंपरा तिचा सोनेरी धागा हाती घेऊन आपण जाऊ या. तो धागा इंग्रज तोडीत आहेत. आपणही मूर्खपणाने ता तोडीत आहोत. ऐक्यनिर्माते ते आपले पूर्वज काय म्हणतील? आपण एकमेकांच्या भल्या गोष्टी आठवून पुढे जाऊ या. जुन्या उखाळ्या-पाखाळ्या काय कामाच्या? जुन्या इतिहासातील भले ते स्मरू व कठीण काळात तरू.

तुला ती एका म्हाताऱ्याची गोष्ट माहीत आहे का? त्याला दोन मुलगे होते. आपली इस्टेट कुणाला द्यावयाची याचा तो विचार करीत होता. कोणता मुलगा शहाणा? शेवटी त्याने परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याने प्रत्येकाला चार दिडक्या दिल्या व तो म्हणाला, "या चार दिडक्या घ्या व ह्या शेजारी दोन खोल्या आहेत, त्यांतील प्रत्येकाने एक खोली नीट भरून ठेवावी." दोघे मुलगे विचार करू लागले. मोठा मुलगा म्हणाला, "चार दिडक्यांत अशी कोणती वस्तू मिळेल की, जिने ही सारी खोली भरता येईल? इतकी स्वस्त व मुबलक कोणती गोष्ट? बाबांची काही तरीच अट! अडाणी व हट्टी आहेत बाबा." परंतु त्याला एक युक्ती सुचली. गावचा सारा कचरा एके ठिकाणी टाकण्यात येत असे. हा कचरा त्याने विकत घेतला. गाडीभर कचरा त्याला मिळाला. तो कचरा त्याने खोलीत ओतला. खोली भरून गेली. त्याला आनंद झाला! बाप आपल्यावर प्रसन्न होऊन आपणासच सारी इस्टेट देईल, असे त्याला वाटले. त्या दुसऱ्या भावाने काय केले? त्याने दोन दिडक्यांच्या आठ पणत्या आणल्या. एका दिडकीचे तेल घेतले. एका दिडकीच्या वाती घेतल्या. त्यानें खोली स्वच्छ झाडून सारवून त्या आठ पणत्या आठ दिशांना लावून ठेवल्या! बाप पहावयास आला. तो एका खोलीत कचऱ्याचा ढीग! "अरे हे रोगाचे जंतू येथे कशाला आणलेस? घाणीने का खोली भरायची!" असे म्हणून पिता दुसऱ्या खोलीकडे वळला. तो त्या खोलीत सुंदर प्रकाश भरलेला होता. ज्योती तेवत होत्या. दिवा देखून नमस्कार! त्या पित्याचे मन प्रसन्न झाले. त्याने त्या ज्योतींना प्रणाम केला. त्याने लहान मुलाच्या पाठीवर शाबासकी दिली व तो म्हणाला, "बाळ, तू शहाणा आहेस, तुला घे इस्टेट!"

वसंता, जुन्या इतिहासातील कचरा घेऊन आपण पुढे जाणार की शेकडो वर्षांच्या इतिहासातून जे मांगल्य आपण निर्मिले, ज्या मधुर रूढी निर्मिल्या, सुरेख रीतीरिवाज निर्मिले ते घेऊन पुढे जाणार? एखाद्या मनुष्याची एका गावाहून दुसऱ्या गावाला जर बदली झाली तर तो बरोबर काय नेतो? मौल्यवान वस्तू बरोबर नेतो. फुटक्या काचा, खोकी, टिनपाटे, केरसुण्यांचे बुडखे, दगडधोंडे हे तो बरोबर नेतो का? मग आपणांस तर एका शतकातून दुसऱ्या शतकात जावयाचे आहे. अशा वेळेस मंगल स्मृतींचे काही तारेच बरोबर घेऊन गेले पाहिजे. काळाच्या ओघात जे भले असेल ते शिदोरी म्हणून बरोबर घेऊन पुढील यात्रेसाठी निघाले पाहिजे. द्वेष-मत्सराच्या पुरचुंड्या बरोबर घेण्यात काय अर्थ?

मी यासंबंधी पुढच्या पत्रात अधिक लिहीन. माझी काँग्रेस तरी हिंदुस्थानचा आत्मा ओळखून चालली आहे. समुद्र आपण पवित्र मानतो. कारण सारे प्रवाह तेथे असतात. नद्यांचा संगम आपण पवित्र मानतो. कारण दोन भिन्न प्रवाह एकत्र मिळाले. नदी आपण पवित्र मानतो. कारण अनेक प्रवाह जवळ घेऊन ती बनली. म्हणून आपले पूर्वज नदीत, संगमात, समुद्रात स्नाने करा असे म्हणत. आपण स्नाने तर करतो परंतु नदीचा, संगमाचा, समुद्राचा संदेश ध्यानात घेत नाही. जास्तीत जास्त प्रवाहांस जवळ घेईल ती नदी अधिक मोठी होते. अधिक पवित्र मानली जाते. त्याप्रमाणे आपण सारे मानवी प्रवाह जवळ येऊ या. मानवी प्रवाहांचे या भारतात ऐक्य होवो. समुद्रात सारी तीर्थे. त्याप्रमाणे भारतात मानवी समुद्र उचंबळून मानवी तीर्थक्षेत्र येथे निर्माण होवो. सारे जग म्हणेल, "तो पहा हिंदुस्थान. सारे धर्म व संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत आहेत. परस्परांचे मंगल घेत आहेत." पूर्वजांचा हा संदेश आहे. हा भारताचा स्वधर्म. ही आपली परंपरा. हजारो वर्षांच्या इतिहासाचे हे सार व सूत्र. ते कोणी ओळखले? काँग्रेसने नाही का?

तुझा

**श्याम**

पत्र आठवे

# खरे आस्तिक व्हा !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

दत्तू नावाचा एक लहान मुलगा संघ सोडून तुझ्या सेवा दलात आला हे वाचून आनंद झाला. जातीय संघटनांनी हिंदुस्थानचा नाश चालविला आहे. भारतीय मनाला ही कीड लागत आहे. लाठी फिरवून कवाईत करून संघातील मुलांची शरीरे दणकट होतील, परंतु शरीरातील मने विषारी होत आहेत. आपल्या संघटनेतील मुलांच्या कानांवर नवीन विचार ते जाऊ देत नाहीत. बौद्धिक गुलामगिरी निर्मिली जात आहे! दुनियेतील सर्व विचारांचा व प्रयोगांचा अभ्यास करून जर कोणी एखादा मार्ग पत्करला तर ती गोष्ट निराळी, परंतु या जातीय संघटना मुलांची बुद्धीच मारीत आहेत. त्यांच्या आत्म्याचा वध करीत आहेत.

आपल्या हिंदुधर्मात गायत्री मंत्राला आपण अत्यंत पवित्र मानले आहे. का बरे? वेदात शेकडो मंत्र आहेत. परंतु ह्याच मंत्राला आपण प्राधान्य का दिले? कारण या मंत्रात स्वतंत्र विचाराची देणगी मागितली आहे. सूर्याजवळ प्रार्थना केली आहे की, " हे सूर्या, जसा तुझा प्रकाश स्वच्छ आहे, तशी आमची बुद्धी सतेज राहो. आमच्या बुद्धीला चालना दे." गायीगुरे, धनसंपत्ती, संतती वगैरेंची मागणी करणारे वेदामध्ये शेकडो मंत्र आहेत, परंतु बुद्धीची मागणी करणारा मंत्र आपण पवित्र मानला. ती बुद्धीच आज मारली जात आहे. एका ठराविक साचाचे अहंकारी विचार खाद्य अशा संघटनांतून दिले जात आहे. या संघटनांचे

पुरस्कर्ते आपापल्या संघटनांभोवती भिंती बांधीत आहेत. बाहेरच्या विचारांची त्यांना भीती वाटते. परंतु बाहेरचे विचार आल्याशिवाय राहणार नाहीत. विचारांना कोण अडथळा करणार? हिमालयाची उंच शिखरे ओलांडून ते विचार धावत येतील. सप्तसागर ओलांडून ते विचार येतील. तुमच्या भिंती कोलमडून पडतील. नवविचारांची ज्यांना भीती वाटते, त्यांचे तत्त्वज्ञान कुचकामी आहे. बायबलमध्ये एक वाक्य आहे, "तुझे घर खडकावर बांध म्हणजे ते वादळात पडणार नाही, पावसात वाहून जाणार नाही." त्याप्रमाणे आपल्या संघटना शास्त्रीय विचारांच्या पायावर उभारल्या पाहिजेत. परंतु शास्त्रीय विचाराची तर या संकुचित मंडळीस भीती वाटते.

वसंता, एखादे लहानसे रोपटे तू उपटून बघ. त्याची मुळे एकाच दिशेला गेलेली दिसतील का? नाही. झाडांची मुळे दशदिशांत जातात. जेथे जेथे ओलावा मिळेल तेथे तेथे जाऊन तो ओलावा घेऊन झाडे उभी राहतात. त्याप्रमाणे आपले जीवन हवे. ज्ञानाचा प्रकाश कोठूनही येवो. त्याचा आपण सत्कार केला पाहिजे. दाही दिशांतून प्रकाश येवो. सर्व खिडक्या मोकळ्या असू देत. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघात काय चालते? अन्य मतांचा वाराही आपल्या संघातील मुलांच्या कानांवर येऊ नये म्हणून तेथे खटपट केली जाते! मी मागे संगमनेर येथे गेलो होतो. सायंकाळी माझे व्याख्यान आहे असे जाहीर होताच संघचालकांनी एकदम आपली मुले कोठे तरी बाहेर नेण्याचा कार्यक्रम ठरविला! तुला हा अनुभव आहेच. तूच मागे आपल्या पहिल्या भेटीत म्हणाला होतास "आमची कीव करा. आम्हांला दुसरे विचार ऐकूच देत नाहीत." ती सत्य गोष्ट आहे. मला या गोष्टीचे फार वाईट वाटते.

पलटणीतील लोक असतात ना, त्यांना अज्ञानात ठेवण्यात येत असते. सरकार पसंत करील तीच वर्तमानपत्रे मिळाली तर त्यांना मिळतात. नवाकाळ, लोकमान्य, लोकशक्ती, क्रॉनिकल अशी राष्ट्रीय पत्रे पलटणीत जातील का? पलटणीतील शिपायांना पशूप्रमाणे केवळ मारामारीसाठी तयार ठेवण्यात येते! गोळी घाल म्हणताच त्यांनी

घातली पाहिजे. सत्य काय, असत्य काय, याचा विचार त्यांनी करायचा नसतो. पलटणीत जसे हे विचारशून्य टॉमी तयार करण्यात येतात तसेच आम्हीही आज टॉमी तयार करीत आहोत! शत्रूचा द्वेष ही एकच गोष्ट शिपायांस सांगण्यात येते. १७८९ च्या फ्रेंच क्रांतीच्या वेळेस फ्रेंच लोक म्हणजे आग लावणारी माकडे आहेत, असा प्रसार इंग्लंडमध्ये करण्यात येई. एकदा फ्रेंच कैदी लंडनमधील रस्त्यातून नेले जात होते. फ्रेंच माणसास खरोखरीच पाठीमागे शेपटे असतात की काय ते पाहण्यासाठी त्यांचे कोट इंग्रज लोक पाठीमागून गंभीरपणे उचलून बघत! विषारी प्रचाराचा असा परिणाम होत असतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कोणते बौद्धिक खाद्य दिले जाते? वर्तमानपत्रात मुसलमानांनी केलेले अत्याचार जे येतील, त्यांची कात्रणे म्हणजे यांचे वेद! "कृण्वन्तो विश्वमार्यम्" हे यांचे ब्रीद वाक्य. "हिंदुस्थान है हिंदुओं का, नहीं किसी के बाप का." हा यांचा महान मंत्र. जर्मनीने ज्यू हद्दपार केले. आपणही मुसलमानांना घालवू, हे यांचे स्वप्न. आपली संस्कृती, आपला धर्म किती उच्च! हे मुसलमान म्हणजे बायका पळवणारे. मुसलमान म्हणजे शुद्ध पशू. त्यांना न्याय ना नीती. मुसलमानांना लांडे याशिवाय दुसरा शब्द ते लावणार नाहीत. असा हा मुसलमानद्वेष लहान मुलांच्या मनात ओतण्यात येत आहे. मुस्लिम लीग व हिंदुमहासभा दोघांकडून हे पाप होत आहे.

बायबलमध्ये एक वाक्य आहे, "माझ्या लहानग्यांना जो बिघडवितो त्याने सर्वांत मोठे पाप केले!" आज असे पाप आमचे जातीय पुढारी करीत आहेत. त्यांना ना धर्माची ओळख ना संस्कृतीची. एखाद्या जातीचा किंवा धर्माचा द्वेष करणे म्हणजे केवळ मनुष्यद्रोह आहे. भलेबुरे लोक सर्वत्रच आहेत. त्यामुळे सर्वच्या सर्व लोकांना पशू मानणे म्हणजे बुद्धीचे दिवाळे निघाल्याचे चिन्ह आहे. १९१४-१८ च्या महायुद्धात शत्रूकडच्या कैद्यांना सर्वांत चांगल्या रीतीने जर कोणी वागविले असेल तर ते तुर्कस्तानने, असा युरोपीय राष्ट्रांनी निकाल दिला. तुर्की लोक मुसलमान धर्माचेच आहेत. मुसलमान लोक सभ्यता, दिलदारी

याबद्दल प्रसिद्ध आहेत. हिंदुस्थानातील सारे मुसलमान का पै किंमतीचे? कोट्यवधी लोक पै किंमतीचे निर्माण करणारा तो ईश्वरही मग पै किंमतीचा ठरेल.

हिंदुस्थानातील मुसलमान हिंदूंतूनच गेलेले असेही आपण म्हणतो. जर हे हिंदी मुसलमान तेवढे वाईट असतील तर आपण हिंदूच वाईट असा त्याचा अर्थ होतो. कारण हे मुसलमान प्रथम हिंदूच होते, असे आपण सांगत असतो. वसंता, पापाचा मक्ता कोणा एका जातीला नाही. हिंदू स्त्रियांना मुसलमान गुंड पळवतात. पुष्कळ वेळा आमच्याच श्रीमंत लोकांना त्या सुंदर स्त्रिया हव्या असतात. मुली किंवा बायका पळविणाऱ्या टोळ्या असतात. त्यांत हिंदू व मुसलमान दोन्ही प्रकारचे लोक असतात, असे दिसून आले आहे.

पुष्कळ वेळा हिंदूंच्या रूढीमुळेही हिंदू स्त्रिया अनाथ होतात. जरा वाकडे पाऊल पडले तर त्या स्त्रीला आपण जवळ घेत नाही. जणू आपण सारे पुरुष पुण्यात्मेच असतो! अशा निराधार स्त्रिया मिशनमध्ये जातात किंवा मुसलमान त्यांना जवळ करतात. याचा अर्थ असा नाही की काही मुसलमान गुंड अत्याचार करीत नसतील. परंतु गुंडांना शिक्षा करा. सारे मुसलमान बायका पळवणारे असे म्हणू नका. सबंध जातच्या जात नीच मानू नका. त्यांच्यातही आयाबहिणी आहेत, हे आपण विसरता कामा नये.

जे मुसलमान गुंड असतील त्यांना शासन होऊ नये असे कॉंग्रेसने कधीच म्हटले नाही. स्त्रियांवर अत्याचार झाला तर महात्माजी किती संतापतात. मागे मुंबईला आस्ट्रेलियन टॉमींनी हिंदी स्त्रियांचा अपमान केला. त्याविरुद्ध शेवटी कोणी लेखणी उचलली? उठल्यासुटल्या मुसलमानांच्या काल्पनिक वा अतिशयोक्तीने भरलेल्या अत्याचारांवर टीका करणारे आमचे सारे जातीय हिंदू पुढारी व त्यांची पत्रे मूग गिळून बसली होती. मुसलमानांवर टीका करतील, परंतु साहेबावर आणि त्यातल्या-त्यात लढाईच्या काळात डिफेन्स ॲक्ट चालू असता, कोणी टीका करावी? परंतु महात्माजींनी जळजळीत लेख लिहिला. हिंदी स्त्रियांची अब्रू

सांभाळण्यासाठी हाच एक धीरवीर महात्मा उभा राहिला. व्हाइसरॉय का झोपले, सैन्याचे अधिकारी का झोपले, असे त्यांनी विचारले. आणि शेवटी लिहिले, " हिंसा वा अहिंसा, स्त्रियांची विटंबना होता कामा नये. हिंदी स्त्रियांच्या अब्रूला धक्का लागता कामा नये. जनतेने तत्क्षणी त्याचा प्रतिकार केला पाहिजे. "

गुंडांचे पारिपत्य झाले पाहिजे. स्त्रियांच्या अब्रूचे रक्षण केले पाहिजे. परंतु तेवढ्यासाठी सबंधच्या सबंध मुसलमानांस सारख्या शिव्या देण्याची जरूरी नाही. 'लांडे असेच!' असे म्हणण्याची जरूरी नाही. आणि आपणही आपल्या स्त्रियांना अधिक उदारपणे वागविले पाहिजे.

'कृण्वन्तो विश्वमार्यम्' याचा अर्थ काय? सर्वांना का तुमच्या धर्माची दीक्षा देणार? सर्वांना का शेंड्या व जानवी देणार? जगात केवळ आर्य जात नाही. या देशातच द्रवीडियन लोक आहेत. ते का आर्य आहेत? आर्य तेवढे चांगले असा अहंकार भ्रममूल आहे. जगाच्या संस्कृतीत सर्व मानवी वंशांनी भर घातली आहे. आज हिटलर म्हणतो की " आर्य तेवढे सर्वश्रेष्ठ. ज्यूंना द्या हाकलून. " परंतु आइन्स्टीन-सारखे शास्त्रज्ञ ज्यूत निर्माण झाले. कोणतीही एक जात, कोणताही एक मानववंश इतरांपेक्षा श्रेष्ठ असे नाही. कोणासही अहम्‌ची बाधा व्हायला नको.

'कृण्वन्तो विश्वमार्यम्' याचा अर्थ इतकाच की, आपण सर्व जगाला उदार व्हायला शिकवू या. आर्य म्हणजे उदार-चरित. आपण एकजात मुसलमानांना निंद्य म्हणू तर आपणच अनुदार व अनार्य ठरू. आर्य म्हणवून घेण्यास नालायक ठरू. 'अरिषु साधुः स आर्यः' शत्रू-जवळही जो प्रेमाने वागतो तो आर्य, असा आर्यपणा आपणाजवळ कोठे आहे? आपण आपल्या शेजारी शेकडो वर्षे राहणाऱ्यांना आज पाण्यात बघत आहोत. हा का आर्यपणा?

जर्मनीने काही लाख ज्यू लोकांस बाहेर घालविले. आपण आठ कोटी मुसलमानांस कसे बाहेर घालवणार? ते तर शेकडो वर्षे घरे-दारे करून येथे राहिले. हिंदुमुसलमान नव संस्कृती निर्मित होते.

परस्पर प्रेमभाव शिकत होते. जर्मनीचे अनुकरण करणे म्हणजे वेडेपणा आहे. भारताची परिस्थिती निराळी, भारतीय राष्ट्राची परंपरा निराळी, इतिहास निराळा. आणि शेजाऱ्यांस घालवण्यात पुरुषार्थ नाही. त्याच्याशी मिळते घेऊन सहकार्य करण्याची पराकाष्ठा करणे यात मोठेपणा आहे.

आपण मुसलमानांच्या शेजारी शेकडो वर्षे राहात आहोत. सहा हजार मैलांवरून आलेल्या इंग्रजांचे वाङ्मय आपण आत्मसात केले. आपण इंग्रजीत बोलू लिहू. इंग्रजी ग्रंथांतील उतारे देऊ. पाश्चिमात्य संस्कृती आपण पचनी पाडली. मुसलमानबंधू इतकी वर्षे आपल्याजवळ राहात आहेत, परंतु त्यांची भाषा शिकण्याची, त्यांची संस्कृती अभ्यासण्याची, त्यांच्या धर्मातील चांगुलपणा पाहण्याची बुद्धी आपणांस झाली नाही. एक काळ असा होता की ज्या वेळेस हे आपण करीत होतो, हिंदूमुसलमान एकमेकांचे चांगले घेत होते. एकमेकांची भाषा बोलत होतो. परंतु ब्रिटिश आले आणि आपण परस्परांचे शत्रू बनलो. परसत्तेचे मात्र आपण पाय चाटीत बसलो.

मुसलमानी धर्म का केवळ वाईट ? मुहंमद पैगंबरांचीही आम्ही कधी कधी कुचेष्टा करतो. ज्या थोर पुरुषाने वाळवंटातील लोकांत अशी ज्वाला पेटविली की जी क्षणात स्पेनपासून चीनपर्यंत पसरली, तो पुरुष का क्षुद्र ? तो पुरुष का रंगीला रसूल ? जनता कोणाच्या भजनी लागते ? जनता शील व चारित्र्य ओळखते. मुहंमद चारित्र्यहीन असते तर आज पंधराशे वर्षे पंचवीस तीस कोट लोक त्यांच्या नादी का राहते ? इंग्लंडमधील विश्वविख्यात इतिहासकार गिबन याने मुहंमदांची स्तुतिस्तोत्रे गायिली. गिबनला का कोणी लाच दिली होती ? कार्लाईल या प्रसिद्ध पंडिताने मुहंमदांवर स्तुतिसुमनांजली वाहिली. कार्लाईलला का कळत नव्हते ?

मुहंमद पैगंबर एक ईश्वरी विभूती होते. त्यांना जेव्हा एकाने विचारले, "तुम्ही काही चमत्कार करा." तेव्हा ते म्हणाले, "वाळवंटात मधून मधून झरे दिसतात. वाळवंटात गोड खजुरीची झाडे आढळतात. समुद्रावर लहानशा होड्याही डौलाने नाचतात. माणसावरच्या प्रेमाने

सायंकाळ होताच त्यांची गाईगुरे घरी परत येतात. असे हे चमत्कार सभोवती भरले आहेत. आणि न शिकलेल्या मुहंमदांच्या तोंडून ईश्वर कुराण बोलवितो, हा का चमत्कार नाही? जग चमत्काराने भरलेले आहे. मी काय आणखी चमत्कार करू?"

मुहंमदांची राहणी साधी. ते पाणी पीत व कोरडी भाकरी खात. एकदा शत्रू त्यांच्या पाठीस लागला होता. मुहंमद थकून झाडाखाली झोपले. तो वैरी तेथे आला. त्याने तलवार उपसली. मुहंमद जागे झाले. त्यांनी वैऱ्याकडे पाहिले. वैऱ्याच्या हातची तलवार एकदम गळाली. मुहंमदांनी ती झटकन उचलली व ते म्हणाले, "आता मी तुला मारू शकतो. परंतु मी मारीत नाही. जा. मला मारणाऱ्याला मी प्रेम देतो." असे हे मुहंमदाचे अंतरंग.

धर्मामध्ये काही भाग अमर असतो. काही त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे असतो. अरब लोक आपसात भांडत होते. त्यांची भांडणे मिटविण्यासाठी मुहंमद म्हणाले, "आपसात काय भांडता? दुनियेत जा. जग तुमचे आहे. तुमचा धर्म जगाला द्या." आपल्या मराठ्यांच्या इतिहासात असाच एक प्रसंग आहे. राजाराम महाराजांच्या वेळेस मराठे आपसात भांडत होते. तेव्हा राजाराम महाराजांनी असे फर्मान काढले, "दिल्लीच्या साम्राज्याचा जो जो मुलूख कोणी जिंकून घेईल, तो तो त्याला जहागीर म्हणून देण्यात येईल!" हे जाहीर होताच आपसात भांडणारे मराठे सरदार हिंदुस्थानभर पसरले. दिल्लीच्या साम्राज्याचे लचके त्यांनी तोडले. मुहंमदांनाही त्या वेळेस तसा सल्ला द्यावा लागला. याचा अर्थ नेहमीच परधर्मीयांना मारा असा नव्हे. कुराणात एके ठिकाणी लिहिले आहे, "ज्याप्रमाणे मला ईश्वरी ज्ञान झाले आहे, त्याप्रमाणे जगात इतर महात्म्यांसही झाले असेल. अरबांनो, तुम्ही मला मान देता तसा त्यांनाही द्या." मुसलमानी धर्मात थोर तत्त्वे आहेत. त्यांकडे आपण लक्ष दिले पाहिजे. तो खरा धर्मात्मा की जो दुसऱ्या धर्माविषयीही आदरबुद्धी दाखवितो. तो खरा मातृभक्त, जो इतर मातांसही मान देतो. तो खरा देशभक्त, जो इतर देशांच्या स्वातंत्र्याचीही इच्छा करतो. जो दुसऱ्या धर्मांची टिंगल

करील त्याला धर्म कळलाच नाही. गीतेने सांगितले आहे की, " जेथे जेथे मोठेपणा दिसेल तेथे तेथे माझा अंश मान ! ईश्वराचा मोठेपणा सर्वत्र भरलेला आहे. स्वामी विवेकानंद मुहंमदाच्या जन्मतिथीस उपवास करीत, ख्रिस्ताच्या जयंतीस उपवास करीत, – ज्याप्रमाणे रामनवमी, गोकुळाष्टमीस ते उपवास करीत. विवेकानंदांना का हिंदुधर्माचा अभिमान नव्हता ? परंतु त्यांचा अभिमान मुहंमद पैगंबरांची पूजा करण्याइतका आर्य होता.

किती सुंदर सुंदर संवाद व वचने मुसलमानी धर्मग्रंथांतून आहेत. एके ठिकाणी प्रभूचा देवदूतांशी झालेला संवाद आहे. देवदूत परमेश्वराला विचारतात, " सर्व जगात बलवान काय ? "

देव म्हणाला, " लोखंड. "

त्यांनी पुन्हा विचारले, " लोखंडाहूनही बलवान काय ? "

ते म्हणाले, " अग्नी ! कारण अग्नी लोखंडाचा रस करतो."

त्यांनी पुन्हा विचारले, " अग्निहून प्रबल कोण ? "

देव म्हणाला, " पाणी. कारण पाण्याने अग्नी विझतो."

पुन्हा त्यांचा प्रश्न आला, " पाण्याहून बलवान कोण ? "

तो म्हणाला, " वारा. कारण वाऱ्यामुळे पाण्यावर लाटा उत्पन्न होतात. "

पुन्हा ते विचारते झाले, " वाऱ्याहून प्रबळ काय ? "

देव म्हणाला, " पर्वत. कारण पर्वत वाऱ्यांना अडवतात. "

शेवटी प्रश्न आला, " पर्वताहून प्रबळ कोण ? "

देवाने उत्तर दिले, " परोपकारी हृदय. ते पाषाणासही पाझर फोडील. "

असे हे संवाद त्या धर्माचा गाभा आहे. " तू एकटा खाऊ नकोस. शेजाऱ्याला तुझी भाकर दे. " असे कुराण सांगते. सुफी कवी म्हणतात, " बाहेरच्या मशिदीचा दगड दुखावला गेला तरी चालेल परंतु कोणाच्याही दिलाची मशीद दुखवू नकोस ! "

आपण कचऱ्याच्या पेटीजवळ कचरा टाकतो. तेथे धान्याचा अंकुर वर आलेला दिसतो. तो सुंदर अंकुर त्या कचऱ्यातून का वर आला? नाही. त्या कचऱ्यात धान्याचा एक टपोरा दाणा होता. त्या दाण्यातून तो अंकुर वर आला. कचऱ्यात ती शक्ती नव्हती. जगात जे सत्य आहे त्याचीच वाढ होते. जी काही पुण्याई असते ती फळत असते. ती पुण्याई संपली म्हणजे भाग्य संपते. जगात कोठेही कोणाचाही जो विकास होतो, तो त्याच्या पापांमुळे होत नसतो. काही तरी सत्‌अंश त्या पापसंभारात असतो. तो सत्‌अंश वाढतो.

आणि मी मागेच सांगितले आहे की, पूर्वीच्या इतिहासातून भले ते घेऊन पुढे जाऊ या. वसंता, परवा गाडीत एक गृहस्थ भेटले होते. ते म्हणू लागले, "मुसलमानांचे सारे आमच्या उलट. त्यांना धर्मच नाही. हिंदूंच्या उलट करणे म्हणजे जणू त्यांचा धर्म? आम्ही पूर्वेकडे, सूर्याकडे तोंड करू तर त्यांचे पश्चिमेकडे तोंड. आम्ही दाढी काढू तर ते दाढी राखतील. आम्ही अलग अलग जेवू. ते एका थाळीत जेवतील." असे त्या गृहस्थाचे व्याख्यान चालू होते. लहान कोवळ्या मुलांनाही या गोष्टी सांगण्यात येतात, परंतु केवळ हिंदूंच्या उलट करणे हा त्यात हेतू नाही. मक्का पश्चिमेकडे आहे. तिचे स्मरण म्हणून ते पश्चिमेकडे तोंड करतात. आपल्यातही उत्तरेकडे तोंड करून औषध घेण्याची पद्धत आहे. संध्येच्या वेळी कधी कोणी उत्तरेकडेही तोंड करतात. का बरे? आपण उत्तर ध्रुवाकडून आलो त्याची ती खूण आहे. मुसलमान पश्चिमेकडे पाहतात म्हणून जर त्यांना या देशात स्थान नसेल तर आपण उत्तरेकडे पाहतो म्हणून आपणासही नसावे. मुसलमान बाहेरून येथे आले आणि आपण का येथलेच आहोत? आपणही ध्रुवावरच्या बर्फात पुन्हा मरायला जाऊ या. फक्त द्रवीडियन लोकांना येथे राहू दे.

त्या त्या देशातील परिस्थितीप्रमाणे रीतिरिवाज पडत असतात. अरबस्थानात वाळवंटे आहेत. वाऱ्याने वाळू उडते. दाढीमुळे संरक्षण होते. ती वाळू नाकातोंडात शिरत नाही. अरब लोक एकत्र जेवत. त्यांचे खाणे कढी-आमटीचे नसे. त्यांचा आहार म्हणजे सुका मेवा, किंवा कोरडी भाकर. चादरीवर खजूर पसरीत, एकत्र खात. ती चाल इकडेही आली.

इकडे कढीभात ते खाऊ लागले! परंतु एकत्र जेवणाची चाल राहिली. मारवाडात पाणी कमी म्हणून तेथे भांडी कोरड्याच राखेने घासतात. मारवाडी महाराष्ट्रात आले तरी तीच चाल त्यांची राहिली. अशा चाली राहतात. त्या केवळ दुसऱ्याच्याविरुद्ध वागण्यासाठी नसतात.

मुसलमान गाईची कुरबानी करतात. या चालीचा इतिहासही पाहिला पाहिजे. एक मुसलमान साधू होता. देव व देवदूत यांच्यात चर्चा चालली होती. देवदूत म्हणाले, " देवा, तो काही तुझा खरा भक्त नाही. " देव म्हणाला, " तो साधू माझा खरा भक्त आहे. मी त्याची परीक्षा घेतो. " देव त्या साधूच्या स्वप्नात आला व म्हणाला, " तुझी सर्वांत प्रिय अशी जी वस्तू असेल ती मला अर्पण कर. " साधू दुसऱ्या दिवशी जागा झाल्यावर विचार करू लागला. त्याची आवडती एक बकरी होती. देवाने ती बकरी का मागितली? त्याने ती आवडती बकरी बळी दिली. परंतु देव पुन्हा स्वप्नात आला व म्हणाला, " त्या बकरीहूनही प्रिय अशी एक वस्तू तुझ्याजवळ आहे ती मला दे. " साधू सकाळी विचार करू लागला. तो म्हणाला, " खरेच, माझा मुलगा बकरीहूनही प्रिय आहे. " त्याने आपल्या मुलाला बळी द्यावयाचे ठरविले. मुलाला मारण्यासाठी त्याने तरवार वर केली तोच देवाने वरचेवर हात धरला. प्रभू म्हणाला, " तू माझ्या कसोटीस उतरलास. तू खरा भक्त आहेस. " अशी ही गोष्ट आहे. त्या गोष्टीची स्मृती म्हणून मुसलमान त्या दिवशी कुरबानी करतात. केवळ हिंदूंच्या भावना दुखविण्यासाठी नव्हे. परंतु मुसलमानांसही ही रूढी का आली ते माहीत नाही, आपणासही माहीत नाही. आपण गाईची पूजा करणारे. आपणास वाटले की, मुसलमान मुद्दाम हे करतात. आणि अडाणी मुसलमानांसही वाटले की, बरे आहे हे हिंदूंना चिडविणे!

किती तरी मुसलमानांच्या घरीही गाई असतात. आपण हिंदू प्रेम करतो त्याचप्रमाणे तेही करतात. आणि हिंदूंत तरी गाईवर कितीसे प्रेम आहे? गाईची अवलाद सुधारणे, तिचे दूध वाढविणे, हे सारे दूरच राहिले, गाईला आपण वेळेवर खाऊ घालणार नाही, पाणी पाजणार

नाही. आपण स्वतःला गोपूजक म्हणवितो, परंतु म्हशींची उपासना करतो व त्यांचे दूध पितो !

मुसलमान राजांनी गोवधबंदी केली होती. परंतु गोरे साहेब आले. त्यांना गोमांसाची चटक. त्यांनी ठायी ठायी कत्तलखाने सुरू केले. गोऱ्या साहेबांना व शिपायांना गोमांस पुरविण्यासाठी गाईंचा संहार सुरू झाला. सरकारी कत्तलखान्यांतून लाखो गाईंचा होणारा संहार हिंदू मुकाट्याने बघतात. मग आपण पूर्वीप्रमाणे गाईंची कुरबानी का करू नये, असे मुसलमानांस वाटू लागते. बंद झालेली कुरबानी पुन्हा होऊ लागली.

परंतु याला उपाय म्हणजे सत्कल्पनांचा प्रसार करणे हाच आहे. त्यांनी गाय मारली म्हणून त्यांना मारणे हा उपाय नव्हे. ते एक पूर्वीची धार्मिक स्मृती म्हणून तरी मारतात, परंतु साहेबाच्या जिव्हा-लौल्यासाठी होणाऱ्या कत्तलीविरुद्ध आपण काय करीत आहोत ? ही कत्तल आपण थांबविली तर मुसलमानांसही वाटेल की, खरोखरच गाय हिंदूंस प्राणाहूनही प्यारी आहे.

वसंता, माझे म्हणणे इतकेच की, उगीच द्वेष पसरू नये. गोष्टी कशा रूढ झाल्या ते पहावे. द्वेषाने द्वेष वाढतो. एखाद्या मुलाला नेहमी आपण दगड आहेस असे म्हटले तर खरोखरच तो तसा नसला तरी तसा होईल ! त्याप्रमाणे "लांडे असेच, मुसलमान म्हणजे वाईटच, बायका पळवणारे" असे जर आपण नेहमी म्हणू तर मुसलमान तसे नसले तर तसे होतील. आपल्या सदैव म्हणण्याचा तो परिणाम होईल. म्हणून आपली सत्श्रद्धा दुसऱ्यावर आपण लादीत असावे. "तू चांगला होशील. चुकीच्या कल्पनांमुळे तू असा वागत आहेस. तू मुळात वाईट नाहीस." असे आपण म्हटले पाहिजे. शास्त्रज्ञ डांबरातून सुंदर रंग काढतात. डांबरातून साखर काढतात. माणूस का डांबराहून डामरट आहे ? मुसलमान सारे वाईट, ते कधीही चांगल्या रीतीने वागणार नाहीत, असे म्हणणे म्हणजे नास्तिकवाद होय. मी तर परमेश्वरावर– म्हणजेच शेवटी सारे चांगले होईल– यावर विश्वास ठेवणारा आहे. "अहं ब्रह्मास्मि,

तत्त्वमसि– मी मंगल आहे व तूही मंगल आहेस." या उपनिषदाच्या वचनावर श्रद्धा ठेवणारा मी खरा हिंदू आहे.

असो. आपण आपली श्रद्धा घेऊन जावे. रवीन्द्रनाथांनी म्हटले आहे, "तुझा दिवा घेऊन तू जा. तुझ्यावर टीका होतील. तुझा दिवा विझवतील. पुन्हा लाव. तुला एकट्यानेच जावे लागेल." वसंता, तुला माहीत आहे की नाही मला ठाऊक नाही; परंतु काही काही हिंदु-महासभेचे लोक मला "मुल्ला" म्हणतात. म्हणोत विचारे. त्याने मी माझ्या ध्येयाजवळ येतो असेच मला वाटते. मी सर्वांचा आहे. माझा देव सर्वांचा आहे. सर्व विश्वाचा आहे. तू प्रकृतीस जपत जा हो. सर्वांस सप्रेम नमस्कार व आशीर्वाद.

तुझा

**श्याम**

पत्र नववे

# विकासाचा आरंभ मंगल

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

आज सायंकाळी आकाशात बीजेची चंद्रकोर दिसत होती. लहानपणी आम्ही द्वितीयेची ही चंद्रकोर पाहण्यासाठी धडपड करीत असू. आणि दिसली की, ती एकमेकांस दाखवीत असू. सुताचा धागा त्या चंद्राला वाहून जुने घे, नवे दे, असे नमस्कार करून म्हणत असू. या चंद्रकोरेची इतकी का बरे महती? कारण ती वर्धिष्णू आहे. विकासाचा तो आरंभ आहे. कोणताही विकासाचा आरंभ मंगल आहे. श्रीशिवछत्रपतींची जी राजमुद्रा होती तीत 'प्रतिपच्चंद्ररेखेव' असे तिला म्हटले आहे. शिवाजी महाराजांची ही राजमुद्रा शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे वर्धिष्णू आहे असे त्या श्लोकात आहे.

आकाशातील चंद्र म्हणजे सृष्टीचे महाकाव्य आहे. परंतु वसंता, मध्ये मी कोकणात गेलो होतो. तेथे मला एक विचित्र अनुभव आला. माझ्या मनाला त्यामुळे मोठा धक्का बसला. मी माझ्या लहानपणच्या एका मित्राला मोठ्या प्रेमाने भेटावयास गेलो होतो. त्याचा एक सात-आठ वर्षांचा मुलगा होता. मोठा तरतरीत होता तो मुलगा. त्याचे डोळे तेजस्वी होते. माझा मित्र आपल्या मुलाला म्हणाला, "बाळ हे पाहुणे आले आहेत; त्यांना चित्र काढून दाखव."

त्या मुलाच्या बोटात उपजतच जणू चित्रकला होती. काही तरी पाटीवर काढावे असा त्याला नाद होता. तो बाळ हातात पाटी घेऊन

गेला व थोड्या वेळाने तो परत आला. त्या पाटीवर त्याने चंद्र-सूर्य, फुले वगैरेंची चित्रे काढली होती. माझ्या मित्राने ती पाटी हातात घेतली. परंतु त्या पाटीवर चंद्र काढलेला पाहून तो रागावला. "अरे, हा मुसलमानांचा चंद्र कशाला काढलास? पुसून टाक तो" असे संतापून म्हणाला. तो लहान मुलगा पाहातच राहिला. मी तर चकितच झालो. मुसलमानांचे अर्धचंद्राचे निशाण आहे. म्हणून का हिंदू मुलाने पाटीवर चंद्रही काढू नये? त्या मुलाच्या मनावर केवढा हा आघात! मी त्या माझ्या मित्राला म्हटले, "अरे, चंद्र सर्व विश्वाचा आहे. आपल्या बायका सकाळी सडा घातल्यावर जी रांगोळी काढतात तीत चंद्र-सूर्य काढतात. चंद्र-सूर्य आकाशात नसून माझ्या अंगणात आहेत इतके माझे अंगण भाग्यवान व पवित्र, असे जणू त्या दाखवतात. स्वर्ग दूर नसून माझ्या दारी आहे असा जणू त्यात भाव असतो. अरे, लहानपणी आईच्या कडेवर बसून 'चांदोबा, चांदोबा भागलास का?' हे गाणे आपण शिकलो व म्हटले. संकष्टी चतुर्थीला चंद्राचा केवढा महिमा. आपण चांद्रायण व्रतही करतो. चंद्र का फक्त मुसलमानांचा? का रे एवढा मुसलमानांचा द्वेष? इतका द्वेष करून काय मिळणार आहे?

वसंता, संघटनेच्या नावाने इतका अपरंपार द्वेष आम्ही पसरवीत आहोत. मला अत्यंत वाईट वाटले. ही का संस्कृती? ही का माणुसकी? हा का धर्म!— असे मनात आले. मागे एकदा जळगाव शहरात खादी-संबंधी एका गृहस्थांजवळ बोलताना ते गृहस्थ म्हणाले, "आम्ही खादी नाहीच वापरणार. कारण खादीमुळे मुसलमानासही धंदा मिळतो! मुसलमान बायका, मुसलमान पिंजारी वगैरेस काम मिळते. आम्हांला नको खादी." आपल्याजवळच्या मुसलमान आया-बहिणींस दोन घास मिळतात म्हणून आर्यसंस्कृतीच्या या उपासकांचे पोट दुखू लागले. हीच जर आर्य-संस्कृती असेल तर मग आग लागो तिला. ज्याला ज्याला काम देता येईल, त्याला आम्ही देतो. खादीमध्ये हिंदू-मुसलमान सर्वांना काम मिळते. खादी हिंदुमुसलमानांची छकले जोडीत आहे. काही गरीब मुसलमानांची फार दैना असते. त्यांच्यात पडदा आहे. घरात दारिद्र्य असले तरी रूढीमुळे त्यांना बाहेर पडता येत नाही. घरात

उपास पडतात. मागे भुसावळजवळ वरणगाव नावाच्या खेडेगावात असे करुण अनुभव आले. तेथे माझ्या काही मित्रांनी मजुरीने सूत काढून घेण्याचे काम सुरू केले. मुसलमान आयाबायांस ते कळले. त्यांनी आपल्या मुलींना सूत कातणे शिकवण्यासाठी त्या मित्राकडे पाठविले. आठ आठ तास न कंटाळता त्या मुली शिकत बसत.

"तुम्ही कंटाळत नाही का?" माझ्या मित्राने त्या मुलींना विचारले.

"कंटाळून काय करू? आम्हांला लौकर शिकू दे. मग आमच्या आयांना आम्ही शिकवू. आम्हांला दोन पैसे मिळतील. पोटाला मिळेल." त्या मुली म्हणाल्या.

"सध्या तर तुमचे सणाचे दिवस ना?"

"काय का सण? घरमे खानेकू तो नही!"

वरणगावचे माझे एक थोर मित्र बनाभाऊ. मुसलमान मायबहिणींनी त्यांना भाऊ मानले. मुसलमानांत पडदा होता तरी बनाभाऊस तो नडत नसे. ते खुशाल त्यांच्या घरी जात. हा आपला अन्नदाता आहे असे त्यांना वाटे.

पारोळे येथे नेहमी हिंदुमुसलमानांचे दंगे. परंतु खादीने तेथे मांगल्य निर्मिले आहे. मुसलमान मायबहिणींस दोन घास मिळतात. त्या आपल्या भांडखोर नवऱ्यास म्हणतात, "हुज्जत कशाला घालता? पोटाला खायला द्यायला हे काँग्रेसवालेच आले. दुसरे कोण आले?" एरंडोल येथील कागदाचा धंदा पुन्हा वाढला. काँग्रेसच्या मदतीमुळे अधिक कागद होऊ लागला. अधिक खपू लागला. सात आठ हजारांचा कागद मागील वर्षी झाला! त्या मुसलमानांतले किती तरी काँग्रेसचे सभासद झाले. त्यांना काँग्रेसविषयी आपलेपणा वाटला. सेवा हृदयांना जोडते. काँग्रेस हिंदी जनतेची शकले विधायक सेवेने जोडीत आहे. पूज्य विनोबाजी सांगत असतात की, "सुताचा धागा सर्व दरिद्र-नारायणांशी आपल्याला जोडीत आहे, असे सूत कातताना वाटते."

ते खरे आहे. परंतु खादी सर्वांना जोडीत आहे म्हणूनच ती काहींना नको आहे. जळगावच्या त्या मित्राचा तो मुस्लिम-द्वेष पाहून मी गारच झालों! जणू गिरणीमध्ये सारे हिंदूच कामगार आहेत. आगगाडीचे व मोटरीचे सारे ड्रायव्हर जणू हिंदूच आहेत! मुसलमानांचा ज्या ज्या धंद्यांशी संबंध असेल त्या धंद्याशी का तुम्ही संबंध तोडला आहे? फोडणीला लागणारा हिंग तर काबूलहून येतो. सोडलात का तो? काही तरी चावटपणाने बोलावयाचे झाले. मागे नाशिकचे काही हिंदू-महासभेचे तरुण 'गांधी टोपी जाळा' वगैरे गांधी जयंतीस ओरडले. अरे इंग्रज सरकारने तेच म्हटले. इंग्रजात व तुमच्यात फरक काय? गांधी टोपी जाळा म्हणण्यात ज्या गरिबांना खादीने घास मिळतो त्यांच्या संसारास आग लावा असेच जणू तुम्ही म्हणत असता.

वसंता, आपल्या पूर्वजांची अशी द्वेषी दृष्टी नव्हती. मुसलमान शेजारी आहेत. त्यांना उपाशी ठेवायचे? हे मुसलमान कधी कधी फार गरीब असत. कारण मुळांत गरीब व उपेक्षित असे हिंदू-धर्मातीलच ते होते! हिंदुधर्मातील उपेक्षा व मानहानी पाहून ते परधर्मात गेले होते. त्यांना नसे शेतीभाती, नसे धंदा. आपण काही धंदे मुद्दाम दिले. ते जगावेत हा हेतू. अपल्याकडे लग्नमुंज वगैरे समारंभ असला तर चौघड्याबरोबर मुसलमानांचा ताशाही आपण बोलावीत असू. परंतु आज मुसलमानांवर बहिष्कार घालण्यात येतो. केवळ मुसलमान म्हणून हा बहिष्कार असतो! आपण आपल्या ओळखीच्या, आपल्या जातीच्या दुकानदाराकडे सहजपणेच जातो. त्यात दोष नाही. पण जेव्हा जाणूनबुजून द्वेषाच्या पायावर आपण या गोष्टी उभारू लागतो, तेव्हा ते वाईट असते. आपल्या बायकांच्या हातात काही मुसलमानही बांगड्या भरण्याचा धंदा करतात. हिंदु स्त्रियांच्या हातात लांड्यांनी काय म्हणून बांगड्या भराव्या? जणू एखादा हिंदू तरुण नव्याने हिंदू स्त्रियांच्या हातात बांगड्या भरू लागला तर त्याचे मन अगदी पवित्रच राहील! उलट ज्याला वंशपरंपरा सवय झाली त्याच्या मनातही काही येत नाही! पुरुष हिंदू असो, मुसलमान असो, मने दोघांचीही विकार-

क्षम आहेत. फार तर आपण असे म्हणू या की बायकांनीच बायकांच्या हातांत बांगड्या भराव्या. त्यांत काही अर्थ आहे.

असे हे द्वेष फैलावले जात आहेत. मुसलमान तेवढा वाईट, असे लहान मुलांना शिकवण्यात येत आहे. द्वेषाच्या व धर्माच्या नावावर संघटना करण्यात येत आहेत. परंतु अशा संकुचित धर्माच्या नावाने केलेली संघटना टिकणार नाही. एकाच धर्माचे लोकही आपसात लढतांना प्राचीन काळापासून दिसत आहेत. जपान व चीन यांचा धर्म एकच. दोघांचा बुद्धधर्म आहे. परंतु दोघांचे सारखे रणकंदन चालले आहे. युरोपखंडातील सर्वांचा एकच धर्म होता. एकच धर्म आहे. परंतु युरोपातील राष्ट्रे सारख्या लढाया करीत आहेत. औरंगजेब मुसलमान होता, परंतु गोवळकोंडा व विजापूर येथील राज्ये त्याने नष्ट केलीच! मराठे इतर प्रांतांतील हिंदूंवर स्वाऱ्या करीतच होते. मराठ्यांना हिंदुसाम्राज्य निर्मावयाचे नव्हते, त्यांना मराटा साम्राज्य निर्मावयाचे होते! नानासाहेब पेशवे म्हैसूरकडचा सुपीक व समृद्ध प्रदेश पाहून पत्रात लिहितात, "दक्षिणेकडची ही सपत्ती महाराष्ट्रात नेली पाहिजे, पुण्यास नेली पाहिजे." ब्रिटिश साम्राज्यवाले हिंदी संपत्ती लंडनला नेतात. फरक तो काय? मराठ्यांचा रजपूत, जाट, शीख वगैरेंशी कोठे सहकार होता? पानिपतच्या लढाईच्या वेळेस रजपूत, जाट, वगैरे अलगच राहिले. कारण हा मराठ्यांचा साम्राज्यवाद आहे हे ह्यांना कळू लागले. मराठे जातील तेथे आपले सरदार-सुभेदार नेमतील हे जगजाहीर झाले होते!

ज्यांची सुखदुःखे एक त्यांची संघटना होत असते. भगवद्गीतेने स्वकीय व परकीय असे दोन भेद नाही सांगितले. कौरव व पांडव एकाच कुलातील होते. एकाच धर्मांचे होते. परंतु ते लढाईला उभे राहिले. कारण काय? दिसायला त्यांचा एक धर्म असला, तरी प्रत्यक्ष व्यवहार-धर्म दोघांचा निराळा होता. एक पक्ष असत्याचा पुजारी होता. दुसरा पक्ष सत्याला घेऊन उभा होता. चांगल्याची वाईटाविरुद्ध संघटना हे आपण समजू शकतो. मग जे जे चांगले असतील ते चांगल्या

बाजूस उभे राहतील. चांगले हिंदू, चांगले मुसलमान, चांगले शीख, चांगले पारशी, चांगले ख्रिश्चन. होऊ दे सत्पक्ष घेणाऱ्याची संघटना. परंतु जातीय संघटनेला काय अर्थ ?

गीतेच्या सोळाव्या अध्यायात जगात दोनच पक्ष आहेत असे सांगितले आहे. एक दैवी वृत्तीचा पक्ष व एक आसुरी वृत्तीचा पक्ष. "मीच काय तो चांगला. मी फक्त श्रेष्ठ कुळातला. मीच संपत्तिमान व बुद्धिमान. मला हे घेऊ दे, ते जिंकू दे." असे सदैव म्हणणाऱ्यास गीतेने आसुरी म्हटले आहे. याच्या जे उलट ते दैवी. आसुरी वृत्तीच्या लोकांशी दैवी वृत्तीच्या माणसांचा सदैव झगडा चालला आहे. तुम्ही हिंदू संघटनवाले का मुस्लिम संघटनवाले असा प्रश्न न करता तुम्ही सत्पक्षाची संघटना करणारे की असत् पक्षातले, असा प्रश्न विचारला पाहिजे.

आज जगात असेच हे दोन पक्ष आहेत. तरुणांनी आपली संघटना शास्त्रीय पायावर केली पाहिजे. भ्रामक कल्पनांच्या नादी त्यांनी लागू नये. आज कदाचित् धर्माच्या नावाने लोक भुलतील, भाळतील. परंतु उद्या वस्तुस्थिती दिसू लागताच या संघटना मोडतील. मुसलमानांचे अन्याय काही रोज उठून प्रत्येक खेड्यात घडत नाहीत. परंतु सावकारांचे व जमीनदारांचे अन्याय तर दररोज वर्षानुवर्षे होत आहेत. ते सावकार गरिबांच्या घरांतील भांडी काढतात. लग्नाची पैठणी, तीही काढून तिचा लिलाव करतात. सावकारांनी शेतकऱ्यांची विटंबना चालविली आहे. बेअब्रू चालविली आहे. ही बेअब्रू हिंदू संघटनवाले थांबविणार आहेत का ? माझ्या दाराशी हिंदू सावकारांची जप्ती येते. पठाणही येऊन बसतो. दोघे सावकारच. जात एकच. गरिबांना पिळण्याची. शेतकऱ्यांच्या ध्यानात ही गोष्ट येईल. नुसते हिंदू-हिंदू ओरडण्यात काय अर्थ ? श्रीमंत हिंदू गरीब हिंदूंचे रोज रक्तशोषण करीत आहेत त्याचे काय ? माझी गीता या दोघांना एका धर्माची म्हणणार नाही. रक्त-शोषण करणाऱ्याला ती आसुरी म्हणेल. आणि सावकाराविरुद्ध शेतकरी झगडायला उभा राहील तर त्या शेतकऱ्याला ती दैवी म्हणेल. राक्षसी व

दैवी या पूर्वीच्या दोन नावांनाच आज आपण भांडवलवाले व श्रमणारे अशी नावे देऊ या. नावे बदलली तरी अर्थ एकच आहे.

किती तरी कारखान्यांचे मालक हिंदू असतात. ते का हिंदू मजुराला अधिक मजुरी देतील? उद्या मुसलमान कमी मजुरीवर मिळाला तर ते त्याला आधी कामाला ठेवतील. आमच्या अमळनेरच्या कामगारांत मिलच्या चालकांनी खानदेशी कामगार व खानदेशाच्या बाहेरचे कामगार अशी फूट पाडण्याचे प्रयत्न केले. इंग्रज आमच्यात फुटी पाडून राज्य चालवितो. भांडवलवाले कामगारांत फुटी पाडून स्वतःची लूट चालवितील. या गिरण्यांतून किती विटंबना असते ! स्त्री–कामगारांची तेथे किती करुण दशा असते! परंतु कोणा हिंदू संघटनवाल्याचे तेथे लक्ष जाईल का? निदान तुझ्या हिंदू कामगारांना तरी अधिक मजुरी दे, हिंदू कामगारांसाठी तरी नीट चाळी बांधून दे, असे हिंदुमहासभावाले एखाद्या श्रीमंत हिंदू कारखानदारास सांगतील का? आणि तो कारखानदार ते ऐकेल का?

काँग्रेसने कर्जनिवारणबिल आणले तर सारे हिंदुमुसलमान सावकार एकत्र जमून त्यांनी आरडाओरडा केला. कूळकायदा येताच सारे जमीनदार जातगोत न पाहता उठले. खोतीविरुद्ध काँग्रेसचे मत दिसताच सारे खोत एकत्र झाले. संघटना हिंदुमुसलमानांच्या वरवरच्या आहेत. खरी संघटना आर्थिक हितसंबंध एक असणाऱ्यांचीच होत असते. कोकणात हिंदू खोत आहेत, मुसलमान खोत आहेत. हिंदू खोत व मुसलमान खोत का अलग राहिले? हिंदुमहासभेचे काम करणारे खोत, खोतमंडळातही सेक्रेटरी होतात. आणि त्या खोतमंडळात मुसलमानही असतात. खोत तेवढे सारे एक होतात व कुळांना चिरडतात. कुळेही मग सारी एक होतील.

शहरातील कामगारांना ही गोष्ट पटकन पटते. दुनियेत गरीब व श्रीमंत, छळणारे व छळले जाणारे, पिळणारे व पिळले जाणारे हेच काय ते खरे भेद आहेत हे त्यांना पटकन समजते. मालक हिंदू असो, ज्यू असो, मुसलमान असो. सर्वत्र कामगार भरडलेच जात असतात.

कारण सर्व मिलवाल्यांचे आर्थिक हितसंबंध एक असतात. कानपूरला हिंदुमुसलमान कामगारांत कधी फारसे भांडण होत नाही. ते एकत्र राहतात. उलट कानपुरात होणारे हिंदुमुसलमानांचे दंगे मिटवण्यासाठी तेथले कामगार खटपट करतात. तेथे हिंदुमुसलमानांची भांडणे पुष्कळ वेळा सरकारी हस्तकही लावीत असतात. हिंदू कामगार वा मुसलमान कामगार दोघे कारखान्यांतून मरत आहेत. हे कामगार ओळखतो.

बारिसाल म्हणून बंगालमध्ये प्रसिद्ध जिल्हा आहे. एकदा त्या जिल्ह्यांतील हिंदुमुसलमान शेतकरी हजारोंच्या संख्येने तगाई मागण्यासाठी सरकारकडे निघाले. वाटेत मुस्लिम लीगचे लोक आले. ते मुसलमानांस म्हणाले, "हिंदूंबरोबर तुम्ही का जाता?" हिंदुमहासभेचे लोक आले व हिंदूंस म्हणाले, "त्या मुसलमानांबरोबर तुम्ही का जाता?" परंतु ते हिंदुमुसलमान शेतकरी म्हणाले, "आम्ही हिंदू नाही, आम्ही मुसलमान नाही. आम्ही श्रमजीवी आहोत. आणि हिंदू असो, मुसलमान असो; जमीनदार आम्हांला पिळून काढीत आहेत. जा तुम्ही." धर्माच्या नावाने काही दिवस जनता भुलेल, परंतु ती एक दिवस शहाणी झाल्याशिवाय राहणार नाही.

आणि गुंड म्हणजे मुसलमानच असतात असे नाही. छळणारे सारे गुंडच. हिंसा नाना प्रकारे जगात चालू आहे. कोणी तरवारीने मान कापतो, कोणी लेखणीने कापतो. कोणी एकदम गोळी घालतो, कोणी तीळतीळ मारतो. आपणास प्रत्यक्ष सोट्याची, प्रत्यक्ष सुऱ्या-खंजिरांची हिंसा दिसते. परंतु ती हिंसा इतर अप्रत्यक्ष हिंसेच्या मानाने अल्प आहे. कोट्यवधी कुटुंबांत सुख नाही, अन्न नाही, वस्त्र नाही, औषध नाही, ज्ञान नाही, अंथरूण नाही, पांघरूण नाही, घरदार नाही. हे विराट दुःख का मुसलमान गुंडांनी निर्माण केले आहे? श्रमणाऱ्या जनतेची जगभर चालणारी विटंबना कोणी केली, कोणी चालविली? वसंता.....तू ही जगभर चालणारी विटंबना पहा. हिंदुस्थानातील गरिबांची विटंबना जगतात सर्वत्र चाललेल्या गरिबांच्या विटंबनेशी जोडलेली आहे, हे ध्यानात धर.

एखादा आडदांड मनुष्य रस्त्यात जर जाणारा–येणारांस कोपरखळी मारू लागला तर आपण त्याला गुंड म्हणतो. त्याला कदाचित तुरुंगातही पाठवू. मग पैशाच्या नावावर, पैशाच्या आधारावर गरिबांना जे छळतात, त्यांना का तुरुंगात पाठवू नये ? शारीरिक शक्तीचा दुरुपयोग करणारा ज्याप्रमाणे गुंड व पुंड ठरतो, त्याप्रमाणे आर्थिक सत्तेचा दुरुपयोग करणाराही गुंड व पुंड समजला गेला पाहिजे. परंतु ही आर्थिक पुंडगिरी अद्याप जगाला, भोळ्या जनतेला कळायची आहे.

हिंदुस्थानात जे काही मुसलमानांचे अत्याचार होत असतील, त्यापेक्षा हे सत्ता व मत्तावाल्यांचे अत्याचार सहस्रपटीने सर्वत्र होत आहेत. काँग्रेस हळूहळू का होईना, या अत्याचारांस आळा घालण्यासाठी झटत आहे. आणि म्हणूनच तिच्यावर सर्वश्रेष्ठांचा व वरिष्ठांचा राग आहे. मुस्लिम लीगचा व हिंदुमहासभावाल्यांचा दोघांचा राग काँग्रेसवर आहे. कारण ती हळूहळू परंतु निश्चितपणे सर्व गरिबांची बाजू घेऊन उठणार आहे. मग छत्रीचे नबाब व हिंदू नबाब दोघे तिच्याविरुद्ध ओरडणार नाहीत तरच अश्चर्य. हिंदू रावराजे व मुस्लिम नबाबजादे सारे गरिबांची बाजू घेणाऱ्या काँग्रेसवर उठतील.

पण हिंदुमहासभा किंवा मुस्लिम लीग यांचे पुढारी मी सोडूनच देतो. जातीयवादाचा फायदा घेऊन स्वतःचा वर्गीय स्वार्थ साधण्याकरताच ते सिद्ध झाले आहेत. पण आमच्या राष्ट्रवाद्यांतही– काँग्रेसवाल्यांनाही– या प्रश्नाचे खरे स्वरूप समजले नाही. पाया सोडून वरच्या रंगीत इमारतीकडे पाहून ते आपली अनुमाने बांधीत आहेत असे वाटते. हिंदू-मुसलमानांची एकी ही सांस्कृतिक दृष्ट्या भिन्न असलेल्या जमातीची एकी आहे. केवळ दोन जमातींमधील साम्यविरोधांची तराजू जोखून हा प्रश्न सुटणार नाही. ह्या दोन जमातींची एकी व्हायची असेल तर जातीयवादाचा फायदा घेऊन वर्गहित साधणाऱ्या पुढाऱ्यांचे स्थान समाजातून नष्ट झाले पाहिजे. ते स्थान समाजवादी क्रांतीशिवाय नष्ट होणे शक्य नाही. एकजिनसी संस्कृती निर्माण व्हावयाची असेल तर एकजिनसी समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे. जळगावच्या शेतकरी परिषदेला हजारो

मुसलमान शेतकरी आले होते. हिंदू शेतकऱ्यांबरोबर असलेले त्यांचे आर्थिक एकजिनसी नाते त्यांना कळले, पण कॉंग्रेसचा राष्ट्रवाद त्यांना कळत नाही. ह्याचा अर्थ मुसलमान शेतकरी जातीयवादी आहेत असा का तू करणार? पण कॉंग्रेसचा राष्ट्रवाद म्हणजे आपल्या आर्थिक झगड्याचे तत्त्वज्ञान आहे हे त्यांना कळत नाही, आणि नाहीही कळणार कदाचित. कारण कॉंग्रेसही बहुजनसमाजाच्या आर्थिक प्रश्नाकडे इतक्या आत्मीयतेने अद्याप कोठे पहात आहे?

परंतु अधिक पुढील पत्री. सर्वांस सप्रेम प्रणाम व आशीर्वाद.

तुझा
**श्याम**

पत्र दहावे

# दीनदलितांचा कैवार हाच खरा धर्म !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

आज खूपच थंडी आहे. बाहेरच्या गुलाबावरच्या कळ्या नीट फुलल्या नाहीत. सूर्याची ऊब मिळेल तेव्हा त्या फुलतील. प्रेमाची ऊब सर्वांना हवी. सूर्याचे प्रसन्न व प्रेमळ असे हात लागताच या कळ्या खुदकन हसतील. वसंता, आज पहाटे एक मांजर थंडीत कुडकुडत होते. ते माझ्या दाराजवळ येऊन केविलवाणे ओरडत होते. मी दार उघडले व ते आत आले. ते माझ्या पांघरुणात शिरले. मी त्याला जवळ घेतले. ते घुरघुर करीत मला बिलगले. प्रेमाने अनोळखी पशुपक्षीही माणसाळतात. मग माणसे नाही का माणसाळणार?

परंतु आम्हांला द्वेषाचेच डोहाळे होत आहेत. आणि आश्चर्य हे की धर्माच्या नावाने हे द्वेष माजवले जात आहेत. संस्कृतीचे संवर्धन का द्वेषाने करायचे? धर्माच्या नावाने आतापर्यंत जेवढी हिंसा जगात झाली असेल तेवढी दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी झाली नाही ! आम्ही पुन्हा आज तेच करीत आहोत. परंतु धर्माच्या लंब्याचौड्या गप्पा मारणारे हे लोक गरिबांची पिळवणूक दूर करण्याच्या बाबतीत मात्र मुके असतात.

वसंता, काही महिन्यांपूर्वी मुंबई कौन्सिलमधील रिकाम्या झालेल्या काही जागांची निवडणूक होती. कॉंग्रेसने आपले उमेदवार उभे केले होते. परंतु कॉंग्रेसच्या उमेदवारास प्रतिस्पर्धी म्हणून जे उमेदवार हिंदुमहासभावाले, वर्णाश्रमवाले, लोकशाहीवाले वगैरेंनी मिळून उभे

केले होते, त्यांची भूमिका काय होती ? काँग्रेसने कूळकायदा केला म्हणून जे लोक रागावले होते त्यांच्या वतीने ते उमेदवार होते. कूळकायद्यात वास्तविक काही विशेष नव्हते. तो एक साधा कायदा होता. जमीनदारांच्या जमिनी काढून कुळांना देण्यात आल्या नव्हत्या. परंतु कूळकायद्याचा पहिला खर्डा प्रसिद्ध होताच, "आता जमिनदारांना फाशी द्या !" अशी ओरड होऊ लागली. अरे, फाशी कुणाला दिले आहे ? कुळांनी जर वेळच्या वेळी खंड दिला, जमिनीची नासधूस केली नाही तर त्यांना काढून टाकू नये अशा अर्थाचे ते साधे बिल होते. परंतु आमचे खोत व जमीनदार रागावले. आणि या रागावलेल्यांची बाजू केसरी वगैरे पत्रांनी घेतली ! कर्नाटकातील श्री. बेळवी हे स्वतःला लोकमान्यांचे अनुयायी म्हणवितात. परंतु लोकमान्य तर तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून उपहासिले जात. लोकमान्यांना अटक झाली तेव्हा मुंबईच्या कामगारांनी दंगे केले. बेळवी जर स्वतःला लोकमान्यांचे अनुयायी समजत असतील तर गरिबांची बाजू त्यांनी घेतली असती. परंतु ते म्हणाले, "काँग्रेस कूळकायदा करते. तिला विरोध केलाच पाहिजे." आणि अशा या बेळवी वगैरे असंतुष्टांस कोणी पाठिंबा दिला ? हिंदुमहासभावाले, वर्णाश्रमवाले, केसरी वगैरे पत्रे—सर्वांनी.

या कौन्सिलच्या निवडणुकीत काँग्रेसचे काही उमेदवार पडले. कारण या निवडणुकीचे मतदार जरा मोठे जमीनदार असतात. जमीनदार रागावले होते. केसरीने लिहिले, "काँग्रेसचे उमेदवार पडले. याचा काँग्रेसने धडा घ्यावा." धडा कोणता घ्यायचा बाबा ? धडा काँग्रेसने हा घेतला की श्रमणाऱ्यांची बाजू जसजशी काँग्रेस घेईल, तसतशी भांडवलवाल्यांची काँग्रेसभक्ती नाहीशी होईल. पू. विनोबाजींना जळगावला एका कम्युनिस्टाने एक प्रश्न विचारला की, "काँग्रेस ही भांडवलवाल्यांची नाही का ?" विनोबाजींनी शांतपणे उत्तर दिले, "स्वातंत्र्याचा खरा लढा अद्याप सुरू झाला नाही. तो लढा सुरू झाल्यावर हे काँग्रेसवाले खड्यासारखे वेगळे पडतील. आणि तरीही जे राहतील ते मग भांडवलवाले म्हणून राहणार नाहीत." स्वातंत्र्याचा खरा अर्थ म्हणजे सर्व दरिद्र-

नारायणाचा संसार सुखाचा करणे. हे कार्य जसजसे जोराने होऊ लागेल तसतसे श्रीमंतांचे व वरिष्ठ वर्गाचे काँग्रेस-प्रेम कमी कमी होऊ लागेल.

लोकनायक अणे त्यांच्या षष्ठ्यब्दपूर्ती समारंभाच्या वेळेस म्हणाले, "काँग्रेसने समाजवाद सोडून द्यावा." अद्याप समाजवाद काँग्रेसमध्ये आला आहे तरी कोठे? परंतु इतक्यातच यांना भीती वाटत आहे. अण्यांसारख्यांसही जर ही भीती वाटते तर मग इतरांची कथा काय? केसरी पत्राने एकदा लिहिले होते, "सावकार, जमीनदार, इनामदार, कारखानदार यांच्या दुःखास वाचा फोडण्यासाठी हे पत्र आहे!" मला नक्की शब्द आठवत नाहीत. परंतु अशा अर्थाचे लिहिले होते. यावरून केसरी पत्र कोणाची बाजू मांडणारे आहे हे तुझ्या ध्यानात येईल. आणि हिंदुमहासभेचा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा उदो उदो करणारे हे पत्र गरिबांच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारील तेही दिसत आहे.

धर्माच्या नावाने ओरडून ओरडून या संघटकांना वरिष्ठांचे वर्चस्व राखायचे आहे व गरिबांची पिळवणूक कायम करायची आहे. कल्याणच्या पुढचे नेरळ स्टेशन तुला माहीत असेल. त्या बाजूस कोणी एक मुसलमान आहे. तो पैसेवाला आहे. तरीचा मक्ता नेहमी आपला त्यालाच मिळतो! जंगलातील कूप तोच विकत घेतो!! हा मुसलमान गोरगरीबांना फार छळतो. आसपासच्या चाळीस पन्नास गावच्या लोकांस त्याचा त्रास. तो वेळेवर तरच सोडणार नाही. शेतकरी गरीब असतात. त्यांच्याजवळून अधिकच पैसे मागतो. नाही तर तरच सोडीत नाही म्हणतो. मग तो शेतकऱ्यास म्हणतो, "पैसे तुमच्याजवळ नाहीत. परंतु जंगलात मोफत चार दिवस लाकडे तोडायला याल?" अडलेले शेतकरी कबूल करतात. मग ती तर सुटते. शेतकरी वेठीला धरल्याप्रमाणे जंगलात जाऊन त्याची झाडे तोडतात. लाकडे तोडतात. अशा गोष्टी तिकडे कानांवर येतात.

या छळवाद्या मुसलमानास तरीचा मक्ता मिळू नये म्हणून काँग्रेसने दुसरा एक मनुष्य उभा करायचे ठरविले. केवळ मुसलमानविरोध हे

काँग्रेसचे ब्रीद नव्हे. परंतु तो मुसलमान पिळवणूक करतो म्हणून काँग्रेसने दुसऱ्यास उभे केले. परंतु वसंता, काय तुला सांगू? हिंदुमहासभेच्या वरिष्ठांनी, खोतांनी व श्रीमंतांनी त्या मुसलमानासच मक्ता मिळावा म्हणून खटपट केली. श्रीमंत श्रीमंतास मिळाले. ते हिंदू असोत वा मुसलमान असोत. गरिबांची दैना तशीच चालू राहिली.

पंडित जवाहरलाल पुण्याच्या प्रचंड सभेत म्हणाले, " हिंदू संस्थानिकही मुस्लिम लीगला पैशाची मदत करीत असतात. " याचा अर्थ काय? याचा अर्थ एकच की मुस्लिम लीग काय, हिंदुमहासभा काय, या श्रीमंतांच्या इनामदारांच्या बाजू घेणाऱ्या संस्था आहेत. त्या धर्माच्या नावाने अलग दिसल्या तरी आर्थिक बाबतीत आजची गरिबांची पिळवणूक कायम ठेवणे हेच त्यांचे ध्येय आहे.

मागे एकदा स्वातंत्र्यवीर सावरकर बोलले होते म्हणे की " जपानशी हिंदुस्थानने वाकडे धोरण धरू नये. जपान बलवान राष्ट्र आहे. जपानला दुखवू नये. " चीनचा गळा दाबणाऱ्या साम्राज्यवादी जपानशी हे हिंदु-महासभावाले प्रेमाचा संबंध राखू इच्छितात. आज जगात साम्रज्यवाद व समाजवाद हे दोनच प्रमुख वाद आहेत. हिंदुमहासभा साम्राज्यवादी आहे. त्यांना साम्राज्याचीज स्वप्ने पडत असतात. परंतु साम्राज्य शब्द काँग्रेसला सहन होत नाही.

काँग्रेसने चीनला सहानुभूती दाखविली. चीनमध्ये जखमी शिपायांची शुश्रूषा करावयास डॉक्टर पाठविले. काँग्रेसने स्पेनला गलबतभर धान्य पाठविले. काँग्रेसने अबिसीनिया, पॅलेस्टाइन यांना सहानुभूती दाखविली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बौद्धिक वर्गातून सांगण्यात येत असते की " काँग्रेसची बाहेर दृष्टी. ती चीनला मदत पाठवील, स्पेनला पाठवील, तुर्कस्तानला पाठवील. परंतु सक्करच्या हिंदूंना मदत पाठवणार नाही. " काँग्रेसने सक्करच्या हिंदूंनाही मदत पाठविली. हिंदुमहासभावाल्यांनी पाठविली त्याहून अधिक पाठविली. साठ सत्तर हजार रुपयांची मदत तेथे काँग्रेसने पाठविली. सिंधमध्ये हिंदूचे खून होत आहेत याचा काँग्रेसला काही आनंद नाही. काँग्रेस रडत आहे. महात्माजींनी सिंधमधील

काँग्रेस कमिटीस लिहिले, " हे अत्याचार थांबवण्यासाठी मरा, नाही तर काँग्रेस खतम् करा." सिंधमधील त्या आगीत उडी घ्यायला काँग्रेसचे राष्ट्राध्यक्षच शेवटी गेले! महात्माजींच्या आश्रमातील मुस्लिम भगिनी तेथे गेल्या. हिंदुमहासभेचे कोण तेथे गेले होते? राष्ट्राध्यक्षांनी शक्य ते सर्व तेथे जाऊन केले. केसरी पत्राने लिहिले, " काँग्रेसला हे पूर्वीच करता आले असते!" परंतु बाबा, काँग्रेस तर मुसलमानधर्जिणी ना? तुम्ही तर हिंदूंच्या हितासाठी सवता सुभा उभारलात ना? तुम्ही का तेथे जाऊन दिवे लावले नाहीत?

काँग्रेस काय करायचे, केव्हा करायचे ते जाणते. सक्करमध्ये हिंदू बंधूंचे खून होतात. आमची ही कसोटी आहे. ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकर अलग राहण्यासाठी काँग्रेसची परीक्षा घेतात, त्याप्रमाणे मुस्लिम-हिंदी जग अलग करण्यासाठी धर्मांध मुसलमानांचे ते प्रयत्न असतील. परंतु अशाच वेळी श्रद्धेची सत्त्वपरीक्षा असते. सामान्य परिस्थितीत कोणीही श्रद्धा राखतो. असामान्य व गंभीर परिस्थितीतही जो आपली मांगल्यावरची श्रद्धा ढळू देत नाही, तोच खरा धर्मात्मा व पुण्यात्मा!

शेतकरी घरातले मढे झाकून ठेवतो, दुःख गिळतो व शेतात पेरणी करायला जातो. त्या दुःखाने तो वेडा होईल तर घरातील मुलेबाळे उद्या काय खातील? त्याप्रपाणे सिंधमध्ये किंवा इतरत्र होणारे अत्याचारही दुःखाने पोटात गिळून स्वातंत्र्याची पेरणी करून, उद्याचा सर्व भारतीय संसार हिरवाहिरवा दिसावा म्हणून काँग्रेस अहोरात्र झटत आहे. तिची अवहेलना नका करू. तिच्या महान ध्येयनिष्ठेचे कौतुक करा. समर्थांनी म्हटले आहे, 'अधीर माणसे खोटी'. चुटकीसरसे सर्व प्रश्न सुटणार नाहीत. त्यांनी पाकिस्तान म्हणताच आम्ही हिंदूंचे हिंदुस्थान, हिंदूंचे राज्य असे म्हणणे याने प्रश्न सुटत नाही. यामुळे द्वेषाचे वणवे अधिकच पेटतात. ज्याचे तेच ध्येय असेल त्यांनी तसे करावे. माझी माय माउली काँग्रेस शान्तीचे कुंभ होऊन हे वणवे विझविण्यासाठी शक्य तसे सारे करील. श्रद्धेने व विश्वासाने सर्व धर्मांचे, सर्व जातींचे, सर्व वर्गांचे कल्याण साधू पाहील. ती श्रद्धेने आपला

दिवा घेऊन जाईल. ज्याने त्याने आपल्या हृदयातील ईश्वराला स्मरून वागावे. दुसरे काय?

नागपूरचा एकदा एक बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थी माझ्याकडे आला व म्हणाला, "काँग्रेसने इतर देशांत मदत पाठविणे बरे नव्हे. येथले मरणारे लोक का काँग्रेसला दिसत नाहीत?" आपल्या शेजारचा मनुष्य जर संकटात असला तर आपण त्याला गरीब असूनही मदत नाही का देत? आपल्या चतकोरातली नितकोर भाकर त्याला नाही का देत? जग आज जवळ आले आहे. लांब लांब नाही. रेडियो, बिनतारी यंत्रे या सर्वांनी दुनिया म्हणजे एक घर झाले आहे. अशा या जगात अलग राहून चालणार नाही. चीनमध्ये चार डॉक्टर काँग्रेसने पाठविले. ते हिंदुस्थानात कितीसे पुरले असते? ते चार डॉक्टर पाठवून काँग्रेसने काय साधले? चिनी हृदय हिंदी हृदयाला जोडले! उद्या स्वतंत्र होणारा हिंदुस्थान चीनच्या बाजूचा राहील, साम्राज्यवादी जपानच्या बाजूचा राहणार नाही, हे काँग्रेसने जगाला जाहीर केले. चाळीस कोटी चिनी जनतेचे हृदय जोडण्यासाठी काँग्रेसने जे चार डॉक्टर पाठविले ते का अनाठायी गेले? ४० कोटी स्वतंत्र होणाऱ्या चिनी जनतेची सहानुभूती काँग्रेसने जोडली. तिची का किंमत नाही?

हिंदुस्थान आज जरी परतंत्र असला तरी तो लौकरच स्वतंत्र होणार यात शंका नाही. एकदा अरविंद घोष यांना कोणी तरी विचारले, "तुम्ही योगसाधना सोडून स्वातंत्र्यासाठी चला ना झगडायला." ते म्हणाले, "हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालेले मला दिसत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर काय करायचे याचा विचार मी करीत आहे." हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आता कालावधीचा प्रश्न नाही. ४० कोटी लोकांचा स्वतंत्र होणारा हिंदुस्थान उद्या जगात कोणाची बाजू घेईल? या स्वतंत्र हिंदुस्थानचे जगात कोणते धोरण राहील? परराष्ट्रीय धोरण कसे राहील? हे प्रश्न एव्हापासून महत्त्वाचे होऊ लागले आहेत. जग या प्रश्नाकडे लक्ष देत आहे. काँग्रेसच्या बैठकीतून पास होणारे ठराव दुनियेतील सर्व देशांतून प्रसिद्ध होतात. काँग्रेस लुंगीसुंगी संस्था नाही. उद्याच्या हिंदुस्थानचे

परराष्ट्रीय धोरण तीच ठरवील, तीच बनवील, हे जग ओळखते. आपल्या देशातील काही घमेंडानंदन कॉंग्रेसचा उपहास करीत असतील. परंतु अद्याप हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी लढणारी साम्राज्यविरोधी संस्था म्हणून एक कॉंग्रेसच ओळखली जाते. युरोपातील स्वित्झरलंड वगैरे चिमुकल्या देशांतील वर्तमानपत्रांतूनही कॉंग्रेसची हकीकत येत असते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल वगैरेंच्यामुळे कॉंग्रेस दुनियेला ज्ञात झाली आहे. जवाहरलाल मागे सर्वत्र दौरे करून आले. युरोपमध्ये ते गेले. इजिप्तमध्ये गेले. ते स्पेनमध्ये गेले, चीनमध्ये गेले. काही वर्षांपूर्वी ते ब्रह्मदेश, सयाम, जावा वगैरे भागांतही जाऊन आले. कॉंग्रेसची प्रतिष्ठा त्यांनी सर्वत्र वाढवली आहे. ठिकठिकाणी त्यांचा सन्मान झाला. कॉंग्रेस सर्व जगाला आज माहीत आहे.

अशा या कॉंग्रेसचे उद्याचे धोरण काय राहील ? ती साम्राज्यवाद उचलून धरणार नाही. स्पेनमध्ये शेतकरी व कामकरी यांनी निवडणुकीत बहुमत मिळविले. सनदशीर रीतीने बहुमत मिळविले. गरिबांच्या हिताचे कायदे ते करू लागले. परंतु स्पेनमधील मठवाले, सरदार, इनामदार, कारखानदार सारे एक झाले. फ्रँको या हडेलहप्प्याने त्यांची बाजू घेतली. स्पेनमध्ये शेतकऱ्या-कामकऱ्यांचे राज्य झाले तर इटलीला धोका होता. जवळच्या ज्वालाग्रही फ्रान्सला धोका होता. पलीकडे असलेल्या जर्मनीला व इंग्लंडला धोका होता. कारण ही सारी भांडवलवाली राष्ट्रे. स्पेनमधील फ्रँकोला इटली व जर्मनी यांनी मदत केली. फ्रान्समधील क्रांतिकारी, स्पेनमधील शेतकरी कामकरी वर्गास कदाचित मदत पाठवतील या भीतीने फ्रान्समधील सरकारने आपली दक्षिण सरहद्द बंद केली ! इंग्लंड नक्राश्रू ढाळीत बसले. स्पेनमधील श्रमणाऱ्या जनतेस एका रशियाची फक्त मदत होती. श्रमणाऱ्या दुनियेची बाजू घेणारा रशियाच फक्त. एका हाताने तो दूर स्पेनला व एका हाताने दूर चीनला मदत देत होता. बाकीची साम्राज्यवादी राष्ट्रे काय करीत होती ?

परंतु कॉंग्रेसने स्पेनमधील शेतकऱ्या-कामकऱ्यांस गलबतभर धान्य पाठविले. काही कपडे पाठविले. जवाहरलाल स्पेनमधील बॉंबवर्षाव

स्वतः पाहून आले होते. तेथील गरिबांचा जय व्हावा असे त्यांना वाटत होते. दुसरी मदत करता येत नव्हती. परंतु काँग्रेसने आपण कोणत्या बाजूचे आहो हे जगाला कळविले.

इजिप्त, तुर्कस्थान, वगैरे मुसलमानी राष्ट्रांस उद्याच्या स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थानचा सहकार मिळेल. कारण ही मुसलमानी राष्ट्रे साम्राज्यवादी नाहीत. आमच्यातील काही संकुचित दृष्टीच्या लोकांना वाटत असते की सारी मुस्लिम राष्ट्रे एक होतील व हिंदुस्थानवर येतील! हा त्यांचा भ्रम आहे. जे ते राष्ट्र स्वतःपुरते पाहते. केमालपाशाला हिंदुस्थानातील एक धर्मवेडा मुसलमान जाऊन म्हणाला, "तुम्ही सर्व मुस्लिम जगाचे खलीफा व्हा." केमाल हसला व म्हणाला, "जमाना बदल गया है बेटा! मला आज कोण मानील? इजिप्तमधले लोक म्हणतील, 'इजिप्त इजिप्शियन लोकांचा.' इराणातील लोक म्हणतील, 'इराण इराण्यांचा' अफगाण म्हणतील, 'अफगाणिस्थान अफगाणांचे.' खलीफा होऊन हसे करून घेण्याइतका मी वेडा नाही. मला माझ्या तुर्कस्थानचे कल्याण पाहू दे."

खेदाची गोष्ट ही की आमच्यातील काही धर्मवाल्या लोकांची दृष्टी अद्याप प्राचीन काळातच आहे. अद्याप मुसलमानांच्या स्वाऱ्यांचीच त्यांना भीती वाटत असते. अद्याप पंधराव्या, सोळाव्या, सतराव्या शतकातील राजकारणाहून पलीकडे त्यांची दृष्टी गेली नाही. हिंदुस्थानातील मुसलमान मनात काय मांडे खात असतील ते खावोत, परंतु हिंदुस्थानाबाहेरचे मुसलमान हिंदी मुसलमानांची कीवच करतात! काँग्रेसच्या अधिवेशनास इजिप्तमधील प्रतिनिधी हजर राहतात. पॅले-स्टाइनमधील अरब जवाहरलालना बोलावतात. एवढेच नव्हे तर केटा-बलुचिस्थानमधील मुस्लिमबंधू खानसाहेब व जवाहरलाल यांनाच आमंत्रणे देतात. जगातील स्वातंत्र्य-प्रेमी मुस्लिम जनता स्वातंत्र्यार्थ झगडणाऱ्या काँग्रेसची किंमत जाणते.

सर शिकंदर हयातखान पंजाबमध्ये म्हणाले, "काँग्रेस या युद्धात सहकार करीत नाही. मुस्लिम राष्ट्रांच्या दाराशी संकट आले तरी

काँग्रेस सत्याग्रहाची भाषा बोलते. मुसलमान राष्ट्रांबद्दल काँग्रेसला कोठे आहे सहानुभूती ?" शिकंदर हयातखान हिंदुस्थानात असा विषारी प्रचार करू शकतील. परंतु मुस्लिम राष्ट्रांतून जाऊन जर काँग्रेसवर ते असे आरोप करतील तर कोणते बक्षीस त्यांना मिळेल बरे ? स्वातंत्र्य-प्रेमीच स्वातंत्र्यार्थ झगडणाऱ्यांची किंमत जाणतो. स्वार्थासाठी ब्रिटिशांचे जू हिंदुस्थानवर कायम राखू पाहणाऱ्यास कोणते स्वातंत्र्य-प्रेम ?

वसंता, महात्मा गांधी सर्वांनी जगावे असे म्हणत आहेत. एकदा एका जमीनदाराने त्यांना विचारले, "जमीनदार सारे नष्ट व्हावे असे काँग्रेसचे म्हणणे आहे काय ?" महात्माजी म्हणाले, "तुम्ही सर्वांनी जगावे असे मला वाटते. जमीनदार, जहागिरदार, संस्थानिक सारे रहा. परंतु गरिबांचे विश्वस्त म्हणून रहा. तुमच्या जवळची धनदौलत गरिबाची ठेव समजा. ती त्यांच्या हितासाठी खर्चा. त्यातून स्वतःची चैन करू नका. तुम्ही जगावे असे मला वाटते. परंतु माझ्या इच्छेने काय होणार ? तुमचे जगणे व मरणे तुमच्या कृतीवर अवलंबून आहे !" अर्थपूर्ण शब्द. भांडवलवाले, संस्थानिक, जमीनदार, काँग्रेसच्या लहान सहान सुधारणांनाही जर विरोध करतील तर ते पुढे कसे जगतील ?

वसंता, स्पेनमध्ये जसे झाले तसेच या देशात एखादे वेळेस होईल. बहुजनसमाजाच्या, श्रमणाऱ्या जनतेच्या हिताचे जसजसे अधिका-अधिक कायदे काँग्रेस करू पाहील तसतसे वरिष्ठ वर्ग, मग ते हिंदू असोत वा मुस्लिम असोत वा पारशी असोत, काँग्रेसला विरोध करावयास उभे राहतील. आणि मग हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, व मुस्लिम लीगचे स्वयंसेवक एक होऊन हिंदुस्थानातील फ्रँकोचे लष्कर उभे राहील ! येथील गरीब जनतेच्या चळवळीवर ते हल्ला करतील. साम्राज्यवादी राष्ट्रे त्यांना मदत करतील. असे हे भविष्यकालीन दृश्य माझ्या डोळ्यांना दिसत आहे.

पांढरपेशा तरुणांनी विचार करावा. संस्कृतीच्या व धर्माच्या नावाने फसू नये. धर्म सर्व जनतेला सुखी करणे हा आहे. केमालपाशाने

मशिदींची क्रीडांगणे बनविली. प्रभूच्या घरी मुले खेळू लागली. रशियात चर्चेची हॉस्पिटले झाली. चर्चेची हॉस्पिटले झाल्यामुळे त्या चर्चमध्य देव नव्हता तो आला. देव म्हणजे गप्पा नव्हत. "सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयः" हे ध्यय गाठण्यासाठी क्रान्ती करणे म्हणजेच धर्म.

तरुणांसमोर हा प्रश्न आहे. त्यांना या जातीय संघातून शिरून गरिबांची पिळवणूक कायम ठेवावयाची आहे का? जर नसेल ठेवायची तर त्यांनी हे संघ सोडले पाहिजेत. संघटना कोणत्या तरी ध्येयासाठी असतात. ध्येयहीन संघटना फोल आहेत. ज्या अर्थी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदुमहासभेचा उदो उदो करतो, आणि समाजवादी लोकांना शिव्या देतो, त्या अर्थी या संघाचे ध्येय धर्माच्या नावाने पिळवणूक कायम ठेवणे हेच ठरते! आम्ही हिंदू एक होऊन समाजवाद आणू असे म्हणणे हा वदतोव्याघात आहे. हिंदूतील श्रीमंत लोक व हिंदू संस्थानिक मग मुसलमान नबाबाशी संगनमत करतील, तुम्हांला गाडू पाहतील. आर्थिक भूमिका एकदा स्वीकारली म्हणजे मग हा हिंदू व हा मुसलमान हा भेद राहात नाही. हिंदू भांडवलवाले व मुस्लिम भांडवल-वाले, हिंदू सत्तावाले व मुस्लिम सत्तावाले परस्पर भांडले तरी ते शेवटी गरिबांना चिरडण्यासाठी एक होतील!

हिंदी तरुणांसमोर हा प्रश्न आहे. डॉक्टर, वकील, पेन्शनर, भटजी, प्रोफेसर, शिक्षक, एंजिनीअर, जमीनदार, इनामदार वगैरे प्रतिष्ठित वर्गाच्या मुलांसमोर हा प्रश्न आहे. उद्या तुमची संघटना घेऊन तुम्ही खेड्यात गेलेत व शेतकऱ्यांनी जर विचारले, "हे सावकार व जमीनदार छळीत आहेत. यांचे काय?" तर त्यांना काय उत्तर देणार? हिंदू, हिंदू तेवढे आधी एक होऊ या, या उत्तराने त्यांचे समाधान होणार नाही. काही वेळ ही धार्मिक पुंगी कदाचित अडाणी लोकांना गुंगवील, परंतु पुढे भ्रम उडेल. त्या वेळेस हे संघवाले काय करणार?

भारतीय तरुणांनी गरिबाची बाजू घेऊन उभे रहावे. जगात दोन वाद आहेत. त्यांतील गरीबाकडे जाणाऱ्या वादाला मिठी मारावी.

काँग्रेस जपून का होईना, परंतु गरीबांकडे जात आहे. अद्याप ती मर्यादेने जात आहे. श्रीमंत लोकांना सद्बुद्धी येईल व ते श्रमणाऱ्यांस सुखी करतील, अशी आशा ती बाळगते आहे. महात्माजी ‘ट्रस्टी व्हा’ असे सांगत आहेत. श्रमणारे अधीर होत आहेत. काँग्रेस त्यांना जरा धीर राखा असे सांगत आहे. परंतु भांडवलवाल्यांनी शेवटी काँग्रेसचे न ऐकले तर? मग इतर देशांत झाले ते या देशात होईल. एक तर येथे फॅसिझम स्थापन होईल किंवा समाजवाद येईल. रक्तातून राष्ट्राला जावे लागेल.

काँग्रेस शेवटी गरिबांच्या सागराला जाऊन मिळणार आहे. तो खाली जो अनंत असा श्रमणारांचा सागर आहे, तेथे काँग्रेस जाणार आहे. कधी तिच्या हातून चुका होतील, कधीं ज्यांचे संसार सुंदर व सुखी करण्यासाठी तिचा अवतार त्यांनाही तिला दुखवावे लागेल. परंतु म्हणून तिला नावे ठेवू नका. वेडीवाकडी, नागमोडी ती गेली तरी गरिबांकडे ती जात आहे. तिच्या हृदयावर चरखा कोरलेला आहे. तिच्या हृदयात गरिबाची-दरिद्रीनारायणाची मूर्ती आहे. हे विसरू नका.

वसंता, किती रे तुला लिहू? हा हृदय-सागर तुझ्यापुढे कसा रिता करू? परंतु थेंबामध्येही सर्व सागराची चव असते. असो.

तुझा

**श्याम**

पत्र अकरावे

# भारताचा इतिहासदत्त प्रयोग

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

आज सकाळी मी अंगणात फिरत होतो. एक लहानसे फुलपाखरू पडले होते! फारच चिमुकले होते ते. मी ते हातात घेतले. ते मेलेले होते. तरीही त्याचे ते चिमणे पंख किती तजेलदार दिसत होते. चिवरे-बावरे असे ते पंख सौंदर्याने भरलेले होते. ते पाखरू किती दिवस जगले असेल? कदाचित चार दिवसही ते नाचले बागडले नसेल! इतक्या क्षणभंगुर अशा जीवनात सृष्टीने किती सौंदर्य ओतले होते, किती कला ओतली होती? मग मानवी आत्मा निर्मिताना किती कला ओतली गेली असेल? मानवी आत्म्यात किती रंग भरलेले असतील?

परंतु हे रंग कधी प्रकट होणार? मानवी आत्म्याचे सुंदर रंग प्रकट व्हावे म्हणून कोण धडपडणार? इतकी खोल दृष्टी कोण घेणार? आपण तर एकमेकांस शिव्या देत आहोत. मनुष्य मनुष्याला गुलाम करीत आहे, तुच्छ लेखीत आहे. इंग्लंडमधील थोर कवी वर्डस्वर्थ म्हणाला—

> Much was I grieved to think
> What man has made of man
> करी मानव हा काय मानवाचे
> मनी येऊन मज दुःख होइ:साचे

वर्डस्वर्थ हे शब्द शंभर-दीडशे वर्षांपूर्वी म्हणाला; परंतु आजही ते खरे आहेत. या जगात पूर्वी कधी नव्हता इतका आज द्वेषांना ऊत

आला आहे. मधूनमधून मानवी समुद्राला पोटातील वडवानळी आग ओकण्याची अशी सवयच आहे की काय न कळे!

हिंदुस्थानात हा द्वेष जातीयवादावर आधारला आहे. मला कळत नाही हे द्वेष का ते! शेकडो हिंदूंच्या घरी मुसलमान नोकरचाकर आहेत. प्रेमळ संबंध आहेत. परंतु वर्तमानपत्रातील गोष्टी वाचून बोंबा मारणारे आमचे द्वेषाळ लोक या गोष्टी बघतील तर ना? कावळा सडलेल्या भागाकडे दृष्टी देतो, त्याप्रमाणे हे द्वेषी लोक नेमके वाईट तेवढेच बघतात. हजारो कुटुंबांतून व खेड्यांतून प्रेमळ संबंध आहेत, ही गोष्ट ते विसरतात. म्हणून माझ्यासारखा लहानसा लेखक त्यांना हे मांगल्य दाखवू पहात असतो. अंधारात एक किरण दाखविणेही पुण्यकारक आहे. माझी गीता सांगते, 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्'– थोडे का सत्कर्म असेना तेही तारील.

वसंता, माझा एक बंगाली मित्र आहे. तो दिल्लीहून येत होता. त्याच्या डब्यात एक गुजराती मनुष्य होता. त्या माणसाला खूप ताप भरला. त्याला वांत्या झाल्या. गाडीत का थोडे हिंदू होते? परंतु त्याची वांती कदाचित अंगावर पडेल म्हणून ते भीत होते! तो गुजराती कावरा-बावरा झाला. त्या डब्यात दिल्लीचा एक दिलदार मुस्लिम तरुण होता. तो उठला. त्याने त्या गुजराती हिंदूला आपल्या बिछान्यावर निजवले. खांडवा स्टेशनवर त्याने त्याला उतरवले. त्याच्या घरी तार केली. त्याला स्टेशनमास्तरांच्या स्वाधीन करून तो मुसलमान तरुण गाडीत बसला. आमची वर्तमानपत्रे आग लावायला टपलेली आहेत, परंतु ज्यामुळे समाज एकत्र येतील असे कोणी लिहिणार नाही!

मी शाळेत शिक्षक असताना माझ्या एका विद्यार्थ्याच्या घरी मी गेलो होतो. आम्ही दोघे दुसऱ्या दिवशी निघणार होतो. त्या विद्यार्थ्याचा मोठा भाऊ सायंकाळी जिनमध्ये पैसे आणण्यासाठी म्हणून गेला होता. ते जिन गावापासून दोन मैलांवर होते. बरीच रात्र झाली तरी भाऊ परत आला नाही. त्यांच्या घरी एक मुसलमान नोकर होता. त्याला घरातील सारी मुले 'अटेलाक्का' असे म्हणत. त्या नावातही

किती गोडी आहे पहा ! तो अटेलाकाका अस्वस्थ झाला. शेवटी हातात कंदील व काठी घेऊन तो निघाला. रात्रीची वेळ, धनी पैसे घेऊन येणार होता. वाटेत बरेवाईट झाले असते तर? असे मनात यऊन ता निघाला. 'हा आपला हिंदू मालक मरो' असे का त्याच्या मनात आले? घरातील माणसांना चिंता वाटली नाही इतकी त्याला वाटली. तो मुसलमान होता, परंतु दिलदार होता. ज्यांना तुम्ही लांडे लांडगे म्हणता, त्यांच्यातही अशी दिलदारी भरलेली आहे. परंतु तुम्हांला दिसत नाही. मी तरी काय करू?

खानदेशातील चोपडे तालुक्याकडची गोष्ट आहे. एकदा एक मोटर रस्त्यात मोडून पडली. रात्र झाली. गाडीत कुटुंबवत्सल माणसे होती. रस्त्याजवळ एक गाव होता. त्या गावात एक वृद्ध काजीसाहेब होते. त्यांना कळले की, रस्त्यात मोटर पडली आहे. आत बायकामाणसे, मुलेबाळे आहेत. ते लगेच हातात कंदील घेऊन निघाले. त्या सर्व मंडळींना ते म्हणाले, "रात्री यथे का उघड्यावर बालबच्चे घेऊन बसणार? गावात चला. मी सारी व्यवस्था करतो. तुम्ही स्वयंपाकपाणी करा. तुम्हांला शिधासामुग्री, दूध वगैरे सारे मिळेल. अंथरूण–पांघरूण मिळेल."

मुसलमानावर विश्वास ठेवावा की न ठेवावा अशी त्या मंडळींस चिंता वाटली. त्या वृद्ध मुसलमानाच्या लक्षात ही गोष्ट आली. त्याला दुःख वाटले. तो म्हणाला, "या पांढऱ्या दाढीवर विश्वास ठेवा. मुसलमानही माणसेच आहेत." शेवटी ती सर्व मंडळी गावात आली. त्यांना दूध वगैरे मिळाले. तो काजी म्हणाला, "घरात झोपता का?" ते लोक म्हणाले, "बाहेरच बरे!" त्या मुसलमान वृद्धाने आंथरूण-पांघरूण दिले. ती मंडळी झोपली.

तो वृद्ध मुसलमान पहाटे प्रार्थनेला उठला. एका लहान मुलाच्या अंगावर पांघरूण नव्हते. त्याने आपली चादर त्याच्या अंगावर घातली. त्याची प्रार्थना झाली, आणि आता सकाळ झाली. ती प्रवासी मंडळी उठली. त्या काजी साहेबांची गाय होती. गायीचे दूध त्याने

त्या मुलाबाळांस, सर्वांस दिले. मोटर आली तेव्हा त्या मंडळीस पोचवावयास गेला. मंडळी मोटरीत बसली. म्हातारा उभा होता. लहान मुलाने त्याच्या पांढऱ्या दाढीवरून चिमुकले हात फिरविले. काजी म्हणाला, "बच्चा, तू नाही ना मला भीत? ही दाढी निर्मळ आहे हो!"

वसंता, अशी उदाहरणे किती सांगू? मागील वर्षी माझी वैनी कोकणात मरण पावली. किती तरी मुसलमान बंधुभगिनी माझ्या दादाच्या समाचारासाठी आल्या होत्या. माझ्या भावाच्या लहान मुलीला खाऊसाठी त्यांनी एक रुपया दिला! एक मुसलमान मित्र म्हणाला, "दादा, रडू नका. काय करायचे? जो मायच्या पोटी आला त्याला धरित्रीच्या पोटी जावेच लागतं! वाईट नका वाटून घेऊ. तुमचा संसार लंगडा झाला, तुमचा वजीरच गेला!" त्याने पत्नीला वजीराची उपमा दिली. मला कवी कुलगुरू कालिदासाच्या 'गृहिणी सचिवः' या वचनाची आठवण झाली. आणि 'मायच्या पोटी आला तो धरित्रीच्या पोटी जायचाच' किती सुंदर वचन! 'धरित्री' संस्कृत शब्द त्याने वापरला, अर्थात न कळत.

खेड्यापाड्यांतून असे हे प्रेमळ संबंध आहेत. आम्ही जाऊन पाहू तर दिसतील. स्त्रियांच्या जुन्या ओव्या मी गोळा करून प्रसिद्ध केल्या. त्यांत मुसलमानास भाऊ मानण्याच्या किती तरी ओव्या आहेत—

मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
दिवाळीचा खण त्याचा कागदी सलाम

अशा किती तरी सहृदय ओव्या आहेत. ठाणे येथे मला एका मित्राने विचारले, "ही खरी ओवी आहे का?" द्वेषाचा इतका पूर आम्ही ओतीत आहोत की ते प्रेमळ संबंध, जे पूर्वी होते व अजून आढळतात ते आम्हांला अशक्य वाटू लागले आहेत.

काँग्रेस हिंदू-मुस्लिम ऐक्यावर श्रद्धा ठेवून चालली आहे. भारताचा भूतकाळ पाहून श्रद्धेने ती भविष्याकडे पाहात आहे. "महात्माजी किंवा काँग्रेस मुसलमानांना जवळ घेतात, परंतु मुसलमान तर त्यांना लाथा

मारतात" असे आमचे द्वेषपंडित म्हणत असतात. "मुसलमानांनी गांधींना फसवले, त्यांच्या हातावर तुरी ठेवल्या" असे ऐक्य-द्वेष्टे म्हणत असतात. परंतु प्रेम हे फसवून घेण्यासही तयार असते! तेच खरे प्रेम जे निरपेक्ष असते. कर्तव्य म्हणून आपण प्रेम करतो, सहानूभूती दाखवितो. परंतु महात्माजींना कोणी फसविले नाही. त्यांच्या श्रद्धेला व विश्वासाला फळ लागले आहे. आपली सर्वांची तशी श्रद्धा असती तर अधिक फळ लागले असते.

काँग्रेसमध्ये जे काही थोर मुसलमान आहेत ते गांधीजींच्या श्रद्धेचेच फळ आहे. ज्या खैबरखिंडीतून पूर्वी मुसलमानांचे लोंढे आले, त्याच बाजूला देशभक्तीचे फळ आले! हजारो खुदाई खिदमतगार तेथे उभे आहेत. त्या प्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ हाते. आज जरी तेथे काँग्रेसचे मंत्रिमंडळ नसले तरी त्या प्रांतात काँग्रेस-प्रेम आहे. खान अब्दुल गफारखान आज तुरुंगात आहेत. सरकारी कारवायांनी आज सरहद्द प्रांतात, सिंधमध्ये, बंगालमध्ये, जरी मुस्लिम लीगचा वरचष्मा दिसला तरी तेथे खरा पाया नाही. ब्रिटिशांची व मुस्लिम लीगची ही कुटिल नीती आहे. परंतु कुटिलता नेहमीच फलद्रूप होत नसते. मुस्लिम लीगच्या प्रतिष्ठेचे हे पोकळ डोलारे आहेत. ते पुढे कोलमडतील.

पेशावर प्रांतात काँग्रेस-प्रेम आहे. अहरार पक्षही काँग्रेसला सहानुभूती दाखवायला तयार असतो. जमीयतु-उलमा ही संस्थाही काँग्रेसप्रेमी आहे. बोहरी मुसलमानांत काँग्रेस-प्रेम आहे. शियापंथी मुसलमान अद्याप मुस्लिम लीगला फारसे मिळाले नाहीत. लाखो मोमीनांचा मुस्लिम लीगला विरोध आहे. निरनिराळ्या प्रांतांतून काँग्रेसला अनुकूल असे मुसलमान आहेत. मुस्लिम लीगच्या गाजावाजामुळे या काँग्रेसप्रेमी मुसलमानांचे स्वरूप दिसून येत नाही. परंतु बॅ. जिनांच्या एकान्तिक धोरणास मुसलमान विटतील, आझाद-मुस्लिम पक्ष बलवान होतील.

मुस्लिम लीग हीच काय ती मुसलमानांची एकमेव संस्था, या गोष्टीला काँग्रेसने कधीही मान्यता दिली नाही. जिनासाहेबांजवळ काँग्रेसने

पुन:पुन्हा वाटाघाटी करण्याचे प्रयत्न केले. आणि वेळ आली तर पुन्हाही करील. कारण किती झाले तरी आपल्याच राष्ट्रातील ते भाऊ आहेत. ब्रिटिश सरकारशी पुन:पुन्हा वाटाघाटी करण्यात जर आम्हांस कमीपणा वाटत नाही तर जिनांजवळ वाटाघाटी करण्यात कमीपणा का वाटावा? परंतु जोपर्यंत काँग्रेसबद्दल सहानुभूती दाखवणारे इतर मुसलमान पक्ष आहेत, खुद्द काँग्रेसमध्येही जोपर्यंत मुसलमान आहेत तोपर्यंत मुस्लिम लीग हीच मुसलमानांची एकमात्र संस्था असे काँग्रेस मानणार नाही. जिनासाहेब सारखे सांगत आहेत की काँग्रेस फक्त हिंदूंची. परंतु काँग्रेस एका जातीसाठी वा धर्मासाठी कधी जन्मली नव्हती. ती सर्वांसाठी आहे. सर्व राष्ट्रासाठी म्हणून ती आहे. सर्व राष्ट्राची याच भूमिकेवरून ती वागेल. काँग्रेस केवळ हिंदूंची ही गोष्ट काँग्रेसने कबूल करणे म्हणजे काँग्रेसने स्वत:ची हत्या करून घेणे होय. काँग्रेस मग मेलीच! हिंदुमहासभा व काँग्रेस यांत मग फरक काय! काँग्रेस मरावी हाच तर सर्व जातीय पुढाऱ्यांचा हेतू आहे. मरायचीच असेल तर काँग्रेस मरेल,– परंतु ती ध्येयाला सोडणार नाही!

जिनांची पाकिस्तान-योजना तरी काय? ती व्यवहार्य तरी आहे का? पाकिस्तान-योजनेची स्पष्ट कल्पना त्यांनी कधी मांडली नाही. पाकिस्तान हे सर्व बाबतीत स्वतंत्र राष्ट्र होणार का? परंतु पंजाबला बंगाल जोडणार कसा? सरहद्द प्रांत, सिंध प्रांत, पंजाब, बंगाल यांचे म्हणे पाकिस्तान बनवा. परंतु बंगाल का पंजाबला जोडलेला आहे? पंजाब व बंगाल या दोन्ही प्रांतांत हिंदू का केवळ अल्पसंख्य आहेत? सरहद्द प्रांतात शेकडा ९० मुसलमान आहेत. येथे म्हणता येईल की हिंदू अल्पसंख्य आहेत. परंतु पंजाब व बंगालमध्ये मुसलमान शेकडा ५५ तर हिंदू ४५ आहेत. याला का अल्पसंख्य म्हणावयाचे?

पंजाबमध्ये शीख व हिंदू आहेत. ज्या जिल्ह्यातून त्यांची अधिक वस्ती असेल ते अलग करा, असे ते म्हणतील. पश्चिम बंगालमध्ये हिंदूंची संख्या अधिक आहे. तेथील हिंदू म्हणतील आम्ही निराळे होतो. कसे करायचे या पाकिस्तानाचे? सरहद्द प्रांत कदाचित हिंदुस्थानातच राहू

इच्छील. मग पाकिस्तान कोणाचे? पंजाबचा थोडा भाग, सिंध आणि बंगालचा पूर्वभाग यांचे का पाकिस्तान बनवायचे? आणि लष्कर व आरमार कोठे ठेवणार? पूर्व बंगालचे रक्षण कसे करणार? त्याच्याशी संबंध कसा ठेवणार? एका पाकिस्तानचे का दोन तुकडे,—एक पूर्वेस व एक पश्चिमेस असे ठेवणार? आणि आर्थिक दृष्टया हे सारे कसे शक्य होईल?

आणि उद्या पाकिस्तान एक स्वतंत्र देश मानला तर किती आपत्ती येतील! हिंदू हिंदुस्थानात जे दोनतीन कोटी मुसलमान असतील त्यांना का तथे विदेशी समजायचे? मुसलमान पाहताच हा दुसऱ्या देशातील असे का मानायचे? आणि पाकिस्तानात जे दोनतीन कोटी हिंदू असतील त्यांना मुसलमान का परदेशी मानणार? पाकिस्तानात हिंदूंना व हिंदुस्थानात मुसलमानांना नागरिकत्वाचे हक्क राहतील का? कारण ते निराळ्या देशाचे मानले जाणार? असे एकमेकांस विदेशी मानणे शक्य होईल का? शेकडो वर्षे जे एकत्र राहिले ते उद्यापासून एकमेकांस केवळ दुसऱ्या देशाचे असे मानू शकतील का?

आणि अशी अलग राष्ट्रे करून राहणे ही गोष्ट कालाच्या ओघाविरुद्ध आहे! लहान लहान तुकडे करून त्यांची राष्ट्रे करण्याचे दिवस संपत आले आहेत. छोट्या-छोट्या राष्ट्रांचे दिवस जाऊन विशाल राष्ट्रांचे दिवस येत आहेत. हिंदुस्थान आधीच एक विशाल राष्ट्र आहे. सर्वांना एकत्र नांदविण्याचा प्रयोग करीतच आले आहे. आणि हाच प्रयोग उद्या व्हावयाचा आहे. अशा विशाल राष्ट्राला खंड—राष्ट्र म्हणा पाहिजे तर. येथे खंड याचा अर्थ तुकडा नसून आशिया खंड वगैरे शब्दात जो अर्थ आहे तो घ्यायचा. आणि काँग्रेस प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता देऊ करीत आहे, एवढेच काय त्यांना अलग राहायचेच असेल तर तोही हक्क मान्य करीत आहे! परंतु तेथील सर्व जनतेने ते ठरवावे. काँग्रेसची श्रद्धा आहे की प्रांतांनी एका अर्थी स्वतंत्र राहून दुसऱ्या अर्थी एका विशाल संघटनेत राहणे हेच उद्या सारे मान्य करतील. कारण त्यातच कल्याण आहे, संरक्षण आहे, विकास आहे.

बॅ. जिनांचे असे का म्हणणे आहे की एक मुस्लिम फेडरेशन व एक हिंदू फेडरेशन असावे? आणि या दोन फेडरेशनांचे काही प्रतिनिधी घेऊन त्यांचे एक पुन्हा वरिष्ठ कार्यकारी फेडरेशन असावे? या वरिष्ठ संयुक्त फेडरेशनात प्रतिनिधी का समान घ्यायचे? जिनांच्या मनात काय आहे? कदाचित जिनांच्या डोळ्यांसमोर स्वतंत्र हिंदुस्थान ही वस्तूच नसेल! मुस्लिम पाकिस्तान व हिंदू हिंदुस्थान यांच्या डोक्यावर सदैव ब्रिटिश सत्ता असावी असेही त्यांच्या मनात असेल. कारण ब्रिटिश नसतील तर कसे व्हायचे? हिंदू फेडरेशन तर बलवान होईल. मुस्लिम फेडरेशनला भीती वाटणार. आणि बॅ. जिनांचे पाकिस्तान ब्रिटिशांचे मांडलिक राहू पाहणार! मुस्लिम जनतेला हे आवडेल का?

काँग्रेसने करायचे काही शिल्लक ठेवले नाही. त्या त्या प्रांतातील जनतेने अलगच राहायचे ठरविले तरीही मान्यता दिली. प्रांतिक सरकारास शेष अधिकारही देऊ केले. एकदा मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार यांचे अधिकार ठरविल्यावर मधून मधून जे इतर प्रश्न उत्पन्न होतील त्या बाबतीतील अधिकार ते शेष अधिकार. जवाहरलाल म्हणाले, "अशाने मध्यवर्ती सरकार दुबळे होईल. परंतु तरीही ऐक्यासाठी मी याला अनुकूल मत देतो." काँग्रेसने आणखी काय करायचे?

पाकिस्तानची योजना अव्यवहार्य वाटते. जिनांचा हा केवळ स्टंट आहे! डॉ. आंबेडकर मध्येच धर्मान्तराची घोषणा करतात तसाच हाही एक प्रकार आहे का? अल्पसंख्य लोक नेहमी साशंकच असणार. जास्तीत जास्त मिळावे म्हणून ते खटपट करणार. मुसलमान तर बोलून चालून परधर्मी. परंतु ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांची नाही का भीती वाटत? ब्राह्मण-ब्राह्मणेतर एकाच धर्माचे तरीही परस्परांविषयी किती साशंकता! या भांडणांच्या मुळाशी पारतंत्र्य आहे. हे सारे आर्थिक प्रश्न आहेत. नोकऱ्याचाकऱ्यांचे प्रश्न आहेत. काँग्रेस मंत्रिमंडळांच्या कारकीर्दीतच हे वाद विकोपास गेले.

परंतु काँग्रेस स्वातंत्र्यासाठी लढत आहे. माझ्या एका मित्राने आपल्या एका मुसलमान मित्रास विचारले, "काँग्रेसने लढा सुरू केला तर यादवी

होईल असे जिना म्हणत. परंतु जातीय दंगा कोठेही झाला नाही. हे आश्चर्य नव्हे का?" तेव्हा तो मुसलमान बंधू म्हणाला, "आज काँग्रेस गोळ्या खात आहे. फाशी जात आहे. फटके खात आहे. आज नोकऱ्यांचा सवाल नाही, मरणाला मिठी मारण्याचा सवाल आहे! आम्ही बोलून दाखविले नाही तरी बलिदान करणाऱ्या काँग्रेसविषयी आम्हांला आदर वाटतो. दिल्लीस गोळीबार झाला तर मुसलमानांनी मशिदीचे दरवाजे उघडून हिंदूंना आत घेतले." असो.

मुसलमानांनीही स्वातंत्र्ययुद्धात कुरबानी केली नाही असे नाही. ३०-३२ सालच्या सत्याग्रहयुद्धात पेशावर प्रांतातून १७ हजार पठाण तुरुंगात गेले! आणि पेशावर प्रांताची लोकसंख्या फक्त ४५ लाख!! आपल्याकडे झाला नाही इतका अपरंपार जुलूम तिकडे झाला. त्या लढाऊ लोकांत काँग्रेसप्रेम वाढू नये म्हणून सरकारने कहर केला. परंतु ते शूर अहिंसक पठाण कसोटीस उतरले.

काँग्रेसने मुसलमानांस जे जे संरक्षण पाहिजे असेल ते ते देऊ केले. धर्माचे, भाषेचे, संस्कृतीचे संरक्षण सर्वांना मिळेल असे कराची काँग्रेसच्या ठरावात स्पष्ट आहे. स्वातंत्र्ययुद्धात मुसलमानांनी सहकार करावा म्हणून काँग्रेसने शक्य ते द्यायची तयारी दर्शविली. १९३१ मध्ये लंडनच्या गोलमेज परिषदेच्या वेळेस गांधीजींनी त्यांना कोरा चेक दिला! त्यामुळे हिंदुमहासभावाले रागावतात. परंतु गांधीजी अखिल भारताची तेथे अब्रू सांभाळीत होते. ब्रिटिश मुत्सद्यांनी जगासमोर हिंदुस्थानचा फजितवाडा चालवला होता. तुमची एकमुखी मागणी आणा नाही तर आमचा निर्णय मान्य करा, असे मिस्कीलपणे कुटिल ब्रिटिश मुत्सद्दी सांगत होते. काँग्रेसने मुसलमानांस इतक्या जागा देऊ, असे म्हणताच ब्रिटिश मुत्सद्दी त्यांना तिकडे बोलावून आम्ही अधिक देऊ असे म्हणत. असा चावटपणा सुरू झाला! जगाच्यासमोर गांधीजी का घासाघीस करित बसतील? राष्ट्राचे प्रश्न म्हणजे का केवळ आकडे? तेथे शेवटी मोठी दृष्टी घ्यावी लागते. महात्माजींना ब्रिटिशांनी चालविलेली ही कुतर-ओढ सहन होईना. महात्माजी मुसलमानांस म्हणाले, "तुम्ही

म्हणाल तितक्या जागा; कोरा चेक. आपण एकमुखी मागणी करू. परंतु ब्रिटिशांनी मागणी मान्य न केली तर काँग्रेसच्या खांद्याशी खांदा लावून तुम्ही लढले पाहिजे." कोरा चेक देत असताना 'स्वातंत्र्यार्थ लढायला या' ही गांधींची अट होती.

गांधीजींनी जगाच्या बाजारात हिंदुस्थानची अब्रू सांभाळली. त्यांच्यासमोर या ४० कोटी लोकांच्या इभ्रतीचा प्रश्न होता. म्हणून त्यांनी ही मोठी दृष्टी घेतली. तीत चूक काय आहे? परवा राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मागणीच्या वेळेस श्री राजगोपालाचार्य म्हणाले की, "मुख्य प्रधान जिना झाले तरी आमची तयारी आहे." क्रिप्सजवळ वाटाघाटी करताना काँग्रेस म्हणाली, "मध्यवर्ती मंत्रिमंडळ जिनांना बनवू दे. आमची ना नाही. परंतु तुम्ही जा."

काँग्रेस कोरा चेक देते, जिनांना मुख्य प्रधानकी देऊ करते, मंत्रिमंडळ बनवा म्हणते, याची हिंदुमहासभावाल्यांस चीड येते. परंतु राष्ट्राच्या स्वातंत्र्याची ज्याला कदर आहे, त्याला क्षुद्र दृष्टी घेऊन चालत नाही. म्हणून लोकमान्य टिळकही म्हणत, "येथल्या मुसलमानांच्या हाती सर्व सत्ता आली तरी चालेल, परंतु सहा हजार मैलांवरचे हे परके जाऊ देत."

अशा म्हणण्यात काय बरे अर्थ असतो? काँग्रेसला किंवा महात्माजींना मुसलमानांची भीती वाटत नाही. उद्या आपले कसे होईल ही भीती काँग्रेसमधील हिंदूंना नाही. ३० कोटी हिंदूंना भयभीत होण्याचे काय कारण? हा न्यूनगंड हिंदुमहासभेला आहे, काँग्रेसला नाही. हिंदुमहासभेला मुसलमानांची भीती वाटते. म्हणून तिची धावपळ. काँग्रेस धीरोदात्त वागत आहे. स्वराज्य आले म्हणजे आर्थिक प्रश्न सुटू लागून भांडणे आपोआप कमी होतील, ही गोष्ट काँग्रेस जाणते.

स्वराज्य येणे म्हणजे काय? स्वराज्य म्हणजे राष्ट्राच्या सर्व शक्तींना वाव मिळणे. राष्ट्राच्या विकासास अवसर मिळणे. अडथळे दूर होणे. आज राष्ट्राच्या कर्तृत्वास वावच नाही. नोकरीशिवाय धंदा नाही. उद्या स्वराज्य मिळाले म्हणजे व्यापार वाढेल, उद्योगधंदे वाढतील. लोकांची

कोंडलेली चैतन्यशक्ती शतक्षेत्रांत खेळू शकेल. भांडणे आपोआप बंद होतील. उद्योगी माणसांना भांडायला वेळ आहे कोठे? मुसलमानांतील बोहरी समाज हा व्यापारी आहे. त्यामुळे ते कडवे नाहीत. ते गुजराती भाषा बोलतात, गुजराती वर्तमानपत्रे घेतात. कारण त्यांना उद्योग आहे. रोज त्यांचा व्यापाऱ्यांशी संबंध, म्हणून त्यांची भांडखोर वृत्ती नाही. उद्या स्वतंत्र हिंदुस्थानात भांडणे उरणारच नाहीत. कोठून का होईना एकदा या देशातील लोकांच्या हातात सत्ता येऊ दे. एकदा देश स्वतंत्र होऊ दे. जोपर्यंत देश परतंत्र आहे तोपर्यंत भांडणे राहणार, कारण कर्म-शक्तीला वाव नसणार. इंग्रज म्हणतात, "तुमच्यात भांडणे आहेत म्हणून स्वराज्य देत नाही." काँग्रेसचे नेहमी एकच म्हणणे आहे, "तुम्ही आहात म्हणून भांडणे आहेत. गुलामगिरीमुळे भांडणे आहेत. तुमचा संबंध सुटताच सलोखा निर्माण होईल."

वसंता, तू पानपट्टीवाल्याचे दुकान पाहिले आहेस का? तो पट्टीवाला हातात कातरी घेऊन उजाडत दुकानात बसतो. तो ते सडलेले पान कापून टाकतो. तसे तो न करील तर सडलेले पान चांगल्या पानांसही सडवते. त्याप्रमाणे आम्ही आमच्या देशात चांगले संबंध निर्मित होतो, परंतु इंग्रज आले. ते फोडा व झोडा असे सडके धोरण घेऊन आले. त्यांनी हिंदुस्थानास कीड लावली आहे. त्यांचा संबंध सुटल्याशिवाय हिंदुस्थानचे ग्रहण सुटणार नाही, भांडणे मिटणार नाहीत, दारिद्र्य व दास्य दुरावणार नाहीत. काँग्रेस हे पुरेपूर ओळखते.

वसंता, लोकमान्य टिळक, देशबंधू दास—सर्वच पुढाऱ्यांना काँग्रेसच्या या धोरणासारखेच धोरण ठेवावे लागले. देशबंधू दासांनीही १९२४–२५ मध्ये बंगालमध्ये हिंदू-मुस्लिम पॅक्ट केला. त्यांना हिंदुसहासभावाल्यांनी विरोध केला. परंतु देशबंधू डगमगले नाहीत. त्यांनी असा पॅक्ट केला तेव्हाच त्यांना प्रांतिक कायदेमंडळात सरकारचा सारखा पराभव करता आला! दिवाणांचा पगार तीन रुपये, असे ठराव त्यांनी मंजूर केले!! ब्रिटिशांचा पराभव करण्यासाठी, ब्रिटिशांची सत्ता येथून घालवण्यासाठी, वाटेल ती किंमत द्यावयास भारतीय पुढारी तयार असत, त्यांनी तयार

असले पाहिजे. लोकमान्यांची, देशबंधू दासांची परंपरा आज काँग्रेस पुढे चालवीत आहे. तिच्या डोळयांसमोर देशाचे स्वातंत्र्य हीच एक गोष्ट रात्रंदिवस आहे. अर्जुनाला द्रोणाचार्यांनी विचारले, "अर्जुना, तुला काय दिसते आहे?" तेव्हा तो नरवीर पार्थ म्हणाला, "पक्ष्याचे डोके व बाणाचे टोक याशिवाय मला काहीएक दिसत नाही." त्याप्रमाणे काँग्रेसला स्वातंत्र्य मिळणे याशिवाय दुसरी वस्तू दिसत नाही." मुसलमानांस किती जागा, हिंदूंस किती, हे भांडण इंग्रजासमोर कशाला? मुसलमानांस दोन जागा जास्त म्हणून तीन कोटी हिंदूंनी भिण्याचे कारण काय? उद्या जे कायदे होतील ते कोणा विशिष्ट जातीसाठी नाही होणार, दरिद्री जनता, श्रमणारी जनता, ती कोणत्याही जातीची असो, त्यांची स्थिती सुधारणे हे उद्या स्वराज्यातले मुख्य काम. सर्वसामान्य जनतेचा संसार सुधारणे हे मुख्य काम.

ही अशी काँग्रेसची दृष्टी आहे. पाकिस्तानला महात्माजींनी प्राणत्यागानेही विरोध करण्याचे ठरविले आहे. दहा हजार वर्षांचा अखंड भारताचा प्रयोग का धुळीत मिळवायचा? मुसलमानांनी अलग होणे हा हिंदुस्थानचा अपमान आहे. सर्व जाती, धर्म, संस्कृती यांना एकत्र नांदवण्याचा प्राचीन काळापासूनचा आपला प्रयोग का अर्धवट सोडायचा? छेः, महात्माजी तो प्रयाग पुढे नेतील. आणि सर्वांचा वाढता पाठिंबा मिळेल.

एक 'पाकिस्तान' म्हणू लागले—तर दुसरे 'हिंदु राष्ट्र' म्हणून ओरडू लागले, दोघांचे न कळत एकच धोरण. देशाचे तुकडे करण्याचे. पाकिस्तानमुळे 'हिंदूंचा हिंदुस्थान' जन्माला आला. आणि 'हिंदुओंका ही हिंदुस्थान' या घोषणेने पाकिस्तानला जोर चढला. दोन्ही हातांची टाळी आहे ही! एकाने गाय मारली, दुसरा वासरू मारतो, हा खरा मार्ग नव्हे. काँग्रेसचा मार्ग हा खरा मार्ग आहे. प्रभू करो व. भारतीय तरुणांस सद्‌बुद्धी देवो!

तुझा

**श्याम**

पत्र बारावे

# सातशे काळ्या डागांची कहाणी !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

हिंदुस्थानचा प्रश्न मोठा विकट आहे. कुटिल ब्रिटिश मुत्सद्द्यांनी तो अधिकच विकट करून ठेवला आहे. हिंदी संस्थानिकांची एक धोंड स्वराज्याच्या मार्गात सदैव उभी असते. हिंदुस्थानातील हे बहुतेक संस्थानिक म्हणजे जगातील एक अजब चीज आहे! त्यांच्या लीला किती वर्णाव्या? किती सांगाव्या?

जगाचा इतिहास पाहिला तर आपणास असे दिसते की साम्राज्ये स्थापन होतात; काही काळ ती टिकतात; नंतर ती मोडतात. त्यांचे निरनिराळे भाग स्वतंत्र होतात. रोमन साम्राज्य, त्यापूर्वीचे पर्शियन साम्राज्य, आपल्याकडील मौर्य व गुप्त साम्राज्ये, मोगल साम्राज्य, मराठी साम्राज्य– सर्वांची एकच गती झाली.

हिंदुस्थानात ब्रिटिश आले तेव्हा मराठे प्रबळ होते. तिकडे पंजाबात शिखांची प्रबळ सत्ता स्थापन झाली होती. अगदी दक्षिणेकडे हैदरअलीने राज्य बळकावले होते. मधूनमधून लहान लहान राजे अथवा त्यांचे मांडलिक असे वावरत होते. ब्रिटिशांशी तह करून आपले संस्थान टिकविणारा निजाम हा पहिला संस्थानिक! हळूहळू ब्रिटिशांची तैनाती पद्धत सर्वांच्या मानगुटीस बसली. ब्रिटिशांच्या कारवाया व आमची आपसांतील भांडणे यामुळे हळूहळू एक एक भाग ब्रिटिशांनी गिळंकृत केला. वेलस्ली, हेस्टिंग्ज व डलहौसी यांनी हिंदुस्थान एका

सत्तेखाली आणण्याचे काम पुरे केले. सार्वभौम सत्ता स्थापन झाली. मधूनमधून संस्थाने काजव्याप्रमाणे लुकलुकत राहिली.

१८५७ साल आले. असंतुष्ट लोकांचे ते युद्ध होते. ज्यांच्या जहागिरी गेल्या, पेन्शने गेली, संस्थाने खालसा झाली ते रागावले होते. 'स्वराज्य म्हणजे जनतेचे राज्य' ही कल्पना त्या वेळेस उद्‌भूत झालेली नव्हती. ते आम जनतेचे युद्ध नव्हते. असंतुष्ट संस्थानिकांचे, राजे-महाराजे यांचे ते युद्ध होते. परंतु या युद्धात जर सारे सामील झाले असते तर हिंदुस्थानच्या इतिहासाला निराळी गती मिळाली असती. ग्वाल्हेरचे शिंदे जर लढाईत पडले असते तर सारे रजपूत राजेही उठाव करणार होते. 'शिंदे विरुद्ध गेले तर आपले आटोपले?' असे कॅनिंगने कळविले होते. कदाचित राजनिष्ठ शीखही मग असंतुष्ट झाले असते. परंतु ग्वाल्हेरचा राजा वयाने लहान होता. दिवाणांच्या हातात सूत्रे होती. रावराजे दिनकरराव दिवाण होते. त्या अल्पवयी राजाला दिल्लीला पाठवून दिले. दिल्ली ब्रिटिशांनी सर केली होती. ग्वाल्हेर ब्रिटिशांच्या बाजूने राहिले . रजपूत रक्त थंड राहिले. महाराष्ट्रातील संस्थानेही शान्त राहिली. १८५७ आले व गेले! तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मी अशी वीर रत्ने चमकली. परंतु स्वातंत्र्य दुरावले. परवशता कायमची जणू पदरी आली.

१८५७ च्या युद्धाच्या वेळी हिंदुस्थानातील काही राजेरजवाड्यांनी इंग्रजांना मदत केली. काही तटस्थ राहिले. या गोष्टीचा इंग्रजांनी विचार केला. डलहौसी भराभर संस्थाने खालसा करीत होता. परंतु संस्थाने खालसा होण्याचे बंद झाले. हे राजेरजवाडे, हे संस्थानिक, हे जहागीरदार, हे जमीनदार, यांना जिवंत ठेवण्यातच ब्रिटिश सत्तेला फायदा आहे, ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्द्यांनी ओळखली. हिंदुस्थानात जर पुन्हा कधी स्वातंत्र्याची चळवळ झाली तर ठायी ठायी पसरलेली ही संस्थाने आपणास उपयोगी पडतील, यांची आपणास मदत होईल ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान असे दोन तुकडे त्यांनी पाडले. सर्व हिंदुस्थानचा प्रश्न सोडवताना या

संस्थानिकांचे हातचे प्यादे वाटेल तेव्हा वाटेल तेथे आपणास पुढे सरकविता येईल हे त्यांच्या ध्यानात आले आणि म्हणून ब्रिटिश सत्तेने ही बांडगुळे राखून ठेवली! पुष्कळसे संस्थानिक म्यूझियममध्ये नेऊन ठेवण्याच्या लायकीचे आहेत. दुसरे काय?

या संस्थानिकांना लोकशाही कारभार हाकण्याची बुद्धी होऊ नये असे प्रयत्न केले जातात. प्रजेपासून त्यांना दूर राखण्यात येत असते. राजपुत्रांना शिकविण्यासाठी खास शिक्षणसंस्था आहे! सरदार वल्लभभाई म्हणाले, "या शिक्षणसंस्थांतून राजपुत्रांना असे शिक्षण दिले जाते की ते त्यामुळे जणू पशू होतात!"

१९१७ साली बनारस येथे हिंदू युनिव्हर्सिटीचा पदवीदानसमारंभ होता. महात्मा गांधीही त्या वेळेस आमंत्रणावरून उपस्थित होते. अनेक संस्थानिक तेथे आले होते. सुंदर, रंगीबेरंगी, जरतारी पोशाख करून ते आले होते. सोन्यामोत्यांच्या अलंकारांनी नटून आले होते. महात्माजी ते ऐतिहासिक भाषण करताना म्हणाले, "हे नटलेले संस्थानिक पाहून माझी मान खाली होत आहे. आपल्या प्रजेची स्थिती कशी आहे, तिची किती दैना आहे, कर किती वाढलेले आहेत, अज्ञान किती पसरलेले आहे, उद्योग-धंदे कसे मेले आहेत, इकडे त्यांचे लक्ष आहे का? आपले दागदागिने प्रजेच्या हितासाठी त्यांना नाही का खर्चिता येणार? प्रजेचा दुवा हा सर्वांत मोठा अलंकार!" अशा आशयाचे महात्माजी बोलू लागले, हिंदीतून बोलू लागले. त्यांना त्यांचे भाषण अर्धवट बंद करावे लागले! डॉ. ॲनी बेझंट वगैरेंना ते सहन झाले नाही, झेपले नाही.

पं. जवाहरलाल तर नेहमी म्हणतात की ही संस्थाने नष्ट केली पाहिजेत. ती टिकविण्यात काही अर्थ नाही. निजामाचे संस्थान घ्या. काय आहे तेथे? नबाबी कारभार तेथे चालला आहे. जनतेला हक्क नाहीत. हम करे सो कायदा! वाटेल तेव्हा सभाबंदी, भाषणबंदी. संघटनेचे स्वातंत्र्य नाही, लेखनाचे स्वातंत्र्य नाही. म्हैसूर, बडोदे ही आम्ही सुधारलेली समजतो. इतर संस्थानांच्या मानाने ही सुधारलेली. परंतु अद्याप तेथेही लोकशाहीचा मागमूस नाही. बडोदे संस्थानातील धारासभेत लोकांना

बजेटवर मत देता येत नाही! फार तर प्रश्न म्हणे दोन चार विचारा. कसले स्वातंत्र्य नि काय? लोकांच्या हातात कारभार या सुधारलेल्या संस्थानिकांनीही का देऊ नये? त्याला इंग्रज सरकारच आड येत आहे का?

आमच्यातील काही पत्रपंडित म्हणतात, "पूर्वजांच्या वैभवाची ही चिन्हे आहेत. ती राहू देत. ती नष्ट करणे कृतघ्नपणा आहे!" परंतु ती नष्ट व्हायला नको असतील तर त्यांना थोडी सुधारणा करू दे. ज्यांना नष्ट व्हायचे नसेल त्यांनी युगधर्म ओळखला पाहिजे. सतराव्या-अठराव्या शतकातील नबाबी थाटाने त्यांना अतःपर राहता येणार नाही. बदला नाही तर नष्ट व्हा!

या संस्थानिकांना जर काही स्वाभिमान असता, या देशाचे आपण याची काही लाज असती तर उत्कृष्ट कारभार चालवून त्यांनी ब्रिटिशांस लाजविले असते. ब्रिटिश सरकार बोलून चालून परकी. सहा हजार मैलांवरून आलेले. त्यांना हिंदुस्थानाविषयी का म्हणून आपलेपणा वाटावा? ते रक्त शोषण करण्यासाठीच आले आहेत. परंतु संस्थानिक तर आमचे ना? ते येथलेच ना? त्यांनी आदर्श कारभार का हाकू नये? आम्हा ब्रिटिश हिंदुस्थानातील लोकांना असे का सांगता येऊ नये की, "संस्थानातील तो सुंदर कारभार पहा, तेथे पहा लोकसत्ता आहे. सर्व कारभार जनतेच्या हाती आहे." परंतु तसे होण्याऐवजी उलट संस्थानातच जाऊन नेहमी सांगावे लागतं की "ब्रिटिश हद्दीत आहेत तसे तरी कायदे येथे करा. तितके तरी स्वातंत्र्य तुमच्या संस्थानातून द्या." पदोपदी ब्रिटिश हिंदुस्थानाकडे पहा असे सांगावे लागणे लाजिरवाणे आहे. त्याने आमची मान खाली होते. पूर्वजांचीही मान खाली होत असेल.

आम्हा महाराष्ट्रीयांना आमचे साम्राज्य अद्याप आठवते! साम्राज्यात जे त्याग झाले, जी शौर्य-धैर्य-त्यागाची कृत्ये झाली ती सदैव वंदनीयच आहेत. परंतु त्या वेळेस आम्ही आमचे साम्राज्य निर्मीत होतो, हे विसरून चालणार नाही!! आम्हांला बडोदे, ग्वाल्हेर, इंदूर, कोल्हापूर, सांगली, मिरज वगैरे लहानमोठ्या संस्थानांचा अभिमान वाटतो! परंतु त्या

संस्थानिकांनी प्रजेला हक्क दिले तर तो अभिमान सार्थ होईल. बडोदे संस्थान हे गुजरातमध्ये. मराठ्यांनी गुजरातवर स्वाऱ्या केल्या. आपली सत्ता तेथे स्थापली. आपले अधिकारी नेमले. जित व जेते असे संबंध सुरू झाले! मला असे मागे कळले की, डाकोर या देवस्थानचे पुजारी हे महाराष्ट्रातले आहेत. गुजरातमधील देवस्थानचे पुजारीही महाराष्ट्रीय नेमले गेले! अहमदाबादला महाराष्ट्रीय वस्ती ज्या भागात आहे, त्या भागाला ' भद्र ' म्हणतात! हा भद्र भाग पूर्वीही होता की महाराष्ट्र जेते स्वतःला ' भद्र ' व ' उच्च ' समजून वागू लागले ते देवाला माहीत! ते पूर्वीचे जावो, गुजराती भाषेत मराठ्यांविषयी वाक्प्रचार– खेड्यापाड्यांतून रूढ आहेत ते ऐकले म्हणजे आपली कारकीर्द तिकडील लोकांना कितपत मानवली ते दिसून येईल! एकदा पूज्य विनोबाजींस कोणी विचारले, " काकासाहेब कालेलकर महाराष्ट्र सोडून गुजरातेत कशाला गेले? त्यांच्या सेवेला महाराष्ट्र मुकला. " तेव्हा विनोबाजी म्हणाले, " आपण पूर्वी जे पाप केले ते निस्तरावयास काका तेथे गेले आहेत. पूर्वी सत्ता गाजविली, आता थोडी सेवा करू या. "

परंतु बडोदे प्रजामंडळ जर म्हणाले की, आमच्या हातात सत्ता द्या तर आम्हा महाराष्ट्रीयांना राग येतो! या गुजरात्यांना मराठी राजा बघवत नाही, असे आपण म्हणतो. जर महाराष्ट्रीयांना लोकशाहीची, स्वराज्याची खरी आवड असेल तर ते म्हणतील की, बडोदे संस्थानात बहुतेक प्रजा गुजराती आहे. त्यांच्या हातात राज्यकारभार जाणे साहजिक आहे. त्यांनी तसा कारभार मागितला तर चूक काय? परंतु आम्हांला गुजराती बंधूंची रास्त मागणीही अन्यायाची वाटते. कारण आमच्या रक्तातील तो जुना साम्राज्यवाद जात नाही! आमच्या जुन्या साम्राज्यवादाची ही चिन्हे आता लोकशाही स्वरूपाची व्हावी असे जर आम्हांस अद्यापही वाटत नाही तर ब्रिटिशांनी मात्र येथली साम्राज्याची मगरमिठी सोडावी असे आम्ही कोणत्या तोंडाने म्हणावे?

हिंदुमहासभा भगवा झेंडा मानते. ठीक आहे. त्यागाने तो झेंडा पूज्य व पवित्र झालेला आहे; परंतु प्रतीके व चिन्हे बदलत असतात.

आज राष्ट्राचा निराळा झेंडा करावा लागेल. कारण आज सर्व भारताचा आपणांस विचार करायचा आहे. आपापल्या जातीच्या संघटनांपुरती जातीय चिन्हे वापरा, परंतु अखिल हिंदुस्थानसाठी निराळा झेंडा, निराळी खूण निर्मावी लागेल. कॉंग्रेसने ती निर्मिली आहे. तिरंगी झेंडा निर्मिला आहे. परंतु पंढरपूरच्या हिंदू युवक परिषदेत सावरकर म्हणाले, "हा तिरंगी झेंडा म्हणजे मुरदाड झेंडा आहे!" सर्व राष्ट्राचे एकीकरण करण्यासाठी जे प्रतीक निर्माण झाले, जे त्यागाने रंगले, लक्षावधी खेड्यांतून गेले, ज्याच्यासाठी अपार बलिदान झाले तो का मुरदाड झेंडा? चाळीसगाव तालुक्यात हिंडताना मी असे पाहिले की, वंजारी लोक तिरंगी झेंडा पाहताच धावत येत. तिरंगी झेंड्याचे ते चुंबन घेत! रानावनातील लोकांतही आशा व चैतन्य या झेंड्याने निर्मिले आहे. या झेंड्याने मढ्यांना जागृती दिली आहे.

आणि भगवा झेंडा कशासाठी उभा होता? भगव्या झेंड्याचा आम्ही जरीपटका केला! आम्ही साम्राज्यवादी झालो! भगवा झेंडा याचा अर्थ असा होता की, राजा संन्यासी आहे. प्रजेच्या पैशावर तो स्वतःची चैन चालवणार नाही. श्रीशिवाजी महाराजांना तो अर्थ अभिप्रेत होता. शिवाजी महाराजांना पाच पातशहा आजूबाजूस असताही क्रान्ती करता आली. कशाच्या जोरावर करता आली? बहुजनसमाजासाठी ते उभे होते. मावळे शेतकरी होते. त्यांना नव्हते पोटभर अन्न, नव्हते अंगभर वस्त्र. समर्थांनी लिहिले आहे, "न मिळे खावया, खावया, खावया!" खावया हा शब्द त्यांनी तीनतीनदा उच्चारला! सर्वत्र गढी-वाल्यांचे राज्य होते. प्रत्येक गावाला गढी असे. तेथे कोणी सरदार असे. गावच्या लोकांनी राबावे व गढीवाल्यांनी फस्त करावे! बखरीत अशा अर्थाचे लिहिले आहे: "हे गढीवाले नष्ट करण्याकरता शिवाजी महाराजांचा अवतार होता!"

अवतार म्हणजे वरून खाली येणे. शिवाजी महाराज खालच्या गरिबांत येऊन मिसळले. त्यांच्या सुखदुःखांशी समरस झाले. म्हणून त्यांना अवतार म्हणावयाचे. त्या वेळेस केवळ मुसलमानांचाच त्रास

होता असे नाही, हिंदू गढीवाल्यांचाही त्रास होता. ठायी ठायी हिंदू व मुसलमान सरंजामी सरदार होते, आणि जनता निःस्त्राण झाली होती. शिवाजी महाराजांना हिंदू व मुसलमान दोन्ही गढीवाले नष्ट करावे लागले.

वसंता, रामचंद्रपंत अमात्यांनी शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र म्हणून लिहिले आहे. निर्णयसागर प्रेसने ते प्रसिद्ध केले आहे. ते तू अवश्य वाच. लहानसे बत्तीस पानांचे मला वाटते ते पुस्तक आहे. परंतु फार सुंदर! शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे त्यात वर्णन आहे. शिवाजी महाराजांनी कोणते हुकूम काढले? "प्रजेने पोटच्या पोराप्रमाणे वाढविलेली झाडे, ह्यांची फळे खबरदार कोणी तोडून घेईल तर? रयतेच्या गवताच्या काडीसही कोणी स्पर्श करता कामा नये!" असे हे गोरगरिबांचे राज्य शिवाजी महाराज करू पाहात होते. त्यांनी वतने–जहागिऱ्या कोणाला दिल्या नाहीत. शिवाजी महाराज काळाच्या फार पुढे होते. त्यांचे धोरण, त्यांची दूरदृष्टी पुढील लोकांत राहिली नाही. मराठ्यांचे राज्य झाले. परंतु आले नि गेले! असे का? भगव्या झेंड्याचा अर्थ आपण विसरलो. पहिले माधवराव पेशवे यांनी तो अर्थ ओळखला. परंतु ह्या हिऱ्याला आयुष्य कमी पडले. मराठ्यांचे साम्राज्य झाले, पण स्वराज्य गेले! जनतेला हे राज्य आपले आहे असे वाटेना. ठायी ठायी मातबर सरदार झाले व प्रजेचे सुख नाहीसे झाले.

भगव्या झेंड्याचा अर्थ बहुजनसमाजाचे हित. हा अर्थ जर हिंदू-महासभेच्या लोकांच्या ध्यानात येता तर कॉंग्रेसला त्यांनी विरोध केला नसता. कूळकायदा, कर्जनिवारण कायदा यांना त्यांनी विरोध तर नसताच केला, उलट "खोती नाहीशी करा, हे इनामदार, जमीनदार जर जनतेसाठी नसतील तर दूर करा, हे संस्थानिक प्रजेची पोटच्या पोराप्रमाणे चिंता वाहात नसतील तर त्यांना जगायला अधिकार नाही" असे त्यांनी म्हटले असते. परंतु भगव्या झेंड्याचा अर्थही न कळण्या-इतकी त्यांची बुद्धी कोती झाली आहे. जो जो श्रीमंतांची, संस्थानिकांची, खोतांची, जमीनदारांची, पिढीजाद प्रतिष्ठांची बाजू घेईल त्याने भगवा

झेंडा नाही हाती घेतला, त्याने तो वस्तुतः भस्म केला, असेच श्रीशिवाजी महाराज वरून म्हणतील.

आज आमचे पुष्कळ हिंदू संस्थानिक भगवा झेंडा सरकारी इमारतीं-वरून लावतात. ती का गंमत आहे? प्रजेला हक्क नाहीत, काही नाही. जनतेच्या उत्पन्नापैकी वाटेल तितका पैसा स्वतःच फस्त करतात. अशांना का भगव्या झेंड्याचा अर्थ कळला? त्याला खरोखर भगव्या झेंड्याचा अर्थ कळला– जो जनतेला स्वराज्य द्यावयास तयार झाला. आमच्या हिंदू-सभावाल्यांनी हा अर्थ हिदू संस्थानिकांना जरा समजावून द्यावा; हिंदू इनामदार, जमीनदार यांस समजावून द्यावा.

वसंता, खरी गोष्ट ही की तत्त्वनिष्ठा आमच्याजवळ नाही. आमच्या-जवळ खोटी प्रतिष्ठा, अहंकार, गर्व, घमेंड, हट्ट, दुराग्रह, एकांडे शिलेदार-पणा, साऱ्या गोष्टी शिल्लक आहेत. असो; आपण काय करणार? आपण श्रद्धेने मोठी राष्ट्रीय दृष्टी घेऊन जेवढे होईल तेवढे करण्याची खटपट करू या.

हिंदुस्थानात जवळ जवळ सातशे संस्थानिक आहेत. परंतु दहाबाराच संस्थाने मोठी आहेत. बाकी सारी लहान लहान संस्थाने! काठेवाडात तर संस्थानिकांचे पीकच आहे! जणू एकेक गाव म्हणजे संस्थानच. काही संस्थाने इतकी लहान आहेत की त्यांचे वर्षाला ९६ रुपयांचेही उत्पन्न नाही! ही संस्थाने म्हणजे केवळ अडगळ आहे. प्रगतीच्या मार्गातील धोंड आहे. हे स्वतः हालत नाहीत, इतरांना हालू देत नाहीत. ही लहान लहान संस्थाने कधीही स्वाश्रयी व स्वावलंबी होऊ शकणार नाहीत. त्यांना ना प्रजेला देता येईल शिक्षण, ना वाढवता येईल व्यापार. कशासाठी ही आहेत देव जाणे!

या संस्थानिकांनी युरोप–अमेरिकेच्या सफरी केल्या तरी जगातील वारा त्यांना कधी लागत नाही! हिंदी संस्थानिकांची टाइम्स वगैरेतून येणारी वर्णने वाचावी. अमक्या शर्यतीत यांचे घोडे नाचले, अमुक टीम घेऊन ते विलायतला गेले, अमक्या ठिकाणी ते नाच खेळले, अमक्या ठिकाणी त्यांनी शिकार केली, त्यांच्या लग्नात इतके हत्ती

होते, त्यांच्या खान्याच्या वेळेस साहेब होते, याशिवाय त्या वर्णनांतून काय असते? पतियाळाच्या महाराजांची घोडी म्हणे शर्यतीत पहिली आली नाही म्हणून ते संतापले व पेट्रोल तिच्या अंगावर ओतून त्यांनी ती जिवंत जाळली! असे हे संस्थानिक प्रजेची काय स्थिती करीत असतील बरे? गुराख्यांना वाघाच्या भक्ष्यस्थानी उभे करण्यात येते. वाघ वास घेत येतो. गुराखी डोळे मिटतो. परंतु राजेसाहेबांचा अचूक नेम जातो व वाघ मरतो! आणि वाघ न मरता तर गुराखी फाडला गेला असता ना? अशा ह्या संस्थानिकांच्या लीला आहेत! कोणाला सुंदर स्त्रियांचा शौक, कोणाला कुत्र्यांचा शौक. कोणाला कुस्त्यांचा नाद, कोणाला शर्यतीचे वेड. कोणी कबुतरे पाळतो, तर कोणी पोलो टीम्स् घेऊन युरोपात जातो. कोणा एका लहान संस्थानिकाने म्हणे कुत्र्यांसाठी बंगले बांधले आहेत! त्या कुत्र्यांना खारीक घालून खीर देण्यात येते! त्यांच्या प्रजेने मरून देवाजवळ कुत्र्याचा तरी जन्म मागावा, म्हणजे त्यांची हायहाय टळेल!

हे संस्थानिक म्हणजे हिंदुस्थानला डाग आहेत. हे जगभर जातात. परंतु या देशाचे ते हसे करतात. काही अपवाद आपण सोडून देऊ या. परंतु बहुतेक संस्थानिक केवळ जंगली व रानटी आहेत. त्यांना माणुसकी नाही, काही नाही. शिकार करावी, खान–पान–गान करावे, अनंगरंगात दंग व्हावे, असा ह्यांचा खाक्या आहे!

अशा ह्या संस्थानांतून चळवळ करणे कठीण आहे. या संस्थानांच्या मागे ब्रिटिश सत्ता आहे. ब्रिटिशांची बागनेटे संस्थानिकांचा चावटपणा चालू देत आहेत. ब्रिटिश साम्राज्याचा मुख्य राजा तो प्रजेच्या उत्पन्ना-पैकी कितीसा पैसा खर्च करतो? परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या राजाला जे हक्क नाहीत ते आमच्या संस्थानिकांना आहेत! त्यांना ना कोणी शास्ता ना पुस्ता.

हिंदुस्थान सरकारने मध्ये एक कारस्थान केले. लष्करी सुधारणा करण्याच्या निमित्ताने संस्थानातील लष्कर अद्यावत करण्याचे त्याने ठरविले. संस्थानिकांनी अर्थात मान डोलावली! ठिकठिकाणच्या

संस्थानांतील हे अद्ययावत लष्कर उद्या स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थानवर गोळ्या झाडण्यास उपयोगी पडेल! संस्थानिकांना स्वतःची चैन चालू ठेवावयाची आहे. तेव्हा ते स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यास सदैव तयारच राहतील!

संस्थानातून जर लोकशाहीची चळवळ झाली तर खुशाल गोळीबार होतात. ढेकानल वगैरे ओरिसा प्रांतांतील संस्थानातील कहाण्या ऐकून अंगावर शहारे येतात! नावा चालवणारे नावाडी मध्यरात्री झोपलेले असावेत. अशा वेळेस सरकारी अधिकाऱ्यांनी जावे. नाव काढायला ह्यांनी सांगावे. थंडी मी म्हणत असावी. ते नावाडी जरा कुरबुरत आहे असे दिसताच त्यांना गोळ्या घालाव्यात! असे प्रकार तिकडे झाले. हजारो लोक संस्थान सोडून बाहेर पडले. लोकशाहीसाठी आज लढणारे ब्रिटिश सरकार, त्याला ह्या गोष्टी कशा पाहवतात? म्हणे आमचे पूर्वीचे तहनामे आहेत. प्रजेवर वाटेल तसे जुलूम केले गेले तरी का शांत बसावयाचे? सत्याची चाड ब्रिटिशांना किती आहे हे माहीत आहे! त्यांच्या मनात आले तर ते आतून किल्ल्या फिरवू शकतात. संस्थानिक म्हणजे कळसूत्री बाहुली आहेत!

अशा कठीण परिस्थितीतही संस्थानांतून चळवळ सुरू झाली. काठेवाड, राजपुताना व मध्य हिंदुस्थानात इकडे स्वर्गस्थ मणिलाल कोठारी यांनी चळवळीचे बीज रोवले. काँग्रेसमधील पुष्कळसे व्यापारी ह्या संस्थानातील आहेत. त्यामुळे साहजिकच काँग्रेसच्या विचाराचे लोक तिकडे गेले. १९२० मध्ये, ३०–३२ मध्ये जे सत्याग्रह झाले त्या सत्याग्रहामध्ये अनेक संस्थानातून सत्याग्रही आले होते. ज्या संस्थानातून अधिक सत्याग्रही आले त्या संस्थानातील प्रजेची चळवळ वाढली.

काँग्रेसने स्वतः ही चळवळ हाती घेतली नाही. परंतु स्टेट काँग्रेस स्थापन होऊन तिच्या शाखा संस्थानातून सुरू झाल्या. काँग्रेसचा नैतिक पाठिंबा या चळवळीस होता परंतु ब्रिटिश सरकारशी लढण्यात आपण अप्रत्यक्षपणे संस्थानिकांशीही झगडत आहोत, ही गोष्ट काँग्रेस जाणून होती. ब्रिटिश हिंदुस्थानात जर स्वराज्य आले तर संस्थानात आलेच.

परंतु संस्थानातील प्रजेनेही चळवळ करणे जरूर होते. विधायक कामांच्या द्वारा सर्व जनतेत आधी विचार-जागृती करणे, जनतेशी संबंध जोडणे हा काँग्रेसचा मार्ग. त्या मार्गाने निरनिराळ्या संस्थानांतून काम सुरू झाले. अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषद स्थापन झाली. काँग्रेसने त्यासाठी आपले एक खातेही जसे काय सुरू केले. स्वतः जवाहरलाल या परिषदेचे सेक्रेटरी झाले. संस्थानांतील घडामोडी प्रसिद्ध होऊ लागल्या.

१९३७-३८ साली सर्व हिंदुस्थानभर कधी नव्हती अशी संस्थानी चळवळीची लाट आली. कारण ब्रिटिश हिंदुस्थानात प्रांतातून प्रांतिक सरकारे स्थापन झाली होती. त्यामुळे जवळच असलेल्या संस्थानी प्रजेलाही स्फूर्ती आली. त्या संस्थानातील सत्याग्रही चळवळ करू लागले. काँग्रेसकडे ठिकठिकाणाहून चळवळ सुरू करण्याची परवानगी मागण्यात येऊ लागली. गांधीजी विचार करीत होते. काठेवाड, म्हैसूर, जयपूर वगैरे ठिकाणी चळवळ सुरू झाली. त्रावणकोरकडेही चळवळ सुरू झाली हाती. निजाम स्टेट तर सर्वांत मागासलेले! तेथेही स्टेट काँग्रेसने सत्याग्रह सुरू केला. कोल्हापूर संस्थानातही चळवळ सुरू झाली. बडोद्यात हालचाल दिसू लागली. राजकोट तर पेटत चालले.

निजाम स्टेट काँग्रेसने सत्याग्रह सुरू करताच हिंदुमहासभाही तेथे सत्याग्रह करण्यास निघाली! आर्य समाजही उठावला. स्टेट काँग्रेसच्या चालकांनी बाहेरच्या या लोकांस पुनः पुन्हा प्रार्थिले, "तुम्ही येऊ नका. आमचा लढा आम्ही चालवू." परंतु स्टेट काँग्रेस म्हणजे शेवटी काँग्रेसचीच संस्था. त्यामुळे काँग्रेसचीच प्रतिष्ठा वाढेल आणि उद्या पुन्हा निवडणुकी आल्या तर आपल्याजवळ सांगायला काही तरी हवे की नको असे मनात येऊन हिंदुमहासभेने आपले पिल्लू त्यात घुसडले!

अशा वेळेस काँग्रेसने काय करावे? महात्माजींनी निजाम स्टेट सत्याग्रह थांबवावा असे सुचविले. गल्लत नको. प्रश्नांची गुंतागुंत नको आर्य समाजाला त्यांची समाजाची पूजा करण्याचे स्वातंत्र्य हवे होते. काँग्रेसचा लढा हा सर्व जनतेच्या नागरिक स्वातंत्र्याचा लढा होता. त्या

लढ्याला कोणतेही जातीय स्वरूप देऊ नये याला काँग्रेस जपत होती. आधीच काँग्रेसकडे कोणत्या दृष्टीने लोक पाहतात ते सर्वांना माहीत आहे, म्हणूनच तिला फार जपून पाऊल टाकावे लागते.

हिंदुमहासभेचा सत्याग्रह जातीय होता. कशावरून? असे कोणी विचारील तर त्याला उत्तर हे की जेव्हा कोल्हापूर संस्थानातील सत्याग्रह सुरू झाला तेव्हा हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांच्या व इतर श्री. भास्करराव जाधवांसारख्यांच्याही तारा गेल्या की, "छत्रपतींच्या राज्यात सत्याग्रह होता कामा नये!" छत्रपतींच्या राज्यात अन्याय होत असले तरी सत्याग्रह नाही होता कामा, परंतु निजामाच्या राज्यात मात्र झाला पाहिजे, असे म्हणणाऱ्यांची ही चळवळ केवळ जातीय व एकांगी होती हे का सांगायला पाहिजे?

बॅ. जिना म्हणतील काश्मीरात चळवळ करा व हिंदुमहासभावाले म्हणतील की फक्त निजाम स्टेटमध्ये करा. परंतु काँग्रेस म्हणेल "परिस्थिती, वेळ, तयारी हे सारे पाहून जेथे जेथे अन्याय असेल तेथे तेथे चळवळ करा. जेथे आपले संबंध आहेत, पुढाऱ्यांचे संबंध आहेत तेथे आपण आधी चळवळ करू या. जमनालालजी जयपूरला जावोत. मी राजकोटला जातो." असे धोरण गांधीजींनी सुरू केले. कारण इतर संस्थानांतल्या प्रश्नांपेक्षा ह्या संस्थानांतील प्रश्न सोडविणे जरा सोपे. कारण ही संस्थाने लहान, एकजिनसी आणि चळवळ करणारेही मूळचे त्याच संस्थानचे.

राजकोटला स्वतः महात्माजी गेले. परंतु राजकोटचा प्रश्न रंगला. सारे हिंदुस्थानचे राजकारण तेथे आले. हिंदुस्थानच्या राजकारणात ज्याप्रमाणे काही मुसलमान, काही आंबेडकरवाले अडथळा आणतात तसे राजकोट येथेही झाले. जिनाही तेथे ठाण देऊन बसले! आंबेडकरही तेथे धावले! आणि हिंदुस्थानात हिंदू-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य हे भेद निर्मून हिंदुस्थानची गुलामगिरी कायम ठेवणारे तेथेही लोकांचा प्रश्न सोडविण्याच्या आड आले! सरकारी एजंटांनीही नाना कारवाया केल्या. महात्माजींनी उपवास केला. राजकोटचा तो सत्याग्रही इतिहास अति दुःखदायक आहे.

आमच्या महाराष्ट्रातील काँग्रेसद्वेष्टे जातीय लोक म्हणू लागले, "महात्माजी, निजाम स्टेट सत्याग्रह बंद करतात. परंतु राजकोटचा प्रश्न प्राणांतिक उपवासाने धसास लावू पाहतात. कारण राजकोट गुजरातमधील आहे. गुजरातचे नाक त्यांना वर ठेवायचे आहे!" किती क्षुद्र व मत्सराने भरलेले हे विचार! अरे बाबा, तू जातीय घोडे दामटले नसतेस तर निजाम स्टेट सत्याग्रह बंद झाला नसता. आमचे बाहेरचे हिंदुमहासभेचे सत्याग्रही औरंगाबादला जात व गिरफदार होत. तेथील जनतेला काय चालले आहे याचा पत्ताही नाही! तात्यासाहेब केळकरांनी ही गोष्ट लिहून जाहीर केली की, "आपण जाऊन गिरफदार होतो पण तेथील जनतेत काय?"

महात्माजींनी सत्याग्रह थांबविला, परंतु पुढील सत्याग्रहासाठी जनतेत विधायक कार्याच्या द्वारा जागृती करण्यास सांगितले. हिंदुमहासभेचा सत्याग्रह थांबला. डॉ. मुंजे यांनी निजामसाहेबांची पाठही थोपटली! परंतु काँग्रेसची पुन्हा सत्याग्रहाची तयारी आहे.

हिंदुमहासभेचा सत्याग्रह निजाम संस्थानातील अन्यायाच्या चिडीने नाही सुरू झाला, तर काँग्रेसला नामोहरम करण्यासाठी तो सुरू करण्यात आला होता. निवडणुकीच्या दृष्टीने तो सुरू केला गेला होता. नाशिक वगैरे ठिकाणी त्यांच्या पुढाऱ्यांनी ही गोष्ट सांगितली. ह्या हिंदू-महासभावाल्यांना निजामी प्रजेची तळमळ नव्हती. उद्याच्या निवडणुकींची त्यांना तळमळ होती, व कोठून तरी थोडे भांडवल त्यांना जमवायचे होते. जो त्याग केला, जे हाल त्यांनी सोसले त्याला यामुळे कमीपणा येतो! तेथील लोकांना तारण्यापेक्षा काँग्रेसला मारण्यासाठी तो सत्याग्रह होता. आर्यसमाजही त्या सत्याग्रहात होता. परंतु त्यांनी काँग्रेसला शिव्याशाप दिले नाहीत. काँग्रेस राजकीय संस्था आहे असे ते म्हणत. सोलापूरला सत्याग्रहींच्या ज्या सभा होत त्यांत कोणा हिंदू-सभावाल्याने काँग्रेसवर तोंडसुख घेतले तर आर्यसमाजी सत्याग्रही रागावत! आर्यसमाजाचे प्रमुख श्री. गुप्ताजी मध्यप्रांतातील असेंब्लीचे काँग्रेसप्रणीत अध्यक्ष होते. ते काँग्रेसचे सेवक होते. ते महात्माजींचा

सल्ला घेत. त्यांची दृष्टी कशी व महाराष्ट्रीय हिंदुमहासभावाल्यांची कशी? देवाला माहीत.

महात्माजींचे कोठेही आतडे गुंतले नाही. "राजकोटचा प्रश्न मला सोडवता आला तर साऱ्या काठेवाडचा सुटेल. त्याचा परिणाम इतर राजेरजवाड्यांवर होईल" असे त्यांना वाटत होते. जमनालालजींना जयपूरला पाठविण्यात हाच हेतु. सोपे सुटण्यासारखे प्रश्न आधी हाती घेऊ या. ते सुटले तर एकंदर संस्थानिकांचा प्रश्नही सोडविण्यास सोपे जाईल. ज्याप्रमाणे केसांची गुंतागुंत सोडवायची असली तरी एकदम खसकन फणी खोवीत नाहीत. मुठीमध्ये थोडे थोडे केस घेऊन त्यांची गुंतागुंत सोडवीत मग वरपासून खालपर्यंत बायका केस विंचरतात. त्याप्रमाणे राजकोट, जयपूर वगैरे संस्थाने आधी घेऊ या. बघू या काय होते ते. मग मोठी संस्थाने घेऊ. तोपर्यंत विधायक कार्यक्रम तेथे होऊ दे. जनता जागी होईल. काय चालले आहे ते तिला कळेल. पुढील सत्याग्रह अधिक जोराचा होईल. अशी माझ्या थोर काँग्रेसची निर्मल व उदार दृष्टी. परंतु गैरसमज पसरविणे हाच ज्यांचा धर्म, हिंदुस्थानात वितुष्टे वाढविणे, वातावरण दूषित करणे, ५०-६० वर्षांच्या तपश्चर्येने उभ्या राहिलेल्या थोर काँग्रेसला राक्षसी महत्त्वाकांक्षेने खाली ओढणे हाच ज्यांचा आनंद, स्वतःचा सवता सुभा करून तेथे मिरविण्यातच ज्यांचा पुरुषार्थ, ते गांधीजी व काँग्रेसवर हीन आरोप करतील यात नवल ते काय?

असो. काँग्रेसची भूमिका वसंता तू ध्यानात घे. काँग्रेसला सर्व संस्थानांचा प्रश्न सोडवायचा आहे. जे फेडरेशन ब्रिटिश सरकार लादू पहात होते त्यात संस्थानी प्रजेने निवडलेले प्रतिनिधी आले तरच आम्ही तेथे बसू. असे काँग्रेसने स्वच्छ सांगितले होते. अर्थात फेडरेशन तर धिक्कारायचेच होते. परंतु जी कोणती संघटना उद्या काँग्रेसकडून स्वीकारली जाईल तीत संस्थानी प्रजेने निवडलेले प्रतिनिधी असले पाहिजेत. काँग्रेसने असा ठराव केल्यामुळे संस्थानी प्रजेचा प्रश्न तिने अलग ठेविला आहे असे नाही. आज आपली शक्ती ती तेथे पणाला

लावू इच्छित नाही. झाडांच्या फांद्या तोडण्यातच वेळ का दवडा ? मुळावरच घाव घालू या. ब्रिटिश सत्ताच येथून नाहीशी करू या. मग संस्थानिक कोठे जातात ?

वसंता, गांधीजी इतकी वर्षे सेवा करीत आहेत. त्यांना आता या भागाबद्दल, त्या भागाबद्दल आसक्ती नाही रे उरली. अहमदाबाद सोडून ते पूज्य विनोबाजींजवळ येऊन बसले. वर्ध्याला आले. त्यांना का आसक्ती आहे ? मागे एकदा आंध्र प्रांतात महात्माजींना एका आंध्र चित्रकाराने हाती काढलेली त्यांची तसवीर दिली. महात्माजी त्याला म्हणाले, " गड्या, कोठे लावू ही तसवीर ? आता हा देहही गळावा असे मला वाटत आहे. " वसंता, तुकारामांनी म्हटले आहे—

" उद्योगाची धाव बैसली आसनी । पडले नारायणी मोटळे हे । "

तसे आता महात्माजींना वाटते. तरीही ते सेवा करीतच आहेत. कोठली रे त्यांना आसक्ती ? त्यांच्याइतका संयमी व वासना–मोह जिंकलेला दुसरा कोण या हिंदुस्थानात दाखविता येईल ? त्यांचे मार्ग सारे पटणार नाहीत. त्यांची मते पटणार नाहीत. परंतु त्यांच्या हेतूची शुद्धता संशयू नये. क्षुद्र आरोप त्यांच्यावर करू नयेत " प्रतिबध्नातिहि श्रेयः पूज्यपूजा व्यतिक्रमः– " पूज्याची पूजा न करू तर कल्याण होणार नाही. " असे कविकुलगुरू कालिदास सांगत आहे. महाराष्ट्रातील तरुण ते ऐकतील का ?

तुझा

**श्याम**

## पत्र तेरावे

# खरी गीर्वाण वाणी

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

आज तुला निराळ्याच गोष्टीविषयी लिहिणार आहे. राष्ट्रभाषेविषयी आज थोडे सांगणार आहे. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी; त्याप्रमाणे स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या हिंदुस्थानला सर्व राष्ट्राची अशी एक भाषा असणे जरूर आहे. त्या त्या प्रांतातून प्रांतीय भाषा असतीलच, परंतु अखिल भारतीय भाषा हवी.

काँग्रेसचे प्रथम प्रथम सारे कामकाज इंग्रजीतून चाले. इंग्रजी बोलणारे व इंग्रजी जाणणारे यांचा मेळावा तेथे जमे. बहुजनसमाज या सर्व गोष्टींपासून अलग राही. बंगालमधील देशबंधू बंगालबाहेर पडले की त्यांना इंग्रजीची कास धरावी लागे. बाबू विपिनचंद्र पाल यांनी स्वदेशीवरील व्याख्यानांनी मद्रासचा समुद्रकिनारा दणाणून सोडला. परंतु इंग्रजी वक्तृत्वाने!

महात्मा गांधींच्या लक्षात ही गोष्ट आली. सारी जनता काँग्रेसशी एकरूप करायची असेल तर काँग्रेसचा कारभार सर्व जनतेला समजेल अशा प्रकारे चालला पाहिजे. राष्ट्राचे हृदय एक होण्यासाठी एक भाषा हवी. एक हिंदी सोडली तर सर्व हिंदुस्थानची होण्यास सोपी अशी दुसरी कोणती भाषा आहे?

हिंदुस्थानातील बऱ्याचशा प्रांतिक भाषा संस्कृतोद्भव आहेत. हिंदी व उर्दू यांच्यात पुष्कळ समान शब्द आहेत. संस्कृतोद्भव भाषा बोलणाऱ्यांस हिंदी समजावयास कठीण नाही. प्रश्न होता तो द्रविडी प्रांतांचा. कन्नड,

तमिळ, तेलुगू, मल्याळम या भाषा बोलणाऱ्यांना हिंदी समजणे कठीण. म्हणून महात्माजींनी प्रथम त्या प्रांतांतच प्रचार सुरू केला. १९१७ मध्ये इंदूरच्या हिंदी साहित्य संमेलनाचे महात्माजी अध्यक्ष होते. अध्यक्ष होण्यापूर्वी महात्माजींनी सांगितले, "हिंदी प्रचारासाठी एक लाख रुपये जमत असतील तर मी अध्यक्ष होतो." एक लाख रुपये मिळाले. हिंदी प्रचार समिती स्थापन करण्यात आली. दक्षिण हिंदुस्थानात गाजावाजा न करता तिचे काम सुरू झाले, आणि हजारो लाखो लोकांनी हिंदीच्या परीक्षा दिल्या.

उद्याची सर्व राष्ट्राची म्हणून जी हिंदी भाषा होईल तिच्यात इतर प्रांतीय भाषांतील शब्दांचीही भर पडणार. मूळची हिंदी अधिक व्यापक व संग्राहक होईल. ती आम जनतेची भाषा होईल. ती सबकी बोली होईल. प्रांतीय हिंदी भाषा 'राष्ट्रभाषा' या संज्ञेस पोचेल.

भाषेचे काम हृदयाची हृदयास ओळख करून देणे हे आहे. त्या त्या प्रांतीय भाषांनीसुद्धा अखिल हिंदुस्थानची एकता निर्मिण्यासाठी प्रयत्न करायला हवा. आज आपण अखंड भारत, अखंड भारत असे तोंडाने नेहमी बोलतो. परंतु या भारताची आपणास ओळख आहे का? गुजराती भाषेत, बंगाली भाषेत, उर्दू भाषेत, हिंदी भाषेत, कन्नड, तमिळ, तेलुगू, मल्याळम इत्यादी भाषांतून जे वाङ्मय आहे त्याची ओळख प्रांतीय भाषांनी आपापल्या लोकांस करून दिली पाहिजे. महाराष्ट्रातील लोकांस प्रेमचंद, शरच्चंद्र व रवीन्द्रनाथ थोडेसे माहीत आहेत. परंतु दाक्षिणात्यातील कोण माहीत आहेत? गुजरातमधील नर्मद, मेघाणी, खबरदार, कलापी, न्हान्हालाल वगैरेंची कितीशी माहिती आहे?

मी एकदा बडोद्याला गेलो होतो. तेथील कॉलेजमधील 'मराठी मंडळा'तर्फे माझे व्याख्यान होते. मी तेथील मुलांस म्हटले, "तुम्ही सीमेवर आहात. येथे गुजराती व मराठी यांचा संगम आहे. येथील तुम्हा लोकांस गुजराती समजते. येथील मराठी बोलणाऱ्यांचे हे काम आहे की त्यांनी गुजरातच्या आत्म्याची, गुजरातच्या हृदयाची ओळख महाराष्ट्रास करून द्यावी. हे काम तुम्ही न कराल तर कर्तव्यास

विसरलेत असे होईल. बेळगावच्या बाजूस राहणाऱ्या मराठी भाषेच्या भक्तांनी कर्नाटकचे हृदय मराठीला कळवावे. विश्वभारतीत वगैरे जाणाऱ्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी बंगाली आत्मा आम्हांला द्यावा. अशा रीतीने त्या त्या प्रांतीय भाषांनी आपापल्या भाषेतून अखिल भारताची ओळख आपल्या लेकरांस करून द्यावी. आपण कलशाची पूजा करताना म्हणतो, 'येथे गंगा, सिंधू, नर्मदा, तापी सर्व नद्या आहेत.' माझ्या घरातील त्या लहानशा तांब्यात मी सर्व हिंदुस्थानच्या नद्या पाहतो त्याप्रमाणे माझ्या भाषेत मला सर्व भारताचा आत्मा दिसला पाहिजे. परंतु तो आज कोण दाखवीत आहे?"

मी १९३०-३१ मध्ये त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होतो. रोज रात्री प्रार्थना झाल्यावर आम्ही काही लिहून वाचीत असू. एके दिवशी माझ्या एका नवीन मल्याळी मित्राला मी म्हटले, "तू काही लिही. तू इंग्रजीत लिही. मी त्याचे मराठीत भाषांतर करून वाचीन." त्या मित्राचे नाव व्यंकटाचलम्. मोठा आनंदी तरुण. तो बी. एस्सी. झालेला होता. तो चांगले गात असे. त्याला मल्याळी, तमिळ, तेलुगू तिन्ही भाषा येत. आणि हल्ली त्याने हिंदीचाही अभ्यास केला आहे. तो हिंदी प्रचारक म्हणूनही काही दिवस काम करीत होता व त्याचे हिंदीतून मला पत्र आले होते. व्यंकटाचलम्‌ची मला आठवण होते. त्या वेळेस वीस-एकवीस वर्षांचे फक्त त्याचे वय होते. त्याने शेवटी इंग्रजीत एक लेख लिहिला. कोणत्या विषयावर लिहिला बरे? 'मलबारकडील एक दिवस!' हा विषय. पहाटे उठल्यापासून रात्री निजेपर्यंत मल्याळी कुटुंबाचा दिवस कसा जातो त्याचे हृदयंगम वर्णन त्याने केले होते. मी मराठी अनुवाद करून वाचला. "पहाटे बायका उठतात, चूल सारवतात, तुळशीपुढे सारवतात. मग दूध काढतात. कॉफी तयार होते. सुना भांडी घासतात. स्नाने झाल्यावर तळ्यावर धुणी धुवावयास जातात. मुलांची शाळेत जाण्याची घाई होते" वगैरे ते वर्णन होते. तो निबंध वाचल्यावर आमचे महाराष्ट्रीय म्हणाले, "हे आपल्याकडच्या-सारखेच आहे!" त्या एका निबंधाने महाराष्ट्र एकदम मलबारच्या

जवळ गेला! महाराष्ट्रातील शारदा नाटकासारखेच नाटक तेलगू भाषेत आहे. या गोष्टी कळल्या म्हणजे सारे हिंदुस्थान एक आहे असे वाटते.

प्रान्तिक भाषांनी हे काम केले पाहिजे. परंतु त्याबरोबरच सर्व राष्ट्राची अशी एक भाषा हवी. म्हणून राष्ट्रभाषेवर काँग्रेस जोर देत आहे. काँग्रेसच्या बैठकांतील भाषणेही आता बरीचशी हिंदीतून होतात. काँग्रेसच्या दृष्टीने राष्ट्रभाषेचा प्रचार करणारे सांगत असतात की, आपण जी हिंदी राष्ट्रभाषा करू इच्छितो ती बहुजनसमाजाची असावी. आज हिंदी म्हणून जी समजली जाते तिच्यातही अनेक प्रकार आहेत, असावयाचेच. ती जी हिंदी तिला अधिक व्यापक करू या असे काँग्रेसचे म्हणणे. हिंदी भाषाभिमान्यांनी यापुढे हिंदीला असे स्वरूप द्यावे की, ते सर्वांना समजेल. काही हिंदी भाषाभिमान्यांस या गोष्टीचा राग येतो. ही हिंदीवर कुरघोडी आहे, हिंदीचा आत्मा नष्ट होईल, असे त्यांना वाटते! हिंदी अधिक लोकांना समजू लागल्याने हिंदीचा आत्मा कसा नष्ट होणार ते समजत नाही!! ते पूर्वीचे व आतापर्यंतचे हिंदी वाङ्मय का फुकट जाणार आहे? ते जनता वाचीलच. परंतु यापुढचे वाङ्मय जरा निराळे पाहिजे. ज्ञानेश्वरांची भाषा निराळी आहे म्हणून का ती खेड्यापाड्यातून वाचली जात नाही? हिंदीचे विशाल स्वरूप होऊन हिंदी जर हिंदुस्थानी झाली, बहुजनसमाजाची झाली तर त्यात काय नुकसान आहे? शिवाय ज्यांना हिंदीचे प्रौढ व संस्कृतप्रचुर स्वरूपच ठेवावयाचे असेल त्यांना कोण प्रतिबंध करणार आहे? प्रतिष्ठित बोलतात तीच भाषा प्रौढ असे मानले जाते. अद्याप सर्वत्र हा प्रतिष्ठेचा अहंकार कायम आहे, बहुजनसमाजाकडे कोणाचेच लक्ष नाही.

बहुजन बोलतात ती भाषा का कम-दर्जाची? आमच्या मराठी नाटकातून पूर्वी जरी विनोद करायचा झाला तरी एखादे खेडवळ पात्र आणून "व्हय, असं म्हनतुस व्हय!" वगैरे त्याच्या तोंडी घालून हशा पिकवण्यात येत असे! ज्याच्या श्रमावर आपण जगतो त्याच्या बोलण्याचे हसे करणारे आम्ही पांढरपेशे केवळ पापात्मे आहोत!

हिंदी ही सबकी बोली होऊ दे. त्याने का पूर्वीचे साहित्य नष्ट होणार आहे? पूर्वीचे राहील आणि नवीन बहुजनसमाजाच्या हाती जाईल. आपले वाङ्मय जास्तीत जास्त लोकांच्या हाती जावे असे खऱ्या साहित्यसेवकास वाटत असते. बहुजनसमाजास समजेल असे हिंदीचे स्वरूप करा, असे गांधीजी व खरे काँग्रेसवादी म्हणतात. परंतु बहुजन-समाजास कचरा मानणाऱ्या लोकांना ते कसे पटावे? आमच्या या दुर्दैवी देशात राष्ट्राची छकले सांधण्यासाठी कोणतीही गोष्ट निघाली की तेथे अहंकारी लोक येऊन मोडता घालतात! सर्वांना समजणारी अशी जी भाषा होईल ती हिंदू-मुसलमान सर्वांसच समजेल. परंतु मुसलमान म्हणू लागले, हिंदी अशी असावी की जिच्यात उर्दू शब्द पुष्कळ असतील. आमच्यातील काही हिंदू म्हणू लागले की, संस्कृतोद्भव शब्दच तिच्यात अधिक असावेत. काँग्रेसचे म्हणणे असे की, ती हिंदू-मुसलमान दोघांसही समजेल अशा स्वरूपाची असावी.

लिपी उर्दू लिहा वा नागरी लिहा, परंतु भाषा अशी वापरा की, जी सर्वांना समजेल. परंतु मुसलमानांतील आग्रही लोक हिंदूंना न समजणारे बोलणार व हिंदूंतील आग्रही मुसलमानांस न समजणारे बोलणार! परंतु परिणाम येथेच थांबत नाही. हिंदूंना न समजणारे असे उच्च उर्दू मुसलमान वक्ते बोलू लागले की, ते बहुजन मुसलमानांसही समजत नाही. आणि मुसलमानांस न समजणारे संस्कृतप्रचुर हिंदी हिंदू बोलतील तर ते हिंदूंसही समजणार नाही. हिंदू व मुसलमान यांचा जो संमिश्र बहुजनसमाज आहे तो अशी भाषा बोलतो की, जी दोघांसही समजते. परंतु आमचे प्रतिष्ठित वर्ग उभयविध बहुजनसमाजापासून दूर राहू इच्छितात! भाषा ही आपले हृद्गत दुसऱ्याला कळविण्यासाठी आहे, परंतु ही साधी गोष्टही अभिमानाने अंध झालेल्यांच्या लक्षात येत नाही.

राष्ट्राध्यक्ष अबुल कलम आझाद पूर्वी उच्च उर्दू बोलत. परंतु बहुजन-समाजाचा विचार त्यांच्या लक्षात येताच ते लोकांस समजेल असे बोलण्याची खटपट करू लागले. आचार्य नरेंद्र देव पूर्वी संस्कृतप्रचुर हिंदी बोलत, परंतु आता त्यांची हिंदी बहुजनसमाजाची होऊ लागली आहे.

बहुजनसमाजाचा विचार करील त्याला हे धोरण स्वीकारावे लागेल. स्वराज्य हे बहुजनसमाजासाठी आहे, पलंगपंडितांसाठी, प्रतिष्ठित पंडितांसाठी केवळ नाही.

ईश्वराने हास्याची व अश्रूंची अशी विश्वव्यापक भाषा निर्मिली. अश्रू हे संस्कृत नाहीत, उर्दू नाहीत. अमुक मनुष्य संस्कृतमध्ये रडला, इंग्रजीत रडला, असे आपण म्हणत नाही! अमुक मनुष्य मराठीत हसला, अमुक कानडीत हसला असे होत नाही! मनुष्याचे अश्रू सर्वांना समजतात. त्याचे स्मित सर्वांना समजते. मनुष्य रडत आहे त्या अर्थी तो दुःखी आहे. मनुष्य हसतमुख आहे त्या अर्थी तो समाधानी आहे, असे आपण जाणतो. देवाने सर्वांसाठी दिले, परंतु माणसाने ह्यात भेद पाडले, भांडणे निर्मिली!

वसंता, आपला हा देश चाळीस कोटींचा आहे. आपण मोठ्या देशात राहतो. मोठ्या देशात राहणाऱ्यांवर जबाबदाऱ्याही फार असतात. आपणास एक राष्ट्रभाषा शिकूनच भागणार नाही. इतर भाषांतीलही थोडे थोडे ज्ञान पाहिजे. थोडे गुजराती, थोडे कानडी, थोडे बंगाली असे केले पाहिजे.

महात्माजींजवळ ही दृष्टी आहे. महात्माजी पेशावरकडे गेले तर अधिक उर्दू शब्द वापरतात. ते काशीला बोलले तर संस्कृत शब्द अधिक असलेली हिंदी बोलतील. बंगालमध्ये गेले तर तेथील लोकांजवळ दोन चार तरी बंगाली वाक्ये बोलतील. महात्माजींनी तेलुगू, तमिळ वगैरे भाषांतीलही काही शब्द पाठ करून ठेवले आहेत. त्या त्या प्रान्तात ते गेले तर थोडे थोडे त्यांचे शब्द ते वापरतात. येरवड्याच्या तुरुंगात असताना हा थोर राष्ट्रपिता मराठी शिकू लागला! मनाचे श्लोक पढू लागला. महात्माजींच्या पत्रात 'सेवाग्राम वर्धा—होकर' असे नागरी लिपीत असते व उर्दू लिपीतही असते. उर्दू व नागरी दोन्ही लिप्या हिंदी मनुष्यास यायला हव्यात असे एकदा ठरले ना, मग महात्माजींच्या पत्रावर तसे दोन्ही लिपींत लिहिलेले आढळेल. किती ही राष्ट्रचिंता! हिंदुस्थान हे अखंड राष्ट्र आहे. सारे प्रान्त भाऊ भाऊ, हिंदू-मुसलमान एकत्र राहू.

हे ध्येय रात्रंदिवस डोळ्यापुढे ठेवून बारीकसारीक गोष्टीतही लक्ष देऊन वागणारा महात्माजींसारखा दुसरा कोणता महापुरुष या देशात आहे? माझे डोके तर या सेवेच्या हिमालयासमोर रात्रंदिवस नमते. परंतु राज-गोपालाचारी एकदा म्हणाले, "देवाने महात्माजींची थोर देणगी आपणाला दिली, परंतु आपणच तिला पात्र नसू कदाचित!"

वसंता, आशुतोष मुकर्जींचे नाव तुला माहीत आहे का? आशुतोष म्हणजे बंगालचे एक अति थोर, महान् सत्पुत्र. कलकत्त्याचे विद्यापीठ ही त्यांची निर्मिती. त्यांनी बंगालमध्ये सर्वांगीण ज्ञानविकासाला चालना दिली. त्यांची बुद्धी असामान्य होती. वयाच्या सतराव्या वर्षीच गणितशास्त्रातील असे काही सिद्धान्त त्यांनी सोडविले, जे रँगलरच्या परीक्षेस असतात! डॉ. परांजपे म्हणाले, "हिंदुस्थानातील एका गणितज्ञाच्या सिद्धान्तांचा आम्हांस अभ्यास करावा लागे व त्याचा आम्हांस अभिमान वाटे!" 'आशुतोष सिद्धान्त' असे त्या सिद्धान्ताचे नाव आहे.

एकदा हे सर आशुतोष काही कामासाठी मद्रासकडे गेले होते. एका मित्राकडे उतरले होते. त्या मित्राने आपल्या मुलांना सांगून ठेवले होते की, ते बडे पाहुणे आले आहेत, त्यांना त्रास देऊ नका! तो मित्र बाहेर गेला. आशुतोष काम करीत होते. ती मुले दारात येत, डोकावत व जात! आशुतोष दिसायला उग्र दिसत. त्यांचा रंग काळा होता. मिशा झुबकेदार होत्या. डोळे विजेप्रमाणे तेजस्वी होते. त्या मुलांना वाटे कोण आला आहे वाघोबा! परंतु तो बंगाली वाघ प्रेमळ होता. ती मुले जवळ बोलवावी, त्यांच्याजवळ बोलावे, हसावे, असे आशुतोषांच्या मनात येई. परंतु मुलांजवळ कोणत्या भाषेत बोलणार? त्यांना तमिळ, तेलुगू थोडीच येत होती? आशुतोषांचा मनःसंतोष नष्ट झाला. ते खिन्न होऊन बसले. त्यांचा मित्र बाहेरून आला. आशुतोष खिन्न आहेत असे पाहून त्या मित्राने विचारले, "मुलांनी त्रास दिला, होय ना?" आशुतोष म्हणाले, "गड्या तुझ्या मुलांनी नाही त्रास दिला. परंतु तुझी मुले दारातून डोकावत; मी

त्यांना हाक मारू शकलो नाही. त्यांच्याजवळ दोन शब्द मला बोलता आले नाहीत. मला वाईट वाटले. दोनचार वाक्ये तुमच्या भाषेतील येत असती तर किती बरे झाले असते ?"

आशुतोषजींचे हे उद्‌गार आपण लक्षात ठेवू या. कलकत्ता विद्यापीठात एम्. ए. च्या परीक्षेत भाषाविषय घ्यायचा असेल तर बंगालच्या बाहेरचीही कोणती तरी एक भाषा आवश्यक आहे! या मोठ्या देशात राहणाऱ्यांवर फार मोठी जबाबदारी आहे. परंतु आपणाला सारी थट्टाच वाटत आहे. देशाचा विचार दूर ठेवून केवळ फाजील अभिमानाचे पूजक होऊन आपण बसलो आहोत. जर दुःखीकष्टी बहुजनसमाज आपल्या डोळ्यासमोर येईल तर आपण हे क्षुद्र वाद माजवीत बसणार नाही.

महाराष्ट्रातील पूर्वीच्या साधुसंतांनी हिंदुस्थानीत रचना केली आहे. तुकाराम महाराजांचे हिंदी अभंग आहेत. रामदास स्वामींनी हिंदीत काव्यरचना केली आहे. साधुसंतांसमोर सर्व भरतखंड असे. ते पायी दूरवर प्रवास करीत. उत्तरेकडचे रामानंद वगैरे दक्षिणेकडे येत, तर दक्षिणेकडचे साधू उत्तरेकडे जात. नामदेवांचे अभंग शिखांच्या धर्मग्रंथात जाऊन बसले. कबिराचे दोहरे, मीराबाईची गाणी, गोपीचंदाची गाणी हिंदुस्थानभर विनपंख उडत गेली! साधुसंत वादविवाद करीत बसले नाहीत. श्रीशिवाजी महाराजांनी मराठीत शिरलेल्या उर्दू शब्दांबद्दल संस्कृत शब्द तयार करण्यासाठी कोशकारास सांगितले. रघुनाथपंथ अमात्यांनी तसा कोश बनविलाही, परंतु शिवाजी महाराजांनी स्वराज्य मिळविल्यावर तो उद्योग आरंभला. आणि तो प्रांतिक भाषेपुरता होता. आजचा काळ निराळा. मुसलमान आता येथले झाले. शेजारी शेकडो वर्षे राहिले. आता मुद्दाम खोडसाळपणा करणे म्हणजे देशद्रोह आहे.

मागे मला एक गोष्ट कळली होती. साताराची वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी आहे ना, तिच्यात एक कारकून होते. त्यांना मुसलमानांची फार चीड. ते शहराची नावेच बदलू लागले. सातारा जिल्ह्यातील इस्लामपूर शब्द त्यांना सहन होईना! त्यांनी ते नाव बदलून 'ईश्वरपूर' असे नाव आपल्या मनात ठेवले. अहमदनगरचे असेच

काही दुसरे नाव त्यांनी केले. आणि गंमत ही की, पुढे पत्त्यावरही त्यांनी ईश्वरपूर वगैरे ती नवीन नावे लिहिली! ती पत्रे परत आली!! व्यवस्थापकांच्या टेबलावर ती परत आलेली पत्रे पडली. व्यवस्थापकाने ते सारे पाहिले. त्याने त्या कारकुनास बोलावले व विचारले. ते कारकून म्हणाले, "माझ्याने इस्लामपूर शब्द लिहवेना, मी काय करू?" मॅनेजर म्हणाले, "हा ध्येयवाद ठीक आहे. परंतु अशाने कंपनी चालणार नाही. तुम्ही ध्येयवाद जरा गुंडाळून ठेवून शहरांची नावे सध्या आहेत तशीच ठेवा!"

इतका हा मुस्लिमद्वेष करून आम्ही काय मिळविणार? मुसलमानांच्या श्वासोच्छ्वासाची हवा पृथ्वीवरील हवेत मिसळते. यासाठी अशा द्वेषी लोकांनी पृथ्वी सोडून दुसरीकडे वस्ती केली तर बरे! नाही तर मुसलमानांचे तरी पृथ्वीवरून उच्चाटन करायला हवे. परंतु ते कसे होणार. द्वेषाने मनुष्य किती अंध होतो ते यावरून दिसेल. आणि ईश्वरपूर तरी नाव का ठेवायचे? दुसरे एखादे द्राविडी नाव शोधू या की. कारण आपणही या देशात बाहेरूनच आलो आहोत!

अशा या बिकट परिस्थितीतून आपणास जावयाचे आहे. या देशाच्या मंगल भवितव्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांची आज कसोटी आहे. मुस्लिम लीग, हिंदुमहासभा व इतर अनेक पक्षोपपक्ष यांच्या चिखलातून राष्ट्राचा गाडा काँग्रेसला ओढावयाचा आहे. वाद करणारे वाद घालोत. संस्कृतप्रचुर हिंदी हवी की उर्दूप्रचुर हवी—करा लठ्ठालठ्ठी! आपण नीट अभ्यास करू या. आपण बहुजनसमाजाचे उपासक होऊ या.

आर्य लोक मध्य आशियाच्या बाजूस असताना आजच्या संस्कृताहून जरा निराळी अशी एक अति प्राचीन संस्कृत भाषा बोलत. पुढे त्या आर्यांची एक शाखा हिंदुस्थानात आली व एक इराणात राहिली. हिंदुस्थानात आले त्यांच्या भाषेस संस्कृत नाव मिळाले. इराणात राहिले त्यांच्या भाषेस पेहेलवी असे नाव मिळाले. पुढे अरबी मुसलमानांनी इराण जिंकले तेव्हा पेहेलवी भाषेत अरबीचे मिश्रण होऊन पेहेलवीची पर्शियन भाषा बनली. ही पर्शियन भाषा मुसलमानी सत्तेबरोबर हिंदु-

स्थानात आली. हिंदुस्थानातील व्रज भाषा व ही पर्शियन भाषा मिळून आजची उर्दू बनली. मुसलमानांच्या लष्करात शेकडो ठिकाणचे लोक असत. या सर्वांनी एक भाषा तयार केली. ही बाजारात, लष्करात सुरू झाली. बहुजनसमाजाची ही भाषा उर्दू म्हणून संबोधली जाऊ लागली. हिला 'हिंदुस्थानी' असेही नाव दिलेले आढळते. आपल्या हिंदू-मुस्लिम पूर्वजांनी संस्कृतप्रचुर व पर्शियन प्रचुर अशी भाषा सोडून आम जनतेला समजेल अशी नवी भाषा निर्माण केली. तिला नाव उर्दू द्यावयाचे की हिंदी? काँग्रेस म्हणते, 'हिंदुस्थानी' नाव द्या. ही हिंदुस्थानी भाषा सर्वांची होईल. पूर्वजांच्या त्यागाने निर्माण झालेली ही हिंदुस्थानी आपण वाढवू या. उर्दू ही संस्कृतशी संबद्ध भाषा आहे. शेकडो उर्दू शब्द मूळ संस्कृतातील आहेत. या भाषांचे थोडक्यात मोघम वर्गीकरण करावयाचे झाले तर पुढीलप्रमाणे करता येईल –

आर्य एकत्र मध्य आशियाचे बाजूस होते त्या वेळची मूळ भाषा

↓ इराणातील आर्य शाखेच्या भाषेस पेहेलवी ही संज्ञा मिळाली.
↓ या पेहेलवीत अरबी शब्द मिळून पर्शियन झाली.

↓ हिंदुस्थानातील आर्य शाखेच्या भाषेस संस्कृत म्हणू लागले.
↓ संस्कृताच्या प्राकृत व अपभ्रष्ट भाषा होऊन हिंदी, बंगाली, मराठी, गुजराती इ. भाषा झाल्या.

↓ हिंदुस्थानी, सबकी बोली, आम जनतेची हिंदी वा उर्दू.

अशा रीतीने हिंदी व उर्दू या एकमेकांस परक्या नाहीत. अशी ही बहुजनसमाजाची हिंदुस्थानी भाषा आपण शिकू या. बहुजनसमाजास समजणारी भाषा शिकू या. रवीन्द्रनाथ म्हणतात, "देव दिवाणखान्यात

नाही. तो रस्त्यात काम करणाऱ्यांजवळ आहे. शेतात काम करणारांजवळ आहे. कारखान्यात, रेल्वेत काम करणारांजवळ आहे!" अशाचे बोलणे आपणास समजले पाहिजे, अशांना समजेल असे आपण बोलले पाहिजे. ही जी बहुजनसमाजाची वाणी तीच खरी गीर्वाण वाणी, तीच आपली देवभाषा. कारण आपला देव स्वर्गात नाही. आपला देव झोपडीत आहे. दरिद्रनारायण हे काँग्रेसचे उपास्य दैवत आहे. हे लक्षात ठेव. सर्वांस सप्रेम प्रणाम.

तुझा

**श्याम**

पत्र चौदावे

# विषमतेचे उच्चाटन हे मानवाचे ध्येय

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

माझी पत्रे तुला व तुझ्या सेवा दलातील मित्रांना आवडतात हे वाचून मला बरे वाटले. मला माझी मर्यादा माहीत आहे. सांगोपांग ज्ञान मला नाही. परंतु समर्थांनी सांगितले आहे की, जे जे आपणास माहीत असेल ते ते द्यावे. काजव्याने आपल्या शक्तीने चमकावे. तारे आपल्यापरी चमकतील. चंद्रसूर्य त्यांच्या शक्तीप्रमाणे प्रकाश देतील. माझ्याने राहवत नाही. भारतीय तरुणांकडे माझे मन धावते. त्यांना मिठी मारावी व भारताच्या ध्येयाकडे त्यांना न्यावे असे वाटते, परंतु मी कोण. माझी शक्ती ती किती! राहवत नाही म्हणून करायचे.

माझी पत्रे वाचावयास इतर मुले मागतात असे तू लिहिलस. एखादे वेळेस वाटते की, ही पत्रे प्रसिद्ध करावी. मुलांना वाचायला होतील. या पत्रांवर टीकेची झोड उठेल, मला माहीत आहे. माझ्या पत्रांना उत्तरे देण्यासाठी म्हणूनही संघातील काही मुले ती पत्रे मागत असतील. परंतु आपला लपंडाव थोडाच आहे. आपला सारा खुला कारभार. जे ज्ञान मोकळेपणे चारचौघांत देण्यास भय वाटते, ते माणुसकीस धरून नसेल असे समजावे!

तू तुझ्या पत्रात इतर काही गोष्टींविषयी थोडक्यात माहिती मागितली आहेस. गांधीवाद व समाजवाद यांत साम्य काय, विरोध काय असे तू विचारले आहेस. वसंता, मी तुला थोडक्यात कितीसे सांगणार?

परंतु तुम्हांला थोडीशी कल्पना यावी म्हणून काही गोष्टी सांगतो! तुम्ही मोठे झालात म्हणजे मोठी पुस्तके वाचा, अधिक विचार करा व काय ते ठरवा.

आज जगात सर्वत्र विषमता भरली आहे. ती आजच आहे असे नाही. प्राचीन काळीही असेल. परंतु आजच्याप्रमाणेच ती भयंकर होती की काय याची शंका आहे. आज यांत्रिक उत्पादन झाले आहे. त्यामुळे थोड्याशा मजुरीवर हजारो कामगार कामाला लावता येतात. कामगार १० रु. चे काम करतो; पण त्याला मजुरी चारसहा आणेच मिळते. ज्यांच्या ताब्यात कारखाना असतो त्यांना असा अपरंपार फायदा मिळत असतो. परंतु कामगारांची दुर्दशाच असते. भांडवलवाला या फायद्यातून, हातात जमा होत जाणाऱ्या भांडवलातून आणखी कारखाने काढतो. जगात माल अपरंपार निर्माण होतो. परंतु कामगारांस पगार कमी मिळत असल्याने या मालाचा उठाव होत नाही. तुमचा माल विकत घेणार कोण? जगात अन्न पुष्कळ आहे, वस्त्र पुष्कळ आहे. परंतु ते घेण्याला बहुजनसमाजाजवळ पैसा नाही. सुकाळात दुष्काळ आहे! बरे, कामगारांची मजुरी वाढवावी, तर माल महाग होतो. जगाच्या स्पर्धेत तो टिकत नाही. कामगारांची मजुरी इतकी कमी असते की, जगातील सुखसोयी त्यांना घेता येत नाहीत. पुष्कळ वेळा जगातील भांडवलवाले मालाचा नाश करतात! गव्हाचे पीक जाळतात!! कपाशीला आगी लावतात!!! असे प्रकार भांडवलशाहीला करावे लागतात.

मग राष्ट्रीय भांडवलशाही जगात स्वतःची साम्राज्ये स्थापू पाहते. स्वतःच्या देशातील जादा भांडवल दुसऱ्या देशात ते नेऊन ओततात. स्वतःचा माल खपविण्यासाठी त्यांना वसाहती लागत असतात. सर्वांची स्पर्धा सुरू होते. मग या भांडवलशाह्या आपापसात लढू लागतात. स्पर्धेत टिकाव लागावा म्हणून काही भांडवलवाल्या राष्ट्रांना आपापल्या राष्ट्रातील लोकशाही संपुष्टात आणावी लागते. आज जर्मनीत हिटलरचा नाझी पंथ आहे. इटलीत फॅसिझम आहे. दोघांचे स्वरूप एकच आहे.

भांडवलशाहीची जगण्यासाठी चाललेली शेवटची धडपड म्हणजे नाझी पंथ किंवा फॅसिझम! जर्मनीतील हिटलर व त्याची नाझी संघटना यांना कोणी पैशाची मदत केली? जर्मनीतील क्रप वगैरे जे अब्जाधीश कारखानदार त्यांनी कोट्यवधी रुपये हिटलरला संघटनेसाठी दिले! नाझी संघटना ही पांढरपेशांची संघटना आहे. तिच्यात शेतकरी-कामकरी नाहीत. आपली संस्कृती, आपला वंश, आपली भाषा वगैरेंची या वरच्या वर्गांतील तरुणांस ऐट असते. या बेकार पांढरपेशा तरुणांस हिटलरने हाताशी धरले. आपले जर्मन राष्ट्र मोठे करू, जगात सर्वत्र साम्राज्य स्थापू असे तरुणांच्या मनात त्याने भरवले. संघटना उभी राहिली. शेतकरी-कामकरी यांच्या संघटना नष्ट करण्यात आल्या. शेतकऱ्यांचा माल ठराविक किंमतीत सरकारनेच विकत घ्यायचा असे ठरविण्यात आले. कामगारांचीच अधिक भीती असते. परंतु जर्मनीत कामगारांना स्वातंत्र्य नाही. नाझी पंथ वा फॅसिस्ट पंथ कोणालाच स्वातंत्र्य देत नसतो. सरकार ठरवील ते ब्रह्मवाक्य!

कामगारांनी मिळेल तो पगार घेतला पाहिजे. जर्मनी किंवा इटली यांना जगात वसाहती नाहीत. त्यांचा माल कसा व कोठे खपणार? जगात तर स्पर्धा आहे. इंग्लंडने स्वतःच्या सर्व साम्राज्याचा एक संघ बनविला. साम्राज्यातील घटकांनी एकमेकांचाच माल आधी घ्यावा असे ठरविण्यात आले. दुनियेतील माल स्वस्त असला तरी तो आधी घ्यायचा नाही. जर्मनीतील इंजिने स्वस्त असली तरी हिंदुस्थानने इंग्लंडमधूनच घेतली पाहिजेत. अशी ही साम्राज्याची भिंत इतरांच्या व्यापाराच्या आड इंग्रजांनी उभी केली. जकाती अधिक बसविणे सुरू झाले. अशा परिस्थितीत जर्मनी, इटली, जपान वगैरेंनी काय करावे? जपाननेही स्वतःच्या देशात कामगार दडपून ठेवले. त्याने चीनशी लढाई सुरू केली. जर्मनी व इटली आज युद्धात पडलीच आहेत. आज अमेरिकेची इंग्लंडला सहानुभूती असली तरी लढाईपूर्वी त्या दोघांची चुरसच होती. आणि अमेरिका आजही अद्याप साशंकतेनेच जपून वागत आहे. जगाच्या स्पर्धेत आपला माल स्वस्त देता यावा म्हणून

कामगारांस कमी पगार द्यावा लागतो. कामगार असंतुष्ट होऊ नयेत किंवा भडकू नयेत म्हणून त्यांच्या संघटना बेकायदेशीर ठरविण्यात येतात. सर्व सत्ता एका पक्षाच्या हाती द्यावी लागते. आणि शेवटी युद्धाची तयारी करून वसाहती मिळविण्यासाठी, आपले मोठे साम्राज्य स्थापण्यासाठी तयार राहावे लागते. हिटलर व मुसोलिनी युद्ध ही पवित्र वस्तू मानतात ! “ युद्धातच मनुष्याची खरी कसोटी. त्यांच्या गुणांची खरी परीक्षा तेव्हाच होते. युद्ध टाळणे योग्य नव्हे. युद्धात विजयी होण्यासाठी सर्वांनी पराकाष्ठेचा त्याग केला पाहिजे. सर्व राष्ट्राने युद्धाच्या तयारीत सदैव असले पाहिजे. नेहमी पिस्तुलावर हात असला पाहिजे.” असे या पंथाचे म्हणणे आहे. युद्ध हा यांचा देव आहे.

मनुष्यातील सर्व बौद्धिक व हार्दिक उच्चभाव प्रकट होण्यासाठी युद्धाचीच का जरूर आहे ? दलदली नाहीशा करणे, रोगराई दूर करणे, पृथ्वी अधिक आनंदमय होण्यासाठी झटणे यात का पुरुषार्थ नाही ? महारोग्यांची शुश्रूषा करण्यात का धैर्य नाही ? पुरुषार्थ दाखवावयास रणांगणच पाहिजे असे नाही. आणि मनातील कुरुक्षेत्र तर आहेच मोठे रणांगण ! मुसोलिनी व हिटलर जगाला जिंकतील, परंतु ते स्वतःला जिंकतील तर अधिक वीरपुरुष होतील. संतही लढतच असतात. तुकाराम महाराजांनी म्हटले आहे—

“ रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन । ”

परंतु ही उच्चतेची लढाई यांना नको असते. त्यांना एकमेकांची हत्या करण्याची, आसुरी आनंदाची लढाई हवी असते. वाघाला हरीण मारून जसा आनंद होतो तसा या फॅसिस्टांना ॲबिसीनियावर विषारी वायू सोडून, लोकांना तडफडत मरताना पाहून होतो !

हिटलर व मुसोलिनी यांना आज कामगारांच्या चळवळी दडपून ठेवाव्या लागल्या आहेत. इंग्लंडमध्ये तशी परिस्थिती नाही. परंतु का नाही ? इंग्लंडचे जगभर साम्राज्य आहे. त्यांना हिंदुस्थानसारखी चाळीस कोटी लोकांची परतंत्र वसाहत आहे. इंग्लंडचा माल साम्राज्यात

व दुनियेत सर्वत्र जातो. त्यामुळे त्यांना स्वदेशातील कामगारांना अधिक सवलती देता येतात. इंग्लंडमध्ये लोकशाहीचा डोलारा दिसावा यासाठी हिंदुस्थानने गुलाम राहिले पाहिजे!

परंतु समजा, हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर? चाळीस कोटी लोकांची पेठ त्यांच्या हातून गेली तर? इंग्लंडमधील भांडवलवाल्यांना चिंता वाटेल. कामगारांना दिलेल्या सवलती त्यांना काढून घ्याव्या लागतील. म्हणजेच इंग्लंडलाही फॅसिस्ट बनावे लागेल. आज ना उद्या इंग्लंडमध्ये हीच स्थिती येणार आहे. इंग्लंडमध्ये मजुरांचे पुढारी म्हणून जे मिरवतात ते निवडणुकीत स्वतःला बहुमत मिळू नये अशी म्हणे खटपट करतात! मजूर मंत्रिमंडळ इंग्लंडमध्ये स्थापण्याची आपत्ती येऊ नये म्हणून हे मजूर पुढारी जपतात! कारण या मजूर पुढाऱ्यांना माहीत आहे की दिवसेंदिवस स्वतःच्या देशातील माल दुनियेत खपविणे कठीण जाईल. मग आपणांसच मजुरांच्या सवलती कमी करण्याचे कायदे करावे लागतील. मग मजूर काय म्हणतील? म्हणून हे मजूर पुढारी स्वतःला बहुमत मिळू नये अशी कारवाई करतात! आणि मग कारखानदारां-जवळ कारस्थाने करतात. कारखानदार जाहीर करतात २५ टक्के पगार-काट. कामगार संपावर जातात. हे पुढारी त्यांच्यापुढे जोर-जोराची भाषणे करतात. कारखानदार या पुढाऱ्यांना बोलावतात. शेवटी तडजोड होते. १० टक्केच पगार-काट करण्याचे ठरते. हे कामगार पुढारी मग कामगारांना सांगतात, “आपला विजय आहे. मालक २५ टक्के पगार-काट करणार होता. आपण त्याला १० टक्क्यांवर आणले!” मालक व हे मजूर पुढारी यांचे आधीच हे ठरलेले असते. त्यांनी २५ टक्के म्हणावयाचे, यांनी संप करावयाचा, व शेवटी १० टक्क्यांवर तडजोड करावयाची. मालकांना १० टक्केच कमी करण्याची जरूर असते. आणि अशा रीतीने क्रान्तीला भिणारे कामगार पुढारी कामगारांना फसवीत असतात.

यांत्रिक भांडवलशाहीचा कळस झाला की दोन फाटे फुटतात. फॅसिझम तरी स्वीकारावा लागतो किंवा समाजवाद आणावा लागतो.

प्रचंड उद्योगधंदे तयारच असतात. लहानलहान कारखानदारांना पोटात घेत घेत एकेका धंद्याची प्रचंड सिंडिकेटस् तयार झालेली असतात. ती राष्ट्राच्या मालकीची करणे एवढेच काय ते उरते. कामगार क्रान्ती करून ते काम पुरे करतात.

गांधीवाद सर्व उत्पादन यंत्रांनी करावे याविरुद्ध आहे. गांधीवादी म्हणतात, "यंत्रांनी बेकारी वाढते. सर्व बेकारांना काम देता यावे व निर्माण झालेला माल खपावा म्हणून दुसऱ्या देशास गुलाम ठेवावे लागते. निरनिराळ्या यांत्रिक उत्पादन करणाऱ्या देशांची स्पर्धा सुरू होते. युद्धे होतात. जीविताची व वित्ताची अपरंपार हानी होते. कामगारही असंतुष्ट होतात. विषमता वाढते. भांडवलवाले मोटरी उडवितात तर कामगार कसा तरी जगतो. या सर्व गोष्टी टाळायच्या असतील तर यांत्रिक उत्पादन कमी करावे." गांधीवाद एकजात सर्वच यंत्रांना विरोध करतात असे काही नाही. आपणातील काही नवमतवादी म्हणत असतात की "गांधीजी जगाला पुन्हा त्रेतायुगात नेऊ पाहात आहेत. आजच्या काळात चरख्याचे गुं गुं सुरू करू पाहात आहेत. गांधीजी प्रतिगामी आहेत!" प्रतिगामी किंवा पुरोगामी याची कसोटी यंत्र किंवा चरखा ही नसून समाजात जो कोणी स्वास्थ्य, समाधान, संतोष व समानता कमी रक्तपाताने आणील तो खरा पुरोगामी असे मानले पाहिजे. गांधीजी काही शनिमाहात्म्य वाचा, कुंडली मांडा, ज्योतिष पहा, तुझ्या पूर्वजन्मीच्या कर्मामुळे तू असा झालास ....वगैरे गोष्टी सांगत नसतात. मला एक आश्चर्य वाटत असते की आमचे पुरोगामी लोकही आपल्या वर्तमानपत्रांतून व साप्ताहिकांतून भविष्ये देत असतात! बुद्धिवादाचा आग्रह धरणारे हे लोक लोकांच्या रूढीची पूजा करीत असतात!! गांधीजींनी असले प्रकार कधी केले नाहीत. गांधीजी बुद्धिवादी आहेत. शास्त्रीय बुद्धिवादी आहेत. मलेरियावर गांधीजी कोयनेल घ्यायला सांगतात म्हणून आमचे आयुर्वेदी गांधीजींवर रागावत असतात! गांधीजी त्यांना म्हणतात, "तुमची गुळवेल किंवा तुमची औषधे शास्त्रीय दृष्ट्या जगासमोर मांडा. मी आयुर्वेद मान्य करीन." गांधीजी विज्ञान मानतात. यंत्राने सडलेले पांढरे

तांदूळ खाणारा उंदीर वजनात घटला, परंतु न सडलेला तांदूळ खाणारा उंदीर वजनात वाढला. म्हणून असडिक तांदूळ खा, निदान हातसडीचे खा, परंतु गिरणीचे पांढरे खाऊ नका, असे शास्त्रीय दृष्टीनेच ते सांगतात. मुंबईच्या केमिकल ॲनलायझरकडे चिंच, घोळीची भाजी, कडुलिंबाचा पाला वगैरे वस्तू गांधीजींनी पाठवून त्यांत कोणते गुणधर्म आहेत त्याची चौकशी केली. गूळ व साखर यात अधिक गुण कशात आहेत हे डॉक्टरांच्याकडून पचूंन घेतले.

वसंता, या गोष्टी ऐकून तू हसशील. मी ह्या गोष्टी अशासाठी देत आहे की गांधीजी विज्ञान मानतात. त्यांना शोधबोध सारे हवे आहे. ते जुनाट बुद्धीचे, जडजरठ बुद्धीचे नाहीत. बंगलोरला पुष्कळ वर्षांपूर्वी भाषण करताना ते म्हणाले, "मला विजेचे दिवे हवे आहेत. परंतु विजेने चालणारी कापडाची गिरणी नको. विजेची शक्ती घरोघर पुरविता आली व घरगुती धंदे त्यावर चालविता आले तर मला तीही हवी आहेत!" यंत्र म्हटले की नाक मुरडावयाचे असे दुराग्रही गांधीजी नाहीत. ते म्हणतील, "शिवण्याचे यंत्र मला पाहिजे. अहिंसक इनॉक्युलेशन मला पाहिजे. क्लोरोफॉर्म मला पाहिजे. जे शोध, जी यंत्रे कोणाची पिळवणूक न करता संसारात सुख आणतील ती मला हवी आहेत!" गांधीजींना वनस्पतिसंशोधन पाहिजे आहे. खगोलविद्या हवी आहे. बौद्धिक आनंद का त्यांना नको आहे? चरखा हाती घ्या एवढे म्हटल्याने गांधीजी काही जुनाट, पुरातन पुरुष होत नाहीत.

यंत्राने बेकारी वाढते व गुलामगिरी वाढते. भांडवलवाले व मजूर असे भेद वाढतात. युद्धे होतात. हिंसा वाढते. म्हणून गांधीजी म्हणतात की साऱ्याच वस्तू यंत्राने नका निर्मू. आता आगगाड्या किंवा इतर गोष्टी खेड्यात किंवा एका माणसाला नाही निर्मिता येणार. आणि त्या नष्टही नाही करता येणार. परंतु अशा काही गोष्टी आपण सोडून देऊ या. दृष्टी अशी ठेवू या की खेड्यातील लोक तेथेच घरबसल्या उद्योगधंदे करून समाजाच्या आवश्यक गरजा पुरवीत राहतील. मग एकाच्या हातात फारशी सत्ता व संपत्ती येणार नाही. ग्रामोद्योग असले म्हणजे

आपोआपच संपत्तीचे विभाजन होईल. यंत्रांचे राक्षस उत्पन्न करा व मग क्रान्ती करा हे सांगितले आहे कोणी ?

गांधीवादाची तीन तत्त्वे सांगता येतील. ( १ ) संपत्ती एका हाती न देणे. ( २ ) सत्ता एका हाती न देणे. ( ३ ) लोकांची एकाच ठिकाणी गर्दी होऊ न देणे. या तिन्ही गोष्टींसाठी यांत्रिक उत्पादन दूर ठेवणे हाच धर्म ठरतो. यांत्रिक उत्पादन केले नाही म्हणजे भांडवलवाला वर्ग निर्माण होणार नाही. भांडवलदार वर्गच जन्मला नाही म्हणजे मग पुढे त्यातून निर्माण होणारी फॅसिस्ट–नाझी हुकूमशाही वा साम्यवादी हुकूमशाही याही जन्मास येणार नाहीत. म्हणजे सत्ता एकाच्या हातात एकवटणार नाही. आणि प्रजाही लाखो गावी पसरलेली असेल. एके ठिकाणी गर्दीने राहण्याची जरूरी भासणार नाही. खेड्यात मोकळी अशी जनता राहील.

समाजवादी लोक म्हणतात की गांधीजींना ज्या तीन गोष्टी हव्या आहेत त्याच आम्हीही इच्छितो. आम्हांलाही एकाच्या हाती संपत्ती नको आहे. परंतु त्यासाठी ग्रामोद्योगांची कास धरण्याची जरूरी नाही. ‘यंत्रांनी बेकारी वाढते. आणि ही बेकारी दूर करण्यासाठी म्हणून इतर देशांना गुलाम करावे लागते व आपला माल तेथे खपवावा लागतो’ असे गांधीवादी म्हणतात. परंतु हा यंत्राचा दोष नसून समाजरचनेचा दोष आहे. समाजवादी समाजरचनेत हा दोष राहणार नाही. समजा, एखाद्या देशाला समाजवादी व्हावयाचे आहे, तर तेथे काय करण्यात येईल ? यंत्राने उत्पादन फार होते. ते खपविण्यासाठी दुसऱ्या बाजारपेठा धुंडाळाव्या लागतात. परंतु आम्ही इतकेच उत्पादन करू की, जे देशाच्या गरजेपुरते आहे. आणि ज्या काही वस्तू देशात होतच नाहीत त्या वस्तू परदेशातून आणण्यासाठी जी किंमत द्यावी लागेल ती भरून काढण्यासाठी जेवढे अधिक उत्पादन करावे लागेल तेवढे करू. जगाच्या बाजारपेठा आम्हांला काबीज करण्याची गरज नाही. आम्ही कामाचे तास कमी करू व अनेकांना काम देऊ. आठ आठ, नऊ नऊ तास काम केल्यानंतर मनुष्यामध्ये जीवनाचा

आनंद उपभोगण्यासाठी शक्तीच राहात नाही. जीवनातील इतर आनंद तो कधी घेणार? त्याला बाग करता येणार नाही. संगीत शिकता येणार नाही; चित्रकला दूर ठेवावी लागेल, इतर शास्त्रे दूर ठेवावी लागतील. आजच्या भांडवलशाही समाजरचनेतील कामगार हा कामगार म्हणूनच जगतो व मरतो! समाजवादी समाजरचनेत कामगारही शास्त्रज्ञ व संगीतज्ञ होईल आणि संगीतज्ञ व शास्त्रज्ञही कामगार होतील. श्रमजीवी वर्ग व बुद्धिजीवी वर्ग यांची आज फारकत आहे. बुद्धीजवळ शरीरश्रम नाहीत व शरीरश्रमाजवळ बुद्धी नाही. मनुष्याचा संपूर्ण विकास भांडवलशाही समाजरचनेत होऊच शकत नाही. आणि उद्याच्या समाजवादी रचनेत कारखाना हा व्यक्तीच्या मालकीचा राहणार नसल्यामुळे एकाच्या हाती संपत्ती जमण्याची भीती नाही. तेव्हा यंत्रावर जे तीन आक्षेप गांधीवादी मंडळींचे आहेत की, त्याने बेकारी वाढते, इतरांना गुलाम करावे लागते, व भांडवलशाही निर्माण होते, ते वरीलप्रमाणे नाहीसे होतात. यासाठी यंत्र ठेवूनही गांधीजींचा उद्देश सफल होईल व फार श्रम न करता फुरसतीचा भरपूर वेळ जीवनाच्या इतर बौद्धिक विकासात व निरामय, निर्मळ आनंदात कामगारास दवडता येईल.

गांधीजींचा मुद्दा हा की, सत्ता एकाच्या हातात नको. भांडवलशाही समाजपद्धतीत शेवटी असा क्षण येतो की ज्या वेळेला फॅसिस्ट हुकूमशाही तरी निर्माण होते किंवा साम्यवादी हुकूमशाही निर्माण होते. भांडवलशाही समाजाच्या परिणतावस्थेत संघटित कामगार क्रान्ति करून समाजवाद स्थापन करतो. त्या वेळेस कामगार–हुकूमशाही काही दिवस असते खरी, परंतु ती आपोआप पुढे नष्ट होईल. कामगार हुकूमशाही ही तात्पुरती, संक्रमणावस्थेतील होय. ती हुकूमशाही चिरंजीव नसते. काही संघटित कामगार क्रान्ती करतात. परंतु सर्वच्या सर्व समाज नवीन प्रकारास तयार असतोच असे नाही. समाजवादी क्रान्ती कामगार करतो. तो क्रान्तीचा आघाडीचा शिपाई असतो. कामगारास गमवायला काहीच नसते. त्याला ना घरदार ना जमीन.

म्हणून तोच राष्ट्राच्या मालकीची उत्पादन-साधने आपली व्हावीत यासाठी झगडायला उभा राहतो. परंतु शेतकरी जमिनीला चिकटलेला असतो. तो सावकार किंवा जमीनदार यांच्या पाशातून मुक्त होण्या-पुरता क्रान्तीत सामील होतो. परंतु 'सर्व जमीन समाजाची' असे म्हणावयास तो एकदम तयार होणार नाही! सामुदायिक शेती करावयास तो एकदम तयार होत नाही. त्याला हळूहळू सामुदायिक शेतीचे फायदे शिकवावे लागतात. प्रचार करावा लागतो. थोडी सक्तीही करावी लागते. संपूर्णपणे समाजवादी प्रयोग होईपर्यंत अशा अडचणी असतात. त्यासाठी काही दिवस हुकूमशाही असते. तसेच हा नवीन प्रयोग हाणून पाडण्यासाठी भांडवलवाले— लहान वा मोठे प्रयत्न करीत असतात. ते असंतुष्ट झालेले असतात. त्यांची चैन नाहीशी होते. त्यांचा बडेजाव व रुबाब जातो. इतर भांडवलशाही राष्ट्रांशी ते संगनमत करतात. कट रचतात. या सर्व गोष्टींचा वेळीच प्रतिकार करता यावा यासाठी संक्रमणावस्थेत कामगार-हुकूमशाही निर्माण होणे अपरिहार्य असते. जगातील भांडवलवालेही हा प्रयोग यशस्वी होऊ न देण्याची पराकाष्ठा करतात. कारण दुसऱ्या एखाद्या देशात शेतकरी-कामकरी सुखी झालेला दिसला तर आपल्या देशातील शेतकरी-कामगारही त्याच मार्गाने जाऊ पाहतील अशी त्यास भीती वाटते. म्हणून हा स्फूर्तीचा झरा नाहीसा करावा, ही ज्वाला विझवून टाकावी, हा आदर्श प्रयोग मातीत गाडावा म्हणून भांडवलवाले अट्टाहास करतात. जोपर्यंत आजू-बाजूस भांडवलशाही आहे तोपर्यंत समाजवादी प्रयोग करणाऱ्या राष्ट्रास नेहमी लढाईच्या पावित्र्यात रहावे लागते. आणि राष्ट्राला लढाईच्या तयारीत ठेवण्यासाठी हुकूमशाहीची जरूरी असते. लढाईच्या वेळी एकाच्या हाती सूत्रे द्यावी लागतात. स्टॅलिन अशा अर्थाचे एकदा म्हणाला की "रशियात अजून हुकूमशाही आहे; पण ती का आहे? आम्हांला सत्तेची स्पृहा नाही. अपरंपार किंमत देऊन जो हा प्रयोग आपण केला आहे तो मातीत जाऊ नये एवढ्यासाठी येथे हुकूमशाही आहे. आपण सुरक्षित आहो असे तुम्हांस वाटते का? सांगा. जर खरोखर तुम्हांस आपण सुरक्षित आहो, आपला प्रयोग आता सुरक्षित आहे असे वाटत

असेल तर सांगा. आता या क्षणी मी अधिकारसूत्रे खाली ठेवतो! परंतु सभोवती पहा. आपल्यावर हल्ले चढविण्यासाठी सारे टपलेले आहेत. जे रोपटे आपण लावले, ते उपटून टाकावयास भांडवलशाही जग अधीर आहे. अशा परस्थितीत आपण नेहमी सज्ज राहिले पाहिजे. आपला प्राणप्रिय प्रयोग नष्ट न होऊ देण्यासाठी सर्व कष्ट सहन केले पाहिजेत."

पण हुकूमशाही हे समाजवादाचे ध्येय नाही. हळूहळू सारी जनता तयार होईल. नवीन प्रयोग पचनी पडेल. अंतर्गत विरोध नाहीसे होतील. सभोतीचे शेजारी निवळतील. आणि मग हुकूमशाही आपोआप गळून पडेल. मार्क्सवादी 'सरकारहीन समाज' हे ध्येय मानतात. सरकारच नाही! सुरळीत असे सहकारी समाजयंत्र चालले आहे. एक दिवस उजाडेल व मानव इतका विकसित झालेला दिसेल. म्हणून सत्ता एका हाती नसावी. हे गांधीवादातील तत्त्व आम्हांसही मान्य आहे. फक्त संक्रमणावस्थेत, प्रयोगाच्या बाल्यावस्थेत आम्हांला हुकूमशाही ठेवणे जरूर पडते. परंतु ते शेवटच्या अराज्यवादी, सरकारहीन ध्येयाचें साधन आहे.

गांधीवादींचे तिसरे म्हणणे असे की, प्रजा फार एकत्र येऊ नये. लोकांची एकेका शहरात फार गर्दी होऊ नये. समाजवादी म्हणतात की, आमच्या आदर्श समाजघटनेत सत्तर सत्तर मजल्यांच्या इमारती बांधून कबुतरांसारखे लोक गर्दी करून राहात आहेत असे दिसणार नाही! आमची शहरेच खूप विस्तृत, लांब-रुंद असतील. कामगारांच्या चाळी दूर दूर असतील. मधून सार्वजनिक बागा असतील. कारखाने एका बाजूला असतील. कामगार दूर रहात असले तरी त्यांना तावडतोब नेण्यासाठी ट्रामगाड्या, आगगाड्या व विमाने असतील. अशी सुंदर ऐसपैस, मोकळी शहरे आम्ही निर्मू. म्हणजे गांधीवाद्यांचा हा तिसरा आक्षेपही उरत नाही.

वसंता, येथेच ही उत्तरे-प्रत्युत्तरे संपली असे नाही. दोन्ही पक्षांचे आणखीही पुष्कळच तात्त्विक विवेचन आहे. खंडन-मंडन आहे. ते पुढील पत्री लिहीन. हा विषय इतका गहन आहे की, वाचावे व ऐकावे

तेवढे थोडेच! गांधीवादी विचार कळण्यासाठी आचार्य कृपलानी यांचे ' गांधीयन वे ' हे वाच. ' गांधी-विचार-दोहन ' हे पुस्तकही वाच. सर्वोदय मासिकाचे अंक व आचार्य जावडेकरांचे ' आधुनिक भारत ' वाच. समाजवाद कळण्यासाठी मराठीतील ' समाजवादच का? ', ' रशियातील राज्यक्रांती ', ' समाजवादाचा ओनामा ', लेनिन, मार्क्सची चरित्रे, वादविवेचन मालेची पुस्तके वाच. आज पुरे.

सर्वांस प्रणाम.

तुझा

**श्याम**

पत्र पंधरावे

# विचारमंथन

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

मागील पत्रातून तुला यंत्रवाद, गांधीवाद, समाजवाद, साम्राज्यवाद, फॅसिझम वगैरेविषयी थोडे थोडे लिहिले होते. गांधीवाद व समाजवाद यांतील साम्य व विरोध मी दाखवीत होतो. गांधीवादी लोकांची जी तीन तत्त्वे ती समाजवादानेही कशी साधली जातात ते मी मांडले होते.

गांधीवादी यावर म्हणतात की आमचे तुमच्या म्हणण्याने समाधान होत नाही. यंत्रवादावर आमचा मुख्य आरोप असा आहे की यंत्राने मनुष्य केवळ यंत्र बनतो ! यांत्रिक निर्मितीत माणसाला आनंद नाही. मोठमोठ्या प्रचंड कारखान्यात निरनिराळे भाग निरनिराळ्या ठिकाणी बनत असतात. कोणा कामगाराला मरेपर्यंत चाकेच करावी लागतील. कोणाला टाचण्यांची डोकीच करीत बसावे लागेल. त्याच त्या ठराविक बारीक बारीक वस्तू यंत्रामध्ये वर्षानुवर्षे करीत राहावे लागते. कामगार यंत्रासमोर आपला यंत्राप्रमाणे उभा असतो ! आणि त्या वस्तू भराभरा उत्पन्न होत असतात. त्या कामगाराला त्या निर्मितीत आनंद नाही, ' हे मी केले, माझ्या बोटांनी केले, माझी बुद्धी मी ह्यात ओतली, माझी कला ओतली ' असे त्याला म्हणता येईल का ? कामगाराचे जीवन यंत्रामुळे कंटाळवाणे होते. तुम्ही कामाचे तास कमी कराल व कारखान्यात जो आनंद मिळत नाही, तो घेण्यासाठी त्याला उरलेला वेळ द्याल. परंतु ग्रामोद्योगात कामातच आनंद वाटतो. ते काम कंटाळवाणे

वाटत नाही. आनंद निराळा शोधावाच लागत नाही. समजा, मी चरख्यावर सूत कातीत आहे. ते सूत जाड येते की बारीक येते ते मी पाहतो. त्यात माझे कौशल्य असते. ते सुंदर दुधाच्या धारेसारखे सूत निघताना पाहून मला आनंद होतो. हे माझ्या हातचे सूत असे मी अभिमानाने सांगतो. माझी कला त्या कृतीत असते. मी तेथे बुद्धी वापरतो. यंत्रानेच जेथे सारे होते तेथे कलानिर्मितीचा आनंद कोठे आहे? त्यामुळे मग मला आनंद अन्यत्र शोधावा लागतो. पण श्रमच आनंदरूप होणे यातील गोडी काही और आहे. आपल्या मागावर लहानशा झोपडीत विणकर मलमल विणतो! किती हलक्या हाताने तो धोटा फेकतो, कसा जपतो, कसे बघतो! त्याचे कलात्मक डोळे, त्याची कलात्मक बोटे, पहा तरी. तो आपल्या कामात मग्न असतो. तल्लीन असतो.

ग्रामोद्योगात, स्वतः निर्माण केलेल्या वस्तूत, असा हा निर्मितीचा आनंद आहे. हा सात्त्विक आनंद यंत्राने नष्ट केला आहे. दुसरी गोष्ट अशी की, तुम्ही कामाचे तास कमी करणार व त्या वेळात मनुष्य आपला जीवनाचा विकास करून घेईल, निरनिराळे आनंद, कलात्मक वा बौद्धिक अनुभवील असे म्हणता. परंतु हे बोलायला ठीक आहे. कारण मनुष्य फुरसतीचा वेळ सार्थकीच लावील याची काय खात्री? मनुष्यप्राणी अद्याप इतका विकसित झालेला नाही. पूर्णत्वाच्या गोष्टी आजच बोलण्यात अर्थ नाही. ' रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी ' ही म्हण खोटी नाही. उद्योगहीन माणसे भांडत बसतात, अधःपतित होतात. " Satan tends idle hands to do mischief. कर्मशून्य हातांकडून सैतान आपले खेळ करवून घेत असतो! " म्हणून मनुष्याला जास्तीत जास्त वेळ, परंतु तो अगदी थकून जाईल इतका वेळ नव्हे, निदान सहा सात तास कामात गुंतवून ठेवणे बरे. त्याच्या आवडीचा उद्योग त्यास द्यावा. म्हणजे त्या कामाचा त्याला कंटाळा येणार नाही. आवडीचे काम करण्यात परमसुख आहे. ते काम करून थकवा वाटत नाही. बुद्धी व हृदय यांनाही त्या हस्तकार्यात वाव असतोच. तुम्ही त्याला

निराळा आनंद देऊ म्हणता, त्याची आमच्या हस्तोद्योगात जरूरी नाही. कारण यंत्राप्रमाणे येथे कंटाळवाणे काम नाही.

आणखी एक मुद्दा असा की, मनुष्याची बुद्धीसुद्धा तो सहासात तास शारीरिक श्रम करील तर अधिक तेजस्वी राहील. जितके शारीरिक काम कमी तितकी बुद्धी कमी तल्लख. थोरो म्हणत असे, "अरे लेखका, जरा हातांत कुदळ घे. शेतात खण. अंगातून घाम निघू दे. शरीरातील मळ बाहेर पडू दे. अंगाला ऊन लागू दे. प्रकाश मिळू दे. म्हणजे तुझ्या लिहिण्यातही प्रकाश येईल. तुझ्या लिहिण्यातील पोटदुखी व निराशा जाईल. खोलीत बसून लिहितोस म्हणून पोटात मुरडा मारतो व लिहिण्यातही सुतकीपणा येतो!" थोरोच्या या म्हणण्यात अर्थ आहे. तुम्ही म्हणाल की शरीरश्रम न करणारेही बुद्धिमान झाले. आमचे म्हणणे असे की त्यांनी शरीरश्रम केले असते तर ते अधिकच सतेज बुद्धीचे झाले असते.

तसेच तुम्ही जे म्हणता की हुकूमशाही ही संक्रमणावस्थेपुरतीच आहे. परंतु ही संक्रमणावस्था किती काळ चालणार? आजूबाजूची सर्व दुनिया समाजवादी होईपर्यंत तुम्हांला धोका राहणार! म्हणजे सारे जग समाजवादी होईपर्यंत तुम्हांला हुकूमशाही ठेवावी लागणार!! या काळाला काही मर्यादाच नाही. तसेच तुमच्या प्रयोगक्षेत्रातील सारे लोक तुमचा प्रयोग पचवीपर्यंतही तुमची हुकूमशाही राहणार. तेव्हा संक्रमणकाल अनंत आहे. सारे जग समाजवादी होईपर्यंत तुमचा प्रयोग वाढत जाणार. तोपर्यंत लढाया राहणार. कट होणार. म्हणून हुकूमशाही राहणार!

आणि मनुष्य-स्वभाव असा आहे की सत्तेची एकदा सवय लागली, चटक लागली की ती जात नाही. एकदा एखाद्या वर्गाला सत्ता मिळाली की तो ती सोडू इच्छित नाही. हुकूमशाहा अमर्याद काळपर्यंत राहणार, सत्तेची एक परंपरा निर्माण होणार. जी कम्युनिस्ट पार्टी असेल ती सत्तेची मैत्रीण बनेल. आज रशियात तोच प्रकार झाला

आहे. या सत्तावाल्यांना हातची सत्ता सोडणे मग जिवावर येईल. महत्त्वाकांक्षी लोक पुढे येतील. हुकूमशाहीच्या संक्रमणावस्थेतून असे उत्पात निर्माण होण्याचा संभव आहे. कारण तुमची संक्रमणावस्था जवळ जवळ सारे जग समाजवादी होईपर्यंत राहणार!

तुम्ही मोठमोठी प्रशस्त शहरे निर्मू व प्रजा कशी एकत्र तरी राहते असे दिसणार नाही म्हणून म्हटलेत. परंतु प्रजा एकत्र न आणण्यात आणखीही आमची एक दृष्टी आहे. जगात युद्धे आहेत, महत्त्वाकांक्षा आहेत, तोपर्यंत धोकाही आहे. जगातील सारे धोके नाहीसे झाल्यावर तुम्ही तशी शहरे निर्मिलीत तर ठीक, परंतु सारे जग निर्वैर कधी होईल ते होवो. तोपर्यंत काय? तोपर्यंत जनता खेड्यापाड्यांतून पांगलेलीच राहू दे. ही विमाने पहा. एक लंडनवर आली की लाखो लोकांचे प्राण संकटात येतात. सात लाख खेडी हिंदुस्थानात आहेत. एक प्रकारे ते संरक्षणही आहे. परंतु या सात लाख खेड्यांची सातशे शहरे केली म्हणजे शत्रूच्या विमानांचे काम सोपे झाले. मरणाचा मार्ग सोपा झाला!

शिवाय आणखी किती तरी गोष्टी मनात येतात. तुम्हांला कदाचित त्या काव्यमय वाटतील. परन्तु ऐका. उद्या सारेच यंत्रमय करावयाचे. दूध प्रयोगालयात तयार होईल. नांगर वाफेचे असतील. कारण तुम्ही सारी शेती सामुदायिक करणार. असे झाले म्हणजे गायी-गुरांची जरूरच राहणार नाही. केवळ दुधासाठी गाय ठेवायची म्हटले तर बैलांचे काय करावयाचे? ते सारे मारून टाकावे लागतील. तुम्हांला त्याचे काही नाही वाटणार. परंतु आम्हा भारतीयांस वाटते. आम्ही मनुष्याचे कुटुंब मोठे केले आहे. माणसाच्या शेजारी घोडा आहे, कुत्रा आहे, मांजर आहे, गाय आहे, बैल आहे. माणसाचा आवाज गुरे ओळखून हंबरत आहेत. घोडा पाठीवर धन्याचा हात फिरताच फुर-फुरतो आहे. यात का आनंद नाही? पशूंनाही माणसाने स्वकुटुंबातील केले आहे. तुम्ही दोन चित्रे चितारा. एका चित्रात मनुष्याच्या सभोती फटफटी, वाफेचा नांगर वगैरे वस्तू उभ्या करा. दुसऱ्या चित्रात माणसा-

भोवती गाय, घोडा, वासरे रंगवा. कोणते चित्र तुम्हांला आवडेल ? घोड्याला थोपटले तर तो फुरफुरतो, हुंकार देतो. मनुष्याच्या प्रेमाला हे मुके पशू उत्तर देतात. त्यांना समजते. गाय अंग चाटायला येते. परंतु त्या फटफटीवरून हात फिरवला, त्या वाफेच्या नांगरावरून हात फिरवला तर माझ्या प्रेमाला आहे का उत्तर ? आपल्या प्रेमाला प्रत्युत्तर मिळाले तर अपार आनंद होतो. आपण मुलाचा मुका घेतो. मूल हसते. परंतु कचकड्याच्या बाहुल्यांचा मुका घेऊन आनंद होईल का ? तेव्हा सारेच उद्या यांत्रिक करावयाचे ठरविलेत तर गायी, बैल, घोडे सर्वांचीच हत्या करावी लागेल. तो एक निर्मळ आनंद नष्ट होईल.

शिवाय अहिंसा हा आमचा मार्ग. जे काही करावयाचे ते अहिंसेच्या मार्गाने. तुमच्या आमच्यातील इतर भेद दूर गेले समजा. परंतु हा सार्वभौम भेद राहीलच. कांदे पेरले तर कांदेच उगवतात. अत्याचाराने कधीही भले होत नाही. जे काही भले मागून झाल्यासारखे दिसते ते अत्याचारामुळे नव्हे, आपण जे भले करू त्यानेच भले होते. आई मुलांना मारते. परंतु मागून त्याला ती पोटाशी घेते. त्याची समजूत घालते. मुलाच्या मनात आईबद्दल राग आला असला तर मागूनच्या त्या प्रेमाने तो जातो. पण म्हणजे आईच्या मारण्याचा तो परिणाम नव्हे. मुलगा आईजवळ वरा वागतो, तो आईच्या बऱ्या वागण्याचा परिणाम. हिंसा व अत्याचार समाजात अनेक प्रकारे विष पेरतात. ती विषे केव्हा कशी वर येतील ते कळतही नाही. म्हणून अहिंसेचा उपाय हाच भला. हिंसेने जी सुधारणा लोकांच्या गळी मारावी लागेल ती सुधारणा न होता शेवटी शापरूपच ठरेल. म्हणून ‘अहिंसेच्या मार्गाने एक पाऊल पुढे पडले तरी पुरे’ असे आमचे मत आहे. घिसाडघाई काय कामाची ? मानवजातीचे जीवन सुधारणे म्हणजे माकडचेष्टा नाही. घेतले कोलीत, लावली आग, असा तो प्रकार नाही. अहिंसेने किती वर्षे लागतील, असे विचारण्यातही अर्थ नाही. जगाचे प्रयोग पाहताना हजार वर्षे म्हणजे एक घटका मानावी लागेल. या विशाल विश्वरचनेत तुम्ही आहात. तुम्हांलाच कसे पटकन झटपट रंगारी बनता येणार आहे ?

जंतूंतून मनुष्य उत्क्रान्त व्हायला ५० लाख वर्षे लागली. मानवी जीवन सुखी व्हायला अनंत काळ लागेल. आणि तुमच्या विरोध-विकासाच्या सिद्धान्ताप्रमाणे तर अशाला अंतच नाही. सारखी एका परिस्थितीच्या परिणतावस्थेतून प्रसववेदना होऊन दुसरी परिस्थिती निर्माण होणार. मग तुम्हांला किती काळ लागणार याची भीती वाटायची जरूरच नाही. कारण अंत व समाप्ती कधीच नाही.

गांधीवाद्यांच्या या सर्व गोष्टींना उत्तरे अशी :

यांत्रिक कामामुळे आनंद जातो व ग्रामोद्योगी कामात आनंद असतो असे जे गांधीवाद्यांचे म्हणणे आहे त्याला समाजवादी उत्तर देतात की, आपल्या कामातच आनंद मानणे हे काव्य आहे! एखाद्या विनोबाजींना सूत कातताना परमानंद होत असेल. त्यांना वाटेल की, या कापसाच्या पेळूतील अव्यक्त परमात्मा सूत्ररूपाने व्यक्त होऊन जणू बाहेर पडत आहे. त्यांना वाटेल की, हे सूत मला सर्व गरिबांशी जोडीत आहे. त्यांना वाटेल की, हिंदुमुसलमानांचे ऐक्य या धाग्यात आहे. त्यांना वाटेल की साधेपणा, सरळपणा, शुद्धपणा या सुतात आहे. ते चरख्याचे गूं गूं त्यांना ॐ ॐ ची कल्पना देईल. अशा अनेक सहृदय भावनांनी रंगून ते काततील. परंतु मजुरीने आठ आठ घंटे कातणारे आपले पेळू कधी संपतात याचीच वाट पाहात बसतील! शेतकऱ्याचे जीवन किती छान म्हणून वर्डस्वर्थ कवी नाचेल. 'आम्ही शेतकरी दैवाचे' असे कवी म्हणोत. परंतु तो शेतकरी राबत असतो. थंडीत कुडकुडतो. चिखलातून जातो. पावसात भिजतो. त्याला ऊन लागते. पायात काटे जातात. कधी साप भेटतो, कधी वाघ दिसतो. कधी पुरातून त्याला जावे लागते. कधी पाऊस येत नाही. कधी पिकले तर भाव नाही. सावकार, सरकार तर आहेतच. कोठला त्याला आनंद? आपल्या महान कार्यात आनंद मानता यावा, परंतु या स्थितीस पोचणाऱ्या माणसाचा परम विकास झालेला असावा लागतो. सर्वसामान्य जनता कामाला कामच म्हणते, व काम केव्हा एकदा संपेल याचीच जनता वाट बघते.

आणि स्वतःच्या निर्मितीचा म्हणून जो आनंद वैयक्तिक हस्तकर्मात आहे असे तुम्ही म्हणता तो आनंद सामुदायिक निर्मितीत का वाटणार नाही? एका जपानी कामगाराची गोष्ट आहे. तो लढाऊ जहाजे बांधण्याच्या कारखान्यात काम करीत होता. काम करता करता तो वाचायला शिकत होता. कोणी तरी त्याला विचारले, "तू आता कशाला शिकतोस वाचायला?" तो म्हणाला, "हे पोलादी गलबत केव्हा तरी लढाईत जाईल. शत्रूचा ते पराजय करील. या गलबताचे नाव वर्तमानपत्रात येईल. ज्या गलबताच्या बांधणीत माझाही हातभार होता त्या गलबताने जय मिळविला हे वाचून मला किती बरे आनंद होईल? ती आनंदाची वार्ता मला वाचता यावी म्हणून या गलबतात स्क्रू बसवता बसवता मी वाचायला शिकत आहे!" तो कामगार स्क्रू पिरगाळीत होता. तो कंटाळला नाही. हे जे आम्ही सर्व कामगार मिळून गलबत बांधीत आहोत त्यात माझाही भाग आहे, याचा त्याला आनंद होता. यांत्रिक निर्मितीतही "हा आमचा कारखाना. साऱ्या समाजासाठी येथून आम्ही माल देत आहोत. त्यात मीही भर घातली आहे. एखादा स्क्रू तयार केला आहे." असा आनंद राहील. सामुदायिक व वैयक्तिक असा दोहो प्रकारचा आनंद यात आहे. हा आनंद अधिकच उच्च आहे. केवळ वैयक्तिक आनंद कमी दर्जाचा आहे. गंगा सागरात मिळाली आहे, परंतु तिला स्वतंत्र, अलग असे अस्तित्वही आहे. अर्थात अशी सामुदायिक आनंदाची कल्पना घेण्यासही मनुष्याचा अधिक विकास व्हायला हवा. परंतु तुमच्या वैयक्तिक कर्मातील आनंद उपभोगावयासही विकास झालेला असला पाहिजे.

गायी-बैलाचे तुमचे काव्य नको. बैलाच्या नाकात वेसण टोचता. घोड्यांना लगाम घालता. बैलांना आर टोचता. घोड्याला फटके मारता. गायी-गुरांना प्रेमाने वागविणारा एखादाच! मुंबईस गोदीतून माल नेणाऱ्या बैलगाड्या पहा. हाकणारे चावकावर चाबूक उडवीत असतात. टांगेवाले रागावले म्हणजे घोड्याला किती मारतील त्याचा नेम नाही. मोटेला बैल जुंपला म्हणजे त्याला काय वाटत असेल ते त्याच्या वंशी जाऊ तेव्हा कळेल!

आम्ही हिंसेचे भक्त नसलो तरी हिंसा अपरिहार्य असेल तरच ती आम्ही करू. आम्ही साधी माणसे. याच घटकेला सारे बदलू दे असे आम्हांला वाटणार. बदलण्यासाठी आम्ही खटपट करणार. आजपर्यंत साधुसंतांनी उपदेश केले. परंतु कोणी ऐकले? ख्रिस्ताने सांगितले, "सुईच्या नेढ्यातून उंट जाईल, परंतु श्रीमंत मनुष्य स्वर्गात जाणार नाही." कुणी ते ऐकले? कुराण सांगते, "तू एकट्याने खाऊ नकोस, व्याज घेऊ नकोस." परंतु कोण ऐकतो? पठाणही आता सावकार बनले! "श्रीमंतांनो, तुम्ही ट्रस्टी व्हा." असे तुम्ही सांगता. कोणता श्रीमंत हे ऐकत आहे? या श्रीमंतांविरुद्ध आम्ही अहिंसक सत्याग्रह करून काय होणार? आमच्यावर गोळ्या घातल्या जाणार. आम्ही असे मरायला तयार नाही. उपासमारीने मरण. गोळीबाराने मरण. आमचे रोज मरणच आहे! ज्याच्यामुळे मरण आहे त्याला नष्ट करायला आम्ही उभे राहू. हिंसा-अहिंसा आमच्यासमोर प्रश्न नाही. कोट्यवधी गरिबांची हाय हाय होत आहे. ही जी श्रमणाऱ्या लोकांची तिळतिळ हिंसा होत आहे ती थांबविण्यासाठी मूठभर लोकांची हिंसा करावीच लागली तर ती आम्ही करू. आम्ही रक्तासाठी तहानलेले नाही. परंतु अपरिहार्यच झाले तर रक्त सांडायलाही आम्ही मागेपुढे पाहणार नाही. हिंसेतून हिंसा निर्माण होते, युद्धातून युद्ध निर्माण होते असे तुम्ही म्हणता. भांडवलशाही समाजरचना आहे, साम्राज्यवाद आहे तोपर्यंतच हे असे चालेल. कारण एक साम्राज्यशाही दुसऱ्या साम्राज्यशाहीचा पराजय करते. ती पराभूत साम्राज्यशाही पुन्हा जोर करून त्याचा सूड उगविते. जोपर्यंत अशी ही समाजरचना आहे, तोपर्यंत युद्ध राहणार. शेवटच्या हिंसेने एकदा समाजवादी वर्गविहीन समाजरचना निर्माण झाली की स्पर्धा संपेल. साम्राज्य अस्तंगत होतील. मग कोण कोणाशी लढणार? मग हिंसा कोठून दिसेल? हिंसेने हिंसाच निर्माण होईल ही गोष्ट शेवटपर्यंत सत्य नाही.

समाजवादी समाजरचना हा आदर्श आहे. प्रयोग एकदम थोडाच यशस्वी होतो? पण उत्तरोत्तर तो आम जनतेला मान्य होत चालला

आहे. रशियाने पोलंड घेतला, फिन्लंडवर स्वारी केली, बेसरबिया व्यापला. याबद्दल कोणी काही म्हणो. त्याचा उत्कृष्ट इतिहास 'मस्ट द वॉर स्प्रेड ?' या पुस्तकात आहे. रशियाने हे सारे स्वसंरक्षणार्थ केले. 'स्वसंरक्षणार्थही रशियाने दुसऱ्यावर आक्रमण का करावे ?' असा कोणी प्रश्न विचारील. प्रश्न विचारणे सोपे आहे. आपण एखादे कलम मोठ्या मिनतवारीने लावावे, ते कलम खायला एखादी गाय येत आहे असे दिसले तर आपण काठी घेऊन धावतो व गोमातेच्या पाठीत ती हाणतो ! हा न्याय समजणाऱ्यांनी फिन्लंडवरील हल्ल्याबाबत का नाक मुरडावे ? ब्रिटिश साम्राज्यसत्तेला साम्राज्यरक्षणार्थ सिंगापूर, एडन, सायप्रस ही हवीत. मग रशियाला का नकोत ? निदान रशियातील प्रयोग तरी बहुजनसमाजाच्या कल्याणाचा आहे. रशियाला पोलंडमध्ये स्वारी करताना गोळी घालावी लागली नाही. तरवार उगारावी लागली नाही. तेथील जनतेने रशियाच्या शेतकऱ्या-कामकऱ्यांच्या लाल सेनेचे स्वागत केले ! असे आक्रमण दुनियेत कोठे झाले असेल ? येणाऱ्या परसैन्याचा असा सत्कार कोणी केला असेल ? पोलंडमध्ये का स्वातंत्र्य होते ? बड्या धनिकांचीच तेथे सत्ता होती. कामगार व शेतकरी चिपाडाप्रमाणे तेथे पिळलेच जात होते. या श्रमणाऱ्या जनतेला लाल सेना तारणारी वाटली आणि रशियाने तसेच केले. प्रदेश घेतल्याबरोबर तेथे सर्वत्र शेतकऱ्या-कामकऱ्यांच्या समित्या स्थापन केल्या. कारखान्यातील म्हाताऱ्या कामगारांस पेन्शने देण्यात आली. प्रत्येक शेतकऱ्यास पाच एकर जमीन व दोन गायी देण्यात आल्या ! असे जगात कोणा जेत्याने आजपर्यंत केले होते का ?

पुष्कळदा म्हणण्यात येत असते की, आमच्या देशाच्या स्वातंत्र्यावर हल्ला झाला. अरे, परंतु त्या देशातील गरिबांना आहे का स्वातंत्र्य ? स्वातंत्र्य याचा अर्थ तेथील सत्ताधारी वर्गाचे स्वातंत्र्य, बहुजनसमाजाला मिळण्याचे स्वातंत्र्य ! त्यांच्या सत्तेवर हल्ला होतो आणि ते ओरड करतात की, आमच्या स्वातंत्र्यावर आक्रमण झाले. परंतु तेथील बहुजनसमाज पायाखाली घातलेला असतो. तो बहुजनसमाज त्या आक्रमणाचे स्वागत करतो,–जर ते आक्रमण रशियासारखे असेल तर.

समाजवादी अशी बाजू मांडत असतात व शेवटी सांगतात, "समाजवादी रशियाच्या प्रयोगाकडे सहानुभूतीने पहा. वीस-पंचवीस वर्षे तर प्रयोगाला झाली. एकंदरीने रशिया सुधारला आहे की नाही ते पहा!"

रवीन्द्रनाथ ठाकूर रशियातील शिक्षणप्रयोग पहावयास गेले होते. त्यांना तेथील शैक्षणिक क्रान्ती पाहून आश्चर्य वाटले. त्यांनी एका रशियन शेतकऱ्यास विचारले, "तुमच्या या नवीन प्रयोगात कुटुंबपद्धती नष्ट नाही का होणार?" तो शेतकरी म्हणाला, "कुटुंब म्हणजे काय ते आता आम्हांस समजू लागले. पूर्वी कसले कुटुंब? मी उजाडत कारखान्यात भोंगा वाजताच कामावर जात असे. दिवसभर काम करावे. रात्री दमून घरी यावे. भाकर खावी व मेल्यासारखे पडावे! कामावर जाताना मुले झोपलेली. कामावरून परत येतो तो मुले झोपलेली!! मुलांजवळ बोलता येत नाही. हसता खेळता येत नाही. बायकोबरोबर कोठले सुखाचे बोलणे? परंतु आता कामाचे तास कमी होतील. बायकोबरोबर मी फिरायला जाईन. हसेन, बोलेन. आम्ही दोघे कामावर गेलो तर पाठीमागे मुलांची चिंता नसते. बालसंगोपनगृहात ती खेळतात. संध्याकाळी मुले घरी येतात. आम्ही भेटतो. मुलांना जवळ घेतो. आनंद आहे आता. कुटुंब म्हणजे काय ते आता कळू लागले. समाजवादी समाजरचनेत वैयक्तिक व खासगी अशी मालमत्ता राहिली नाही तरी पतिपत्नींचे प्रेमळ संबंध राहतील. मुलांचे प्रेम राहील. मुलांसाठी इस्टेटी ठेवण्याची जरूरी वाटणार नाही." रवीन्द्रनाथांना त्या कामगाराचे ते बोलणे ऐकून आश्चर्य वाटले. रवीन्द्रनाथांनी रशियातून आल्यावर लेख लिहिला. चौदा–पंधरा वर्षांपूर्वीची ती गोष्ट आहे. त्या लेखात रवीन्द्रनाथांनी रशियनांची पाठ थोपटली. परंतु ते शेवटी म्हणतात, "हे सारे अहिंसेने करता आले असते तर?"

गांधीजी अहिंसेवर भर देतात. महात्माजींचा सर्वोदयाचा प्रयोग आहे. श्रीमंतांनी विश्वस्त व्हावे व गरिबांसाठी झिजावे. त्यांनीही जगावे, आणि गरिबांनाही नीट जगू द्यावे. श्रीमंत न ऐकतील तर गरिबाने अहिंसात्मक सत्याग्रही लढा करावा. त्या श्रीमंतांचा हृदयपालट आपल्या

बलिदानाने करावा. असा हा गांधीजींचा मार्ग आहे. हरिजनमध्ये महादेवभाईंनी लिहिले, "निवडणुकी समाजवादाच्या कार्यक्रमावर लढवून बहुमत मिळवून जर कोणी कायदे करू लागला तर ते सनदशीर आहे. कारण बहुजनसमाजाने त्या कार्यक्रमास मान्यता दिली आहे." परंतु उद्या समाजवादी पक्षाला बहुमत मिळाले व तो पक्ष कायदे करू लागला तर स्पेनमध्य झाले तसे होईल. या देशातील भांडवलवाले, सरंजामदार, मठवाले व देवस्थानवाले, संस्थानिक, जमीनदार, खोत सारे एक होतील. त्यांच्या पांढरपेशा स्वयंसेवक संघटना उभ्या आहेत. या संघांच्या लाठ्या समाजवादी कायदे करणाऱ्यांवर पडतील. अशा वेळी अहिंसेने प्रतिकार करावयाचा की सेना उभारायची, गरिबांची– श्रमणाऱ्यांची-पलटण उभारायची? गांधीजी म्हणतील, "अहिंसक शांतिसेना उभारू, मुकाट्याने बसण्यासाठी नाही तर शांतपणे प्रतिकार करण्यासाठी. प्रतिकार करू, परंतु तो अहिंसक." परंतु समाजवादी म्हणतील, "आम्हांला तर हिंसेचाच आश्रय करावा लागेल." स्पेनमध्ये शेतकरी-कामकरी पडले. कारण सर्व बाजूंनी भांडवलवाल्या राष्ट्रांनी घेरले आणि मदत देणाऱ्या रशियाचेही धोरण तऱ्हेवाईक व फसवे होते. परंतु सर्वत्र काही असेच होणार नाही.

वसंता, असे हे वाद आहेत. गांधीजींचा प्रयोग आज चालला आहे. काँग्रेस सर्वांना संयम राखा असे सांगत आहे. परंतु वरिष्ठ वर्ग जर सुधारणारच नसतील तर पू. विनोबाजी धुळ्यास एकदा म्हणाले, "हे गरीब लोक आज भोळ्या सांबाप्रमाणे जगाचे कल्याण करणारे शिवशंकर आहेत. स्वतः उपासमार, अज्ञान, अपमान याचे विष पिऊन जगाला अमृत देत आहेत. परंतु गरिबांच्या सहनशीलतेचा शेवट होईल आणि मग दरिद्र देव रुद्र होईल, आणि पुंजीपतींना तो काकडीप्रमाणे खाऊन टाकील. म्हणून सावध रहा." जे जगात इतरत्र झाले तेच माझ्या देशातही व्हायचे असेल तर त्याला काय इलाज? बर्नार्ड शॉने एके ठिकाणी इंग्रजांस बजावले आहे की, "तुमच्या ताब्यातील प्रदेशांस स्वातंत्र्य द्या. त्यामुळे भले संबंध राहतील. परंतु

तुमच्या अन्यायाने ते पददलित परतंत्र लोक खवळले म्हणजे रक्तपात होईल, कायमची वैरे राहतील. परंतु तुम्हांला त्या रक्तपातांचेच डोहाळे होत असले तर त्याला कोण काय करणार? तुमची ती इच्छा पूर्ण होईल– "Then you will have blood, your own choice."

त्याप्रमाणे या देशातील वरिष्ठ वर्गांना गांधीजींचा सर्वोदयाचा मार्ग रुचला नाही तर का दरिद्री जनता अनंत काळ वाट पाहणार आहे? गांधीजींच्या मताचे अहिंसक लोक लाट अडवू पाहतील. परंतु गांधीजींसारखे विभूतिमत्त्व कोणाजवळ असणार? गांधीजींसारख्या युगपुरुषाने हिंदुस्थानात आज लाट थांबविली आहे. परंतु गांधीजी नेहमी म्हणतात, "I see red ruin ahead– पुढे मला रक्तपात दिसत आहे." त्या लाल रक्तमांसाच्या चिखलातून जायचे नसेल तर वरिष्ठ वर्गांनो, सावध रहा. गरिबांना जगवा, त्यांचे संसार सुखी करा.

परंतु महर्षी व्यास महाभारताच्या शेवटी खेदाने व दुःखाने म्हणतात–

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष नच कश्चिच्छृणोति माम्।
धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते॥

सर्व समाजाचे नीट धारणपोषण होईल अशा रीतीने अर्थकामास नियंत्रित करा, असे व्यास सांगतात. आज महात्माजी तेच सांगत आहेत. परंतु हे सांगणे वायाच जाणार का? काळाला माहीत. आज तरी आपण सारे काँग्रेसच्या प्रयोगात सामील होऊ या. पुढे व्हायचे ते होईल.

तुझा

**श्याम**

पत्र सोळावे

# जसे शिक्षण तसे जीवन

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तू मला परवाच्या पत्रात अचानक एक नवीनच प्रश्न केलास. ठीक केलेस. राष्ट्रातील सर्व प्रश्नांची माहिती हवी. भगिनी निवेदिता यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, "ते खरे शिक्षण- जे या क्षणापर्यंतच्या सर्व प्रश्नांचे सम्यक् ज्ञान देते. जास्तीत जास्त पुढे गेलेल्या आजच्या विचार-सरणीशीही गाठ घालते." तू वर्धा शिक्षण पद्धतीविषयी माहिती विचारलीस. मला आनंद झाला. तुझ्या सेवा दलातील एका मुलाने हा प्रश्न तुला विचारला. त्याला वक्तृत्वोत्तेजक सभेत या विषयावर बोलायचे आहे. चांगले आहे. तुला जाता जाता एक गोष्ट सांगतो. तुमच्या सेवा दलातील मुलांसाठी चिकट–बुके तयार करा. इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रे येत असतात. त्यांतून निरनिराळ्या विषयांवरची कात्रणे कापून ती निरनिराळ्या फायलीतून चिकटवावीत. ही चीनची फाइल, ही महायुद्ध फाइल, ही रशिया फाइल, ही काँग्रेस फाइल, ही विद्यार्थी चळवळीची फाइल, ही किसान-कामगार फाइल, ही कम्युनिस्ट फाइल, ही खेळ-व्यायाम फाइल, ही कला व वाङ्मय फाइल,-अशा अनेक फायली कराव्या. त्या त्या विषयासंबंधीची कात्रणे त्या त्या फायलीत ठेवावी. म्हणजे आपणाजवळ माहिती जमते. आपणास चीनची माहिती पाहिजे असली म्हणजे ती चीन-फाइल काढावी. शिक्षणासंबंधी माहिती हवी असली की शिक्षण फाइल काढावी. जसे हे कात्रणाचे सांगितले, तसेच एक काम म्हणजे आल्बममध्ये निरनिराळ्या देशभक्तांचे निरनिराळ्या

वेळचे फोटो, युद्धाचे देखावे, इतरही निरनिराळ्या क्षेत्रांतील फोटो, सुंदर स्थळे व देखावे यांचे फोटो अशांचे सुंदर आल्बम करावे. मुलांना दाखवायला बरे असते. असो.

वर्धा शिक्षण पद्धतीवर लिहिलेली पुस्तके अशी मराठीत अद्याप फारशी नाहीत. आजन्म शिक्षणकार्याला वाहून घेतलेले श्री. आपटे गुरुजी या विषयावर पुस्तक प्रसिद्ध करणार होते. वर्धा शिक्षण पद्धतीत उद्योग-द्वारा शिक्षण द्यायचे असते. पू. विनोबाजींनी खादीद्वारा शिक्षण द्यायचे झाले तर कसे द्यावे यावर एक लहान पुस्तक लिहून प्रसिद्धीसाठी दिले. बोर्डीच्या सुप्रसिद्ध शाळेचे थोर चालक आचार्य भिसे यांनी शेतीद्वारा कसे शिक्षण द्यावे ते एका पुस्तकाच्याद्वारा लिहिले आहे. त्यागी व विद्वान आचार्य भागवत 'वर्धा शिक्षण पद्धती पत्रिका' चालवीत असत. त्या पत्रिकेतूनही काही निबंध प्रसिद्ध झाले आहेत.

शिक्षण हे जीवनाला आकार देण्याचे महत्त्वाचे साधन. जसे शिक्षण तसे मन. जसे मन तसे जीवन. शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. जीवन सुंदर करायचे असेल तर शिक्षणाचा खोल विचार करायला हवा. बर्नार्ड शॉने एके ठिकाणी म्हटले आहे, "साऱ्या शाळा बंद करा. म्हणजे मानवजात सुधारेल!" शॉ नेहमी अत्यंतिक तऱ्हेने लिहितो व बोलतो. त्याच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की शिक्षण हे पुष्कळ वेळा सत्ताधारी हुकूमशहा आपल्या इच्छेप्रमाणे लादीत असतात. जसे सरकार तसे शिक्षण. मनुष्याच्या हृदयाच्या, बुद्धीच्या व देहाच्या भुका व गरजा कोण बघतो? शिक्षणाने देह, मन व बुद्धी या तिहींचा समन्वय करता आला पाहिजे. शिक्षणाने पोषण करायला आपण समर्थ बनले पाहिजे. मनाने उदार झाले पाहिजे. बुद्धी विचार ग्रहण करणारी व स्वतंत्रपणे विचार करणारी झाली पाहिजे.

हिंदुस्थानात प्राचीन काळापासून शिक्षण आहे. आपल्याकडे बहुजन समाजाच्या शिक्षणाचे साधन श्रवण हे असे. सारेच गुरुगृही जाऊन शिकत असतील असे नाही. स्त्रियांचे शिक्षण तर पुढे बंदच झाले. मुले-मुली एकत्र शिकत असे उत्तररामचरित् व शाकुंतल यांतील

उल्लेखांवरून वाटते. राजांचे मुलगेही आश्रमात रहात. त्यांनाही शिस्तीत व आश्रमाच्या नियमाप्रमाणे वागावे लागे. चौदा विद्या व चौसष्ट कला आपण मानीत आलो. आश्रमातून बौद्धिक व शारीरिक शिक्षण दिले जाई. काही काहींना विशिष्ट असे शिक्षण दिले जात असावे.

विषय कोणतेही असोत, भारतीय शिक्षणशास्त्राने जर कशावर भर दिला असेल तर तो एकाग्रतेवर. मन एकाग्र करायला शिका. बुद्धी एकाग्र करायला शिका. मग गायत्री मंत्राने एकाग्र करा, सूर्याकडे पाहून एकाग्र करा, किंवा अर्धोन्मीलित दृष्टी ठेवून एकाग्र करा. कोठूनही हे चंचल मन एकाग्र करायला शिका. मनाची शक्ती अनंत आहे. ही अनंत चैतन्यशक्ती सारखी सर्वत्र वारेमाप जात असते. ती एकत्र केली पाहिजे. सूर्याचे किरण काचेतून एकत्रित करून कापसावर सोडले तर कापूस पेटतो! परंतु कापूस नुसता उन्हात धरू तर पेटणार नाही. फाकलेल्या किरणांत ती शक्ती नसते. केन्द्रीभूत किरणांत ती शक्ती असते. त्याप्रमाणे मनाची, बुद्धीची शक्ती केन्द्रीभूत करून एखाद्या विषयावर सोडली तर तो विषय समजण्यास कठीण जाणार नाही.

वसंता, मी एकदा एक मनुष्य पाहिला होता. तो सुपारी दोन बोटांनी धरी व तिचा चुरा करी! आंगठा व मधले बोट या दोन बोटांच्या अग्रभागी सारी शरीरातील शक्ती तो जणू एकवटी आणि ती शक्ती या सुपारीवर सोडी. सुपारीचा चुरा होई! तसेच बुद्धीचे आहे. ज्याला बुद्धी एकाग्र करण्याची सवय झाली तो कोणत्याही विषयात प्रगती करू शकेल. भारतीय शिक्षण शास्त्राने हा महत्त्वाचा सिद्धान्त जगाला दिला आहे.

हिंदुस्थानातील बहुजन समाज लहानपणापासूनच बापाचा धंदा शिकत असे. जीविकेचा धंदा लहानपणापासूनच सुरू होई. कुंभाराचा मुलगा मडके करू लागे. सुताराचा रंधू लागे, लोहाराचा भाता फुंकू लागे, आपापल्या पिढीजात धंद्याचे ज्ञान त्यांना घरीच जणू मिळे. किंवा त्या त्या धंद्यातील अधिक कसबी माणसांकडे काही दिवस उमेदवारी करीत. मनाचे व बुद्धीचे सांस्कृतिक ज्ञान श्रवणाने मिळे. कथा, कीर्तने, पुराणे यांतून मिळे. जग हीच जणू आमची शाळा होती!

ब्रिटिश राजवट आली आणि मुख्य फरक हा झाला की येथील धंदेच बुडाले. लोक बेकार होऊ लागले. ब्रिटिशांनी नवीन शिक्षण सुरू केले. प्रथम हे शिक्षण त्या त्या प्रान्तांच्या प्रान्तिक भाषांतून सुरू झाले. निरनिराळ्या विषयांवर भाषान्तरे होऊ लागली. परंतु मेकॉले साहेबांनी आपली भारतीय शिक्षणावरची पत्रिका प्रसिद्ध केली आणि इंग्रजीतून शिक्षण सुरू झाले !

परभाषेतून शिक्षण देण्याचा प्रयोग दुनियेत कोठे झाला नसेल ! शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हेच असणे साहजिकच आहे. परंतु पारतंत्र्यात सारेच अस्वाभाविक असते. देशाची लेकरे अन्नास मोताद होतात व परकीयांची चैन चालते ! इंग्रजांना देशाचा कारभार चालविण्यास गावठी साहेब हवे होते. त्यांना इंग्रजी लिहिणारे, बोलणारे कारकून हवे होते. प्रथम इंग्रजी शाळेत मुलांनी यावे म्हणून खाऊ वाटले जात, बक्षिसे दिली जात, पैसे दिले जात. मुलांनी फी देण्याऐवजी शाळेतून घरी पैसे न्यावे ! परंतु पुढे सारे तंत्र बदलले. लाखो लोक शिकू लागले आणि शिकून कर्मक्षेत्र तर दिसेना.

शिक्षण सरकारच्या हाती होते. लोकांना वाटले की आपल्या हातात शिक्षण घ्यावे. मिशनरी लोकांच्या संस्था देशभर होत्याच. आपले लोकही शिक्षण संस्था काढू लागले. महाराष्ट्रात प्रथम थोर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सरकारी नोकरी सोडून शिक्षणकार्यास वाहून घेतले. त्यांना आगरकर, टिळक अशी अद्वितीय माणसे मिळाली. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाले. फर्ग्युसन कॉलेज झाले. प्रथम सरकारी ग्रँट घ्यायची नाही असे धोरण होते म्हणतात. परंतु पुढे ग्रँट घेऊ लागले. लोकमान्य संस्था सोडून गेले ! सरकारी शाळा–कॉलेजांतून शिक्षण मिळे तेच येथेही मिळे. येथे फी थोडी कमी, शिक्षक कमी पगारावर राहात. अन्यत्र मोठ्या नोकऱ्या मिळत असूनही त्यागपूर्वक या संस्थांतून कामे करीत.

या संस्थेचे अनुकरण करणाऱ्या अनेक संस्था महाराष्ट्रभर निघाल्या. परंतु शिक्षणात काय बदल झाला ? शिक्षण तेच. शिक्षक शिकवताना

देशभक्तीच्या ज्या काही थोड्याफार गोष्टी सांगतील तेवढाच काय तो फरक. परंतु ज्याला राहवत नाही असा शिक्षक कोणत्याही शाळेत असो, तेथे तो देशभक्तीच्या गोष्टी सांगेलच. रोज उठून काही इन्स्पेक्टर बघायला येत नसतो. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाचे सारे विषय मातृभाषेतून शिकवण्याचे ध्येय होते. परंतु ते ध्येय कागदावरच राहिले व इतर शाळांप्रमाणेच तेथेही शिक्षण सुरू झाले. १९१८ मध्ये प्रो. घारपुरे यांनी न्यू कॉलेजमध्ये पहिल्या वर्गाला मराठीतून सृष्टिशास्त्र शिकवायला आरंभ केला. परंतु इतर प्रोफेसरांनी त्यांना तसे शिकवणे बंद करायला लावले!

१९०६ साली कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत जी चतुःसूत्री जन्मली तीत राष्ट्रीय शिक्षण हा शब्द जन्मास आला. सरकारी शाळांवर बहिष्कार घालावा. सरकारशी संबंध नसणाऱ्या शिक्षणसंस्था काढाव्या असे ठरले. बडोदे संस्थानातून श्री. अरविंद घोष तेथील सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन कलकत्त्यास राष्ट्रीय विद्यालय स्थापण्या साठी गेले. महाराष्ट्रात तळगावला श्री. अण्णासाहेब विजापूरकर यांनी समर्थ विद्यालय काढले. श्री. ज. स. करंदीकर, श्री. जनार्दनपंत ओक वगैरे थोर त्यागी माणसे तेथे शिकवू लागली. परंतु या संस्थांतूनही शिक्षण कोणते होते? तेच शिक्षण! शिक्षणाचा खोल असा कोणी फारसा विचार केला नव्हता. समर्थ विद्यालयात पहाटे उठणे, स्नान-संध्या, गंध, हजामत, सोवळे, श्लोक म्हणणे या गोष्टींवर अधिक भर देण्यात येई. ही जी ब्राह्मणी सोवळी संस्कृती तिचा येथे जणू आदर्श होता! खरे म्हणजे आपले राष्ट्र त्या वेळेस चाचपडत होते. राष्ट्रीयता शोधीत होते. स्तिमित झालेला देश कोठून स्फूर्ती मिळते का ते पहात होता. कोणी रजपूत इतिहासातून स्फूर्ती घेऊ लागले, कोणी मराठी इतिहासातून स्फूर्ती घेऊ लागले. कोणाला ती जुनी जानवी व शेंडीची संस्कृती स्फूर्ती देईल असे वाटू लागले. या सर्व गोष्टी ही बाह्य प्रतीके होती. या सर्व गोष्टीतून देशा-विषयीचा अभिमान आम्हांस जागृत करावयाचा होता. साहेबाचे अंध अनुकरण करणारे आम्ही होत होतो. स्वदेशास पारखे होत होतो. हॅट,

बूट, सूट घालणे पाप आहे असे नाही, परंतु त्यामुळे जर स्वजन व स्वदेशी यांच्यापासून दूर जाणार असू तर ह्या वस्तू त्याज्यच समजल्या पाहिजेत. इतिहाससंशोधक राजवाडे म्हणत, "प्रयोगशाळेत पंचा नेसून आपण गेलो तर काय ऑक्सिजन तयार होणार नाही? त्यासाठी काय साहेबांची विजारच पाहिजे?"

रजपूत व मुसलमान यांचे झगडे, मराठे व मुसलमान यांचे झगडे यांतून आम्ही नवराष्ट्रस्फूर्ती मिळवीत होतो! परंतु जुन्या इतिहासातून राष्ट्रीयता घेताना काहींची मते हिंदू-मुस्लिम द्वेषाने नकळत भरली. वास्तविक त्या जुन्या इतिहासातील त्यागाची, स्वातंत्र्याची स्फूर्ती घेऊन आजच्या स्वातंत्र्यलढ्यात ती उपयोगावयाची असते. परंतु आजचा परकी शत्रू दूर राहून काही नव सुशिक्षित हिंदू-मुसलमान एकमेकांचेच वैरी होऊ लागले!

त्या काळात शिक्षणाचा विचार नव्हता. स्वराज्याचा थोडासा विचार होता. परंतु स्वराज्याचा अर्थही स्पष्ट नव्हता. स्वदेशाची, स्वदेशीची, स्वधर्माची, स्वसंस्कृतीची चाड उत्पन्न करण्यासाठी नवीन संस्था निघाल्या. परंतु शिक्षणशास्त्राचा असा त्यांत विचार नव्हता. शिक्षण इतरत्र मिळे तेच येथे मिळे. १९०७–८ सालानंतर हिंदुस्थानभर सरकारने दडपशाहीचा वरवंटा फिरवला. त्यात राष्ट्रीय शाळा बंद पडल्या. समर्थ विद्यालय बंद झाले. समर्थ विद्यालयातील विद्यार्थ्यांस दुसऱ्या शाळेतून घेण्यास बंदी झाली! तळेगावच्या समर्थ विद्यालयातीलच तो तरुण वीर पिंगळे! गदर चळवळीत तो फाशी दिला गेला. जपानमध्ये राहणाऱ्या रासबिहारींनी या हुतात्मा पिंगळयांबद्दल लिहिले, "इतका तेजस्वी तरुण मी पाहिला नव्हता!" विजापूरकरांनी लो. टिळक सुटून आल्यावर नामदार चौबळ वगैरेंच्या साहाय्याने तळेगावला नवीन समर्थ विद्यालय पुन्हा स्थापले. तेथे बौद्धिक शिक्षणाबरोबर डेअरी, ऑइल एंजिन चालविणे वगैरे गोष्टींचेही शिक्षण द्यावे असे त्यांनी ठरविले. बौद्धिक शिक्षणाला धंदेशिक्षणाची जोड द्यावी असे विजापूरकर म्हणत होते.

तिकडे १९१२ मध्ये व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या हस्ते बनारस हिंदू विद्यापीठाचा पाया घातला गेला. पंडित मदनमोहन मालवीयांचे अमर कार्य ! केवढी आहे बनारस युनिव्हर्सिटी ! हजारो मुले तेथे शिकत आहेत. सर्व प्रकारची कॉलेजे त्यास जोडलेली आहेत. कोटी कोटी रुपये त्यासाठी मालवीयजींनी मिळवले.

परंतु हिंदुस्थानातील शिक्षण कसे असावे, याचा विचार कोणीही केला नव्हता. कलकत्ता युनिव्हर्सिटीने सॅडलर कमिटी नेमून शिक्षणावर दहा बारा खंडांतून रिपोर्ट प्रसिद्ध केला. तो रिपोर्ट महत्त्वाचा आहे. परंतु तो लायब्ऱ्यांतून पडून राहिला ! त्या रिपोर्टातही अखिल हिंदुस्थानच्या सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न सोडवलेला नाही.

१९२० साल आले. असहकाराचे युग आले. शाळा-कॉलेजांवर पुन्हा बहिष्कार आला. शेकडो विद्यार्थी बाहेर पडले. कारण शिक्षणात जीवनदायी असे काही राहिलेच नव्हते. 'मॉडर्न रिव्हयु' ने लिहिले, "शिलर या जर्मन नाटककाराचे 'रॉबर्स' नाटक वाचून व पाहून कित्येक जर्मन तरुण खरोखरच चोर बनले ! त्याप्रमाणे काँग्रेसने शाळा सोडा म्हणताच शेकडोंनी शाळा सोडल्या. कारण शाळा-कॉलेजांत आकर्षक असे काही नव्हतेच."

परंतु या विद्यार्थ्यांचे पुढे काय करावयाचे ? त्यांना शिकण्याची तर इच्छा होती. राष्ट्रीय शाळा-महाशाळा निघाल्या. टिळक विद्यापीठ स्थापन झाले. अहमदाबादला गुजरात विद्यापीठ स्थापन झाले. मुंबईस नॅशनल मेडिकल कॉलेज निघाले. अमळनेर येथे राष्ट्रीय महाविद्यालय निघाले. राष्ट्रीय शाळा तर सातारा, पुणे, नगर, चिंचवड, येवले, भुसावळ, खामगाव, अकोला, यवतमाळ अनेक ठिकाणी बृहन्महाराष्ट्रात निघाल्या.

परंतु या सर्व संस्थांतून शिक्षण कोणते होते ? तेच काव्यशास्त्रविनोदाचे शिक्षण ! मात्र ते मातृभाषेतून दिले जाई. गुजरात विद्यापीठाने थोडाफार अर्थशास्त्रविषयक शिक्षणाचा प्रयोग केला. 'मातर' तालुक्याची पाहणी हे संशोधनात्मक पुस्तक गुजरात विद्यापीठातील

डॉ. कुमारप्पा यांनी विद्यार्थ्यांसह खेड्यापाड्यांत हिंडून तयार केले! हिंदी अर्थशास्त्र म्हणजे सात लाख खेड्यांचे अर्थशास्त्र असे त्यांनी सांगितले. महात्मा गांधींनी, "स्वातंत्र्यासाठी सत्याग्रही तयार करील ते राष्ट्रीय शिक्षण." अशी व्याख्या केली. राष्ट्र आधी स्वतंत्र केले पाहिजे. आज दुसरे प्रश्न आपण हाती घेऊ शकत नाही. कोणतेही प्रयोग स्वराज्याशिवाय फोल आहेत. तेव्हा ते स्वराज्य जवळ आणण्यासाठी शिपायी हवेत. सत्याग्रही हवेत. शिक्षणाने असे त्यागी, स्वातंत्र्यप्रेमी सत्याग्रही सैन्य निर्माण करावे. असे महात्माजींचे म्हणणे.

१९३० व ३२ च्या लढ्यांत राष्ट्रीय शिक्षण संस्था सामील झाल्या. त्या लढ्यांत या संस्थांच्या आहुती पडल्या! त्या संस्था पुन्हा उभारणे जड झाले. गांधीजींनी गुजरात विद्यापीठाला विचारले, "दहा वर्षे विद्यापीठ चालले. खेड्यात काम करण्यास किती तरुण आपण तयार केले?" समाधानकारक उत्तर मिळाले नाही! गुजरात विद्यापीठ बंद झाले. महात्माजी वर्ध्याजवळ रहावयास गेले. तेथे पू. विनोबाजी-भोवती सेवकांचा मेळावा होता.—जे खेड्यापाड्यांतून हिंडत होते, कामे करीत होते.

महात्माजींना काही मित्र म्हणाले, "तुम्ही खादी भक्कम पायावर उभारलीत. ग्रामोद्योग उभारलात. हरिजनसेवक संघ स्थापलात. हिंदी भाषेला चालना दिलीत. गोरक्षण सुरू केलेत. परंतु शिक्षणाचा तुम्ही नवीन पाया घातला नाही. आम्ही राष्ट्रीय शाळा काढल्या पण तेच जुने शिक्षण देत बसलो. तुम्ही शिक्षणाकडे एकदा दृष्टी वळवा."

महात्माजींच्या मनात शिक्षणासंबंधी विचार आफ्रिकेपासून घोळत होते. राष्ट्र-पुरुष सर्व गोष्टींचा विचार रात्रंदिवस मनात करीत असतो! त्याच्या स्मृतीतून, त्याच्या व्यापक दृष्टीतून कोणतीही गोष्ट सुटत नसते. निरनिराळ्या आश्रमांतून प्रयोग चालले होते. शिक्षणशास्त्राचा अभ्यास केलेले श्री. काकासाहेब कालेलकर, पू. विनोबाजी वगैरे मंडळी महात्माजींजवळ होती. वर्ध्याच्या मारवाडी विद्यालयाच्या समारंभाच्या निमित्ताने महात्माजींनी शिक्षणशास्त्रज्ञांची एक बैठक बोलावली. दिल्लीच्या

‘ जमिया मिलिया ’ राष्ट्रीय विद्यालयाचे प्रमुख डॉ. झकीर हुसेन हे आले. प्रा. शहा आले. आर्यनायकम् आले. अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञ आले. विचार–विनिमय झाला. महात्माजींनी आपले शिक्षणविषयक विचार तेथे मांडले व एक समिती नेमली गेली. डॉ. झकीर हुसेन तिचे अध्यक्ष होते.

समितीने दोन महिन्यात अहवाल लिहिला. वर्ध्याला ही शिक्षणपद्धती आखली गेली म्हणून हिला वर्धा शिक्षणपद्धती म्हणतात. वास्तविक हिला ‘ समवाय–शिक्षण–पद्धती ’ असे नाव दिले पाहिजे. वर्धा शिक्षण-पद्धतीवर या लहानशा पत्रात मी कितीसे लिहू. परंतु आजपर्यंत ज्या ज्या शिक्षणपद्धती निघाल्या, शिक्षणशास्त्रात जे जे सिद्धान्त आजपर्यंत जगात मांडले गेले ते सर्व जमेस धरून त्यात वर्धा शिक्षणपद्धतीने आणखी नवी भर घातली आहे. वर्धा शिक्षण पद्धती म्हणजे महात्माजी व त्यांचे अनुयायी यांचे शास्त्रीय ढंग नव्हेत, ती एक शास्त्रीय पद्धती आहे. मानसशास्त्र तिने अभ्यासिले आहे. आजपर्यंतचे अनुभव जमेस घेतले आहेत. आपल्याकडे बी. टी. किंवा एस्. टी. सी. वगैरे होतात, त्यांना शिक्षणशास्त्राचा इतिहास असतो. युरोपातील अनेक शिक्षण-तज्ज्ञांनी कोणती भर घातली ते त्या इतिहासात असते. रूसो फ्रॉबेल, पेस्टॅलॉझी, मॉंटेसरी अशा शिक्षणाचा विचार करणाऱ्या थोर व्यक्ती तिकडे झाल्या. मॅांटेसरीबाई तर आज हिंदुस्थानात येऊन आपली पद्धती शिकवीत आहेत ! बी. टी. वगैरे होणाऱ्यांस या सर्व पद्धतींचा अभ्यास करावा लागतो. रूसो हा अत्यंत प्रतिभाशाली पुरुष होऊन गेला. तो म्हणत असे, “ निसर्ग हाच मोठा शिक्षक, निसर्ग शिकवील. ” शेक्सपीअर या महाकवीने म्हटले आहे, “ Books in brooks and sermons in stones”.– झऱ्यातून पुस्तके आहेत, पाषाणातून प्रवचने आहेत. मनुस्मृतीत सांगितले आहे, “ पाऊस पडू लागला म्हणजे मुलांना सुटी द्यावी ! ” त्या मुलांना पावसात नाचू दे. त्यांच्या भावनाही नाचू लागतील. रूसोने निसर्ग-शिक्षणावर जोर दिला.

फ्रॉबेल हा जर्मन शिक्षणशास्त्रज्ञ सांगतो की “ लहान मुले म्हणजे देवाचे काव्य ! जीवनात ताल, छंद, नाच यांना महत्त्व आहे. मुलांना

हावभाव करावे असे फार वाटते. नाचावे, गावे असे वाटते. यासाठी मुलांना निरनिराळ्या गाण्यांमधून शिकवा." आपल्याकडे गुजराती लोकांत गर्बागाणी असतात. त्यांत हावभाव असतो. गर्बा जणू लोकांच्या भावनांना वळण देणारे महान साधनच. प्लेटो म्हणत असे, "संगीत हा सृष्टीचा आत्माच आहे. तारे आकाशात थरथरत आहेत. ते तेथे गात आहेत. गायनातील तानांचा तो कंप आहे!" शिक्षणात संगीताला फार महत्त्व. निदान लहान मुलांच्या शिक्षणात तरी.

पेस्टॅलॉझी शिक्षणात श्रमशक्तीला वाव द्यावा असे म्हणे. क्रियाशक्तीला अधिक अवसर द्यावा असे म्हणे. आणि इटालियन भगिनी मादाम मॉंटेसरी मुलांच्या उपजत वृत्तीवर अधिक भर देतात. मुलांच्या भोवती असे वातावरण ठेवावे, असे साहित्य ठेवावे की त्यातून ती आपोआप आपल्या भावनांस व बुद्धीस अनुरूप व अनुकूल ते घेतील. शिक्षक हा नुसता मार्गदर्शक, सूचक. मुलेच जणू स्वतः शिकत आहेत. तीच स्वतःची शिक्षक. गुजरातमधील थोर बालसेवक स्वर्गीय गिजूभाई यांनी भावनगर येथे दक्षिणामूर्ती नावाची अभिनव संस्था चालविली होती, तेथे या पद्धतीचे प्रयोग होत असत.

अमेरिकेतील बुकर टी. वॉशिंग्टन या निग्रो महात्म्याने औद्योगिक शिक्षणावर भर दिला. मुले स्वतःची शाळा बांधीत आहेत, विटा पाडीत आहेत, कौले तयार करीत आहेत. मला वाटते, काकासाहेब कालेलकर पंधरा-सोळा वर्षांपूर्वी भरलेल्या एका राष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या वेळी म्हणाले, "उद्योगधंदा देणे हे पहिले काम. इतर काव्य-साहित्य फिरायला जाताना, भांडी घासतानाही शिकवता येईल." मुले घेऊन आपण फिरायला निघालो. सृष्टी समोर आहे. शिकवा त्या वेळेस काव्य. 'पक्षी कसे मंजुळ शब्द गाती?' हे का चार भिंतीत सांगू? 'वरी बिंब ते लाल आले विशाल' हे का खोलीत कोंडलेल्या मुलांना शिकवू? रोमाँ रोलाँनी आपल्या 'जी ख्रिस्टो फे' या कादंबरीत एका प्रसंगी एका पात्राच्या तोंडी पुढील अर्थाचे वाक्य घातले आहे. "खोलीत मी गाऊ शकत नाही. मला नदीकाठी जंगलात जाऊ दे. तेथे माझी तान आपोआप बाहेर पडेल.

पक्षी पिंजऱ्यात गाऊ शकणार नाही. तो रानावनातील मोकळ्या हवेतच गाईल."

वर्धा शिक्षण पद्धतीने या सर्व विचारांतील सार घेतले आहे. वसंता, वर्धा शिक्षण पद्धतीत मुख्यतः प्राथमिक शिक्षणाचाच विचार करायचा होता. सर्व जनता साक्षर करावयाची तर कोणत्या मार्गाने, हा प्रश्न त्यांना सोडवायचा होता. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानच्या बाबतीत जर सर्वांत मोठे पाप काही केले असेल तर ते हे की जनतेच्या शिक्षणाकडे त्याने दुर्लक्ष केले. शंभर-दीडशे वर्षे राज्य करूनही शेकडा ऐशी-नव्वद लोक निरक्षर, असे येथले चित्र आहे. येथील ब्रिटिश राज्यपद्धतीवर हा सर्वांत मोठा डाग आहे! ब्रिटिश सरकारने दुय्यम व उच्च शिक्षणाकडे त्यांना नोकर वगैरे पाहिजेत म्हणून थोडेफार लक्ष दिले. परंतु प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळावे म्हणून खटपट केली नाही. आजच्या काळात जनता निरक्षर राहणे योग्य नव्हे.

उद्या स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थानला आधी जर कोणते काम करावयाचे असेल तर सर्व जनता साक्षर करण्याचे. नवीन येणारी सर्व पिढी साक्षर हवी. लोकशाहीच्या काळात निरक्षरता काय कामाची? ब्रिटिशांच्या राजवटीत हिंदुस्थान हा जगातील अत्यंत दरिद्री असा देश झाला. चाळीस कोटी लोक आणि अत्यंत भीषण दारिद्र्य! उद्या स्वतंत्र झालो तरी जनतेला शिकविण्यासाठी पैसा कोठून आणावयाचा, हा प्रश्न उभा राहील? ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानभर दारूचे गुत्ते घातले आणि दारूचे उत्पन्न शिक्षणाकडे लावले. काँग्रेस तर दारूबंदीचा विडा घेऊन उभी राहिलेली. हिंदुस्थानचे ७५ ते ८० कोटी रुपये दारूत जातात. गरीब हिंदुस्थानने दारू सोडली पाहिजे. पूर्वी हिंदुस्थान चीनला अफू विकी. नामदार गोखले नेहमी वरिष्ठ कायदे कौन्सिलात म्हणत, "चीनला अफूचे व्यसन लावून आम्ही पैसे मिळविणे हे पाप आहे. हा अफूचा व्यापार बंद झालाच पाहिजे!" त्याप्रमाणेच काँग्रेस म्हणते की लोकांना दारूचे व्यसन लावून तिजोरीत पैसा भरणे हे नीतीवर उभ्या असणाऱ्या

वा जनताहिताकडे दृष्टी देणाऱ्या सरकारचे कर्तव्य नाही. जनतेचा आत्मा व्यसनातून मुक्त केलाच पाहिजे."

पण मग शिक्षणाचा प्रश्न सोडवायचा कसा? हिंदुस्थानात आज प्राथमिक शिक्षणावर १० ते १२ कोटी रुपये खर्च होत आहेत. तरी शेकडा १० लोकच साक्षर आहेत! हिंदुस्थानातील या खर्चाच्या प्रमाणात सर्व जनता साक्षर करायची म्हणू तर १०० कोटी रुपये हवेत. आणि सर्व हिंदुस्थानचे मध्यवर्ती व प्रांतिक धरून सरकारी उत्पन्न जवळ जवळ दोन अडीचशे कोटी आहे. म्हणजे निम्मे उत्पन्न प्राथमिक शिक्षणाकडेच खर्च करावे लागेल. आणि इतर राष्ट्रसंवर्धक कामे कशातून करावयाची? ही एक मोठी समस्या आहे. महात्माजी म्हणाले, "शिक्षणसंस्था स्वावलंबी नाही का करता येणार? शाळेत येणारी मुले काही हस्त-व्यवसाय नाही का करणार? त्यातून काही उत्पन्न शाळेला नाही का मिळणार?" शाळेतील शिक्षण हस्तव्यवसायांमार्फतच द्यावयाचे असा मुद्दा निघाला. आणि मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र दोन्ही या गोष्टीला अनुकूल आहेत.

वसंता, हिंदुस्थानात सक्तीचे व मोफत असे प्राथमिक शिक्षण हवे असे आपण म्हणतो. तेवढ्याने प्रश्न सुटत नाही. लहान मुले—मुलीही गरिबाच्या संसारास हातभार लावतात. जपानसारख्या श्रीमंत देशातही सक्तीचे शिक्षण करताना शेकडा १० लोक बाद करावे लागले. कारण त्या अत्यंत दरिद्री लोकांना आपली मुलेबाळे शाळेत पाठवणे कठीण जाई म्हणून. श्रीमंत जपानची जर ही स्थिती तर हिंदुस्थानात कशी स्थिती असेल बरे? म्हणून पू. विनोबाजी म्हणाले, "हिंदुस्थानातील शिक्षण केवळ सक्तीचे व मोफत करून भागणार नाही. तर ते शिक्षण मुलांना दोन दिडक्या देणारे झाले पाहिजे. तर मग गरीब आईबाप म्हणतील, शेण गोळा करणे, बकऱ्या चारणे वगैरेसाठी पोर नाही गेला तरी चालेल. शाळेत जाऊनही तो रुपयाभर घरी आणतो!"

मुलांनी घरी दोन पैसे देणे दूर राहिले, परंतु निदान शिक्षण तरी स्वावलंबी करता येईल का? आणि मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र यांच्या

पायावर ते उभारता येईल का? मुलांचे मानसशास्त्र काय सांगते? मुलाला तर हालचाल करायला आवडते. आजचे प्राथमिक शिक्षण मुलांना चार घंटे बसवून ठेवते! मग मुले हळूच कोणाला चिमटे घेतील, हळूच कोणाचा सदरा ओढतील, कोणाचे पुस्तक फाडतील, कोणाची पेन्सिल मोडतील. मुलांचे हातपाय बांधून ठेवणारे शिक्षण व्यर्थ आहे. मुलांना काम द्या. कामात रमवा त्यांचे हात, रमवा त्यांचे कान, रमवा त्यांचा डोळा. द्या त्याला कापूस निवडायला आणि तोंडाने गाणे म्हणायला सांगा :

“ कापसांतली घाण काढूं या
चित्तांतली घाण काढूं या
देशांतील घाण काढूं या
साफ करूं साफ करूं
स्वच्छ करूं, स्वच्छ करूं
अज्ञान आपुलें दूर करूं. ”

सांगा असे गाणे. ते काम करताना हा कापूस कोठे होतो? काळ्या जमिनीत. जगात कोणत्या कोणत्या देशांत होतो? हिंदुस्थान, ईजिप्त, अमेरिका, चीन, असा भूगोल सांगा. कापसाचे कापड करण्याचा धंदा हिंदुस्थानात गावोगाव होता. तो का मेला? यंत्रे आली, गिरण्या आल्या. परकी सत्ता आली. अशा रीतीने इतिहास व अर्थशास्त्र जोडा. कापसाचे कापड होईपर्यंत पुष्कळ स्थित्यंतरांतून कापसास जावे लागते. त्याला पिंजून घ्यावे लागते. चरख्यावर पीळ द्यावा लागतो. मागावर ताणून घ्यावे लागते. त्याप्रमाणे जीवणाला किंमत येण्यासाठी लोकांच्या निंदांनी, टीकांच्या प्रहारांनी पिंजून घ्यावे लागते. संयमाचा व निश्चयाचा त्याला पीळ द्यावा लागतो. प्रेमाचा रंग द्यावा लागतो. ध्येयासाठी ते ताणून धरावे लागते. असे सांगून नीतीची व काव्यसाहित्याची गोडी त्यात ओता. कर्मद्वाराच सारे ज्ञान. हस्तव्यवसायाद्वारा भूगोल, इतिहास, शास्त्रे, काव्यसाहित्य, नीती सारे शिकविता येईल. प्रत्यक्ष क्रियेतून हे ज्ञान द्यायचे असल्यामुळे ते जिवंत राहील. ते हवेत उडून जाणार नाही!

आजपर्यंत आपण बौद्धिक शिक्षण व उद्योगधंद्यांचे शिक्षण अलग करीत होतो. दोन तास बौद्धिक शिक्षण द्या, दोन तास उद्योगधंद्याचे शिक्षण द्या. परंतु ती खरी शास्त्रीय पद्धती नाही. उद्योगधंदा हेच शिक्षणाचे माध्यम करा. सरस्वती मोरावर बसून येते. त्याप्रमाणे ज्ञान उद्योगावर बसून येऊ दे. उद्योग, प्रत्यक्ष कर्म हे ज्ञानाचे वाहन होऊ दे. वर्धा शिक्षणपद्धती उद्योगधंदे व बौद्धिक शिक्षण दोन्ही थोडथोडे ठेवा असे नाही म्हणत. केवळ समन्वय करा, असेही नाही म्हणत. तर समवाय करा असे म्हणते. मडक्यापासून माती निराळी करता येत नाही, त्याप्रमाणे शिक्षणापासून उद्योग निराळा करू नका. दोहोंचा एकजीव करा. कर्मातूनच ज्ञान फुलू दे.

टेनिसन या महाकवीने म्हटले आहे, "To know a flower is to know the universe !–एका फुलाचे ज्ञान करून घेणे म्हणजे सर्व विश्वाचे ज्ञान करून घेणे आहे." त्याप्रमाणे एका उद्योगाच्या द्वारा सर्व शास्त्रांचे सर्व प्रकारचे ज्ञान देता येईल. मात्र तो उद्योग व्यापक हवा. कापसाचा उद्योग, शेतीचा उद्योग, कागदाचा उद्योग–कोणता तरी मूलभूत उद्योग घ्या.

याने काय होईल ? मुलांच्या हालचालींना वाव मिळेल. त्याला लहानपणी कापावे, फाडावे, मोडावे असे वाटत असते. त्याला क्रिया पाहिजे असते. लहान मूल आईबरोबर विहिरीवर लहाना तांब्या घेऊन पाणी आणायला जाईल. ते आईजवळ पोळी लाटायला मागेल. ते म्हणेल मी झाडतो, मी कपडे धुतो. आईला त्याला आवरता आवरता नकोसे होते. आपले हातपाय, डोळे सर्वांचा उपयोग सारखा करावा असे त्याला वाटते. ही जी मुलात असणारी क्रियाशक्ती तिला चालना मिळेल. प्रत्येकाला सर्वांत जर कोणता मोठा आनंद वाटत असेल तर तो स्वतःच्या निर्मितीचा. लहान मूल लिहित असताना आपण जर त्याचे हात धरू तर त्याला ते आवडत नाही. तो वेड्यावाकड्या रेघा काढील व त्याकडे पाहील. त्याला वाटत असते, ही माझी कृती ! आजकालच्या रूढ असलेल्या शिक्षणात ही निर्माण-

शक्ती नष्ट केली जाते. ज्या राष्ट्रातील मुलांची निर्माणशक्ती लहानपणीच नष्ट झाली, ती उद्या नव-राष्ट्रनिर्मिती काय करणार? कोणते प्रयोग करणार? कोणते नवीन शोध लावणार?

वर्धा शिक्षणपद्धतीने मुलाची कल्पकता, शोधकता वाढेल; ती मरणार नाही. पुष्कळसे उद्योगधंद्यातले शास्त्रज्ञ त्या त्या उद्योगधंद्यातूनच उदयास आले. त्या त्या कर्मामधूनच त्यांची शोधक बुद्धी प्रज्वलित झाली. कर्म हे ज्ञानाचे पेठवण आहे. म्हणून आमच्या नवसुशिक्षितांस भीती वाटायला नको की मग उद्या शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ निघतील की नाही? आज शे-दीडशे वर्षे शिक्षण सुरू आहे. किती यंत्रज्ञ व शास्त्रज्ञ निघाले? निर्माणशक्तीच जे शिक्षण मारते ते काय निर्माण करणार? उलट या वर्धा शिक्षणातूनच राष्ट्राला उद्याचे शास्त्रज्ञ व यंत्रज्ञ भरपूर मिळतील.

सात वर्षे उद्योगधंद्यातूनच सारे शिक्षण देऊ या. इंग्रजीविरहित आजकालच्या मॅट्रिकला जितके ज्ञान असते, तितके उद्योगधंद्यातून सात वर्षांत देता येईल. आणि मग ज्याला पुढे अधिक शिकावयाचे आहे, ज्याच्या ठिकाणी कल्पकता आहे, शोधकता आहे, तो दुसऱ्या उच्च शाळांतून जाईल. संशोधनाच्या शाळा उद्योगधंदेवाल्यांनीच काढाव्या असे गांधीजींचे मत आहे. प्रयोगाची त्यांना जरूरी. युरोपातील बहुतेक कारखान्यांतून प्रयोगालये असतात. तेव्हा सरकारवर हा खर्च न लादता व्यापाऱ्यांनीच संशोधनाच्या उच्च संस्था चालवाव्या, आणि सात वर्षे हस्तव्यवसायांतून शिकलेली तरतरीत बुद्धीची मुले तेथे जातील. अर्थात् ही गांधीजींची सूचना होती.

उद्योगधंद्यांतून शिक्षण देणारे शिक्षक विशेष दृष्टीचे हवेत. ते सर्वांनाच शक्य होईल असे नाही. ती पद्धती शिकवणारी शिक्षणधामे निघाली पाहिजेत. परंतु हा नवीन प्रयोग आहे. हिमतीने करू या, असे म्हटले पाहिजे. परंतु आमचे लोक म्हणू लागले, "मुलांना का हमाल बनवावयाचे? ती कोवळी असतात. त्यांना शाळेत का काम करायला लावायचे?" नाना गोष्टी बोलू लागले. अरे, काम म्हणजे वाईट वाटते?

आणि मुलांच्या डोक्यावर का गोणी द्यावयाच्या आहेत? मुलांना तर काम हवे असते. परंतु मुलांची मनोवृत्ती पाहतो कोण? आईबापही म्हणू लागले की, मुलगा शाळेत पाठवतो तो काम करायला नाही. काम करणे म्हणजे कमीपणा, अशी आमची भावना झाली आहे! ज्या देशातील श्रीकृष्णाने 'ईश्वराची कर्मरूप पूजा कर व मुक्त हो' असे सांगितले त्या देशातील लोकांना कर्माची का किळस यावी? अरेरे! केवढा हा अधःपात!

मुले तर कर्मात तेव्हाच रमतात. कर्मात त्यांना मोक्ष वाटतो. शिक्षकानेही त्या कर्मांत मुलांबरोबर रमावे. मुलांच्या भातुकलीत आईनेही भाग घेतला तर मुलांना मोठे कौतुक वाटते. मुले पाणी घालीत आहेत, शिक्षक काढून देत आहेत. मुले खणीत आहेत, शिक्षकही खणून घामाघूम होत आहेत. गाणी म्हणत आहेत, फळेफुले निर्मित त्याहेत. निर्मितीचा आनंद मिळत आहे. मजा आहे. सिलोनमध्ये तर पुष्कळ शाळांना शेती जोडलेली आहे. मुलांचे संघ असतात. ते शेती पिकवतात. सारे सामुदायिक, संगीत काम! ते बाजार करतात. जमाखर्च ठेवतात. सिलोनमधील या प्रयोगाने असा फायदा करून दिला की, पूर्वी मुलगा शिकला की तो शेतीकडे वगैरे वळतच नसे. तो नोकरी धुंडू लागे. परंतु आता मुले शिकली तर स्वतःची शेती करायला जातात. 'शिकणे म्हणजे मातीत हात न घालणे' असे आता त्यांना वाटत नाही. शिकलेला व न शिकलेला यांत मी असा फरक करीन : शिकलेल्याला उद्योगात, कर्मांत आनंद घेता आला पाहिजे, जो अशिक्षितास घेता येत नाही.

आपल्याकडे श्रम आणि शिक्षण यांची फारकत झाली आहे. अमळनेर येथील शाळेच्या वसतिगृहात मी राहात असे. मी पहात असे की, नवीन मुलगा शिकावयास येताना आपली ट्रंक स्वतःच्या डोक्यावर घेऊन स्टेशनवरून बोर्डिंगात येई. परंतु बोर्डिंगात राहून शाळेत थोडे शिकून तो सुटीत परत जाऊ लागला म्हणजे स्वतःची ट्रंक डोक्यावरून न्यायला त्याला लाज वाटे! तो पांढरपेशा बने. कपडा सुरकुतेल, मळेल!! 'शिक्षण म्हणजे शरीरश्रम न करणे' असे कोष्टकच झाले. अमळनेरला

डॉ. उत्तमराव पाटील आहेत. तीस साली त्यांनी इंग्रजी सहावीतून शाळा सोडली. पुढे नऊ महिने शिक्षा भोगून ते घरी गेले. ते नांगर चालवू लागले. तर त्यांच्या गावातील लोक म्हणत, "इंग्रजी शिकलास व शेवटी नांगर हातात धरलास. मूर्ख आहेस तू! मग शाळेत गेलास कशाला?"

वर्धा शिक्षणपद्धतीने ही पोशाखी वृत्ती जाईल. मुलांच्या नैसर्गिक वृत्तींना वाव मिळेल. त्यांची शोधक व कल्पक बुद्धी वाढू लागेल. तो खेड्यापाड्यात घरी जाऊन उद्योग करील; त्यात नावीन्य आणील. त्याला हस्तव्यवसाय मिळाल्यामुळे उपजीविकेचाही प्रश्न सुटेल आणि या पद्धतीने शिक्षणसंस्थाही स्वावलंबी होईल.

शिक्षण स्वावलंबी करण्यासाठी म्हणून वर्ध्यास विचार सुरू झाला. विचार करता करता आढळले की, या पद्धतीला मानसशास्त्राचाही पाया आहे. शिक्षणशास्त्रज्ञांचा पूर्वीचा अनुभव एकत्र करता असे दिसून आले की, उद्योगद्वारा शिक्षण, हस्तव्यवसायातून डोक्याकडे व हृदयाकडे जाणे हेच शास्त्रीय शिक्षण. अंगणातून माजघरात व देवाच्या गाभाऱ्यात आपण जातो त्याप्रमाणे हात, डोळे वगैरे बाह्य इंद्रियांच्या व्यवहारातूनच आपण भावना वाढवू, बुद्धी वाढवू. हातानेच डोके व हृदय गाठू.

उद्योगधंद्यातून शाळेला पैसे मिळालेच पाहिजेत असे नाही. परंतु ही पद्धती शास्त्रीय आहे असे ठरले. जगातील काही शिक्षणशास्त्रज्ञांनी ही पद्धती योग्य आहे असे म्हटले. या पद्धतीतून अर्थात द्रव्यही निर्माण होईल. नाना वस्तू तयार होतील. कापसाचा मूलभूत उद्योग घेतला तर सूत निघेल, कापड होईल. शेतीचा मूलभूत उद्योग घेतला तर फुले, फळे, भाज्या, धान्य यांची निर्मिती होईल. मातकाम घेऊ तर विटा, मडकी, कौले, खुजे, पेले निर्माण करू. आणि जसजशी पद्धती अधिकाधिक व्यवस्थित होईल तसतसे निर्माणही चांगले होईल. त्या वस्तू विकता येतील. मुलांनाही अभिमान वाटेल. मुलांना कंटाळा येणार नाही. "देशातील लोकांना दारू पाजून तुझ्या शिक्षणाला पैसे घेणे चांगले का?" असे मुलांना विचारा. ती "नाही" म्हणतील.

" आपली शाळा आपण चालविली आहे, आपल्या श्रमातून चालविली आहे, याचा तुम्हांला आनंद नाही का वाटणार ? " असे मुलांना विचारा. मुले कंटाळत नाहीत. मुलांची उत्साहशक्ती अनंत असते. त्यांच्या भावना निर्मळ असतात. मुलांनीच जगात क्रान्त्या केल्या. मुले उदात्त भावनांना एकदम मिठी मारतात. त्यांच्या भोवती तसे वातावरण ठेवा म्हणजे झाले.

मुले कंटाळलेली नाहीत. ती आजच्या शिक्षणाला कंटाळलेली आहेत. कंटाळलेले जर कोणी असतील तर सुशिक्षित लोक ! त्यांना नवीन प्रयोग नको. चालले आहे ते बरे अशी त्यांची मरतुकडी वृत्ती ! ! " जगाच्या प्रयोगात हिंदुस्थान काही भर घालीत आहे, करू या प्रयोग, दीडशे वर्षे तो प्रयोग झाला ; आता हा करू, हा प्रयोग पूर्णतेस नेऊ; त्यात अनुभवाची भर घालू, आपल्या दरिद्री देशाच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवू. " असे त्यांच्या मनातही येत नाही ! " सरकारने जनतेच्या शिक्षणासाठी पैसा खर्च केलाच पाहिजे. " अशी वाक्ये झोकून देतात. परंतु उद्या स्वराज्य आल्यावर एकदम कोठून येणार आहे पैसा ? गरीब ना आहे आपला देश ? आणि इतर देशांची लूटमार करून तर आपणास पैसा नाही ना आणावयाचा ? आपला तर अहिंसक मार्ग. सारे देश स्वतंत्र असोत. कोणाची पिळवणूक नको. असे ना आपले म्हणणे ? मग शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवायचा ? या मार्गानेच गेले पाहिजे. या मार्गानेच शिक्षणाचा प्रश्न सुटेल. श्रमाची महतीही पटेल. पांढरपेशे व श्रमणारे हे भेद जातील. संशोधक वृत्ती वाढेल. हिंसेची भावना कमी होईल. पोटाला धंदा मिळेल. वर्धा शिक्षण पद्धती म्हणजे ' वर-दा ' वर देणारी आहे. महात्माजींची ही थोर देणगी आहे. राष्ट्राला हा वर आहे. मृत राष्ट्राला ही संजीवनी आहे. वसंता, वर्धा शिक्षण पद्धती म्हणजे काय याची तुला व तुझ्या मित्रांना थोडीफार कल्पना येईल अशी मला आशा आहे.

तुझा

**श्याम**

पत्र सतरावे

# कला व जीवन

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

मागे तू वर्धा योजनेविषयी विचारलेस. आज पुन्हा तू असाच एक प्रश्न विचारला आहेस. आजकाल साहित्य व जीवन यांची चर्चा फार होत असते. हाच प्रश्न निराळ्या दृष्टीने मांडला तर कला व जीवन असा मांडावा लागेल. कारण साहित्य म्हणजे एक कलाच आहे. साहित्य या शब्दाचा अर्थच मुळी जे सदैव जीवनाच्यासह असते ते. जीवनापासून वाङ्मयाची किंवा कोणत्याच कलेची फारकत करता येणार नाही.

जीवनाची कला ही सर्वश्रेष्ठ कला. या जीवनाच्या कलेभोवती बाकीच्या इतर कलांनी उभे राहिले पाहिजे. सात भिन्न भिन्न सुरांतून जो संगीत काढतो त्याची आपण वाहवा करतो. मग आजूबाजूच्या विविध अशा अनंत जीवनांतून संगीत निर्मिण्याची जो खटपट करतो तो केवढा थोर कलावान! आज महात्माजी किंवा माझी काँग्रेस हिंदुस्थानातील नाना धर्म, नाना जातीजमाती, नाना वर्ग यांच्यामध्ये मेळ निर्माण करू पहात आहेत. हिंदुस्थानातील चाळीस कोटी कंठांतून प्रेमाचे, ऐक्याचे, आनंदाचे असे संगीत बाहेर पडावे म्हणून खटपट करीत आहेत. महात्माजी जीवनाच्या कलेचे उपासक आहेत. ते सर्वांत थोर कलावान.

एकदा पूज्य विनोबाजींकडे एक मित्र सुंदरसे चित्र घेऊन गेला. विनोबाजींना संगीत, चित्रकला, साहित्य सर्वांची अपार गोडी आहे. परंतु जीवनाच्या कलेची गोडी त्यांना सर्वांत अधिक आहे. हा मित्र

विनोबाजींस म्हणू लागला, " हे पहा उत्कृष्ट चित्र. हे पहा त्यांतील रंग ! हा गुलाबी रंग येथे किती खुलून दिसतो."

विनोबाजींनी क्षणभर ते चित्र पाहिले. पुन्हा ते सूत कातू लागले. ते काही बोलले नाहीत. तो मित्र रागावला. म्हणाला, " तुम्ही गांधींचे लोक असेच अरसिक. तुम्ही जड-भरत आहात ! "

पू. विनोबाजी त्याला म्हणाले, " आम्हीही कलेचे उपासक आहोत. चल, दाखवतो तुला माझी रसिकता ! " असे म्हणून ते उठले. तो मित्रही त्यांच्याबरोबर निघाला. जाता जाता दोघे हरिजन वस्तीकडे वळले.

" इकडे कोठे नेता मला ? इकडे तर घाण आहे."

" माझी कला इकडेच आहे." शांतपणे विनोबाजी म्हणाले.

विनोबाजी तेथे जाताच हरिजन मुले त्यांच्या भोवती प्रेमाने जमली. विनोबाजी त्या गृहस्थास म्हणाले, " तू तुझे ते चित्र ५० रु. स विकत घेतलेस. ते ५० रुपये या मुलांना रोज दूध देण्यात खर्चिले असतेस तर ह्या मुलांच्या गालांवर गुलाबी छटा आली असती. ही देवाची चित्रे जरा सुंदर दिसली असती. चित्रातील गुलाबी रंग महत्त्वाचा की या दरिद्री मुलांच्या मुखांवर गुलाबी असा आरोग्याचा रंग आला तर तो अधिक महत्त्वाचा ? "

वसंता, आसमंतातले जीवन सुंदर करणे याहून थोर काय आहे ? हे जीवन सुंदर व आनंदमय करण्यासाठी साऱ्या कलांनी झटले पाहिजे. जीवन म्हणजे राजा. या राजाची सेवा कलांनी करावी. ज्याप्रमाणे ग्रहोपग्रह सूर्याभोवती फिरतात व प्रकाश मिळवितात, त्याप्रमाणे जीवनाच्या सूर्याभोवती कलांनी फिरून प्रकाशित व्हावे. ती कला धन्य– जी जीवनाची सेवा करावयास उभी राहिली आहे.

संगीत कला घे. तुला माहीत असेल की सामवेद म्हणून एक वेद आहे. ऋग्वेदातील मंत्र संगीतात म्हटले म्हणजे त्यांचा सामवेद होतो. हे सामवेद नाव मला फार आवडते. संगीत साम्यावस्था निर्माण करते.

दिवाणखान्यात संगीत सुरू होते व सर्वांच्या मनाची समता होते. सारे आनंदात तल्लीन होतात. सर्वांची मान एकदम झुकते, एकदम डोलते. सर्वांचे हात एकदम पुढे होतात. सर्वांच्या तोंडातून एकदम 'वाहवा' असे धन्योद्गार बाहेर पडतात.

माझ्या मनात येते, दिवाणखान्यात संगीत निर्माण करणारा जीवनात संगीत आणतो का? माझे एक शिक्षकमित्र चांगले गाणारे, संगीतज्ञ असे आहेत. त्यांचा आवाज मूळचा चांगला नव्हता. परंतु तपश्चर्येने, अभ्यासाने कमावून त्यांनी तो सुधारला. त्यांचे गाणे मला फार आवडे. ते सुंदर गात. परंतु ते शाळेतील मुलांना मारून रडवीत. आपल्या गळ्यातून गोड आवाज जे काढायला शिकले त्यांनी मुलांच्या गळ्यांतून 'भो' आवाज का काढावा? त्याला आपल्या वर्गात, आपल्या घरात का बरे संगीत निर्माण करता येऊ नये? मेळ का घालता येऊ नये?

मला कधी कधी वाटते की हिंदुमुसलमानांचा दंगा सुरू झाला की एकदम 'है बहारे बाग दुनिया चंद रोज' असे गाणे म्हणत त्या गर्दीत घुसावे. त्या विरोधात संगीत न्यावे. एखादा गंधर्व जर आलाप घेत विमानातून एकदम त्या गर्दीत उतरला तर परस्परांस मारणारे हात एकमेकांस मिठ्या मारू लागतील! संगीताने पाषाणही म्हणे पाझरतात. जनतेत संगीत निर्मिण्यासाठी, मेळ घालण्यासाठी माझ्या जीवनाची तंबोरी फुटू दे. कृतार्थ होईल ती तंबोरी.

टॉलस्टॉय एका सुप्रसिद्ध चित्रकाराच्या सुंदर चित्राविषयी लिहितो: "ते अत्यंत सुंदर चित्र होते. काय बरे होते त्या चित्रात? त्या चित्रात रस्त्यातून लढाईसाठी जाणाऱ्या सैनिकांची मिरवणूक आहे. गच्चीत खुर्ची टाकून एक माता बसली आहे. तिने तोंडावर रुमाल घेतला आहे. तिला ती मिरवणूक पाहवत नाही! जवळच तिचा लहान मुलगा आहे. तो जिज्ञासेने थोडे मिरवणुकीकडे, थोडे आईकडे बघत आहे." किती सूचक चित्र! जीवनावर केवढा प्रकाश त्या चित्राने पाडला! मुत्सद्द्यांच्या महत्त्वाकांक्षेसाठी युद्धे होतात. विचारे शिपाई! त्यांचे का कोणाशी वैर असते? परंतु मातृभूमीसाठी, देशासाठी, राष्ट्रासाठी चला— मरा असे

त्यांना सांगण्यात येते. परंतु देश म्हणजे कोण? देश म्हणजे कोटयवधी लोक. ते तर दरिद्री आहेत. हजारो लढाया झाल्या. परंतु गरिबांची गरिबी जात नाही. शेतसारे कमी होत नाहीत. त्यांचे जीवन पूर्वीप्रमाणेच कलाहीन व निस्तेज. देश म्हणजे लॉइड जॉर्ज, देश म्हणजे हिटलर, देश म्हणजे मुसोलिनी! देश म्हणजे कोटयवधी जनतेचा संसार नव्हे. परंतु शिपायांना भ्रामक भावनांची दारू पाजून दुसऱ्या देशातील तशाच लोकांवर सोडण्यात येते. परिणाम काय? सेनापतींचे पुतळे होतात आणि लाखो शिपायांच्या घरी रडारड होते. मुले पोरकी होतात. पत्नीचा पती मरतो. बहिणीचे भाऊ मरतात. म्हणून त्या चित्रातील माता त्या मिरवणुकीकडे पाहू शकत नाही. ती डोळे झाकते. तिचा पती का अशा लढाईतच मेलेला असतो?

जीवनात सुंदरता, मधुरता, समता, आनंद, न्याय इत्यादी आणण्यासाठी कलांनी झटले पाहिजे. मग ती कला कोणतीही असो. कलांनी आता दिवाणखान्यात नाही राहता कामा. गंगेच्या प्रवाहाचा आकाशातून खाली भूतलावर अवतार झाला म्हणून तिचे महत्त्व. त्याप्रमाणे साहित्य, संगीत, चित्रकला ह्यांनी बहुजनसमाजाच्या संसारात अवतरावे. त्या फाटक्यातुटक्या संसारात आनंद आणण्यासाठी झटावे.

वसंता, धान्य दिवाणखान्यात पेरले तर ते उगवते का? धान्य उघड्यावर शेतात पेरले पाहिजे. तर ते फोफावेल. त्याचा उपयोग होईल. त्याचप्रमाणे कला आता वरिष्ठ वर्गाच्या दिवाणखान्यात नकोत. कला खाली उतरू देत. कलांचा दरिद्रनारायणासाठी अवतार होऊ दे.

कलेचे काम आनंद देणे, असे कलावान म्हणतात. मीही तेच म्हणतो. मीही आनंदमीमांसा मानणारा आहे. परंतु आनंद म्हणजे का दुःखाचा क्षणभर विसर पाडणे? अशाने का जीवनात आनंद येईल? आपली काही साप्ताहिके क्षणभर आठवड्यातून हसवतात. त्यांचे म्हणणे असे की "कारकून, कामगार, यांना रोज दुःख व चिंता आहेतच. आठवड्यातून एक दिवस तरी त्यांना हसू दे. एक दिवस तरी त्यांना दुःखाचा विसर पडू दे." असे म्हणणाऱ्यांना माझे म्हणणे आहे की ते

जे सहा दिवस दुःख होते ते कायमचे कसे दूर होईल व ' अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक ' असे कधी होईल, याचा का नाही तुम्ही विचार करीत? श्रमणाऱ्या लोकांना आठवड्यातून क्षणभर आनंद देऊ पाहता. तो सदैव कसा मिळेल याचा शोधबोध तुम्ही का करीत नाही? त्याचा मार्ग त्या दुःखी जनतेस तुम्ही का दाखवीत नाही? कामगाराला चिंता का? शेतकरी रडतो का? कारकुनाला रविवारीही कचेरीचे काम घरी का आणावे लागते? त्या दिवशीही मुलांबाळांजवळ खेळण्याबोलण्याचा आनंद त्याला उपभोगता येत नाही. त्याला मुलांवर ओरडावे लागते. ही अशी भिकार समाजरचना का? हे जे सभोवती विराट दुःख आहे त्याची मीमांसा तुमच्या लेखणीला करू दे. तुमची प्रभावी लेखणी जनतेला क्रान्तीसाठी उठवू दे. नवीन प्रकाश व नवीन आशा देऊ दे. आठवड्यातून क्षणभर करमणूक केल्याने कामुक विनोद दिल्याने, थोड्या गुदगुल्या केल्याने संसार सुखाचा थोडाच होणार आहे? या क्षणिक आनंदाच्या मृगजळाने कोणाची तृप्ती होणार?

वसंता, तुला तुरुंगातील एक अनुभव सांगू?

त्या वेळेस मी तुरुंगात होतो.

एके दिवशी एक कैदी माझ्याकडे आला व म्हणाला, " माझे पत्र लिहून द्या. " तो कैदी अस्पृश्य होता. तो एक दरिद्री महार होता. त्याने काय बरे लिहायला सांगितले? त्याच्या घरी काय परिस्थिती होती? त्याची पत्नी घरी होती. त्याला दोनचार मुलेबाळे होती. मोठा मुलगा चौदा—पंधरा वर्षांचा होता. दुसरा एक दहाबारा वर्षांचा होता. परंतु हा मोठा मुलगा आईला मारी. आई त्याला कोठे तरी मजुरी करण्यासाठी जा म्हणे. परंतु रोज रोज कामाला जाऊन तो मुलगा कंटाळे. एखादे दिवशी आईच्या अंगावर धावून जाई व म्हणे " नाही जात कामावर. " परंतु मुले मजुरी करणार नाहीत तर घरी खायचे काय? ती माता सर्वांचे पोषण कसे करणार? त्या मुलांनी नको का जायला काम करायला? परंतु ती मुले आहेत दहाबारा वर्षांची. त्यांना नाचावे, कुदावे असे वाटते. खेळावे, हिंडावे असे वाटते.

सृष्टीतील आनंद लुटावा असे त्यांना वाटते. परंतु घरी दारिद्र्य आहे. त्यांना कोठला आनंद ? तो महार पुढील मजकूर सांगत होता—

“ नंदा, आईला मारू नकोस. अरे, जिने जन्म दिला तिला का तू मारावेस ? पाप रे पाप. असे पुन्हा करू नकोस. कामाला जात जा. तुझ्या आईला मदत कर. लहान भावंडांस सांभाळ. बहिणीस माहेरी आणा. तान्ही बरेच दिवसांत माहेरी आली नाही. तिला बोलवा. ती तुझी बहीण. तू मोलमजुरी कर व बहिणीला चोळी-बांगडी कर. ”

असा मजकूर तो सांगत होता. त्या दिवशी मला रडू येत होते. माझे मन उदास झाले होते. मायलेकरांचे प्रेमळ संबंध आपण काव्यात वाचतो. परंतु या हरिजनांच्या झोपडीत कोठे आहे ते प्रेम ? त्या नंदाला आईविषयी का भक्ती नव्हती ? प्रेम नव्हते ? परंतु ते प्रेम दारिद्र्याने गारठून गेले. त्या मातेला का मुलाविषयी प्रेम नव्हते ? परंतु कठोरपणे त्याला मोलमजुरीसाठी तिला पाठवावे लागे. आईबापांचे प्रेम— मुलाबाळांचे प्रेम, भावंडांचे प्रेम, स्नेह्यासोबत्यांचे प्रेम या सर्वांचा विकास दारिद्र्यात नीट होऊ शकत नाही. हृदयातील प्रेमळ भावनांचे झरे दारिद्र्यामुळे सुकून जातात. मातृप्रेमाचा धन्यतम आनंद, परंतु तो दारिद्र्यात अनुभवता येत नाही. हे वत्सल व कोमल आनंद हेही आज वरिष्ठ वर्गांसाठीच उरले आहेत. ज्यांना थोडी फुरसत आहे, त्यांनाच अश्रू ढाळायला सवड आहे. ज्यांना खाण्याची ददात नाही, तेच प्रेमळ कोमल भावनांचे आनंद उपभोगतील. त्या भावनांसाठी उचंबळतील, वाचतील, रडतील. परंतु गरिबाला हे आनंदही वर्ज्य आहेत. त्यांना रडायला तरी कोठे वेळ आहे ? आजाऱ्याला कुरवाळीत बसायला कोठे वेळ आहे ? मृताजवळ बसायला कोठे वेळ आहे ! साऱ्या भावना दारिद्र्याने मरतात. आईबापांना मुलांना जवळ घेता येत नाही. बाप काम करून घरी यावा तो मुले झोपी गेलेली असतात. बाप लौकर कामाला जातो तेव्हा मुले झोपी गेलेली असतात. सुटीच्या दिवशी मुलांना हा आपला बाप असे कळणार ! कोठले मुलांजवळ प्रेमाचे बोलणे, त्यांना मांडीवर घेणे ? कोठले पत्नीजवळ प्रेमाने बोलणे, तिच्याबरोबर फिरायला जाणे ? दारिद्र्याने सर्व संसाराला कठोर अशी प्रेतकळा येते.

वसंता, दरिद्री जनतेला हे आनंद मिळावे असे तुम्हांस वाटते ना? आईबापांचे व मुलांबाळांचे प्रेमळ संबंध का फक्त कादंबऱ्यांतून वाचायचे? प्रत्यक्ष संसारात तसे अनुभव नाही का घेता येणार? येतील. परंतु त्यासाठी क्रान्ती हवी. सारी समाजरचना बदलली पाहिजे. श्रमणाऱ्यांची संपत्ती हा नैतिक कायदा स्थापला गेला पाहिजे. नवी नीतिमूल्ये आली पाहिजेत. श्रमणाऱ्याला प्रथम मान, प्रथम स्थान. दुसऱ्यांच्या श्रमांवर पुष्ट होणारा म्हणजे शेणगोळा वाटला पाहिजे. तो तुच्छ वाटला पाहिजे. हे सारे करण्यासाठी कलांनी कंबर बांधली पाहिजे. कलेने आता क्रान्ती आणावी तरच जीवनात खरी कला येईल आणि जीवनात क्रान्ती होऊन जीवन आनंदमय होऊ लागले की कला पहा कशा बहरतील? कोट्यवधी लोकांच्या अंगात का निरनिराळ्या कला नाहीत? त्यांना का संगीत आवडत नसेल, चित्र काढावे असे वाटत नसेल, गोष्ट लिहावी अशी स्फूर्ती येत नसेल? परंतु त्यांच्या कला—कोकिळेचा गळा दारिद्र्याने पिरगळून टाकला आहे. ना निघत आवाज, ना उठत तान. परंतु ही परिस्थिती जर बदलली तर किती सुंदर आहे. खरी लोक-कला जन्मेल. आम जनतेची कला. आजची कला मूठभर प्रतिष्ठितांची आहे. आजच्या कलानिर्मितीत सर्व जनता थोडीच भाग घेत आहे?

मागे रत्नागिरीला साहित्य संमेलन झालेले तू ऐकले असशील. तेथे जी साहित्यप्रेमी मंडळी जमली, तिने काय केले, काय पाहिले, काय ऐकले? रत्नागिरीचे सुंदर कलमी आंबे म्हणे मंडळींनी भरपूर खाल्ले. त्या रसाळ हापुसच्या आंब्यांची त्यांनी वाहवा केली. परंतु ज्या रत्नागिरी जिल्ह्यात असे रसाळ आंबे पिकतात, त्या जिल्ह्यातील जनतेचे जीवन कसे आहे हे त्यांनी पाहिले का? त्या जीवनात रस आहे की नाही ते त्यांनी पाहिले का? या साहित्यभक्तांनी खेड्यांना प्रदक्षिणा घालाव्या. दरिद्रनारायणाची कष्टमूर्ती पहावी. त्याला अन्नवस्त्र आहे का ते पहावे. त्याला सरकार, सावकार, खोत, जमीनदार कसे छळतात ते पहावे. त्याच्या अब्रूचे धिंडवडे बघावे. रत्नागिरीला गेलेले साहित्यिक

त्या अत्यन्त दरिद्री जिल्ह्यात हिंडते तर त्याच्या कलेला केवढे खाद्य मिळाले असते! किती दारिद्र्य आहे त्या कोकणात! सृष्टिसौंदर्य भरपूर आहे. परंतु ते कोण पाहणार? काजूच्या दिवसांत काजू खाऊन रहा. करवंदांच्या दिवसांत करवंदे खाऊन दिवस न्या. कधी फणसाच्या आठिळ्याच खा. कधी आंब्यांच्या कोयाच भाजून खा. अशा रीतीने लोक जगतात. साहित्यिकांनी जनतेचा हा विकल संसार पाहिला असता तर....कोकणातील शेतकऱ्याला नेसू धोतरही नसते. ही गोष्ट ते पाहते तर....कोकणात सृष्टिसौंदर्य भरपूर आहे. परंतु पोटाची चिंता आहे, सदैव विवंचना आहे.

मागे मुंबईला कामगारांची प्रचंड सभा झाली होती. काही प्रसिद्ध साहित्यिक ती सभा पाहायला आले. एक दिवस तरी लेखणीचे ललित परब्रह्म गरिबाच्या भेटीस आले! परंतु तेवढ्याने काय कळणार? गरिबात जा, त्यांच्यात मिसळा, त्यांची सुखदुःखे रोज पहा. मग तुमची लेखणी निराळे लिहील. त्या लिहिण्यात प्रचंड शक्ती येईल. परंतु तोपर्यंत तुमची लिखाणे चार पांढरपेशे तरुण व तरुणी वाचतील. महाराष्ट्र म्हणजे का चार गुलजार तरुण? महाराष्ट्र तर हजारो खेड्यांत मरत पडला आहे. त्याला उपासमारीचा क्षयरोग जडला आहे.

धुळ्याच्या तुरुंगात ३०-३२ साली काही कादंबऱ्या आमच्या खानदेशी सत्याग्रहींनी वाचल्या. लोढूभाऊ नावाचे एक थोर खानदेशी प्रचारक म्हणाले, "या कादंबऱ्यांतून आमचे कोठेच काही नाही!" त्या थोर प्रचारकाचे ते शब्द मला नेहमी आठवतात. खरा जो महाराष्ट्र त्याच्या संसाराचे कोठेच काही चित्रण नाही.

आमचे कलावान म्हणतील, "शेतकऱ्याच्या, कामकऱ्याच्या जीवनात काय नवीन आहे? त्यांच्या जीवनांत रंगण्यासारखे काय आहे?"

मी विचारीन, "तुम्हा प्रतिष्ठितांच्या जीवनांत तरी काय नवीन आहे? तेच टेनिस, तेच ब्रिज, त्याच नट्या, तेच बोलपट, तीच बाजाची पेटी, तेच 'वळखलं ग, वळखलं ग'. काय आहे नावीन्य? उलट

शेतकऱ्याच्या जीवनातच किती विविधता आहे ती पहा. आज पावसात तो भिजला. आज कापणी आहे. आज लावणी आहे. उद्या कोळपणी आहे, परवा निंदणी. आज थंडीने त्याचा केळ्यांचा मळा करपला. दुसऱ्या दिवशी गारा पडून आंब्याचा मोहोर झडला. आज पुरातून त्याला आपली गायीगुरे आणावी लागली. परवा त्याला रानात एकदम वाघ भेटला. आज धान्याला भाव नाही म्हणून तो सचिंत आहे. उद्या सणाला घरी काय करायचे म्हणून मुले निजल्यावर तो बायकोशी बोलत आहे. सावकाराची जप्ती येणार म्हणून तो कधी रडतो. कधी तो नवीन झाड लावतो. बैलांना थोपटतो. नवीन माल विकत घेतो. किती प्रसंग! तसेच शहरातील कामगारांच्याही जीवनात. परंतु ज्याला डोळे आहेत व कान आहेत त्यालाच श्रमणाऱ्यांची ही करुणगंभीर जीवने समजणार. इतरांना काय?

अरे महाराष्ट्रातील कलावंतांनो! तुम्ही महाराष्ट्रातील खेडोपाडी हिंडा. ते कलाहीन संसार बघा. ती खोल गेलेली पोटे बघा. खोल गेलेले डोळे बघा. आणि ही दुर्दशा दूर करण्यासाठी लेखणी उचला. तुमच्या लेखणीचे ललित गरिबांचे सुंदर करण्यासाठी असू दे.

वसंता, प्रतिभा व प्रज्ञा या दोन्ही वस्तू क्वचितच एकत्र दिसतात. मी प्रतिभावान असेन, सहृदय असेन पण, प्रज्ञावान असेनच असे नाही. प्रज्ञावान मनुष्य समाजाला ध्येये देत असतो. समाजाने आजच्या क्षणी कसे वागावे, काय करावे ते तो सांगतो. व्यास, वाल्मीकी, रवीन्द्रनाथ हे प्रज्ञावान होते व प्रतिभावानही होते. त्यांनी समाजाची ध्येये निर्मिली व ती प्रतिभेने रंगवून घरोघर नेली. साहित्य संसारास सुंदरता देते. आज हिंदू कुटुंबांत जे समाधान आहे ते रामायणाने दिले आहे. आमच्यात जी अहिंसा वृत्ती आहे ती साधुसंतांच्या वाङ्मयाने, बायकांच्या संपत शनिवारच्या किंवा नागपंचमीच्या कहाण्यांनी निर्माण केली आहे. भारतीय समाजात आज जी मंगलता आहे, ती पूर्वीच्या वाङ्मयाने निर्मिली. आजच्या वाङ्मयाने उद्याचे संसार मंगल होतील, असे करावे.

भारताचे आजचे ध्येय गांधीजी दाखवीत आहेत. कोणते ध्येय खरे मानावे? जे ध्येय जास्तीत जास्त जनतेचे कल्याण साधू पाहील ते थोर ध्येय. हिंदू-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्योद्धार, खादी, गरिबांचे स्वराज्य, गरिबांची सेवा अशी महान ध्येये उत्पन्न झाली आहेत. या ध्येयांना सुंदर पोशाख घालून ती सर्वत्र नेणे हे कलावंताचे काम आहे. मी चित्रकार असेन तर हिंदू-मुस्लिम ऐक्याचे चित्र रेखाटीन. खादीमुळे गरिबांस कसा घास मिळत आहे ते दाखवीन. हरिजन डबक्यातीलच पाणी कसे नेत आहे ते दाखवीन. जर सर्व प्रकारचे कलावान महान प्रज्ञावंतांनी जी ध्येये निर्माण केली, बहुजनसमाजाला सुखी करण्यासाठी जी ध्येये निर्माण केली, त्या ध्येयांना जर आपल्या ब्रशाने, लेखणीने, वाणीने रंगवतील तर जीवनाला कळा चढेल. जीवन सुंदर होईल. जीवनात खरा टिकणारा आनंद येईल. इंग्रजीत डी क्विन्सी म्हणून एक थोर लेखक झाला. तो म्हणत असे, वाङ्मयाचे दोन प्रकार असतात. एक ज्ञानमय वाङ्मय व दुसरे सामर्थ्यसंपन्न वाङ्मय. Literature of knowledge and literature of power. ज्ञानमय वाङ्मय म्हणजे ऐतिहासिक, शास्त्रीय किंवा तत्त्वज्ञानात्मक वाङ्मय. हे वाङ्मय बदलत असते. एक सिद्धान्त जातो, दुसरा येतो. टॉलेमीचा शोध खोटा ठरला. केप्लरचा व कोपर्निकसाचा आला. न्यूटनचा शोध होता तो आइन्स्टीनने बदलला. राजवाडे यांचे काही सिद्धान्त होते. ते आज मागे पडले. अशा रीतीने हे वाङ्मय निश्चयात्मक नसते. ते चुकांतूनच वाढत जाते.

परंतु दुसरे जे सामर्थ्य-संपन्न वाङ्मय, जीवनातील वाङ्मय, ते कधी मागे पडत नाही. रामायण कितीही काळ गेला तरी ताजेच वाटेल. प्रभू रामचंद्र सत्याचा महिमा सांगत राहतील. भरत व लक्ष्मण बंधुप्रीती शिकवीत राहतील. सीता त्याग शिकवील. हनुमान सेवा शिकवील. ते अमर आदर्श आहेत. अशा वाङ्मयाला सामर्थ्यमय वाङ्मय समजावे. असे जे सामर्थ्य-संपन्न वाङ्मय असते ते जडांना चैतन्य देते, मढ्यांना उठविते, निद्रितांना जागृती देते. सूर्याचे किरण येताच सारी सृष्टी चैतन्यमय होते, त्याप्रमाणे सामर्थ्यवान लेखणी सर्वांना अंधार दूर

करायला लावते, अन्याय दूर करण्यास उठविते. असे सामर्थ्यवान वाङ्मय आज हवे आहे. समाजातील विषमता, दास्य, अन्याय, पिळवणूक वगैरे अनंत विपत्तींनी घाबरून नाही जाता कामा. तिकडे कानाडोळा करून दिवाणखान्यातच आनंदाच्या भ्रमात राहण्याने वस्तुस्थिती बदलत नसते.

असे प्रतिभासंपन्न व सामर्थ्यसंपन्न वाङ्मय, जनतेचे जीवन आपण पाहू तर निर्मिता येईल. सागरात बुड्या मारू तर मोती मिळतील. तीरावर गंमत कराल तर शिंपा व कवड्या याशिवाय काय मिळणार? आज आमचे साहित्यिक जनतेच्या जीवनात खोल शिरावयास भीत आहेत. ते घाबरतात. त्यांची छाती होत नाही. ते तीरावरच शीळ वाजवीत बसले आहेत! अशांना साहित्यिक ही पदवी मी कशी देऊ?

पूज्य विनोबाजींनी गीताई लिहिली. गीतेची मराठी समश्लोकी लिहिली. त्यांची आई त्यांना म्हणत असे, "मला ही संस्कृत गीता नाही रे समजत." विनोबाजींनी वामनपंडितांची समश्लोकी आईला दिली. तीही तिला नीट समजेना. शेवटी गीतेतीलच सोपे श्लोक काढून त्यांनी ते आईला दिले. तेव्हापासून त्यांच्या मनात स्त्रिया, मुले, अशिक्षित लोक सर्वांना सहज समजेल असे गीतेचे समश्लोकी भाषान्तर करण्याचे होते. ते त्यांनी पुढे केले. १९३२ मध्ये ते प्रसिद्ध झाले. सर्व जनतेला सुटसुटीत असे गीताधर्माचे पुस्तक मिळाले! ते पुस्तक लिहिताना विनोबाजींच्या समोर हा महान महाराष्ट्र होता. दिवाणखान्यातील महाराष्ट्र त्यांच्या डोळ्यांसमोर नव्हता. भाषान्तरित श्लोक रोज आश्रमातील मुलींना ते देत. त्या मुलींना समजले म्हणजे विनोबाजींना समाधान होई. मराठीत हे अपूर्व व ईश्वरी प्रसादाने भरलेले गीताई पुस्तक लाखांवर खपले. परंतु एकाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाने त्या गीताईचा उल्लेख केला नाही! जे पुस्तक जनतेने जवळ घेतले, त्याचा आमच्या साहित्यिकांना पत्ताही नाही!! ते आपल्याच दिवाणखानी जगात आहेत. तेथे त्यांच्या चर्चा चालल्या आहेत. परंतु दुःखी, कष्टी, अडाणी, जनतेची चर्चा करावयास कोणीही उठत नाही. ती जनता त्यांच्या डोळ्यांसमोर नाहीच मुळी.

वसंता, तू जीवनाच्या कलेचा उपासक हो. तुझ्या सेवा दलातील मुलांना जीवनाची कला उपसावयास सांग. त्यांच्याजवळ जर इतर कला असतील तर त्या त्यांनी जीवनाच्या कलेसमोर आणाव्या.

वसंता, लौकरच माझा खटला चालून मला शिक्षा होईल. मग पुढे तुरुंगात लिहीन ते बाहेर येईपर्यंत वहीतच राहील. सध्यापुरता तरी सर्वांस सप्रेम प्रणाम. तुम्ही बहुतेक विद्यार्थी आहात. विद्यार्थ्यांनी राजकारणात पडावे की न पडावे, याची चर्चा आता फोल आहे. स्वतंत्र देशात अशी चर्चा कोणी करीत नाही. कठीण प्रसंगी सारे एकजात त्यात पडतात. अशी चर्चा आपल्या देशासारख्या अभागी देशातूनच होते. आज जगातील इतर देशांतील तरुण आपापल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व सोडून बाहेर पडले आहेत. मी तुम्हालाही सांगेन की, शाळा-कॉलेजे सोडा व खेड्यांतून निर्भयता पसरवा. ज्यांना शक्य त्यांनी तरी निघावे. तुम्ही हजारो तरुण पडा बाहेर. जा खेडोपाडी व अस्पृश्यता नष्ट करण्यास सांगा. हरिजनांची वस्ती झाडा. खांद्यावर खादी घेऊन ती खपवा. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रसंग वरचेवर आणा. निरनिराळ्या सणांच्या वेळेस जमवा हिंदू-मुसलमान एकत्र. संक्रान्त झाली तर त्यांना तिळगूळ वाटा. प्रेमाने भेटा. आणि हे सारे करीत असताना काँग्रेसची विशुद्ध भूमिका सर्वांना समजावून देत रहा. निर्भय व्हा. सारे राष्ट्र जागृत होऊ दे. जागृत राहू दे. गा गाणी. घ्या हाती उंच भव्य तिरंगी झेंडे. मिरवणुकी काढा. सभा घ्या. धूमधडाका सुरू करा. ही जीवनाची कला आहे. जीवनात आज रंग भरण्याची ही वेळ आहे. तुम्ही का स्वस्थ राहणार?

ज्यांना हे नसेल करता येत, त्यांनी साक्षरतेचा प्रसार करावा. सुटीचे दिवस सेवेत दवडावे. मी किती सांगू, काय सांगू? माझे हृदय भरून आले आहे. सारा महाराष्ट्र उचंबळून उठेल का? क्षुद्र जातीय डबकी सोडून अखिल भारतीय अशी मोठी दृष्टी घेऊन, स्वातंत्र्य डोळ्यांसमोर ठेवून उठतील का सारे महाराष्ट्रीय तरुण? ज्या राष्ट्रातील तरुणही संकुचित दृष्टीचे बनले, जात्यंध बनले, त्या राष्ट्राला कोण तारणार?

तरुण तरी मोठ्या दृष्टीचा हवा. खरी शास्त्रीय दृष्टी घेणारा हवा. दुसरा वाईट वागला तरी आपण श्रद्धेने सन्मार्ग घेऊनच गेले पाहिजे. कॉंग्रेस हे सांगत आहे. तुम्ही सेवा दलातील मुले! तुम्ही उठा सेवा करायला. शक्य ती तरी करायला. वसंता, आपण केव्हा भेटू? मी सुटेन तेव्हा. तोपर्यंत मनोमय भेट. सेवा दलातील सर्वांस प्रणाम!

लहान दत्तूस व रामूस आशीर्वाद.

तुझा
**श्याम**

पत्र अठरावे

# विविध विचार प्रवाह

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

तू ट्रॉट्स्की व स्टॅलिन यांच्यात काय भेद होता ते विचारले आहेस. तसेच हिंदुस्थानातील कम्युनिस्ट व समाजवादी यांतील फरक विचारला आहेस. अधिक अधिकृत लोकांकडून या बाबतीत माहिती विचारली पाहिजे. परंतु मला जे थोडेफार माहीत आहे ते सांगतो. ट्रॉट्स्की हा जगातील क्रान्तिकारकांचा मुकुटमणी शोभेल. १९१७ च्या रशियन राज्यक्रान्तीत त्याने पृथ्वी-मोलाची कामगिरी केली. त्याने अजिंक्य अशी लाल सेना उभारली. कामगारांच्या क्रान्तीचे सैन्य त्या महापुरुषाने उभारले, आणि म्हणूनच क्रान्ती जगली. लेनिन होता तोपर्यंत ठीक होते. लेनिन महापुरुष होता. तो निरनिराळ्या प्रखर वृत्तीच्या माणसांस सांभाळी – जसे आपल्याकडे महात्मा गांधी करू शकतात. परंतु लेनिन-नंतर मतभेद माजले, ट्रॉट्स्की जागतिक क्रान्तीचा पुरस्कर्ता. इतर सर्व देशांतून क्रान्तीचे वातावरण निर्मावे, तेथेही आपली जाळी पसरावी, तेथील लढे अंगावर घ्यावे असे ट्रॉट्स्कीला वाटे. परंतु स्टॅलिन म्हणे, " आधी आपल्या रशियात नीट घडी बसवू या, पाय पक्का रोवू या. अजिंक्य असे अद्ययावत लष्कर निर्मू या. सर्व लष्करी सामुग्री तयार करू या. आपणास सर्वत्र शत्रू आहेत. आपण आधी प्रबळ होऊ या, आणि मग जगातील कामगारांना हाक मारू. त्या त्या देशात चळवळी सुरू होऊ देत, त्यांच्या संघटना फोफावू देत. तोपर्यंत आपण बलवान होत आहोतच.

मग तो विवक्षित क्षण आला की दुसऱ्या देशातील कामगारांच्या हाकेस आपण ओ देऊ."

रशिया प्रबळ न होता जर स्पेन, पोलंड, फिन्लंड, चीन वगैरे देशांत क्रान्ती पसरवीत जाता तर सारेच एकदम त्याच्यावर उठते, तुटून पडते. त्याने सर्वांना कसे तोंड दिले असते? रशियाविरुद्ध लढायला तर भांडवलशाही राष्ट्रे उत्सुक. म्हणून रशियाने स्वतः सामर्थ्यसंपन्न होण्यापूर्वी होता होई तो आपण होऊन लढाई अंगावर घ्यावयाची नाही असे धोरण ठेविले होते.

याचा अर्थ स्टॅलिनने जगातील कामगारांची बाजू सोडली होती असे नाही. आज हिंदी संस्थानिकांच्या बाबतीत जे कॉंग्रेसचे धोरण आहे तेच एका अर्थी स्टॅलिनचे धोरण! त्या त्या देशांतील श्रमजीवी जनतेने आपण होऊन आधी चळवळ करावी. पुढे योग्य वेळ आली तर रशिया मदत करील. परंतु रशियाची ही मदत किती होणार? स्पेनमध्ये रशियाने थोडीफार मदत केली. परंतु ती मदत इतर लोकशाही राष्ट्रांच्या डोळ्यांत सलू नये इतकीच दिली. स्पेनमध्ये शेतकरी व कामकरी स्वतःची हुकुमशाही स्थापन करून पहात होते. विशेषतः स्पॅनिश कामगारांनी या बाबतीत पुढारीपण घेतले होते. परंतु स्पेनमधील कम्युनिस्टांना हे पसंत नव्हते. स्पेनमध्ये लोकशाही क्रान्ती व्हावी असे जणू स्टॅलिनला वाटत होते. स्पेनमधील कम्युनिस्टांनी तेथील कामकऱ्यांच्या क्रान्तिकारक संघटना हाणून पाडल्या. आणि पुढे स्पॅनिश क्रान्तीचा तो दुःखदायक अंत झाला. फ्रान्स, इंग्लंड यांना रशिया दुखवू इच्छित नव्हता. आणि त्यांना खुष ठेवण्यासाठी जगातील क्रान्तीचा वरपांगी मदत करण्याचा आव थोडाफार दाखवून, बळी देत होता. परंतु इंग्लंड व फ्रान्स रशियाला कितपत विचारीत होते? ज्या वेळेस चेंबर्लेनसाहेबांनी म्यूनिक करार करून झेकोस्लोवाकियाचा बळी दिला, त्या वेळेस रशिया फ्रान्सला म्हणत होता की आपण एकजूट करून जर्मनीला विरोध करू या. या म्यूनिक करारास विरोध करू या. परंतु रशिया व फ्रान्सचा करार असूनही फ्रान्सने रशियाला न विचारता ब्रिटिश धोरणास पाठिंबा दिला. इंग्लंड व फ्रान्स वगैरेंना रशियाला

अलग ठेवायचीच इच्छा होती. जर्मनीला संतुष्ट ठेवायचे. जर्मनी पश्चिमेकडे न वळता पूर्वेकडे रशियावर स्वारी करील असे करायचे, असा ब्रिटिश व फ्रेंच मुत्सद्द्यांचा डाव होता. रशियाजवळ वाटाघाटी करायला ब्रिटिश मुत्सद्दी, ब्रिटिश लष्करी मंडळे जात, परंतु कित्येक महिने झाले तरी त्यातून काही निष्पन्न होईना. याचा अर्थ काय? रशियाशी बोलणी लांबवीत असता तिकडे जर्मनीशी ब्रिटिशांच्या काही कारवाया चालल्या होत्या का? आणि पुढे अकस्मात एके दिवशी जर्मन परराष्ट्र मंत्री मॉस्कोस येतात व रशिया-जर्मनीचा अनाक्रमण-करार होतो! सारे जग स्तिमित होते.

असा हा इतिहास आहे. इटलीने अबिसीनियावर हल्ला केला तेव्हा इटलीला पायबंद घालू या, असे रशियाने राष्ट्रसंघात सांगितले. परंतु राष्ट्रसंघात कोण मानणार? राष्ट्रसंघ म्हणजे चोरांचा बाजार, असे लेनिन म्हणे. स्पेनची थोडीफार बाजू स्टॅलिनने घेतली. चीनला सहानुभूती व मदत थोडीफार करीत होता. अद्यापही करीत असेल. युद्ध-सामान थोडेफार देत असेल. परंतु चँग-कै-शेक चीनमधील कम्युनिस्टांना जर निःशस्त्र करणार असेल तर रशिया चीनला किती दिवस मदत करणार? चीनचा भरवसा रशियाने कितपत धरावा? चँग-कै-शेकचे डोळे रशियाकडे नसून इंग्लंड-अमेरिकेकडे अधिक आहेत. रशिया हे जाणतो. आणि यामुळेच पुढे जपान-रशिया यांचा अनाक्रमणाचा करार झाला! रशियाने जर्मनीजवळ करार केला, जपानजवळ केला. रशियाला अमेरिका-इंग्लंड काय, जपान-जर्मनी काय सारखीच वाटत होती. आपल्याबद्दल कोणालाच फारसे प्रेम नाही हे तो जाणून होता. तो सर्वांजवळ सलोख्याचे संबंध ठेवू पाहात होता. हेतू हा की युद्ध होऊ नये. निदान रशिया त्यात ओढला जाऊ नये. रशियात लोकशाही कारभार सुरू केल्याचे दाखवून राष्ट्रसंघात शिरून फॅसिझमविरोधी एकजूट निरनिराळ्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांस करायला लावून, रशिया इंग्लंड, फ्रान्स, अमेरिकेस खूष करू पाहात होता. तर तिकडे जर्मनी जपानजवळही करार करीत होता. आलीच जर्मनीजवळ लढायची वेळ तर

जपानशी करार असावा. जपानने हल्ला केला तर जर्मनीजवळ करार असावा. दोन सरहद्दींवर तर लढणे रशियाला अशक्य. स्टॅलिन अत्यंत सावधगिरीने वागत होता. रशियाला वाचवण्यासाठी त्याची पराकाष्ठा होती. त्याची सारी दृष्टी स्वतःच्या देशावर होती. स्वतःचे सामर्थ्य वाढवण्यावर होती. परंतु स्वतःचे सामर्थ्य वाढवीत असता रशिया का जगत्क्रान्ती अजिबात विसरला ? तो का केवळ राष्ट्रवादी झाला ? फिन्लंडवर हल्ला करून, बेसरबिया घेऊन तो का साम्राज्यवादी झाला ? तसे असेल तर वाईट आहे. परंतु असे नसावे. रशिया स्वतः बलिष्ठ होऊन जगत्क्रान्तीला पुढे साहाय्य करील अशी आशा करू या.

स्टॅलिनचे सारे धोरण स्वतःचा देश सांभाळून चालू आहे. स्वतःच्या देशातील प्रयोग सांभाळून तो सारे काही करीत आहे. त्याला माहीत आहे की जर्मनीजवळ आपण आज करार केला तरी तो उद्याचा शत्रू आहे. सारे भांडवलशाही जगच आपले शत्रू आहे ! अशा वेळेस नुसती जागतिक क्रान्तीची स्वप्ने खेळवून काय होणार ? आपल्या प्रयोगावर हल्ला आला तर त्यासाठी संपूर्ण तयारी पाहिजे. आणि ती तयारी करता यावी म्हणून शक्य तो युद्ध अंगावर ओढवून घेऊ नये, अंगावर युद्ध येणार नाही इतक्या प्रमाणात इतर देशांतील श्रमजीवी उठावांना सहानुभूती द्यावी.

स्टॅलिन व ट्रॉट्स्की यांच्यात हा मुख्य भेद होता. ट्रॉट्स्की जगत्क्रान्ती करू पाहात होता तर स्टॅलिन प्रादेशिक क्रान्ती सामर्थ्यवान करून मग जागतिक क्रान्तीसाठी उठावे असे म्हणत होता. या भेदामुळे ट्रॉट्स्कीला देश सोडावा लागला. जी क्रान्ती त्याने यशस्वी होण्यासाठी पराकाष्ठा केली, ती क्रान्ती सोडून त्याला जावे लागले. कोठल्याही देशात त्याला थारा मिळेना ! सदैव मारेकरी त्याच्यावर टपलेले. तरीही तो शांत असे. त्याचा अभ्यास, वाचन चालू असे. साऱ्या जगातील माहिती मिळवीत असे. त्याला निराशा माहीत नव्हती. मरणाचे त्याला भय नसे. शेवटी मेक्सिकोत त्याला आश्रय मिळाला. परंतु तेथेच त्याच्या डोक्यावर हातोडा मारून कोणी तरी त्याचा खून केला ! ज्या

हातोड्या–कोयत्याच्या लाल झेंड्यासाठी तो जगला, तोच हातोडा त्याच्या डोक्यावर बसला. दुर्दैवी हुतात्मा! त्याची मूर्ती कितीदा तरी माझ्या डोळ्यांसमोर येते. स्टॅलिनच्या आजच्या कारकीर्दीत ट्रॉट्स्कीचे महत्त्व रशियात कमी केले गेले आहे. ही एक प्रकारची कृतघ्नता आहे! ट्रॉट्स्कीचा पहिल्यापासून रशियन क्रान्तीत केवढा भाग. त्याचे कामगारांवर केवढे वजन. १९१७ च्या क्रान्तीपूर्वी १९०५ मध्ये झालेल्या उठावात त्याने पेट्रोगार्ड शहरात कामगारांची सत्ता स्थापली होती. कामगारांचे सरकार स्थापण्याचा तेथे त्याने प्रयोग केला होता. ज्या कामगारांच्या संघटनेमार्फत अशी सत्ता चालते त्या संघटनेस सोव्हिएट म्हणतात. सोव्हिएटमध्ये फक्त कामगारांसच मत असते. कामगारांच्या प्रतिनिधींचेच सरकार! संक्रमणावस्थेत, वर्ग-विहीन समाज होईपर्यंत कामगारांच्या हाती सूत्रे असणे इष्ट आहे.

१९१७ मध्ये क्रान्ती होण्यापूर्वी लेनिन व ट्रॉट्स्की यांच्यात मतभेद होते. लेनिन म्हणे, "रशिया मागासलेला आहे, येथे प्रचंड प्रमाणावर उत्पादन होत नाही. रशियात केवळ कामगार–क्रान्ती करता येणार नाही. येथे क्रान्तिकारक लोकशाही स्थापावी. रशियात कामगारांचे प्राबल्य राहील. परंतु केवळ कामगार सत्ता नको. भांडवलदारांस उत्पादन वाढावे म्हणून वाव द्यावा लागेल. रशियातील ह्या चळवळीचा जर्मनीवर परिणाम होईल. जर्मनी सर्वांत सुधारलेला देश. तेथे संपूर्ण कामगार-क्रान्ती आधी होईल, मग रशियात होईल." परंतु ट्रॉट्स्कीस हे पसंत नव्हते.

रशियात जेव्हा क्रान्ती होईल तेव्हा एकदमच कामगारांची हुकूमशाही स्थापावी असे तो म्हणे. कामगारांची अशी हुकूमशाही स्थापता येते हे १९०५ मध्ये रशियात जे उठाव झाले त्या वेळेस त्याने दाखवून दिले होते. तरीही त्याचे मत लेनिन वगैरेंस पटत नव्हते.

परंतु हद्दपार झालेला लेनिन १९१७ च्या क्रान्तीसाठी रशियात परत आला. कामगारांनी उत्पादनसाधने ताब्यात घेतलेली पाहून त्याचे मत बदलले होते. तो ट्रॉट्स्कीच्या मताचा झाला होता. एकदम काम-गारांची हुकमत स्थापावी असे मात्र त्याचे मत बनले होते. भांडवलशाहीला वाव दिल्याने उलट अडथळे येतील, अशी विचारसरणी तो घेऊन आला.

परंतु त्याचे पूर्वीचे सहकारी स्टॅलिन वगैरे त्यांना लेनिनचे हे म्हणणे पटत नव्हते. ते म्हणत, लेनिन परदेशात होता. रशियातील परिस्थिती त्याला कळत नाही. परंतु लेनिन आपल्या विचारांचा प्रचार खालच्या थरापर्यंत जाऊन करू लागला. लेनिनचा प्रभाव पडत आहे हे पाहून स्टॅलिन लेनिनच्या मताप्रमाणे बोलू लागला. या वेळेस ट्रॉट्स्कीही (जो अमेरिकेत हद्दपार होता तो) रशियात आला. लेनिनच्या मतात व आपल्या मतात आता फरक नाही हे पाहून त्याला आनंद झाला. एकदमच कामगारांचे राज्य, कामगारांची हुकुमशाही स्थापण्याचे त्यांनी ठरविले.

मी त्या सर्व इतिहासात आज जात नाही. पण पूर्वीचे मतभेद समजून घेणे जरा आवश्यक आहे. स्टॅलिनला खरोखरच केवळ कामगारांची हुकुमशाही हवी होती असे नाही. सोयीनुसार त्याने लेनिनचे मत उचलून धरले. ट्रॉट्स्की हा कामगारांचा सर्वांत मोठा पुढारी. ट्रॉट्स्कीचे फार वजन. तो अलौकिक वक्ता होता. ट्रॉट्स्की बहुजनसमाजाचा अपूर्व पुढारी होता, परंतु लेनिन पुढाऱ्यांचा पुढारी होता! आणि तो मेल्यावर पुढाऱ्यांत महत्त्वाचे मतभेद माजले.

लेनिनने कामगारांची हुकमत तर स्थापली; परंतु तो नेहमी म्हणे, "समाजवाद म्हणजे कामगारांची हुकुमशाही + विद्युत्. प्रोलेटरियन डिक्टेटरशिप + इलेक्ट्रिसिटी याचा अर्थ काय?" याचा अर्थ हा की रशिया तावडतोब उद्योगप्रधान केला पाहिजे. रशियात ठिकठिकाणी विद्युत्शक्ती निर्माण करता येईल. ती वाढवू. त्या विजेच्या शक्तीने प्रचंड कारखाने सर्वत्र सुरू करू. रशिया मागासलेला होता. तो झपाट्याने पुढे यायला पाहिजे होता. सर्वांना काम दिले पाहिजे होते. सर्वांना अन्न पाहिजे होते. परंतु लेनिन गेल्यावर या गोष्टींकडे प्रथम लक्ष दिले जाईना. ट्रॉट्स्की जेव्हा ही गोष्ट मांडी तेव्हा त्याला सुपर प्रॉडक्शनिस्ट अत्युत्पादनवादी म्हणून हिणवण्यात येई. रशियात केवळ कामगारक्रान्ती अशक्य, हा मागासलेला देश आहे, असे स्टॅलिन वगैरेंचे जे पूर्वीपासून मत ते केवळ वरपांगी बदलले होते. म्हणून देशाची औद्योगिक वाढ झपाट्याने करा असे म्हटले की स्टॅलिन व त्याचे जोडीदार हसत! परंतु हसणे जाऊन पुढे

रडण्याची पाळी आली. १९२८–२९ मध्ये फार कठीण दिवस आले. शेतकऱ्यांस खायला नाही अशी वेळ आली! काही सधन शेतकऱ्यांनी धान्याचे साठे साठवून ठेवले. ते देत ना. कामगारांसही काम नाही; बेकार झपाट्याने वाढले. गरीब शेतकरी व बेकार कामगार यांचे सख्य करावयाचे? लेनिनचे धोरण पुढे चालले असते, ट्रॉट्स्कीचे म्हणणे ऐकले असते तर? नीट कार्यक्रम आखून झपाट्याने उत्पादन वाढविण्यास लागले असते तर! परंतु त्याच्या सांगण्याची त्या वेळेस टिंगल करत. 'मोठे आले उत्पादन करणारे!' असे म्हणून त्याचा उपहास करीत आणि आता तर बाका प्रसंग आला. मग तो पहिला पंचवार्षिक कार्यक्रम आखला गेला, त्यातही चुका होत्या. त्यानंतर दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम आखला गेला. परंतु या गोष्टी आधीच होत्या तर? लेनिनच्या मरणानंतर लगेच होत्या तर? शेवटी ट्रॉट्स्कीचे म्हणणेच पत्करावे लागले.

ट्रॉट्स्की जगभर क्रान्ती व्हावी असे म्हणे, याचा अर्थ रशियातील क्रान्तीचा प्रयोग सांभाळला जाऊ नये असे नव्हता तो म्हणत. त्याचे म्हणणे एवढेच की जोर कशावर द्यावयाचा? आपले लक्ष शेवटी जगाकडे हवे. आणि देशातही जागतिक क्रान्तीचे ध्येय सतत सर्वांच्या डोळ्यांसमोर राखले पाहिजे. देशातील कामगारांच्या हाती संपूर्ण सत्ता तोवर असली पाहिजे. संक्रमणावस्थेत जगात अन्यत्र कामगार सत्ता स्थापन झाली नाही तोपर्यंत रशियात कामगारांचीच सोव्हिएटस् हवीत. कामगारांच्याच हाती सूत्रे असावीत. म्हणजे रशियात कामगार-हुकुमशाही जगातील क्रान्तीकडे सतत लक्ष ठेवील.

परंतु स्टॅलिनला हे तितकेसे पटत नव्हते. स्टॅलिनने एक प्रकारे "क्रान्तिकारक लोकशाही" आज रशियात स्थापली आहे. त्याने पार्लमेंटरी पद्धत दिली आहे. तो म्हणतो, "आता कामगारांहून अन्य वर्ग रशियात राहिले नाहीत. तेव्हा सर्वांचे प्रतिनिधी घेण्यास काय हरकत? आता वर्गविरोधच रशियात नाही!" आज रशियात पार्लमेंट दिले जाते याचा अर्थ स्टॅलिन वगैरे पूर्वी जे म्हणत, जे एके काळी लेनिन म्हणे, परंतु लेनिनने जे मत बदलले, त्या

मताप्रमाणे वागणे होय! केवळ कामगारांची हुकूमशाही न ठेवता रेव्होल्यूशनरी रिपब्लिक क्रान्तिकारक लोकसत्ता स्थापणे होय. या गोष्टीस तर ट्रॉट्स्की वगैरे फार पूर्वीपासून विरुद्ध. ट्रॉट्स्की तर कधीच हद्दपार झाला. त्याच्या मताचे जे लोक होते त्यांचे वध झाले. ज्यांनी कामगारक्रान्ती यशस्वी केली तेच बळी पडले,– हाही विरोधविकासवादच म्हणावा व शान्त व्हावे!

रशियातील या बदलाचे फार दूरवर परिणाम झाले. रशिया राष्ट्रसंघात जाऊन बसला व त्याला तेथे घेण्यात आले. कारण रशियात पार्लमेंटरी पद्धत आली होती. इतर वर्गांना थोड्या सवलती मिळाल्या होत्या. भांडवलशाही राष्ट्रे जरा खुलली. रशियाला पॉवर पॉलिटिक्स मध्ये शिरावे असे वाटू लागले. राष्ट्रसंघात जाऊन रशियाला काय करता आले असते? फ्रान्स, इंग्लंड वगैरे राष्ट्रे का रशियाच्या मताप्रमाणे वागतील?

ज्या वेळेस अबिसीनियाचा प्रश्न निघाला त्या वेळेस इटलीवर बहिष्कार घालावा, सँक्शन चा उपयोग करावा असे रशिया राष्ट्रसंघात म्हणू लागला. साम्राज्यवादी राष्ट्रे का हे करतील? स्पेनमधील लढ्याच्या वेळेस स्पेनला, तेथील लोकशाहीच्या प्रयोगाला मदत करावी असे रशिया इंग्लंडला व फ्रान्सला सांगू लागला तर ते का ती राष्ट्रे ऐकणार? स्टॅलिनला का ह्या साऱ्या गोष्टी कळत नव्हत्या? राष्ट्रसंघात नुसते भांडून काय होणार?

जगातील क्रान्तीविषयीची दृष्टीच जरा बारगळली. स्पेनला थोडीफार मदत रशियाने केली असेल. परंतु जर्मनी व इटली तर उघड करीत होते. तितका स्पष्टपणा रशियाजवळ कोठे होता? रशियाचा उत्साह अर्धवट होता का? तसे असेल तर त्याचे कारण काय? आज स्टॅलिनला स्वतःच्या देशात प्रतिक्रान्ती होईल अशी भीती वाटते का? तुला हे ऐकून आश्चर्य वाटेल की तेथील कामगारांच्या हाती आज संपूर्ण सत्ता नाही. कदाचित केवळ कामगार हुकूमशाही तेथे पुन्हा स्थापण्यासाठी कामगार उठतील या भीतीने स्टॅलिन युद्धे टाळू पाहात आहे का? तिकडे स्पेनला उघड मदत केली तर जर्मनी रागावेल. जर्मनीशी युद्धाचा प्रसंग आला तर?

रशियाचा टिकाव लागेल का? परंतु हा टिकाव लागण्याचा जसा प्रश्न आहे तसाच खुद्द रशियातील सत्ता अबाधित राहण्याचाही प्रश्न आहे. तेथे पार्लमेंटरी पद्धत मोडून पुन्हा शंभर टक्के कामगार–हुकुमशाही स्थापन होणार नाही कशावरून?

रशियात आज कुशल कामगारांची स्टॅकनोव्हाइट मूव्हमेंट प्रचंड चळवळ चालू आहे. हे कुशल कामगार कम्युनिस्ट पक्षाचे सभासदही असतात. त्यांच्या हातात पक्षाच्या नेतृत्वाखाली सर्व सत्ता येत आहे. पक्षसत्ता कायम राहावी म्हणून ह्या चळवळीचा उपयोग करून घेण्यात स्टॅलिन अत्यंत हुशारी दाखवीत आहे. ह्या कुशल कामगारांना सामान्य कामगारांच्या २० पट पगार देण्यात येतो! त्यांना सवलती अधिक मिळतात! आणि त्यांची एकूण शिल्लक सरकारी कारखान्यांत गुंतवल्याबद्दल त्यांना व्याजही देण्यात येते. व्याज म्हणजे पिळणूक; पण ती आज चालू आहे! अशा कुशल कामगारांचा, अधिक पगारवाल्यांचा गट (मी वर्ग म्हणत नाही) नेहमीच अल्पसंख्य राहणार. कामगारांच्या सोव्हिएटस्मध्ये सामान्य कामगार बहुसंख्य. कामगार जागृत होतील तर व्याज घेणाऱ्या वरील कुशल कामगारांना ते सोव्हिएटस्मध्ये नाही बहुमत मिळवून देणार. आपले सामान्य कामगारांचे प्रतिनिधी कसे निवडले जातील ते ते पाहतील. स्टॅलिनच्या पक्षसत्तेला (कामगार-सत्तेला नव्हे) नाही का धोका येणार त्यामुळे? म्हणून का स्टॅलिनने पार्लमेंट स्थापले, आणि सर्व वर्गांना सारखे प्रतिनिधित्व देऊन व प्रतिनिधी निवडण्याची सत्ता कम्युनिस्ट पक्षाला देऊन आपले स्थान कायम राखले? असेलही तसे!

स्टॅलिन स्वार्थी आहे, सत्तालोलुप आहे असे नाही. परंतु त्याला रशियातील प्रयोगाचा सांभाळ अधिक महत्त्वाचा वाटत आहे. परंतु एकदा तुम्ही सांभाळण्याची वृत्ती घेणारे झालेत की जहालपणा जातो, ध्येयवाद कमी होतो, तीव्रता कमी होते! तेच आज रशियात झाले आहे का? केवळ आपला प्रयोग सांभाळण्याच्या कामातच रशिया रंगणार का? जगत्क्रान्तीच्या ज्वाला त्याच्या हृदयाला नाही का पेटवणार? आपणास लढावे लागेल, तर मग कसे होईल हा सदैव न्यूनगंड का? समजा, आपणास लढावे

लागले तर तिकडे जर्मनीत क्रान्ती कशावरून नाही होणार ? ती शक्यता का धरू नये ? नेहमी आपण टिकू का ? आपला निभाव लागेल का ? असे न मानता त्या त्या देशातही ज्वाला भडकतील, जगत्क्रान्ती पेट घेईल असेही का वाटू नये ?

सर्वांत आधी क्रान्ती जर्मनीत होईल असे मार्क्स म्हणे. जर रशिया–जर्मनीची लढाई जुंपली तर कदाचित जर्मनीतही होईल क्रान्ती. करू या साहाय्य, घेऊ या उडी, असे स्टॅलिनला नसेल का वाटत ? का तो वाट पाहतो आहे ? युद्धात गुंतले असता स्वतःच्या देशात बेदिली माजणे तर फार वाईट. त्याने आपला पराजय होईल. महान प्रयोग फसेल. असे का हे चालले आहे ? वसंता, आपण दूर आहोत. खरी सत्यता आपणास कळत नाही. स्टॅलिन क्रान्तीला मागे लोटणार नाही असे मी मानतो. पार्लमेंट दिले. सर्व वर्ग नष्ट झाले असतील तर त्यांची जरूरी काय ? तसे सर्व वर्ग नष्ट झाले नसतील. परंतु विरोध करणारे प्रबळ वर्ग नसतील राहिले. जे हतबल वर्ग उरले असतील त्यांना समाधान म्हणून पार्लमेंटपद्धती दिली असेल ! केवळ आपल्या परराष्ट्रीय धोरणास पाठिंबा मिळावा म्हणून नसेल दिले. किंवा कामगारांच्याच हिताच्या दृष्टीने आपल्या परराष्ट्रीय धोरणास जहाल कामगार सर्वस्वी पाठिंबा न देतील तर इतर वर्गांचा पाठिंबा घेऊन ते कामगारांच्याच हिताचे परराष्ट्रीय धोरण चालवावे असेही त्यास वाटत असेल. मी तरी काय सांगू ? मी श्रद्धा ठेवून आहे. शेवटी रशियाचा प्रयोग जगो. ती ज्योत न विझो. ती जगभर पेटो. जगाला स्फूर्ती देवो असे मानीत आहे.

ट्रॉट्स्की या स्वप्नात मेला. या चिंतनातच त्याचे बलिदान झाले. त्यास सहस्र प्रणाम !

कम्युनिस्टांची जी तिसरी आन्तरराष्ट्रीय संघटना तिचे वसाहतींबाबतचे काय धोरण होते ? जे प्रदेश आज साम्राज्यसत्तांच्या आहारी गेलेले आहेत त्यांना वसाहती म्हणावयाचे. परराष्ट्रांच्या आहारी गेलेला चीन हा जपान, अमेरिका, इंग्लंड वगैरेंची वसाहतच जणू. हिंदुस्थान

ब्रिटिशांची वसाहत. अशा या वसाहतींतून स्वातंत्र्याचा झगडा कसा चालवावयाचा? धोरण कोणते ठेवावयाचे?

स्टॅलिन वगैरेंचे म्हणणे असे की चीनसारखे देश मागासलेले आहेत. या देशात उद्योगप्रधानता फार नाही. संघटित कामगारवर्ग फार नाही. येथे कामगारक्रान्ती होणे अशक्य! तेव्हा अशा वसाहतींतून किसान, कामगार, पांढरपेशा, मध्यमवर्ग व लोकशाही स्थापू पाहणारा भांडवलदार वर्ग अशा चारी वर्गांची एकजूट करून तेथला स्वातंत्र्याचा लढा लढविला जावा.

ट्रॉट्स्की वगैरेंचे निराळे मत होते. वरच्या वर्गाशी कधीही संगनमत करू नये असे तो म्हणे. रशियन क्रान्तीच्या आरंभापासून तो या मताचा होता. देश मागासलेला आहे वगैरे मुद्दे तो महत्त्वाचे मानीत नसे. तो म्हणे की, भांडवलशाहीची वाढ सर्वत्र एकाच प्रमाणाने झालेली असेल असे नाही. ती विषम वाढ असते. परंतु वाढ नसतेच असे नाही. चीनमध्येही परकी भांडवलामुळे का होईना, शांघाय, कंतान वगैरे मोठमोठी उद्योगकेन्द्रे निर्माण झाली आहेत. ह्याप्रमाणे रशियातही परकी भांडवलामुळे उद्योगधंदे वाढले होते. कामगार किती तीव्र वृत्तीने प्रेरित झाले आहेत, त्यांची संघटना नीट आहे की नाही एवढे पहावे. मार्क्सचा सिद्धान्त वाच्यार्थाने घेऊ नये की इतक्या तऱ्हेचे उत्पादन वाढलेले असेल तरच क्रान्ती होईल. शिवाय मार्क्सच्याच विरोध-विकासवादाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे विकास हा नेहमीच अगदी क्रमाने होतो असे नाही. कधी कधी विकास हा एकदम उडी घेऊन होतो. उत्क्रान्तिवाद व मार्क्सवाद यात हाच तर फरक आहे. या तत्त्वाप्रमाणे जेथे अगदी उच्च दशेप्रत औद्योगिक वाढ पोचलेली नसेल तेथेही एकदम क्रान्तीचा स्फोट होणे अशक्य नाही.

लेनिनचे मत जरा मधले होते. लेनिन म्हणे की, त्या त्या देशांतील इतर पक्ष कम्युनिस्ट संघटनेला जोपर्यंत विरोध करीत नाहीत तोपर्यंत कम्युनिस्ट पक्षानेही तेथे त्या इतर पक्षांशी सहकार्य करावे. परंतु काही झाले तरी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व राखावे; इतर पक्षांत विलीन होऊन जाऊ नये. कम्युनिस्ट पक्षाने आपले ध्येय कधी सोडू नये. इतर पक्ष आपल्या

कम्युनिस्ट संघटनेस पाण्यात पाहात आहेत असे दिसताच अलग रहावे. थोडक्यात, स्वतंत्र अस्तित्व राखून जे ज्या परिस्थितीत करता येईल ते करावे. लेनिनने रशियाच्या बाबतीत आपले मत ट्रॉट्स्कीप्रमाणे कसे मागून बदलले ते वर दिलेच आहे. लेनिन फार मोठा विचारी. तो आपले जुनेच तुणतुणे घेऊन बसत नसे. परिस्थिती पाहून ध्येय न सोडता तो विचार करी, मार्गदर्शन करी. एक प्रकारे तो कर्मकुशल असा स्थितप्रज्ञ कर्मयोगी होता.

रॉय यांचे म्हणणे जवळ जवळ स्टॅलिनप्रमाणेच होते. फक्त थोडा फरक. ते म्हणत, वसाहतीतील कम्युनिस्ट पक्षाने राष्ट्रीय संघटनेत शिरून, भांडवलदार वर्गाचे पुढारीपण नष्ट करून, शेतकरी, कामकरी व खालचा मध्यम वर्ग यांचे जहाल क्रान्तिकारक नेतृत्व निर्माण करावे. चीनमध्ये चँग कै शेकच्या कोमिंटांगमध्ये कम्युनिस्टांनी शिरावे. तेथे पुढे आपले बहुमत करावे. चँग कै शेकला हुसकून द्यावे. लोकशाही क्रान्ती करावी.

चीनमध्ये स्टॅलिन वगैरेंच्या धोरणाप्रमाणे तेथील काम सुरू झाले. परंतु तेथील संघटनेत जेव्हा कम्युनिस्ट आपले प्रस्थान स्थापू लागले, तेव्हा चँग कै शेक खवळला. चीनमध्ये ती भयंकर यादवी १९२९ पासून काही काळ चालली. चँग कै शेकने शेतकरी कामकरी यांच्या कत्तली केल्या. चीनमधील ती यादवी अंगावर शहारे आणते. तरीही अनुभव नसता तेथील शेतकरी-कामकरी लढत होते. अनुभवातून शहाणपण शिकत होते. काही भागात त्यांनी विजय मिळविले. श्रमजीवी वर्गाची चळवळ प्रभावी केली.

चीनमध्ये पुढे जपानने लढाई सुरू केली. त्या वेळेस चँग कै शेकशी पुन्हा सहकार्य करावे असे कम्युनिस्टांचे ठरले. चीनमधील कम्युनिस्ट पूर्वीचे सारे विसरून चँग कै शेकच्या खांद्याशी खांदा लावून लढू लागले. परंतु पूर्वीप्रमाणेच विश्वासघात कशावरून होणार नाही ? चँग कै शेक हा अमेरिकन व इंग्रज भांडवलशाहीच्या आहारी गेलेला आहे. रशियातील सुधारणावादी बोल्शेव्हिक पक्ष १९१७ च्या क्रान्तीच्या वेळेस अमेरिकन, इंग्रज वगैरे परकी भांडवलदारांच्या धोरणाप्रमाणे वागू पहात, तसेच हे रशियातील कामगार क्रान्ती होण्याच्या थोडे दिवस आधी जे तात्पुरते

केरेन्स्कीच्या प्रभुत्वाखाली सरकार स्थापन झाले होते ते इंग्रज व अमेरिकन धोरणाप्रमाणे पुढे जाऊ म्हणत होते. लेनिन वगैरेला ते फाशी देऊ बघत होते. लेनिन वगैरे देशद्रोही आहेत असे ते म्हणत होते.

तसेच चीनमध्ये होईल का? हा चँगच पुन्हा १९३१ प्रमाणे कम्युनिस्टांना कशावरून दडपणार नाही? परंतु कम्युनिस्ट तर सहकार्य करून लढत आहेत. पश्चात्ताप करण्याची पाळी न येवो.

स्टॅलिन व रॉय यांचे चीनबाबत जे धोरण होते, तशाच प्रकारचे हिंदुस्थानबाबत त्यांचे धोरण होते. रॉय हे हिंदुस्थानातील पहिले कम्युनिस्ट! हिंदुस्थानात कम्युनिस्ट पक्ष त्यांच्याच मुखत्यारीखाली स्थापला गेला. भाई डांगे हे अशा पहिल्या कम्युनिस्टांपैकी. त्यांना कानपूर कटात शिक्षा झाल्या. पुन्हा तो सुप्रसिद्ध मिरत खटला चालला.

रॉय यांचे तिकडे मतभेद झाले. तेही इंटरनॅशनल सोडून हिंदुस्थानात आले. प्रथम गुप्तपणे वावरत होते. नंतर त्यांनाही अटक-शिक्षा झाल्या. चीनमध्ये ज्याप्रमाणे ते म्हणत की कम्युनिस्टांनी राष्ट्रीय संघटनेत शिरून तेथे आपले बहुमत करावे तसेच येथेही ते म्हणत.

हिंदुस्थानात राष्ट्रीय अशी मोठी संस्था म्हणजे कॉंग्रेस. ज्या वेळेस १९३० साली कॉंग्रेसची चळवळ सुरू झाली तेव्हा आन्तर राष्ट्रीय कम्युनिस्ट पक्षाचे असे धोरण होते की, कॉंग्रेसमध्ये शिरू नये. ती केवळ भांडवलवाल्यांची आहे. हिंदी कम्युनिस्ट त्या वेळी अलग राहिले. रॉय यांना हे पसंत नव्हते. ते म्हणत, कॉंग्रेसची सूत्रे जरी भांडवलवाल्यांच्या तंत्राप्रमाणे चालणाऱ्यांच्या हाती असली तरी कॉंग्रेस संघटना ही क्रान्तिकारक आहे; क्रान्तिकारक होत आहे.

१९३० साली कम्युनिस्ट अलग राहिले. परंतु पुढे त्यांनी हे धोरण बदलले. १९३० नंतर आन्तर राष्ट्रीय कम्युनिस्ट पक्षाचे निराळे धोरण आले. या वेळेस हिटलरने जर्मनीत सत्ता हाती घेतली होती. जर्मनीत व इटलीत फॅसिझम पसरत होता. इतर साम्राज्यवादी राष्ट्रांतूनही तेच होणार असे दिसू लागले. तेव्हा कम्युनिस्ट इंटरनॅशनलने ठरविले की वाढत्या

फॅसिस्ट वृत्तीला आळा घालण्यासाठी सर्व देशातील कम्युनिस्ट संघटनांनी तेथील लोकशाही पद्धतीला उचलून धरणाऱ्या भांडवलदार व इतर वर्गांशी सहकार्य करावे व आधी फॅसिझम रोखून धरावा. पॉप्युलर फ्रंट फॅसिझम विरोधी एकजूटत्व नवीन शब्द निघाला. फ्रान्समध्ये कम्युनिस्टांनी तेथील इतर वर्गांशी सहकार्य करून पॉप्युलर फ्रंट सरकार स्थापिले. परंतु फ्रान्समध्ये होऊ नये ते झाले! लेनिन म्हणत असे की इतर पक्षांशी सहकार्य केले तरी आपला ध्येयवाद सोडू नये. पण फ्रान्समध्ये काय झाले? सर्व पुरोगामी व कामगारांच्या प्रतिनिधींच्या बळाने ब्लूम याचे सरकार आले. कामगार चळवळी वाढल्या. कामगारांचा उत्साह वाढला. कम्युनिस्ट म्हणत असत की, 'आता आपले सरकार आहे.' कामगार म्हणत 'आता आपले सरकार तर आम्हांला आमच्या मागण्यांसाठी लढू दे.' ब्लूम म्हणे, 'हे सरकार समाजवादी नाही, जहालांचे आहे.' कामगार तर उठाव करू लागले. तिकडे भांडवलवाले, बँकावाले म्हणू लागले की "आम्ही सोने परदेशात नेऊन आर्थिक कोंडी करू. नाही तर जपून चला." फॅसिस्ट गटही प्रतिकाराची तयारी करू लागला. अशा वेळेस कम्युनिस्ट काय करीत होते? ते फ्रान्समधील कामगारांना क्रान्तिकारक मार्गाकडे नेण्याऐवजी 'संप करू नका, कारखान्यात जा' असे बजावीत होते. लेनिनला काय वाटले असेल? इतर पक्षांशी सहकार्य म्हणजे स्वतःच्या पक्षाची हत्या नव्हे.

शिवाय फ्रान्ससारखे देश का मागासलेले आहेत? तेथे चीन-हिंदुस्थान-सारखी स्थिती नाही. तेथे इतर पक्षांशी इतकी शरणागती घेण्याचे कारण काय? फ्रान्समध्ये कम्युनिस्टांचे धोरण अनर्थावह ठरले. अमेरिकेतील कम्युनिस्ट पक्षही युद्धप्रिय व भांडवलशाहीचा संरक्षक जो रूझवेल्ट त्याला साथ देत राहिला. फॅसिझमला विरोध करण्याच्या निमित्ताने कम्युनिस्टांनी असे धोरण स्वीकारले. हिंदुस्थानातही त्याची आवृत्ती निघाली. १९३४ नंतर त्यांनी कॉंग्रेसमध्ये शिरायचे ठरविले. भाई रॉय म्हणतच होते की कॉंग्रेसमध्ये शिरावे. कम्युनिस्टांचेही अधिकृत धोरण आता ते ठरले.

आणि १९३० ते ३४ च्या सत्याग्रही चळवळीतून निर्माण झालेला काँग्रेस समाजवादी पक्षही होता. १९३० च्या सुमारास युवक संघटना देशात वाढली. नवविचारांचे तरुण चळवळीत पडले. तुरुंगात त्यांनी चर्चा केल्या. अभ्यास केले. कम्युनिस्ट तर त्या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले होते. तेव्हा काँग्रेसमधीलच या नव तरुणांनी काँग्रेसशी संबंध ठेवणारा परंतु स्वतंत्र विचारसरणी असलेला काँग्रेस समाजवादी पक्ष काढला.

आमच्या देशातील कम्युनिस्ट संघटना ब्रिटिश सरकारने बेकायदेशीर ठरविली. त्यांना उघडपणे संघटनेचे काम करता येईना. हिंदुस्थानातील कम्युनिस्ट संघटना तिसऱ्या आन्तर राष्ट्रीय संघटनेस कम्युनिस्ट इंटरनॅशनलला जोडलेली असते. हिंदी कम्युनिस्टांना आन्तर राष्ट्रीय कार्यकारी मंडळाकडून जशा सूचना येतील तसे वागावे लागते! अर्थात येथील कम्युनिस्ट पक्षाचे जे अधिकृत नेते असतात ते इकडील परिस्थिती तिकडे कळवतात. आपले मत कळवतात. त्याचा विचार होऊन तिकडून निर्णय येतो. १९३० साली काँग्रेसने सत्याग्रह केला. परंतु काँग्रेसच्या चळवळीत कम्युनिस्ट सामील झाले नाहीत! त्यांच्या इंटरनॅशनलच्या कार्यकारी मंडळाचे म्हणणे पडले की, "काँग्रेस भांडवलदारांची संस्था आहे. तिचे बल व प्रतिष्ठा वाढविण्यात आपण आपली शक्ती का ओतावी?" परंतु कम्युनिस्टांना ती चूक झाली असे मागून वाटले. काँग्रेसमध्ये भांडवलदार वर्ग जरी असला तरी तो ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झुंजत आहे. जोपर्यंत काँग्रेस साम्राज्यविरोधी अशी दिसत आहे तोपर्यंत तिच्याशी फटकून वागण्यात अर्थ नाही असे मागून ठरले. कम्युनिस्ट काँग्रेसमध्ये शिरले. कम्युनिस्ट काँग्रेसमध्ये धोरण म्हणून राहतात! जोपर्यंत तिच्यात राहून आपले क्रान्तिकार्य पुढे जात आहे असे त्यांना वाटेल तोपर्यंत ते राहतील. आणि मुख्य गोष्ट ही की त्यांना आपले धोरण शेवटी तिकडून पास करून घ्यावे लागते! आधी आन्तर राष्ट्रीय कम्युनिस्ट कार्यकारी मंडळाचा आदेश मानतील, काँग्रेसला मानणार नाहीत.

काँग्रेस समाजवादी जरी वर्गयुद्ध अपरिहार्य आहे असे मानीत असले, शेवटी श्रमजीवी क्रान्ती झाली पाहिजे असे जरी त्यांचे अभ्यासाने व

अनुभवाने मत झाले असले, तरी ते कम्युनिस्ट इंटरनॅशनलला जोडलेले नाहीत. आपल्या देशाचे धोरण आपण या देशात ठरवू; या जगात भिन्न भिन्न परिस्थिती असते. आपल्या देशात रशियातील पद्धतीप्रमाणेच प्रयोग होईल असे नाही. आपल्या देशाचे धोरण मॉस्कोहून ठरवून आणणे योग्य नाही. जरी आपण आपले मत व अनुभव तिकडे कळविले तरी सर्वच परिस्थिती तिकडील कार्यकर्त्यांच्या ध्यानात येईल असे नाही. म्हणून हा समाजवादी पक्ष आपले राष्ट्र हा आपला घटक असे समजून चालतो. तो काँग्रेसला मानतो. साम्राज्यविरोधी काँग्रेसला सोडून जाणे योग्य नव्हे असे त्यांना वाटते. जयप्रकाश नारायण, आचार्य नरेन्द्र देव, मेहेरअली, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन वगैरे या पक्षाची प्रमुख माणसे आहेत. काँग्रेस समाजवादी पक्ष काँग्रेसची टिंगल करणार नाही, काँग्रेसच्या वजनाला जनतेत बाध येईल असे कृत्य ते करणार नाहीत.

गांधींचे किंवा गांधीवादी पक्षाचे नेतृत्व हिरावून घेऊन क्रान्तिकारक नेतृत्व काँग्रेसला दिले पाहिजे हे राष्ट्रवाद्यांचे मत. कम्युनिस्ट व रॉय यांचा या बाबतीत मतभेद होता. कम्युनिस्ट म्हणत, "नेतृत्व गांधीचे असू दे. ते हवेच. कारण दुसरा बहुजन समाजाला उठवणारा कोण महापुरुष आहे? नेतृत्व गांधीचे परंतु कार्यक्रम मात्र आपला." रॉय म्हणत, "गांधीचे नेतृत्व आता कुचकामी आहे. ते प्रतिगामी नेतृत्व आहे. ज्या ग्राम काँग्रेस कमिट्या, तालुका काँग्रेस कमिट्या आहेत ह्या अधिक कार्यक्षम करू या. त्यांनी जनतेचे प्रश्न हाती घेतले पाहिजेत. आजच्या काँग्रेस कमिटयांना काही कामच नाही! सभासद करणे व निवडणूक आली की मत मागणे, यापेक्षा या काँग्रेस कमिटयांना दैनंदिन काय काम आहे? या काँग्रेस कमिटया अधिक कार्यप्रवण करू या. त्यांना वैचारिक व तात्त्विक ज्ञान देऊ या. राजकारण त्यांना कळेल, समजेल असे करू या."

परंतु आजचे युद्ध सुरू झाल्यापासून तर रॉय मत व काँग्रेस मत यात जमीन अस्मानाचा फरक आहे! ब्रिटिश जनता व सरकार आज फॅसिझमविरोधी लढा देत आहेत. यावेळी ब्रिटिश सरकारच्या व पर्यायाने आपल्या युद्धात सहकार्य केले पाहिजे, काँग्रेसने उगीच राजीनामे

दिले. नवीन निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधींचे नवे मंत्रिमंडळ येईपर्यंत हंगामी मंत्रिमंडळे प्रांतातून बनवावी. युद्धसहकार्याला जी हिंदुस्थानातून मदत होत आहे तिला लोकशाही स्वरूप द्यावे. असा कार्यक्रम रॉयवाद्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून आखला आहे. बॅ. जिना, डॉ. आंबेडकर वगैरेंना ते आपल्या पक्षाशी या कार्यक्रमापुरता, तात्पुरता तरी सहकार करण्यास सांगत आहेत.

कम्युनिस्ट व कॉंग्रेस समाजवादी म्हणत कॉंग्रेस काही अद्याप एक पक्ष नाही. कॉंग्रेस म्हणजे एक पक्ष असे झाले तर पक्षात पक्ष नाही काढता येणार. परंतु कॉंग्रेस ही एक संघटना आहे. तिच्यात राहूनही स्वतंत्र पक्ष आपण ठेवू शकू, व आपल्या पक्षाच्या कामासाठी किसान सभा वगैरे स्वतंत्र असणे अयोग्य नाही. कामगारांचे प्रश्न किसानांचे प्रश्न स्वतंत्रपणे लढण्यास कॉंग्रेस उपयोगी पडणार नाही तर स्वतंत्र संघटना हवी.

कम्युनिस्ट व कॉंग्रेस समाजवादी दोघांना जरी किसानसंघ पाहिजे होते तरी दोघांचे धोरण एक नव्हते. दृष्टी एक नव्हती. कम्युनिस्टांना कॉंग्रेसचे महत्त्व हाणून पाडण्याकरिता किसान संघ पाहिजे होता. तसे कॉंग्रेस समाजवाद्यांचे मत नव्हते. कम्युनिस्ट कॉंग्रेसमध्ये शिरले ते तिची विघटना करण्यासाठी, ती उद्ध्वस्त करण्यासाठी ! समाजवाद्यांचे तसे मत नव्हते. ते म्हणत, कॉंग्रेसशी पटत नसेल तर तिच्यापासून अलग व्हावे, तिच्यात राहून तिच्याशी प्रतारणा करणे योग्य नव्हे. यामुळे समाजात बुद्धिभेद होतो. किसान संघ वगैरेंच्या द्वारा आपण कॉंग्रेसवर दडपण आणू, कॉंग्रेसला हळूहळू साम्राज्यविरोधी बनवू ही आशा धरून कॉंग्रेसमध्ये राहू. ही आशा नसेल, ही आशा सुटली तर कॉंग्रेसपासून अलग होऊन कार्य करू.

रॉयना कॉंग्रेसमध्ये असताना किसान संघ अजिबात नको होते. समाजवाद्यांस कॉंग्रेसवर दडपण आणून तिला क्रान्तिकारक करण्यासाठी हवे होते. कम्युनिस्टांस कॉंग्रेसचे महत्त्व उखडून टाकण्यासाठी ते हवे होते !

कॉंग्रेसला क्रान्तिकारक करू, साम्राज्यविरोधी करू असे सारेच म्हणत. कॉंग्रेसनेही जरा सूर बदलला. जवाहरलाल वगैरेंच्या प्रेरणेने

साम्राज्यशाहीविरोधी असे काँग्रेसचे स्वरूप बनत जाऊ लागले. काँग्रेसचे धोरण प्रथमपासून फॅसिझमविरोधी आहे. स्पेन, ॲबिसीनिया, अल्बेनिया, झेकोस्लोव्हाकिया, वगैरेंच्या बाबतीत इंग्लंडने अक्षम्य अपराध केला असे काँग्रेस म्हणत आली. याचा अर्थ इंग्लंडने इटली जर्मनशी युद्ध पुकारले तर आम्ही त्यात एकदम सहभागी होऊ असे नव्हे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यांचा प्रश्न आहेच. या बाबतीत इंग्लंड कसे वागते ही मुख्य गोष्ट आहे. इंग्लंड पोलंडवर हल्ला होईतो स्वस्थ होते. इतकेच नव्हे तर रशियावर स्वारी करण्याचे आश्वासन जर्मनी देता तर कदाचित पोलंडचा प्रश्नही इंग्लंडने गिळला असता! पण जर्मनी आपणावरच उलटेल असे वाटताच इंग्लंड व फ्रान्स यांनी लढायी पुकारली.

काँग्रेसने मंत्रिमंडळांचे राजीनामे दिले. ज्या मंत्र्यांना विचारले जात नाही त्या मंत्र्यांनी बाहुली म्हणून राहण्यात काय अर्थ? काँग्रेसने ते अत्यंत प्रसिद्ध आणि ऐतिहासिक असे १४ सप्टेंबर १९३९ चे पत्रक काढले, आणि शेवटी ब्रिटिशांनी जे युद्ध आज सुरू केले आहे, ज्यात हिंदुस्थानास एका शब्दानेही न विचारता खेचण्यात आले आहे त्या युद्धाचे हेतू काय हे काँग्रेसने विचारले. ४० कोटी लोकांना दास्यात ठेवणारे ब्रिटिश सरकार फॅसिझमविरुद्ध लढत आहे हे हिंदी जनता खरे कसे मानील?

युद्ध संपेपर्यंत ब्रिटिश सरकारला गांधीजी फारसा अडथळा आणणार नाहीत. परंतु काँग्रेसचा विरोध निमित्तमात्र सत्याग्रह करून जगजाहीर मात्र करून ठेवतील. आणि युद्ध समाप्तीच्या वेळेस गांधीजी म्हणतील, "तुमच्या अडचणींचा सत्याग्रही या नात्याने मी फायदा घेतला नाही. सामुदायिक चळवळ करा अशी सारखी मागणी येत असताही मी संयम राखला. तुम्ही लोकशाहीसाठी लढत होता. हिंदुस्थानला देता का स्वातंत्र्य? नसाल देत तर आता मात्र मी प्रचंड चळवळ करीन. असे का महात्माजींच्या मनात नसेल?

वसंता, कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली (घटना समिती) हा शब्द तुला माहीत असेल. ब्रिटिशांनी बनवलेले फेडरेशन आम्हांस नको. हिंदुस्थानची घटना

हिंदुस्थान ठरवील. हिंदुस्थानातील घटनासमिती ठरवील, असे सारे म्हणू लागले. काँग्रेस व जहाल पक्ष म्हणू लागले. कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली म्हणजे काय? कोणत्याही राष्ट्रात क्रान्ती झाल्यावर, जुनी सत्ता नष्ट झाल्यावर नवीन सरकार कशा प्रकारचे असावे हे ठरविण्यासाठी लोकप्रतिनिधी एकत्र येतात. लोकप्रतिनिधींच्या ह्या सभेस कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली असे म्हणतात.

हिंदुस्थानात अशी घटनासमिती ब्रिटिश सत्ता आधी नष्ट केल्या-खेरीज कशी बोलावणार? परंतु आजपर्यंत घटनासमितीचा जो अर्थ होता तो हिंदुस्थानात नव्हता. हिंदुस्थानातील निरनिराळ्या पक्षांच्या मनात निरनिराळा अर्थ. रॉयवादी काय समजत? ते म्हणत की, काँग्रेसला आधी एक पक्ष करू आणि ही एकजिनसी काँग्रेस म्हणजेच घटनासमिती. या काँग्रेसच्या खालपर्यंत शाखा असणार; सर्व काँग्रेस कमिट्या या पक्षाप्रमाणे एका धोरणाने वागणार. या सर्व काँग्रेस कमिट्या क्रान्तिकारक असतील. काँग्रेसचे घटना समितीत पर्यवसान करून तिच्या सर्व शाखां-मार्फत सत्ता हाती घेण्याचा लढा करू. सर्व काँग्रेस शाखा म्हणजे सत्ता घेण्याची संघटित केन्द्रे (ऑर्गन्स) सुभाषचंद्रांच्या प्रतिसरकाराच्या कल्पनेपेक्षा यात फरक आहे. सुभापबाबू प्रतिसरकार एकदम स्थापा म्हणत. रॉयवादी म्हणत की, "आहे ते सरकार नष्ट करा. आपले स्थापन करायचे नाही. आहे ते आधी नष्ट करा. मग सत्ता हाती येईल, पुढे पाहू."

घटनासमिती ब्रिटिश सरकार थोडीच बोलावणार? तेव्हा काँग्रेस म्हणजेच घटनासमिती करू, असे रॉय म्हणू लागले. कम्युनिस्ट म्हणू लागले की, घटनासमिती सत्ता हाती घेतल्याशिवाय व्यर्थ आहे. कराचीला, फैजपूरला जे किसानकामगारांसंबंधी ठराव केले, त्या ठरावांची अंमलबजावणी करणारी घटना जी देईल अशी घटनासमिती हवी. परंतु अशी कोण देणार? कोण बोलणार?

काँग्रेस समाजवाद्यांनी घटनासमितीची घोषणा मान्य केली आहे. तरी रॉय अथवा कम्युनिस्टांप्रमाणे अमुक एक निश्चित अर्थ त्यांनी त्या शब्दां-मागे चिकटविलेला नाही. कामगारांनी सत्ता काबीज केल्यानंतर जी

सोव्हिएटस्च्या प्रतिनिधींची सभा भरली तीत बहुमत होईना. म्हणून लेनिनने घटनासमितीच बरखास्त केली! हा इतिहास ते जाणतात. त्यामुळे लोकशाही पद्धतीतील पार्लमेंटप्रमाणे घटनासमिती अप्रातिनिधिक होते, जनमताची नोंद निवडणुकीने नेहमीच बरोबर होत नाही, हे तो पक्ष लक्षात घेतो. त्यामुळे शब्दार्थावर लक्ष न देता राष्ट्रीय एकजूट व लढ्याने उठावणी करण्याच्या दृष्टीनेच ते घटना समितीकडे पाहतात.

कॉंग्रेसने तर घटनासमिती या शब्दाची कुतरओढ चालविली आहे! महात्माजी म्हणाले, की हिंदुस्थानात जे निरनिराळे पक्ष आहेत त्यांनी एकत्र येऊन बसावे. ती घटनासमितीच होईल. परंतु ही घटनासमिती कशी होणार? या लोकांना कोणी निवडले? ते ते पक्ष म्हणजे सर्व जनता नव्हे. हिंदुस्थानातील सर्व पक्षांचे सभासद एकत्र केले तर एक कोटीही भरणार नाहीत. बाकीच्या कोट्यवधी जनतेचे काय? घटनासमिती ही जातिधर्मविरहित आम जनतेने निवडलेली हवी. हिंदुसभा, मुस्लिम लीग वगैरे जातीय पक्षांचे पुढारी जेथे येणार ती का घटनासमिती?

वल्लभभाई व राजगोपालाचारी तर याच्यापुढे गेले व म्हणाले, आजच्या प्रांतिक असेंब्ल्यांतील प्रतिनिधींपैकी काही घ्यावे व त्यांची मिळून होणारी ती एक घटनासमितीच होईल. अशा रीतीने मग शेवटी छेद देत देत बॅ. जिना, डॉ. आंबेडकर, बॅ. सावरकर व कॉंग्रेसचे अध्यक्ष यांचीच ती घटनासमिती व्हायची!

कॉंग्रेसला क्रान्तिकारक करण्यासाठी घटनासमिती वगैरे शब्द आले. कॉंग्रेसला साम्राज्यशाहीविरोधी स्वरूप देण्याचे प्रयत्न झाले. परंतु ज्याप्रमाणे रॉय कॉंग्रेसला एका विशिष्ट पक्षाची बनवू पाहात होते व एक पक्ष बनवू पाहात होते त्याप्रमाणे गांधीवादीही कॉंग्रेसला एका विशिष्ट छापाची बनवायचे ठरवू लागले; महात्माजी कॉंग्रेसपासून—मुंबई कॉंग्रेसपासून नाममात्र दूर राहिले. या नवपक्षांचे बळ ते पाहात होते. परंतु या नवीन पक्षांची नाडी त्यांनी तपासली. तुम्ही घ्या कॉंग्रेसचे नेतृत्व, असे ते कम्युनिस्टांस, सोशलिस्टांस म्हणत. परंतु त्यांची ताकद नव्हती! हे सारे पारखून गांधीजी व त्यांचे अनुयायी कॉंग्रेसला एक विशिष्ट पक्ष करू

लागले. तुम्ही काँग्रेसला क्रान्तिकारक करू पाहात असाल तर आम्ही गांधीवादी करू.

जो तो पक्ष काँग्रेस आपल्या हाती यावी म्हणून खटपट करीत होता. वसंता, दिवसेदिवस काँग्रेस ही अनेक पक्षांची संघटना न राहता, सर्वांना जवळ घेणारी न राहता, एका कोणा तरी पक्षाची होईल असे दिसत आहे. ती गांधीवादी पक्षाची होईल? निराश होऊन, काँग्रेसला क्रान्तिकारक बनविणे अशक्य आहे असे पाहून इतर पक्ष अलग होतील?

रॉय तर आता अलग झालेच.

कम्युनिस्ट अजून काँग्रेसमध्ये आहेत. परंतु त्यांचा उद्योग काँग्रेसला उद्ध्वस्त करणे हाच आहे. जेथे त्यांना काँग्रेस कमिट्या ताब्यात घेता येतील तेथे घेऊन ते आपले धोरण चालवतील. जेथे काँग्रेस कमिटी ताब्यात घेता येणार नाही असे वाटेल तेथे स्वतः निवडून येण्यापुरते थोडेसे सभासद करतील. काँग्रेसचे सभासद करण्यात कम्युनिस्टांचा निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळा उत्साह असतो, यातील हेतू हाच. सोलापूरची काँग्रेस कमिटी आपल्या ताब्यात येणे अशक्य; मग का करा कामगारांत सभासद? अमळनेरची काँग्रेस कमिटी हाती येईल, मग करा सारे कामगार सभासद!

काँग्रेसवर दडपण आणून तिला सामुदायिक चळवळ करावयास लावू असे काँग्रेस समाजवादी म्हणत. पण ते आज काँग्रेसबद्दल निराश झाले आहेत! जयप्रकाश वगैरे तर स्वतंत्र संघटना निर्माण करून शक्य असेल तर स्वतंत्रपणे लढा करावा असे म्हणत होते. कदाचित काँग्रेस समाजवाद्यांना काँग्रेसपासून अलग व्हावे लागेल. आजचा काळच निराळा आहे. आज सारे बदलत आहे. सारेच स्तिमित झाले आहेत. या वेळेस कोण काय नवीन करणार? परंतु काँग्रेस एक दिवस लढा पुकारील असा समाजवादी पक्षास अद्याप विश्वास आहे. गांधीजी केव्हा प्रखर होतील, क्रान्तिकारक घोषणा करतील त्याचा काय नेम? हा महान् एक नेताच सर्वांच्या आघाडीस जाऊन, एखादे वेळेस उभा रहावयाचा! सर्वांहून

अधिक क्रान्तिकारक होऊन उभे रहावयाचे, म्हणून कॉं. समाजवादी आशेने व श्रद्धेने कॉंग्रेसमध्येच आहेत. कॉंग्रेस द्वारा लढा झाला तरच प्रभावी होईल. केवळ कॉंग्रेस समाजवाद्यांची कितीशी शक्ती असणार. मध्यंतरीच्या काळात कॉं. समाजवादी व कम्युनिस्ट यांनी एकी करावयाचे ठरविले होते. कम्युनिस्टांनी काय केले की हिंदुस्थानभर कॉंग्रेस समाजवादी संघटनांतून समाजवादी म्हणून ते घुसले. एक प्रकारे कॉं. समाजवादी संघटना त्यांना आत शिरून नष्ट करायची होती! कॉंग्रेस समाजवादी म्हणू लागले, 'अरे, आपण कोठे आहोत?'

या प्रचारानंतर कॉंग्रेस समाजवादी प्रमुख व कम्युनिस्ट प्रमुख यांच्यात एकजूट व्हावी म्हणून त्रिपुरा कॉंग्रेसच्या वेळेस जोराचे प्रयत्न झाले. कॉंग्रेस समाजवादी म्हणाले, "कम्युनिस्ट जर आन्तर राष्ट्रीय संस्थेपासून अलग होणार असतील तर आम्ही व ते एक होऊ." कॉंग्रेस समाजवाद्यांचा कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी विरोध होता असे नाही. परंतु रशियात स्टॅलिनचे धोरण आले. रशियाचे धोरण हेच कम्युनिस्ट इंटरनॅशनलचेही होऊ लागले. 'एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांच्या सत्तेच्या राजकारणात घुसले म्हणजे त्या राष्ट्राची दृष्टी तितकी निर्मळ राहात नाही. म्हणून 'हिंदुस्थानात आपण रशियाशी एकरूप झालेल्या आंतर राष्ट्रीय संघटनेपासून अलग राहू' असे कॉं. समाजवादी म्हणत. कम्युनिस्ट त्यांना म्हणाले, 'ठीक; आम्ही आन्तर राष्ट्रीय संघटनेपासून अलग होतो.' परंतु ही फसवणूक तर नसेल? अशी शंका काहींना आली. तेव्हा काही कॉंग्रेस समाजवाद्यांनी कम्युनिस्टांस कसोटीचा प्रश्न विचारला, "समजा, उद्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे धोरण चुकीचे आहे असे आपले ठरले तर ते उघडपणे ठरावात मांडाल का?" कम्युनिस्ट पुढारी गांगरले! ते म्हणाले, "तसे नाही आम्ही करणार" या मुद्द्यावर एकजुटीच्या वाटाघाटी थांबल्या आणि या दोन मार्क्सवादी पक्षांत विलक्षण तफावत पडत गेली.

अशा प्रकारचा इतिहास आहे. वसंता, गांगरून नको जाऊस. तू व तुझ्या सेवा दलातील मुले अवश्य अभ्यास करा. बहुजनसमाज सुखी करण्याची दृष्टी सोडू नका. जातिभेदांपासून अलग राहून विचार

करा. यात संरक्षण आहे. कोण कोणत्या जातीचा व धर्माचा हे न पाहता बहुजनसमाजासाठी त्यांचा कार्यक्रम काय आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. मी अद्याप काँग्रेससंबंधी आशा बाळगून आहे. परंतु जर काँग्रेस जनतेपासून दूर जाऊ लागली तर माझी ध्येयभूत काँग्रेस मेली! मनातील काँग्रेसचा मी सेवक होईन.

वसंता, दुसरी एक गोष्ट सांगायची की सदैव प्रामाणिक राहा. तरुणात अशी वृत्ती आहे की खोटे सांगणे म्हणजे क्रान्तिकारक होणे! ज्याप्रमाणे एखादे पिस्तुल झाडणे म्हणजे क्रान्तिकारकपणा नाही त्याचप्रमाणे केवळ लपंडाव म्हणजेही क्रान्तिकारक होणे नव्हे! आपले हेतू स्वच्छ सांगावे. काँग्रेसमध्ये नाही पटत, स्वच्छ सांगावे, निघून जावे. बुद्धिभेद तरी निर्मू नयेत. कम्युनिस्ट वा काँग्रेस समाजवादी, रॉयिस्ट वा गांधीवादी किंवा आणखी कोणी असा, प्रामाणिक रहा. सर्वांत अधिक नुकसान जगात कशाने होत असेल तर मतभेदांपेक्षा फसवाफसवी, अप्रामाणिकपणा, अविश्वास वगैरेंनी अधिक होते. म्हणून यापासून जपा. सुटीत पुष्कळ वाचा. विचार व ज्ञान मिळवा. नाताळच्या सुटीत जा कोठे हिंडायला. खेडी-पाडी पहा. जनतेच्या संसाराचे दर्शन घ्या. निरीक्षणाने विचार येतात. मार्ग कळतो.

तुला हे पत्र लिहिता लिहिता माझे मनही जरा कावरे बावरे झाले आहे वाटते. कोठे आहे मार्ग? कधी सुटणार देशाचे ग्रहण? परंतु मानवी इतिहास का एका क्षणात संपणार आहे? वेडे मन.

सर्वांस सप्रेम प्रणाम व आशीर्वाद.

तुझा
**श्याम**

पत्र एकोणिसावे

# स्वातंत्र्य लढ्याच्या नौबती

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

मागे तुला बरेच दिवसांपूर्वी मी एक पत्र लिहिले होते. महात्मा गांधी युद्ध आहे तोपर्यंत ब्रिटिश सरकारला अडचणीत आणू इच्छित नव्हते. परंतु ब्रिटिशांच्या युद्धाला आमचा पाठिंबा नाही एवढे दाखवण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रह त्यांनी सुरू केला होता. सत्याग्रही अधिकाऱ्यांना कळवी व घोषणा करून तुरुंगात जाई. प्रचारही करावयाचा नाही. कारण काँग्रेसचे केवळ अस्तित्व टिकवण्यापुरता तो सत्याग्रह होता! लढा तर आज करावयाचा नाही, सरकारशी सहकार्य तर करता येत नाही, मग काँग्रेसने करायचे काय? काँग्रेस का मेली? नाही; जिवंत आहे. विरोध नमूद करून ठेवीत आहे. थोड्या निवडक लोकांनी तुरुंगात जावे आणि बाकीच्यांनी बाहेरच विधायक कार्य करीत राहून जनतेशी संबंध ठेवावा. त्यांना स्वावलंबी, स्वाश्रयी व्हायला सांगावे, शिकवावे. हे महायुद्ध आहे. उद्या अन्नवस्त्रांची चणचण भासेल. आगगाड्या मालाची ने-आण करायला मिळणार नाहीत. उपाशी वा उघडे रहायची पाळी येईल. तेव्हा एव्हा-पासूनच गावाला लागणारे अन्नवस्त्र गावातच कसे निर्माण होईल त्याची कोशीश करावी. बाहेरच्या काँग्रेसवाल्यांनी असे करावे. अशी गांधीजींची शिकवण होती.

परंतु परिस्थिती झपाट्याने बदलली. तिकडे जर्मनीने रशियावर अचानक हल्ला चढविला! साऱ्या जगाला धक्का बसला. रशियाला ही

कल्पना असेलच. पूर्वीच रशिया लढाईत पडता तर कदाचित जर्मनीने आधी रशियावरच मारक हल्ला चढवला असता. आणि रशियावर जर्मनी प्रहार करीत असता तिकडे इंग्लंड, फ्रान्स यांनी जर्मनीवर जोरदार हल्ले चढवलेच असते असे कशावरून? अद्यापही प्रभावी दुसरी आघाडी जे उघडीत नाहीत, त्यांनी त्या वेळेस काय केले असते? आणि त्यांची तयारी तरी कोठे होती? फ्रान्सचा किती अल्पावधीत फडशा पडला! तेव्हा रशियाने एक वर्ष तयारीला मिळविले हे बरेच केले असे म्हणायला हवे.

हिंदी कम्युनिस्टांचा युद्धाला पूर्वी विरोध होता. ते काँग्रेसला 'लढा करा' म्हणून सांगत होते. परंतु रशिया युद्धात पडताच त्यांचा पवित्रा बदलला! रशियाने युद्ध सुरू केल्यावरही नाशिकच्या तुरुंगात असणारे कम्युनिस्ट म्हणत असत की, "आमचे युद्धविरोधी धोरण कायमच राहणार!" परंतु पुढे बदलले! हिंदी कम्युनिस्ट पक्षाला इंटरनॅशनलकडून सूचना आल्या आणि ब्रिटिशांशी मिळते घ्या असा आदेश आला. आदल्या दिवसापर्यंत ठिकठिकाणचे कम्युनिस्ट विरोधी होते. परंतु दुसऱ्या दिवशी पक्षाचे फतवे येताच ते चकित झाले! पक्षाच्या अधिकाऱ्यांनी खालच्या कम्युनिस्टांस कळविले, "जनतेत, कामगारांत हळूहळू जपून युद्धानुकूल प्रचार करा. हे लोकयुद्ध आहे असे सांगा. पचनी पडेल असे करा." आणि कम्युनिस्ट तसे म्हणू लागले. परंतु तरीही सरकार त्यांना सोडीना.

परिस्थिती आणखी गंभीर झाली. जपाननेही युद्धात उडी घेतली आणि आश्चर्यकारक वेगाने त्याने अतिपूर्वेकडील भाग भराभरा जिंकून घेतले. सिंगापूर पटकन पडले. जग चकित झाले. मलाया गेला, आणि ब्रह्मदेशही गेला. जपान हिंदुस्थानवर स्वारी करणार का? ब्रिटिश सरकार कावरे बावरे झाले होते. इंग्रजांच्या इतिहासात त्यांचे कधी झाले नव्हते असे पराजय होत होते. हिंदुस्थानशी काही तरी तडजोड करावी, असे ब्रिटिशांना वाटले. आणि क्रिप्स येणार असे जाहीर झाले.

काँग्रेस महायुद्ध आहे तोवर लढा करणार नाही, असे समाजवादी पक्षास वाटत होते. काँग्रेसमधून अलग व्हावे व आपणच लढा करावा असेही त्यांच्या प्रमुख लोकांचे म्हणणे होते. परंतु ते धीराने वाट पहात होते.

लढ्याची भाषा बोलणारे कम्युनिस्ट आता बारगळले! रशियाचा बचाव हे त्यांचे धोरण. रशियाला अनुकूल असे धोरण हिंदुस्थानात ते ठेवणार. मग हिंदी स्वातंत्र्याचे तीन तेरा वाजले तरी त्याची त्यांना पर्वा नव्हती. त्यांना वाटत होते की आता सरकारची काँग्रेसशी तडजोड होणार.

तडजोड कोणाला नको होती असे नाही. काँग्रेस आशेने होती. क्रिप्स आले. किती सहनशीलतेने काँग्रेसने वाटाघाटी केल्या. परंतु काही आशा उरली नाही. क्रिप्स आज काहीही द्यायला तयार नव्हते. प्रथम म्हणाले, इंग्लंडमधील मंत्रिमंडळासारखे मंत्रिमंडळ देतो. मागून म्हणाले, व्हाइसरॉय तुमचे म्हणणे वाटेल तेव्हा झिडकारू शकेल! हे स्वातंत्र्य का फार्स? क्रिप्स म्हणाला, "अमेरिकेत प्रेसिडेंट असतो, त्याला नाही का स्वातंत्र्य?" हिंदी व्हाइसरॉय व अमेरिकन प्रेसिडेंट हे का सारखे? अमेरिकेचा प्रेसिडेंट जनतेकडून निवडला जातो. आणि हिंदी व्हाइसरॉय परकी सत्तेने नेमलेला! हिंदुस्थानने इंग्लंडवर एखादा हिंदी व्हाइसरॉय नेमून त्याच्या हाती सर्व सत्ता दिली– ब्रिटिश पार्लमेंटचे ठराव फेटाळून लावण्याची सत्ता दिली तर त्याला का इंग्रज लोक स्वातंत्र्य म्हणतील? ते का इंग्लंडचे राष्ट्रीय सरकार होईल? क्रिप्सला वाटले की, हिंदी जनता बोळ्यानेच दूध पिते! क्रिप्स शिव्याशाप देत गेला. "युद्धोत्तर घटनास्वातंत्र्य आम्ही हिंदी जनतेस देऊ केले; परंतु ती महत्त्वाची गोष्ट कोणीच ध्यानात घेईना. आणि बाजारात घासाघीस करीत बसतात तसे हिंदी पुढारी करीत बसले." असे क्रिप्स कराचीस बडबडला. युद्धोत्तर हिंदी जनतेने एकमुखी सर्वसंमत अशी घटना केली तर पार्लमेंट म्हणे त्यास मंजुरी देईल! परंतु एकमत होऊ नये अशी कारवाई करून तर क्रिप्स गेले. उद्या युद्धोत्तर हिंदुस्थानात वाटले तर तीन भाग करा, चार करा; त्या त्या दिशेच्या फेडरेशनमध्ये त्या दिशेच्या प्रांतांनी जावे. आणि अशा सर्व फेडरेशनांचे पुन्हा का एक वरिष्ठ फेडरेशन करायचे? का अलग अलग फेडरेशने ठेवायची? क्रिप्स या क्षणी तर काही द्यायला आला नाही. उलट युद्धोत्तर काळातही हिंदी एकजूट होऊ नये, या भारताचे खंड व्हावेत, अशी कारवाई करून गेला! म्हणून तर महात्माजी क्रिप्सला

भेटले तेव्हा एवढेच म्हणाले, "अशी विषारी व भिकार योजना तू तरी आणायला नको होती!" याहून अधिक शब्द महात्माजी बोलले नाहीत. ते भेटायला जातच नव्हते. परंतु शेवटी गेले. आणि आहार-चर्चा करून आले. राष्ट्राध्यक्ष आझाद व पंडित जवाहरलाल शेवटपर्यंत मिळते घेऊन बोलत होते. काँग्रेसला स्वतःला सत्ता नको. मुस्लिम लीगला मंत्रिमंडळ बनवायला सांगा. याहून अधिक मिळते किती घ्यायचे? व्हाइसरॉय, हिंदुस्थानातील ब्रिटिश नोकरशाही व बॅ. जिना यांनी का क्रिप्सच्या मार्गात काटे पेरले? भावी इतिहास सांगेल. किंवा ते सारे अंधारातच राहील. कुटिल कारस्थाने प्रकाशात येणार कशी?

परंतु क्रिप्स गेले, आणि गांधीजी अत्यंत अशान्त झाले. तू त्यांचे हरिजनमधील लेख वाचीतच असशील. कसे त्यांचे हृदय तळमळत आहे! हिंदुस्थानच्या दाराजवळ युद्ध आलेले. अशा वेळीही ब्रिटिश सरकार स्वार्थी कुटिल रीतीने वागते. फोडा झोडा धोरण ठेवते. काँग्रेसला झिडकारते. मुस्लीम लीगला डोक्यावर घेते! अल्पसंख्याकांच्या हिताचा पुळका दाखवते. गांधीजी अशान्त झाले. ब्रिटिश आपण होऊन गुण्या-गोविंदाने स्वराज्य देतील अशी त्यांना आशा होती ती नष्ट झाली. ब्रिटिश आहेत तोपर्यंत ऐक्य अशक्यच, असे त्यांना वाटू लागले. आमचे ऐक्य तेव्हाच होईल जेव्हा ही परकी सत्ता मध्ये आडवी येणार नाही, आमचे आज या परकी सत्तेकडे पदोपदी डोळे जातात, आणि स्वजनांस आम्ही झिडकारतो. महात्माजी रात्रंदिवस विचारात मग्न झाले. त्यांचे लेख अधिकाधिक प्रखर असे येऊ लागले. युद्ध आहे तोपर्यंत ब्रिटिशांना प्रत्यक्ष चळवळीने विरोध करायचा नाही, असे त्यांचे पूर्वी मत असावे. सामुदायिक चळवळ करण्याला ते तयार होते. परंतु युद्धकाळात करायची का युद्धोत्तर? रामगड काँग्रेसच्या वेळेस ते म्हणाले होते, "मला सामुदायिक चळवळ करायची नसती तर मी येथे आलो नसतो." पण ती करावयास योग्य क्षण ते पहात होते. युद्ध हिंदुस्थानच्या दारात न येते तर कदाचित ते थांबले असते. परंतु युद्ध दारात आले. ब्रिटिश सरकार सत्ता द्यायला नाखूष. अधिकच भेदनीतीचे कुटिल प्रदर्शन ब्रिटिशांनी केले! गांधीजी

विटले. ब्रिटिश आपण होऊन सामोपचाराने हिंदुस्थानला कधीकाळी स्वातंत्र्य देतील ही त्यांची आशा नष्ट झाली. आणि जपानने आक्रमण केले तर? माझी अहिंसा का म्यानात घालून ठेवू? सर्वत्र हिंसा आहे. अशा वेळेस मी का स्वस्थ बसू? उद्या जपानने हिंदुस्थान घेतला तर? माझी अहिंसा आताच पणास लावू दे. परिस्थितीच अशी आहे की, मी अतःपर थांबणे योग्य नव्हे. सत्याग्रही या नात्याने शत्रूच्या अडचणींचा फायदा घेऊ नये हे ठीक, परंतु त्यालाही मर्यादा आहेत. हिंदुस्थानचा सर्व बाजूंनी कोंडमारा होत आहे. ब्रिटिश साम्राज्यशाही व जपानी साम्राज्यशाही या दोहोंच्या कैचीत हिंदुस्थान सापडला आहे. अशा वेळेस मी कशाची कोठवर वाट पाहणार? आताच मला माझी असेल नसेल ती अहिंसक संघटना घेऊन उभे राहू दे. असे का त्यांनी मनात म्हटले?

कम्युनिस्ट निराळाच सूर काढीत होते. क्रिप्स वाटाघाटी फिसकटल्या. त्यामुळे त्यांची निराशा झाली. काँग्रेसने लढा पुकारला तर आपले कसे व्हायचे? काँग्रेस-मुस्लिम लीग एकजूट झालीच पाहिजे, असे तुणतुणे ते वाजवू लागले. 'प्रान्तांना संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे. फेडरेशनमधून फुटून जाण्याचेही स्वातंत्र्य द्यावे. आमच्या रशियात असेच आहे' वगैरे ते बोलू लागले. तुमच्या रशियात काय आहे? रशियात जी अनेक प्रादेशिक सोव्हिएट्स आहेत त्यांना फुटून निघण्याचे स्वातंत्र्य आहे, पण लष्करी दृष्ट्या ती पंगू आहेत. त्यांना स्वसंरक्षण करून घेणे कठीण असते. आज ब्रिटिश साम्राज्यातील वसाहतींना फुटून निघण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु द. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया का फुटत नाहीत? त्यांना स्वसंरक्षणाचा विश्वास नाही. रशियातील सारी लष्करी सत्ता मॉस्कोला केन्द्रीभूत आहे. तेव्हा तुम्ही तोंडाने सर्वांना फुटून निघण्याचे स्वातंत्र्य आहे असे म्हटले तरी काय अर्थ? प्रत्यक्षात मॉस्कोचाच प्रभाव सर्वत्र असतो. रशियन भाषा सर्वत्र सक्तीची केली गेली आहे! हिंदी कम्युनिस्ट हिंदी लोकांच्या डोळ्यात धूळ फेकीत असतात. हे कम्युनिस्ट पूर्वी काँग्रेस जर मुस्लिम लीगजवळ वाटाघाट करायला गेली तर टीकेचा भडिमार करीत. त्या प्रतिगामी व जात्यंध जिनांजवळ कशाला वाटाघाटी करता असे म्हणत.

'जिनांजवळ वाटाघाटी करून ऐक्य मिळणार नाही, लढ्यातून ऐक्य येईल.' काँग्रेसने लढा पुकारावा असे त्यांचे पूर्वीचे प्रवचन असे. परंतु आता त्यांना लढा नको होता. आता जिना म्हणतील ते मान्य करा, असे बेटे म्हणू लागले. जिनांना मिठ्या मारण्यासाठी जाऊ लागले. जिनांची मुलाखत व्हावी म्हणून ते आशाळभूतपणे पाहू लागले. प्रान्तांना स्वयंनिर्णयाचे तत्त्व लावावयास काँग्रेसही तयार आहे. परंतु प्रान्तातील सर्व लोकांनी मत देऊन ठरवावे. फक्त तेथल्या मुसलमानांनी नाही. काँग्रेसने मुस्लिम लीगजवळ आणखी काय कबूल करावयाचे? डॉ. लतीफ– जे पाकिस्तानच्या कल्पनेचे आद्य प्रवर्तक– तेही म्हणाले, "काँग्रेसजवळ तडजोड होणे शक्य आहे. महत्त्वाच्या गोष्टी काँग्रेसने मान्य केल्या आहेत. परंतु बॅ. जिना अहंकारी आहेत!" डॉ. लतीफांनी काँग्रेसला शिफारसपत्र द्यावे याहून आणखी काय हवे? सर शिकंदर हयातखान प्रांतांना शेष अधिकार असावेत असे म्हणत. तीही गोष्ट काँग्रेसने मंजूर केली. आता आणखी काय करावयाचे? जिनांच्या अटीच अपमानास्पद! राष्ट्राध्यक्ष मौलाना आझाद यांची भेट घ्यायलाही ते तयार नाहीत. कोणी तरी हिंदूनेच यावे. त्याने हिंदूंचा प्रतिनिधी म्हणूनच यावे. या उर्मटपणाला कोण पुरे पडणार? उगीच काँग्रेस-मुस्लिम लीग एकजूट अशी घोषणा करून काय होणार? ही एकजूट होऊ नये अशी जिनांची इच्छा आहे. ब्रिटिश सरकारची इच्छा आहे. त्यामुळे हिंदी स्वातंत्र्याची गळचेपी होत आहे. पूर्वी हिंदू-मुस्लिम ऐक्य आधी व मग स्वराज्य असे गांधीजी म्हणत. परंतु आता आधी स्वातंत्र्य, मग ऐक्याची शक्यता असे ते म्हणू लागले. याचा अर्थ गांधीजींनी ऐक्य सोडले असा नाही. त्यांच्याहून ऐक्याचा अधिक भुकेला कोण आहे? २० वर्षे एका विश्वासाने त्यांनी ऐक्य-प्रयत्न केले. परंतु ऐक्य होईना. तेव्हा त्यांना नवदर्शन झाले की, ब्रिटिश गेल्याशिवाय ऐक्य अशक्य आहे. माझ्या आयुष्यात हिंदू-मुस्लिम ऐक्य व्हावे असे मला वाटत असेल तर ब्रिटिश सत्ता दूर करण्यासाठी मी उभे राहिलेच पाहिजे, या निर्णयावर ते आले. ऐक्याच्या आत्यंतिक तीव्रतेनेच आज वृद्धपणी हा महापुरुष पुन्हा एक प्रखर असे अहिंसक स्वातंत्र्ययुद्ध करावयास, निर्वाणीचा लढा करावयास उभा राहिला.

वसंता, स्वातंत्र्याचा लढा का सुरू होणार? ब्रिटिश सरकार नाही का सलोख्याने प्रश्न मिटविणार? समाजावादी लढा करायला उत्सुक आहेत, गांधीजी त्याच मताचे होत आहेत. जवाहरलाल, आझाद घुटमळत आहेत. मोठमोठे धोके आहेत. प्रसंग कठीण आहे. राष्ट्राची तर अपार कुंचवणा होत आहे. एक तर सरकारच्या हातास हात लावून सरकारच्या धोरणाप्रमाणे वागायचे, किंवा स्वस्थ बसायचे. याहून अन्य मार्ग कोणता? स्वस्थ बसून विधायक काम तरी करता येईल का? अन्नाचे प्रश्न तरी सोडवता येतील का? हाती सत्ता असल्याशिवाय काहीही करता येणे शक्य नाही. मग काँग्रेससारख्या महान संस्थेने का केवळ निष्क्रिय होऊन बसायचे? ते काँग्रेसचे मरण आहे. ती आत्महत्या होईल. महात्माजी म्हणाले, "काँग्रेससारख्या संस्थेने नुसते ठराव करण्यात काय अर्थ? काँग्रेसने राष्ट्रीय सरकारची मागणी १९४० पासून केली. सरकारने त्या मागणीला काय दिले? तोंडाला पाने पुसली! राष्ट्राचा तर प्राण जाण्याची पाळी आली. तरी हे सत्ता देत नाहीत. जनतेच्या विश्वासाचे राष्ट्रीय सरकार होऊ देत नाहीत. अशा वेळेस काँग्रेसने का मूग गिळून बसायचे? काँग्रेस नुसती ठराव करणारी संस्था नाही. तशी ती असेल तर इतर संस्थांत व काँग्रेसमध्ये काय फरक? काँग्रेसने आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात म्हणून शेवटी उभे राहिले पाहिजे. आपल्या मागणीपाठीमागे शक्ती खडी केली पाहिजे. बलिदान करायला निघाले पाहिजे." अशा अर्थाचे गांधीजींचे म्हणणे होते. हळूहळू जवाहरलालांस त्यांनी आपले म्हणणे पटवले आहे. जवाहरलालांच्या काही शंका गांधीजींनी दूर केल्या आहेत. काँग्रेस शेवटचा निर्णायक सामना देणार असे दिसत आहे.

महात्माजी शान्तिपुरुष आहेत. ते पुनःपुन्हा शान्तीसाठी खटपट करतील. व्हाइसरॉयांना भेटू पाहतील. परंतु भेट मिळेल की नाही कोणी सांगावे? १९३२ च्या जानेवारीत व्हॉइसरॉय लॉर्ड विलिंगडन याने महात्माजींची भेट अशीच नाकारली होती. पुनःपुन्हा गांधीजींनी त्याला तारा केल्या. परंतु साम्राज्यसत्तेच्या मदाने अंध झालेल्या त्या व्हाइसरॉयाने महात्माजींची भेट नाकारली. कारण त्याला काँग्रेसने लढा करावा व त्या

निमित्ताने काँग्रेस चिरडून टाकावी असेच वाटत होते. लॉर्ड लिन-लिथगोना असेच वाटत असेल? मुस्लिम लीग, हिंदु महासभा, आंबेडकरवाले, कम्युनिस्ट, सर्वांना जवळ करून काँग्रेसला कायमची चिर-डूनच टाकू या, करू दे लढा बेट्यांना, येथे आता भरपूर गोरी फौजही आहे, भीती नाही आम्हांला, असे व्हाइसरॉय मनात म्हणत असेल!

आणि काँग्रेस चिरडली गेली तर? आज युद्धाचा काळ आहे. आपला लढा अहिंसक असला तरी सरकार सर्व हिंसक शक्ती योजील. परंतु पंडित जवाहरलालांनी दिल्लीस नाही का सांगितले, "काँग्रेस नष्ट झाली तरी हरकत नाही. हिंदी स्वातंत्र्यार्थ लढत असताना ती नष्ट झाली असे इति-हास म्हणेल! काँग्रेस मेली तरी अमर होईल!" काँग्रेस मरेल म्हणजे काय? काँग्रेसने जी स्वातंत्र्याची ज्वाला पेटवली आहे ती का मरणार आहे? आणि ती ज्वाला जोवर राष्ट्रात राहील तोवर काँग्रेस जिवंतच आहे!

वसंता, राष्ट्राच्या इतिहासात आणीबाणीची वेळ आली आहे. इंग्लंड-मधील व अमेरिकेतील वर्तमानपत्रे काँग्रेसवर शिव्याशापांची झोड उठवीत आहेत. गांधीजींवर अत्यंत जहरी टीका होत आहे. बर्ट्रांड रसेलांसारखे इंग्रज तत्त्वज्ञानीही हिंदी स्वातंत्र्याच्या आड येत आहेत! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे खरे कैवारी कोण त्याची आज परीक्षा होत आहे. नाणी पारखली जात आहेत. काँग्रेस अचल व अढळ आहे. जगाची सहानुभूती मिळाली तर हवी आहे. परंतु स्वार्थी जगाची, आपमतलबी सत्ताधाऱ्यांची सहानुभूती न मिळाली तर काय पर्वा? काँग्रेस दुसऱ्यांच्या तोंडाकडे पहात नाही. आपण सत्याच्या, न्यायाच्या मार्गावर आहो ही गोष्ट काँग्रेस जाणते. काँग्रेसला दोस्तांच्या दंभाचा वीट आला. चर्चिल साम्राज्य सोडा-यला तयार नाही. अटलांटिक सनद हिंदी राष्ट्राला लावायला तयार नाही. त्यांना युरोपातील लुंग्यासुंग्या सर्व राष्ट्रांचे स्वातंत्र्य हवे आहे. परंतु पौर्वात्यांच्या स्वातंत्र्याची त्यांना पर्वा नाही. उद्या हिंदुस्थानचे काय व्हायचे? ब्रह्मदेश पुन्हा जिंकलात तर त्याचे काय कराल? जावा, सुमात्रा, मलाय, बोर्निओ वगैरेंचे काय होणार? डचांचे साम्राज्य तसेच ठेवणार का?

आफ्रिकेतील साम्राज्ये तशीच ठेवणार का? अनेक प्रश्न आहेत. परंतु काळ्या लोकांच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत ब्रिटिशांना फारशी पर्वा नाही. कसले लोकयुद्ध नि काय?

पहावे काय होते ते. लढा आलाच तर माझ्यासारख्यास दूर कसे राहवेल? सेवा दलाने संस्था या नात्याने लढ्यात नये पडू, परंतु सेवा दलातील ज्यांना राहवत नसेल त्यांनी स्वतंत्रपणे जावे व जीवन कृतार्थ करावे, दुसरे मी काय सांगू?

तुझा

**श्याम**

# अश्रू पुष्पांनी त्यागाची पूजा !

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

शेवटी काँग्रेसने स्वातंत्र्याचा निर्वाणीचा संग्राम सुरू केला. काँग्रेसला दुसरा मार्गच उरला नव्हता. ४० कोटी जनतेची कुतरओढ इतर पक्षांनी सहन केली तरी काँग्रेस तसे करणे शक्यच नव्हते. हिंदी स्वातंत्र्यासाठी आजपर्यंत काँग्रेसच लढली व आजही ती सर्वस्व-त्यागाने लढत आहे. या लढ्यात काँग्रेस नष्ट झाली तरीही पर्वा नाही. संस्था अमर थोड्याच असतात! त्या केव्हा तरी मरावयाच्याच. ज्या ध्येयार्थ त्या जन्मल्या, त्या ध्येयासाठी लढताना त्या मेल्या तर ते मरणही जीवनप्रदच होय. हिंदी इतिहासात काँग्रेस मेली तरी अमर राहील आणि इतर पक्ष जिवंत राहिले तरि मृतवत होतील.

काँग्रेसवर स्वकीय व परकीय दोघेही वाटेल ते आरोप करीत आहेत. परंतु त्यांना आज उत्तरे तरी आपणास कशी देता येतील? आज सरकारच्या हाताला हात लावतील त्यांनाच भाषण-स्वातंत्र्य आहे, त्यांनाच मुद्रण-स्वातंत्र्य आहे. हिंदी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचा आवाज आज मारून टाकलेला आहे. नाही आम्हास बोलता यत, नाही लिहिता येत. आमचे मुके बलिदान हेच एक आमचे साधन. त्यानेच जनता समजेल तितके समजेल.

कम्युनिस्ट, रॉयिस्ट, हिंदू महासभावाले, मुस्लिम लीगवाले, आंबेडकरवाले सारे काँग्रेसच्या विरुद्ध आहेत. ते सदैवच तसे होते. काँग्रेसच्या कोणत्या

लढ्यात हे लोक सामील झाले होते? काँग्रेसचा जेव्हा लढा नसेल तेव्हा लढ्याच्या गर्जना करून आपण अधिक जहाल आहोत असे भासवायचे व लढा सुरू झाला तर त्या लढ्याला नावे ठेवून अलग रहावयाचे हे हिंदी कम्युनिस्टांचे चिरंतन धोरण आहे. १९४० साली हे लढ्याच्या गर्जना करीत होते. आज ते केवळ सरकारचे झाले आहेत. बेटे खुशाल म्हणतात की हे लोकयुद्ध आहे. हिंदी स्वातंत्र्याची आज पदोपदी विटंबना होत असता हे लोकयुद्ध आहे. असे यांच्याने म्हणवते तरी कसे? सिंध, बंगाल वगैरे प्रांतांत प्रांतिक स्वातंत्र्यही काय किंमतीचे आहे ते दिसून आलेच. स्वर्गीय अल्लाबक्ष सरकारची री ओढीतनासे होताच त्यांना हाकलून देण्यात आले. कोटले स्वातंत्र्य नि काय? आज ब्रिटिशांचे केवळ होयबा होऊन राहण्यापलीकडे पैचेही स्वातंत्र्य आपणांस नाही. कोटले लोकयुद्ध?

रशिया, चीन हे देश शर्थीने लढत आहेत. काँग्रेस त्यांच्याविरुद्ध थोडीच आहे? महात्माजींनी लिहिले होते की "रशिया थोर आहे. पराक्रमी आहे. परंतु हिंदी स्वातंत्र्यासाठी त्याने एका शब्दाची सहानुभूती दाखविली असती तरी आम्हांला आनंद झाला असता." चिनी सेनापती चँग कै शेक निदान येथे आले. विचारविनिमय करून गेले. ते काँग्रेसला नावे नाही ठेवणार. महात्माजींनी चँग कै शेकला लिहिलेल्या त्या ऐतिहासिक पत्रात स्पष्ट लिहिले आहे की चीनच्या स्वातंत्र्याचा नाश करून हिंदुस्थानला स्वातंत्र्य नको आहे."

परंतु परतंत्र हिंदुस्थान रशिया, चीन यांना प्रभावी मदत कशी करणार? आम्हांला राष्ट्रीय स्वातंत्र्य द्या. लाखोंचे राष्ट्रीय सैन्य आम्ही उभारतो. दोस्तांच्या खांद्यास खांदा लावून लढतो. असे काँग्रेस म्हणाली. मौलाना अबुल कलाम आझाद, जवाहरलाल नुसते तडफडत होते. परंतु काय उपयोग? आम्हांला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाले असते तर या प्रचंड राष्ट्राची सहस्र शक्ती वाढली असती व ती दोस्तांच्या बाजूने, लोकशाहीच्या बाजूने कामी येती. येथे प्रचंड कारखाने आम्ही सुरू केले असते. अडथळे व बंधने दूर झाली असती. परंतु आमची औद्योगिक

शक्ती वाढावी असे सरकारला वाटत नव्हते. आज हिंदुस्थान जर झपाट्याने यंत्रप्रधान झाला, मोटरी, विमाने, जहाजे, रणगाडे बनवू लागला तर उद्या युद्धानंतर तो औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर होईल. इंग्लंड, अमेरिका यांची मग कुचंबणा होणार. यासाठी हिंदी शक्तीचा आज कोंडमारा करण्यात येत आहे. स्वतंत्र हिंदुस्थानची अपार मदत होऊन विजय थोडा जवळ आला असता. परंतु पुढच्या स्वार्थासाठी हिंदी शक्ती आज दडपून ठेवण्यात आली आहे.

काँग्रेस आज स्वातंत्र्य मागते. ते स्वातंत्र्य स्वतःसाठी नाही ती मागत. राष्ट्रीय सरकार सर्व पक्षांचे असावे असेच तिचे म्हणणे होते. वाटले तर बॅ. जिनांना राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनवायला सांगा असे उदार मनाची काँग्रेस म्हणाली. कोठूनही राष्ट्र स्वतंत्र होवो. राष्ट्राची प्रचंड सुप्त शक्ती झपाट्याने वाढो व या जागतिक युद्धात प्रगतिपर शक्तींच्या बाजूने ती कामी येवो एवढीच काँग्रेसची उत्कट इच्छा.

रॉयिस्ट, कम्युनिस्ट काँग्रेसवर आरोप करतात की काँग्रेस क्षुद्र राष्ट्रीय वृत्ती घेऊन बसली आहे. डॉ. आंबेडकर मुंबईस एकदा नभोवाणी-वरून बोलले की काँग्रेसला आन्तर राष्ट्रीय दृष्टी नाही. मला या लोकांची कीव येते! डॉ. आंबेडकर तर नेहमी म्हणतात : "मला माझ्या जातीपुरते आजकाल पहावयाचे आहे." आपल्या जातीपुरते पाहणारा– त्याने का राष्ट्रीय व आन्तर राष्ट्रीय दृष्टीविषयी उपदेश करावा? जिना काय, हिंदू महासभावाले काय, रॉयिस्ट काय, कम्युनिस्ट काय, यांना आपापल्या क्षुद्र पक्षांपलीकडे दृष्टी आज नाही. खरी मोठी दृष्टी काँग्रेसचीच आहे. स्वतःचे बलिदान देण्यासाठी ती आज उभी आहे. आणि तिच्या चितेवर इतर पक्ष आपली विडी शिलगवीत आहेत. आपल्या भाकऱ्या भाजीत आहेत! काँग्रेस निर्वाणीच्या संग्रामात गुंतली आहे असे पाहून, काँग्रेसचा बुलंद आवाज, घनगंभीर आवाज आज बंद आहे असे पाहून, तिच्यावर वाटेल ती खुनशी व विषारी टीका करून हे सारे पक्ष आपापली शक्ती वाढवू पहात आहेत. परंतु राष्ट्राची खच्ची होत असता यांना स्वतःची शक्ती कशी वाढवता येणार? शक्तीचा त्यांना त्रास होत आहे.

वसंता, तुझ्या सेवादलाशी वाद करायला येणाऱ्या कम्युनिस्टांस सांग की राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उभयविध दृष्टी काँग्रेसला आहे. घरी पैचेही स्वातंत्र्य नसता उगीच आन्तरराष्ट्रीय गप्पा मारण्यात काय अर्थ? आज आम्हांला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाले तर दोस्तांच्या बाजूने आम्ही लढायला उभे राहू असे काँग्रेसने नाही का जाहीर केले? वास्तविक जपान आमचा शत्रू नाही. त्याच्याशी आम्ही युद्ध का सुरू करावे? आमच्या देशावर जपानी आक्रमण आले तर पाहू. असे काँग्रेस म्हणू शकली असती. देश तटस्थ राखती. आज आयर्लंड नाही तटस्थ? ईजिप्त नाही तटस्थ? तुर्कस्थान नाही तटस्थ? रशियाने जपानजवळ थोडेच युद्ध पुकारले आहे? अमेरिका युद्धात थोडीच एकदम पडली? रशियाने तर आधी जर्मनीजवळ करार केला होता. या सर्व गोष्टींचा अर्थ काय? चीनचा जपानजवळ लढा सुरू झाला तेव्हा का चीनची बाजू इंग्रजांनी किंवा अमेरिकनांनी घेतली होती? इंग्लिश व्यापारी शिष्ट मंडळाचे जपानजवळ बोलणी करायला गेली होती. जपानच्या ताब्यात आलेल्या चीनमध्ये ब्रिटिश भांडवलाला जर जपानने पूर्ण मोकळीक दिली असती तर ब्रिटिशांना चीनविषयी सहानुभूती वाटती ना. परंतु जपानने परकी भांडवलास दारे बंद असे जेव्हा अप्रत्यक्ष रीत्या सुचवले तेव्हा ब्रिटिशांचे तोंड लढणाऱ्या चीनकडे वळले. अमेरिका तर लोखंड वगैरे सामान, तशीच विमाने जपानला खुशाल विकीत होती. आणि त्या विमानातून चीनची शहरे उद्ध्वस्त होत होती. स्पेनमध्ये अंतर्गत युद्ध चालले होते. तेथील लोकशाहीच्या पक्षास इंग्लंड, फ्रान्स यांनी केली का मदत? रशियाने मदत केली, परंतु त्या मदतीने भले होण्याऐवजी तेथील लोकशाही क्रान्तीचा गळाच कसा कापला गेला त्याचा करुण इतिहास प्रसिद्ध इंग्रज समाजवादी फेनर ब्रोकवे याच्या आत्मचरित्रात आहे. लुई फिशर याच्याही 'मेन अँड पॉलिटिक्स' या पुस्तकात आहे.

वसंता, मी हे सारे का लिहीत आहे? या लिहिण्याचा एकच उद्देश की जगातील सारी राष्ट्रे फक्त स्वतःपुरते पाहणारी आहेत. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याची त्यांना पर्वा नाही. आपली धोरणे, आपला फायदा, यापलीकडे त्यांना दृष्टी नाही. संकुचित राष्ट्रीय वृत्ती त्यांची आहे. याच्या उलट काँग्रेसची दृष्टी आहे. स्पेनचा लढा चालू असता स्वतः जवाहरलाल तेथे

गेले. त्यांनी हिंदुस्थानातून एक बोट भरून धान्य पाठवले, हिंदी सहानुभूती तुमच्याकडे आहे असे पटवले, चीन देशातही काँग्रेसने वैद्यकीय पथक पाठवले, हिंदी आत्मा तुमच्यासाठी तडफडत आहे असे कृतीने सिद्ध केले, आजही आम्हांला स्वातंत्र्य द्या. आम्ही तुर्कस्थान, आयर्लंड, ईजिप्त यांच्याप्रमाणे तटस्थ न राहता हिरीरीने या युद्धात सर्व शक्ती ओतण्यासाठी तयार आहोत, असे काँग्रेसने जाहीर केले. काँग्रेस तटस्थ राहती तरीही ते क्षम्य होते. स्वतंत्र हिंदुस्थान तटस्थ राहता तरीही त्याला बोल लावता आला नसता. ४० कोटींच्या स्वतंत्र हिंदी राष्ट्राने जपानवर दडपण आणून कदाचित चिनी प्रश्न सोडवायला मध्यस्थीही केली असती. महात्माजी जपानला जाते. परंतु हे सारे दूर राहिले, आंतर राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे कार्य या परतंत्र हिंदी देशाला करता येत नाही. आंतर राष्ट्रीय दृष्टया काही करायचे असेल तर आधी आमचे राष्ट्रीय स्वातंत्र्य आम्ही मिळविले पाहिजे. युद्धोत्तर नव्या पुनर्रचनेच्या वेळेस हिंदुस्थान स्वतंत्र असेल तर केवढी कामगिरी करील? परंतु तेच तर आमच्यावर सत्ता चालवणाऱ्यांस नको आहे.

काँग्रेसजवळ संकुचित राष्ट्रीय दृष्टी नाही. तिचे गेल्या दहा वर्षांचे ठराव वाचा. ही दृष्टी तेथे दिसणार नाही, "आपण हिंदुस्थान ताब्यात ठेवला आहे, मग जपानने चीन घेतला तर त्याला नावे आपण कशी ठेवावी? वाढत्या जपानी लोकसंख्येला नको का कोठे वाव?" असे उद्गार सायमनसाहेब, चर्चिल वगैरेंनी पूर्वी काढले होते! वसंता, जगात एकच संस्था आहे की जी खरोखर आंतर राष्ट्रीय दृष्टीची आहे; फॅसिझमविरोधी आहे व ती संस्था म्हणजे काँग्रेस. आणि आंतर राष्ट्रीय दृष्टया थोर कामगिरी करता यावी म्हणूनच काँग्रेस राष्ट्रीय स्वातंत्र्य मागत आहे, त्यासाठी आज मरत आहे.

योगी पुरुषाची दृष्टी अर्धोन्मीलित असावी असे म्हणतात. अगदी मिटलेली नाही, अगदी वटारलेली नाही. असे का? योग्याने केवळ बहिर्दृष्टी नसावे. केवळ अंतर्दृष्टीही नसावे. स्वतःपुरते पाहणे, स्वतःमध्ये लीन होऊन जाणे तेही बरोबर नाही. आणि स्वतःचे स्वरूप न

पाहता केवळ बडबड करणे तेही चूक. थोडे स्वतःकडे पहावे, थोडे जगाकडे. ती दृष्टी योग्य. अशी योग्याची कर्मकुशल दृष्टी काँग्रेसजवळ आहे. स्वतःची शक्ती काय आहे ते न पाहता उगीच लोकयुद्धाच्या फोल वल्गना ती करीत नाही. काहीही करण्याची शक्ती व स्वतंत्रता नसता पोकळ आन्तर राष्ट्रीय दृष्टीची बडबड करण्यात काँग्रेसला स्वारस्य वाटत नाही. काँग्रेस आन्तर राष्ट्रीय दृष्टीची आहे. ती बाहेरही पाहते. परंतु अंतर्दृष्टी होऊन स्वतःकडेही पाहते. स्वतःचे पारतंत्र्य तिला दिसते. ते नष्ट करावे असे तिला वाटते. स्वतःचे स्वातंत्र्य घेऊन ते आन्तर राष्ट्रीय कामासाठी उपयोगात आणावे अशी उभयविध निर्मळ दृष्टी, उदार व व्यापक राष्ट्रीय दृष्टी, आन्तर राष्ट्रीयतेशी जोडलेली राष्ट्रीय दृष्टी काँग्रेसजवळ आहे. अशा या काँग्रेसचा सदैव अभिमान वाटावा. ही अपूर्व संस्था आहे. जगाला भूषण अशी ही संस्था आहे. आणि महात्माजींसारखा अद्वितीय पुढारी तिला लाभला आहे. मौलाना आझाद, सरहद्द गांधी, पंडित जवाहरलाल, सरदार वल्लभभाई अशी थोरथोर माणसे या संस्थेत आहेत. या संस्थेविषयी कोणाला आदर वाटणार नाही ? ज्यांचा अहंकार जरा झडलेला आहे, जरा मोठी दृष्टी ज्यांना आहे अशा सर्वांना काँग्रेसविषयी प्रेम वाटल्याशिवाय राहणार नाही.

क्रिप्स काही न देता गेले. आणि महात्माजींना किती वाईट वाटले ! ते म्हणाले, " माझी झोप नाहीशी झाली ! किती करुणगंभीर शब्द ! महात्माजींच्या वेदना कोण जाणील ? हिंदू-मुस्लिम-ऐक्यासाठी उपवास कोणी केले ? हरिजनांसाठी उपवास कोणी केले ? अमदाबादच्या कामगारांसाठी उपवास कोणी केले ? महात्माजी म्हणजे राष्ट्रीय ऐक्याची मूर्ती आहेत. परकीय सत्तेमुळे या देशात भेद आहेत, ही गोष्ट त्यांच्या उदार व थोर हृदयास शतशल्याप्रमाणे बोचली. आणि ते आयुष्याच्या सायंकाळी शेवटचा संग्राम करायला उभे राहिले. हिंदू-मुस्लिम-ऐक्यासाठीच परकी सत्ता दूर करायला ते उभे राहिले आहेत. परंतु आपापल्या जातींची तुणतुणी वाजवणारे सरकारचेच अप्रत्यक्ष बगलबच्चे होऊन या महान संस्थेवर शिव्याशाप वर्षत आहेत. येशू खिस्त क्रॉसवर चढवला जात असता म्हणाला, " देवा, आपण काय करीत आहोत ते यांना कळत

नाही. यांना क्षमा कर." माझी कॉंग्रेस असेच म्हणेल. "प्रभो, या माझ्या संकुचित दृष्टीच्या बंधूंस आपण काय करीत आहोत ते कळत नाही. तू त्यांना क्षमा कर."

कॉंग्रेसचा हा लढा सुरू होण्यापूर्वी जवाहरलालजी महात्माजींना भेटायला गेले होते.आणि त्यांनी लिहिले, महात्माजींच्या डोळ्यात मला किती उत्कटता व करुणा दिसली! स्वातंत्र्यार्थ तहानेलेले ते डोळे होते. महापुरुषांच्या डोळ्यांत कधी कधी थोडी खिन्न अशी करुणा असते. का बरे? ज्यांच्यावर आपण प्रेम करतो तेच जर विपर्यास करू लागले तर त्याहून दुःखदायक दुसरे काय आहे? आणि महात्माजींना तेच दुःख असेल. ते मुंबईच्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभेत नाही का म्हणाले मुसलमान माझ्यावर टीका करतात. बंदुकीच्या गोळ्यांप्रमाणे ती टीका झोंबते, हृदयाला घरे पाडते. परंतु मला सारे सहन केले पाहिजे." वसंता, हिंदी राष्ट्राच्या अपरंपार प्रेमानेच, 'सर्व भारतीयांच्या कल्याणासाठीच' सर्वांचे ऐक्य व्हावे म्हणूनच, व आन्तर राष्ट्रीय दृष्टयाही या महान राष्ट्राची शक्ती कामी यावी यासाठी महात्माजी बंड करून उभे राहिले.

वसंता, तुझे सेवा दल लढ्यापासून अलिप्त आहे. ज्यांना लढ्यात भाग घ्यायचा असेल ते सेवा दल सोडून मग भाग घेवोत. परंतु सेवा दलाने भाग घेतला नाही तरी कॉंग्रेसच्या या स्वातंत्र्यसंग्रामाविषयी प्रेम बाळगावे. कॉंग्रेसवर उगीच कोणी टीका केली तर त्यांना उत्तरे द्यावी. तुरुंगात पडलेल्या हजारो लोकांच्या घरी मदत करता यावी म्हणून मदत गोळा करावी. जे तुरुंगांत आहेत त्यांच्यासाठी पुस्तके, मासिके गोळा करून पाठवावी. कॉंग्रेसच्या या लढ्यात ठिकठिकाणी झालेल्या बलिदानाच्या कथा गोळा कराव्या. त्यांपासून स्फूर्ती घ्यावी. मी कोण कोणाची नावे सांगू? नंदुरबारचा शिरीषकुमार, आडगावचा भगवान भुसारी, अमळनेरचा बळीराम, यांची का नावे सांगू? कोल्हापूरचा बिंदूमाधव कर्जत तालुक्यातील कोतवाल, बिहारमधील यूसफ यांची का नावे सांगू? आणि आज हा बलिदानाचा इतिहास कळणार तरी कसा? हिंदुस्थानभर जो प्रचंड उठाव झाला त्याचा इतिहास पुढे गोळा करता

येईल. कर्नाटकातील एका शहरात रस्त्यावर रोज नंदादीप एके ठिकाणी लावतात. एका बालवीराने तेथे स्वतःची प्राणज्योत देशात स्वातंत्र्य यावे म्हणून मालवून टाकली. ठायी ठायी बलिदाने झाली असतील. निष्पाप निर्मळ बलिदाने! अश्रूंचा व रक्ताचा हा इतिहास आज अज्ञात आहे. आजच्या लढ्याचे रामायण महाभारत उद्या कळेल. परंतु तोपर्यंत जेवढे कळेल तेवढे हृदयाशी धरावे. त्या बलिदानाच्या हकिगतींनी, त्या पुण्यपावन कथांनी पावन व्हावे. काँग्रेस विषयी अधिकच प्रेम वाळगावे. अशा काँग्रेसच्या झेंड्याखाली आपण आहोत. याचा सेवा दलातील मुलांनी अभिमान बाळगावा. तिरंगी झेंडा पाहताच तुमचे हृदय अभिमानाने फुलावे. प्रेमाने सद्गदित व्हावे. खरे ना?

वसंता, काँग्रेसच्या लढ्यात मंदपणा येईल, येणारच. निःशस्त्र जनता वर्षानुवर्ष थोडीच लढू शकते? क्रान्ती व्हायची असली तर ती महिन्या दोन महिन्यांतच होते. काँग्रेसच्या लढ्याचे काही होवो. परंतु जनतेत अपरंपार प्रेम तिच्याविषयी आहे. कपाळकरंटे काही म्हणोत—सेवा दलात आज हजारो तरुण येत आहेत ते का? सेवा दल नुकते सुरू झालेले. आपलाच प्रचार करायला पुढारी बाहेर नाहीत. कार्यकर्ते पुष्कळसे तुरुंगात, परंतु काँग्रेसचा त्याग "विनपंख उडत जाय" असा सर्वत्र जात आहे. इतरांनी फक्त स्वातंत्र्याच्या गप्पा माराव्या, मरणारी एक काँग्रेस आहे. ही गोष्ट तरुणांस स्वच्छ दिसली, आणि म्हणून सेवा दल जणू स्वयंस्फूर्तीने वाढत आहे. प्रकाशाकडे तरुण येत आहेत. राष्ट्रीय ध्वजाचा मोठेपणा त्यांना दिसू लागला आहे. महाराष्ट्रात २५ हजारांवर आज सेवा दलातील संख्या आहे. लौकरच ही पाच लाख होईल अशी मला आशा आहे. काँग्रेस जेव्हा तुरुंगातून बाहेर येईल त्या वेळस खरी राष्ट्रीयता पसरवणाऱ्या सेवा दलाच्या शाखा हिंदुस्थानभर दिसू देत. गावोगावी, शहरोशहरी, गल्लीगल्लीतून सेवा दल सुरू झालेले दिसू दे. काँग्रेसने एवढे पाहिले तरी ती कृतार्थ होईल, काँग्रेसच्या बलिदानातून सेवा दले सर्वत्र फुलली, त्यांचा सुगंध सर्वत्र पसरू लागला तरी ती गोष्ट कमी नाही.

वसंता, तुला किती लिहू, काय लिहू? माझ्या हृदयातील लाटा शब्दांनी व्यक्त करता आल्या असत्या तर? परंतु शब्द शेवटी अपुरे पडतात.

आता पहाट झाली आहे. बाहेरच्या झाडावर टपटप दवबिंदू पडत आहेत. आणि माझेही डोळे भरून आले आहेत. हिंदी स्वातंत्र्य-संग्रामातील मुलाबाळांचे बलिदान, मायबहिणींचे बलिदान, थोर हुतात्म्यांचे बलिदान डोळ्यांसमोर येऊन माझ्या डोळ्यातून अश्रू गळत आहेत. या अश्रूंची तिलांजली त्यांना मी देतो. त्यांचे धन्य मरण मिळण्याइतके माझे भाग्य नाही. मी दुबळा आहे. मी कोपऱ्यात बसून त्या त्यागाची अश्रुपुष्पांनी पूजा करीन. त्या त्यागाची गाणी गाईन. त्या त्यागाच्या गाथा लिहीन त्या त्यागाचा गौरव करायला तुम्हा तरुणांस सांगेन. दुसरे काय करू? तुझे सेवा दल वाढो. सर्वास सप्रेम प्रणाम.

तुझा

**श्याम**

पत्र एकविसावे

# राष्ट्रपुरुषाचे दोन डोळे

प्रिय वसंतास सप्रेम आशीर्वाद.

या वेळचे तुझे आलेले पत्र बरेच महत्त्वाचे होते. अनेकांच्या अनेक शंका तू त्यात मांडल्या आहेस. सेवा दलाची शक्ती वाढत आहे. ही शक्ती आपणास सतत वाढवायची आहे. खरी शक्ती आपण स्वतः निःशंक असू तेव्हाच वाढवू शकू. सेवा दलाचे कार्य करणाऱ्यांच्याही मनात जर शंका आशंका डोकावू लागल्या तर ते फार वाईट. आपणाला डोळे बंद करून घ्यायचे नाहीत. सर्व प्रकारचे विचार आपण घेऊ. सर्व चर्चा करू. आपणास केवळ टॉमी व्हायचे नाही. आपणाला बुद्धीचा डोळा मिटायचा नाही. यामुळे शंकांना उत्तरे दिली पाहिजेत.

सेवा दलाचे कार्य करणाऱ्यांत कोणी गांधीवादाकडे झुकणारे असतील, कोणी समाजवादाकडे झुकणारे असतील. परंतु त्यामुळे वैषम्य का वाटावे, मने कलुषित का व्हावीत ते मला समजत नाही. सेवा दलाचे जे चालक असतील, जे ठिकठिकाणी पदाधिकारी असतील ते अमुक एका विशिष्ट पक्षाचा प्रचार करणारे नाहीत. अखिल राष्ट्रीयतेचे तत्त्व सांभाळून जातिधर्मातीत निर्मळ दृष्टी ठेवून, स्वातंत्र्याचे ध्येय राखून इतर विचारांची ओळख आपण करून दिली पाहिजे. गांधीवाद काय, समाजवाद काय, यांची मीमांसा आपण आपल्या दलात केली पाहिजे. त्या त्या वादाचे विशेष काय ते सांगितले पाहिजे. त्यांतील साम्य व विरोध समजावून दिला पाहिजे. आणि हे विचार ऐकून सेवा दलातील काही

मुले समाजवादी झाली वा गांधीवादी झाली म्हणून काय बिघडले? पदाधिकाऱ्यांनी खास पक्षप्रचार करू नये एवढेच. मुले निरनिराळ्या विचारांची होऊ लागली तर होऊ देत. काँग्रेसमध्ये आज नाहीत का अनेक पक्ष? तसे सेवा दलात राहतील. परंतु जातिभेदातीत राष्ट्रीयतेचे विशाल बंधन, काँग्रेसच्या थोर दृष्टीचे बंधन सर्वांना एकत्र ठेवील.

वसंता, खरे पाहिले तर गांधीवाद व समाजवाद यांत फारसा फरक नाही. धुळे येथे एकदा पूज्य विनोबांची व समाजवादी प्रोफेसर दांतवाला यांची चर्चा झाली. चर्चा होता होता शेवटी दांतवाला म्हणाले "मग तुमचा आमचा विरोध कोठे आहे?" विनोबाजी म्हणाले "मलाही तेच समजत नाही."

काँग्रेस समाजवादाकडे जात आहे. मुंबईच्या ऑ. इं. कॉ. कमिटीच्या त्या ऐतिहासिक ठरावात शेवटी काय म्हटले आहे? 'सर्व सत्ता शेतकरी व कामगार यांच्या हाती द्यावयाची आहे' असे त्यात स्पष्ट आहे. मुंबईच्या त्या ऐतिहासिक बैठकीच्या आधी वर्ध्यास जी वर्किंग कमिटीची बैठक झाली तिच्या ठरावात तर ही गोष्ट अधिकच स्पष्ट आहे. त्या ठरावात म्हटले आहे की, श्रमणारेच सारी संपत्ती निर्माण करतात. शेतात श्रमणारे शेतकरी व कारखान्यांतून श्रमणारे कामगार यांच्याच हाती मुख्यत्वे करून सत्ता असली पाहिजे. संस्थानिक, जहागीरदार, कारखानदार, सावकार, यांच्या हितापेक्षा आधी श्रमणाऱ्यांचे हित उद्याच्या स्वराज्यात पाहिले गेले पाहिजे." अशा अर्थाचे स्पष्ट शब्द वर्ध्याच्या ठरावात आहेत. उद्या हिंदुस्थानात कोणत्या वर्गाच्या हाती सत्ता राहणार? काँग्रेसचे स्पष्ट उत्तर आहे की, श्रमजीवींच्या हाती. काँग्रेसचे हे जे ध्येय आहे ते कृतीत यायला हवे असेल तर गांधीवादी व समाजवादी या दोहोंचे सहकार्य काँग्रेसमध्ये असणे आवश्यक आहे. राष्ट्रपुरुषाचे जणू हे दोन डोळे आहेत.

समाजवादी व गांधीवादी यांत मतभेदाचे दोनच प्रश्न आहेत.

(१) यंत्रवाद.

(२) हिंसा-अहिंसा वाद.

परंतु गांधीवादातही यंत्रांवर संपूर्ण बहिष्कार नाही. गांधीवादी का आगगाड्या बंद करणार आहेत, बोटी बंद करणार आहेत, मोटरी, विमाने बंद करणार आहेत? या गोष्टी उद्या स्वराज्यातही राहणार. या गोष्टी ग्रामोद्योगाने थोड्याच साधणार आहेत? त्यासाठी टाटांचे अचाट कारखाने हवेत. नवीन काढलेही पाहिजेत. परंतु या कारखान्यांवर मालकी राष्ट्राची राहील. या कारखान्यांतून कामगारांची पिळवणूक होणार नाही असे पाहिले जाईल. उद्या विद्युत् शक्ती निर्मून ती खेड्यापाड्यांना पुरवून तेथेही उद्योग वाढवता येतील. गांधीजींना स्वस्त विद्युच्छक्ती हवी आहे. लेनिन म्हणत असे, "समाजवाद व विद्युच्छक्ती यांचे सहकार्य हवे." याचा अर्थ हाच की, ती शक्ती सर्वत्र खेळून थोड्या श्रमांत भरपूर उत्पादन करावयाचे. उद्यांच्या हिंदी स्वराज्यात ग्रामोद्योग व यंत्रे यांचा आपण समन्वय करू.

आणि हिंसा-अहिंसेचा प्रश्न राहिला. समाजवादी अंतिम ध्येयाच्या दृष्टीने अहिंसक असले तरी ते परिस्थिती पाहून हिंसेचाही आश्रय करतील. परंतु काँग्रेसची हीच दृष्टी नाही का? ज्या वेळेस मंत्रिमंडळांचा आपण स्वीकार केला तेव्हा काँग्रेसच्या मंत्र्यांना गोळीबार नाही का करावा लागला? काँग्रेसचे मंत्री होते म्हणून गोळीबार कमी झाला असे एक मोठे कम्युनिस्ट कार्यकर्ते माझ्याजवळ म्हणाले. महात्माजींना तो थोडाही गोळीबार पसंत नव्हता. काँग्रेसच्या मंत्र्यांनी अहिंसक स्वयंसेवकांचे पथक घेऊन तेथे गेले पाहिजे होते व स्वतःचे बलिदान करून दंगल थांबविली पाहिजे होती. गांधीजी असे म्हणाले तरी प्रत्यक्ष व्यवहारात काँग्रेसला हाती शस्त्र घ्यावे लागलेच. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाले तर हाती शस्त्र घेऊन दोस्तांच्या खांद्यांस खांदा लावून आम्ही लढू असे काँग्रेसने जाहीर केले होते. त्या वेळेस महात्माजी दूर राहिले होते. काँग्रेसच्या मर्यादा महात्माजी ओळखतात. आणि म्हणूनच महात्माजी एकदा म्हणाले होते की, "उद्या स्वराज्यात लष्कर वगैरे एकदम जाईल असे नाही. पाच हजार वर्षे तरी हिंदुस्थान लष्कराशिवाय आहे असे होणार नाही." समाजवादी हिंसक आहेत आणि गांधीवादी अहिंसक आहेत असे नाही. महात्माजींची व त्यांच्या काही निष्ठावंत अनुयायांची गोष्ट बाजूस ठेवू. परंतु वल्लभभाई वगैरे तर गांधीवादी

आहेत ना? परंतु पुणे ठरावाच्या वेळेस ते काय म्हणाले? "गांधीजी संत आहेत. आम्हांला त्यांच्याबरोबर कसे राहवेल?" मग समाजवादी व वल्लभभाई वगैरेंच्यात कोणता हिंसा-अहिंसेचा भेद राहिला?

कोणी म्हणतील की, काँग्रेसने इंग्रजांशी लढा करताना अहिंसाच सांगितली आहे. उद्या स्वतंत्र हिंदुस्थान शस्त्राने परकीयांशी लढेल. परंतु जोपर्यंत स्वराज्य घ्यावयाचे आहे, जोपर्यंत ब्रिटिशांशीच लढा आहे, आणि तो लढा अहिंसेनेच लढला जावा अशी काँग्रेसची सांगी आहे. परंतु आज स्वातंत्र्य संग्रामात समाजवादी हिंसाही आणीत आहेत, हे कसे?

देशात जो स्वातंत्र्याचा संग्राम झाला व अद्याप सुरू आहे त्यात समाजवादी पक्ष अग्रेसर आहे यात शंका नाही. परंतु समाजवादी पक्षाने हिंसेचा अवलंब केला नाही. हिंदुस्थानभर जो उठाव झाला त्यात स्वातंत्र्यार्थ लढणाऱ्यांनी कोणाचे किती खून केले? आम्ही कोणाच्या कत्तली केल्या? समाजवादी पक्षानेही प्राणांची हिंसा वर्ज्य ठरविली होती. प्राणांचे पावित्र्य त्यांनीही पाळले होते. आणि म्हणून तर हिंदुस्थानभर सरकारी नोकर, पोलीस, पोलीसपाटील, सी. आय्. डी. सारे सुखरूप राहिले! ज्या वेळेस खऱ्या गोष्टी बाहेर येतील तेव्हा जगाला कळेल की समाजवादी पक्षाने हिंसेला किती आळा घातला तो. तरुणांना किती कह्यात ठेवले. त्यांच्याजवळ वाद करून अहिंसक रहा, प्राण घेऊ नका असे परोपरीने कसे सांगितले. समाजवादी पक्षाने हिंसा केली नाही.

कोणी म्हणतील, मोडतोड झाली ना? मोडतोड हिंसेत येते की नाही हा विवाद्य विषय आहे. ३० साली आम्ही शिंदीची झाडे तोडली, मिठागरे लुटली, परदेशी कपड्यांच्या होळ्या केल्या. ती हिंसा होती की अहिंसा? पहिल्या असहकाराच्या वेळेस रवीन्द्रनाथ व महात्माजी यांचा परदेशी कापड जाळण्याविषयी वाद झाला होता. अशा होळ्या करून द्वेष वाढेल असे रवीन्द्रनाथ म्हणाले. म्हणून का महात्माजी होळ्या करायचे थांबले? रवीन्द्रनाथांचे वडील बंधू द्विजेन्द्रनाथ म्हणाले, "रवी मोठा असला तरी महात्माजींचे स्वरूप समजण्याइतका तो मोठा नाही." हे बडा दादा महात्माजींच्या मताचे होते.

वसंता, मोडतोडीतील हिंसा-अहिंसा बाजूस ठेव. परंतु प्राणांची हिंसा जवळ जवळ कोठे झाली नाही ही गोष्ट कोणीही कबूल करील. प्राणांची अहिंसा हे सार्वभौम बंधन समाजवादी पक्षाने स्वतःला घालून पण घेतले होते. उद्या महात्माजी सुटल्यावर समाजवादी पक्षाने तरुणांना ठायी ठायी शेकडो प्रसंगी कसे आवरले हे त्यांना जेव्हा कळेल तेव्हा ते समाजवादी पक्षाची पाठ थोपटल्याशिवाय राहणार नाहीत. परंतु समाजवादी अंतिम दृष्टीने अहिंसक नाहीत;– जशी कॉंग्रेसही नाही. तसे फक्त एक गांधीजीच आहेत, व त्यांचे थोडे परम निष्ठेचे थोर अनुयायी.

म्हणून गांधीवादी व समाजवादी असे भेद पाडणे व सेवा दलात ती भांडणे आणणे वेडेपणा आहे. उद्याच्या स्वराज्यात या दोन्ही विचारांचा समन्वय होणार आहे. संयुक्त प्रान्तातील समाजवादी पुढारी भाई संपूर्णानंद एकदा म्हणाले, "गांधीवादाला समाजवाद आपल्या पोटात घेईल." काकासाहेब कालेलकरांनी सर्वोदय मासिकात लिहिले, "उद्या गांधीवाद समाजवादाला पोटात घेतो की समाजवाद गांधीवादाला पोटात घेतो ते दिसेल. दोघांनी प्रेमाने एकमेकांस आत्मसात करण्याचे प्रयत्न करावे." गंगा-यमुनांची भेट होणार हे निश्चित. काळ्यासावळ्या यमुनेला जवळ घेतल्याशिवाय गोऱ्यागोमट्या गंगेला पुढे जाता येणार नाही. पांढरपेशांची गंगा श्रमजीवींच्या काळ्या यमुनेला मिळू दे. आणि श्रीकृष्णाला यमुनाच अधिक आवडे.

एकदा एक निष्ठावंत गांधीवादी एका सभेत म्हणाले, "समाजवाद काय ते मला माहीत नाही. समाजवादाला शिंगे आहेत की शेपूट आहे ते मला माहीत नाही." वसंता, त्या कार्यकर्त्यांविषयी मला आदर आहे; परंतु ते शब्द ऐकून मला वाईट वाटले. समाजवादही एक शास्त्र आहे. मार्क्ससारख्या महर्षिंनी त्याची प्रतिष्ठापना केली. एक नवीन दृष्टी जगाला आली. त्याचाही आपण अभ्यास करायला हवा. आपल्या परिस्थितीत, आपल्या परंपरेस धरून काय घेता येईल ते घेतले पाहिजे. सर्वांगीण विकास केला पाहिजे.

कोणी म्हणतील की, "गांधीवादी व समाजवादी यांच्यात धर्मश्रद्धा हाही एक महत्त्वाचा भेद आहे. समाजवादी धर्माला स्थान देत नाहीत.

धर्म म्हणजे अफू असे ते म्हणतात." परंतु हे बोलणे फार स्थूल आहे. धर्म म्हणजे काय? उदात्त ध्येयार्थ सर्वस्व देणे म्हणजे धर्म नव्हे का? दारिद्र्यात कष्ट भोगणाऱ्या मार्क्सने जगाच्या उद्धाराचा मार्ग दाखविला; त्याच्याजवळ धर्म नाही तर कोणाजवळ? ज्याला ज्याला स्वतःच्या जीवनाहून काही मोठे असे सापडले, ज्याच्यासाठी स्वतःचे जीवन द्यावे असे काही आढळले त्याला धर्म मिळाला असे मी समजतो. समाजवादात नीतीला, ध्येयवादाला स्थान आहे. मानवाच्या सद्गुणांचा विकास व्हावा, मनुष्यातील दिव्यता प्रकट व्हावी म्हणून तर समाजवाद. पोटापाण्याचे प्रश्न सुटल्यावरच मानवातील खरी सुंदरता प्रकट होईल. महात्माजीही म्हणाले होते, "उपाशी लोकांना मी परमेश्वराचे नाव कसे शिकवू?" आधी पोटोबा व मग विठोबा हे पदोपदी अनुभवास येणारे सत्य आहे. भगवान बुद्ध म्हणाले, "उपाशी मनुष्यास आधी खायला द्या, मग त्याला धर्म शिकवा." वसंता, समाजवाद, मार्क्सवाद म्हणजे केवळ शिश्नोदरपरायण धर्म नव्हे. परंतु अर्थ, कामांची नीट व्यवस्था लावून मानवातील दडपलेला चांगुलपणा प्रकट व्हावा यासाठी त्यांची आटाआटी आहे.

मार्क्सवादी वा समाजवादी धर्माला अफू म्हणतात, परंतु तो कोणता धर्म? शनीची तुला पीडा आहे! म्हणून तू दरिद्री आहेस असे सांगून स्वस्थ बसणारा धर्म अफूप्रमाणे आहे. धर्माच्या नावाखाली सारी विषमता, सारे अन्याय कायदेशीर ठरवणे, लोकांना त्याविरुद्ध ब्र काढू न देणे म्हणजे अफू आहे. परंतु अशा धर्माहून थोर असा दुसरा एक महान धर्म आहे जो सत्याचा व प्रेमाचा धर्म आहे. ईश्वराची व्याख्या शेवटी तो ज्ञानमय आहे, प्रेममय आहे, मंगलमय आहे, आनंदमय आहे अशीच केली आहे. आणि अन्नमय ईश्वराचा भेट घालून दिल्यावरच या दुसऱ्या रूपांची ओळख करून देता येईल!

सृष्टीच्या मुळाशी एखादे आदितत्त्व होते की नाही, तो प्रश्न बाजूस ठेवू. परंतु आज सर्वत्र चित् व अचित् यांचा पसारा दिसत आहे. जड व चेतन असा प्रकार सर्वत्र आहे. आणि या दोहोंचा एकमेकांवर परिणाम

होत आहे. शरीर दुःखीकष्टी असले तर मनावर परिणाम होतो. आणि मन प्रसन्न असले तर दुःखी शरीरासही थोडा आराम वाटतो. बाहेरच्या सृष्टीचा आपल्यावर परिणाम होतो आणि आपणही बाहेरच्या सृष्टीत फेरबदल करतो. जड व चेतन यांच्या अन्योन्य परिणामातून सृष्टीचा इतिहास घडत असतो. परंतु जड व चेतन या दोहोत महत्त्वाचे काय? बाहेरची परिस्थिती मला बनवते हे खरे, परंतु या परिस्थितीवर मी स्वार होतो. या परिस्थितीचा मी विचार करतो. नवीन मार्ग शोधतो. नवीन स्फूर्ति नवीन प्रेरणा मिळते. मनाची, बुद्धीची अशी स्वयंभू निर्माणशक्ती आहे. आपली बुद्धी म्हणजे केवळ बाह्य वस्तूंचे ठसे घेणारी नाही. या सर्व संवेदना घेऊन त्यांत निवड करून त्यांचा विचार करून काही तरी नवीन विचार बुद्धी निर्मित असते. जडावर चैतन्य मात करते.

आणि हे जे चैतन्य, ते सर्वत्र आहे. धर्माचा खरा आरंभ 'ईश्वर म्हणून कोणी आहे असे मानण्यात मला वाटत नाही. धर्माचा खरा अनुभव 'आपण सारे एक' असे वाटण्यात आहे. प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ फ्राइड याने आपल्या एका पुस्तकात 'धर्म म्हणजे अफू' असेच लिहिले. परंतु या फ्राइडला एकाने पत्र लिहिले व विचारले : "तुम्ही धर्म म्हणजे अफू मानता, किंवा लहानपणी मुलाला स्वतःचे रक्षण करणारे आईबाप असावे असे वाटते, त्याचप्रमाणे पुढे मोठेपणी मनुष्याला कोणी देव असावा असे वाटते. याहून दुसरा अर्थ धर्माला नाही असे तुम्ही म्हणता. परंतु मला वाटते की, धर्मभावना अशी सहजासहजी उडवून लावता येणार नाही. मनुष्याला असा एक अनुभव येतो की सर्व प्राण्यांत एकच तत्त्व आहे. ते तत्त्व याला सर्व सृष्टीशी जोडते. मनुष्यमात्राशी, पशुपक्ष्यांशी, वृक्ष-वनस्पतींशी जोडते. जे चैतन्य लाखो वर्षे परिणत होत आले, नाना योनींतून विकसत आले त्या विश्वव्यापक चैतन्याकडे आपले मन ओढते. 'आपण सारे एक' असे वाटते. हा जो दिव्य अनुभव, ही जी विशाल एकत्वाची अनुभूती ती का अफू? तिला का काही अर्थ नाही?" अशा अर्थाचे ते पत्र होते. त्या पत्राला उद्देशून फ्राइड म्हणाला, या लेखकाच्या म्हणण्यात अर्थ आहे. परंतु त्या दृष्टीने अद्याप मी विचारच केला नाही.

वसंता, जवाहरलालजींनी आत्मचरित्रात जे लिहिले की महात्माजींसारख्यांकडे पाहिले की काही तरी थोर धार्मिक अनुभव असावा असे वाटते, त्यांतीलही हा अर्थ. हा जो धर्म, त्याच्याशी मार्क्सवादाचा विरोध नाही; समाजवादाचाही विरोध नाही. परंतु ही जी एकता, तिचा अनुभव नीट यावयासही आर्थिक प्रश्न नीट सुटायला हवेत. मुलाविषयी आईला आपलेपणा वाटतो. परंतु दुष्काळात पोटच्या गोळ्याचाही त्याग आईबाप करतात. दारिद्र्य दूर केल्यावर सर्वांना पोटापाण्याचे सुख दिल्यावरच बंधुभावाचा अधिक साक्षात्कार होईल. स्वतःचे आनंदी व उदार, प्रेमळ व मंगल स्वरूप प्रकट होईल.

वसंता, हे भेद माजवीत बसू नका. सेवा दलाला नुकता कोठे प्रारंभ झाला आहे. तो का गांधीवादी, समाजवादी असे भेद तुम्ही पाडणार? समाजवाद म्हणजे काही शाप नाही. समाजवादी प्रामाणिक आहेत. त्यांनी काँग्रेसची अप्रतिष्ठा कधी केली नाही. कम्युनिस्टांप्रमाणे काँग्रेसमध्ये घुसून तिला पोखरण्याचे काम त्यांनी कधी केले नाही. महात्माजींसारख्यांची कधी नालस्ती केली नाही. प्रामाणिक मतभेद त्यांनी मांडले, परंतु सदैव शिस्त पाळली. काँग्रेस आज समाजवादाकडे जात आहे हा त्यांचाच विजय. समाजवादी व गांधीवादी परस्पर पूरक आहेत. परंतु हे आम्हांला कधी कळणार?

सेवादलाचे नेतृत्व कोणाकडे, असले क्षुद्र वाद करीत बसू नका. उद्या काँग्रेसचे नेतृत्व कोणाकडे जाणार आहे? गांधीजींचे मानसपुत्र जवाहरलाल आहेत. गांधीजींचे ते वारसदार आहेत. आणि जवाहरलाल समाजवादी आहेत. काँग्रेसने उद्या स्वराज्यात शेतकरी कामकरी यांच्या हाती सत्ता देण्याचे ठरविले आहे. वाद विसरा, कार्य वाढवा. देशात स्वातंत्र्याचा लढा चालू असता आपण असले भेद माजवणे वाईट आहे. ३०-३२ सालच्या लढ्यात ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद कमी झाले. त्याप्रमाणे आजच्या या लढ्यातून गांधीवादी व समाजवादी यांच्यातील भेद कमी होऊन ते अधिकच जवळ येतील, अशी आशा मी करीत आहे.

सेवा दलातील मुलांचे ध्येय काय? हिंदुस्थानातील श्रमजीवींचा संसार सुखाचा व्हावा, त्यांना अन्नवस्त्र मिळावे, ज्ञान मिळावे; त्यांचा सर्वांगीण

विकास व्हावा हेच ध्येय सेवा दलातील मुलांच्या डोळ्यांसमोर हवे. हे ध्येय गांधीवादाने साधो वा समाजवादाने साधो, वा उभयांच्या समन्वयाने साधा. कॉंग्रेसचे हेच ध्येय आहे. गंगा खाली खाली वाहात सागराला मिळते. त्याप्रमाणे खालच्या बहुजन समाजाकडेच कॉंग्रेसची गंगा वाहात जाईल व खऱ्या स्वातंत्र्याच्या सागराला ती मिळेल.

वसंता, रॉयिस्ट वगैरे म्हणत असतात की "कॉंग्रेसच्या हाती सत्ता देऊ नय, ती भांडवलदाराची सत्ता होईल." परंतु हा शुद्ध खोडसाळपणा आहे. कॉंग्रेसचे वर्ध्याचे व मुंबईचे ठराव पाहिले म्हणजे कॉंग्रेसचे स्वराज्य हे कोणासाठी आहे ते दिसून येईल. डॉ. आंबेडकरांनी एकदा विचारले, "तुम्ही सरकारला युद्धहेतू विचारता. कॉंग्रेसचे तरी हेतू काय आहेत?" डॉक्टर आंबेडकरांनी कॉंग्रेसचे ठराव नीट वाचले असते तर त्यांना कॉंग्रेसचे हेतू दिसून आले असते. कॉंग्रेसला ब्राह्मणांची, पांढरपेशांची, पुंजीपतींची सत्ता स्थापावयाची नसून सत्ता श्रमजीवींच्या हाती द्यावयाची आहे.

अर्थात पुष्कळ वेळा ठराव कागदावरच राहतात हेही खरे. मागील महायुद्धाच्या वेळेस स्वयंनिर्णयाचे तत्त्व उद्घोषिले गेले. परंतु हिंदुस्थानला ते थोडेच लावण्यात आले? त्याप्रमाणेच कॉंग्रेसने ठराव केला एवढ्यावरून उद्या अंमलबजावणी होईलच असे नाही. त्यासाठी जनतेची संघटना हवी. आणि खऱ्या गांधीवादींची व खऱ्या समाजवादींची त्यासाठीच आवश्यकता आहे. आजच्या स्वातंत्र्यसंग्रामात हजारो तरुण पडले, हजारो शेतकरी कामकरी सामील झाले. हे जागृत तरुण, हे जागृत किसान कामगार कॉंग्रेसचा ठराव कागदावर राहू देणार नाहीत. त्याची उद्याच्या स्वराज्यात अंमलबजावणी व्हावी म्हणून ते धडपडतील.

वसंता, आज पुरे. तुझ्या इतर प्रश्नांची उत्तरे पुढच्या पत्रात लिहीन. परंतु माझे अंतःकरणपूर्वक सांगणे आहे की वाद माजवू नका; कार्यावर दृष्टी ठेवा. सेवा दल कसे वाढेल ते पहा. उदार व व्यापक दृष्टी घ्या, नाही तर सुरू झालेले सेवा दलाचे सुंदर कार्य पुन्हा बंद पडेल. प्रभू करो व तसे न होवो.

तुझा

**श्याम**

# साने गुरुजींचे वाङ्मय

| | |
|---|---|
| सुंदर पत्रे, भाग १ ला (आ. ६) | २–०० |
| सुंदर पत्रे, भाग २ रा (आ. ५) | २–०० |
| सुंदर पत्रे, भाग ३ रा (आ. ३) | २–०० |
| धडपडणारी मुले, खंड २ रा (आ. ७) | ४–०० |
| इस्लामी संस्कृती, मुहमद पैगंबर चरित्र | ४–०० |
| साधना (आ. २) | २–५० |
| श्यामची पत्रे (आ. २) | ६–०० |
| माझी दैवते | १–५० |
| दिगंबरराय | ०–८० |
| जीवनाचे शिल्पकार (आ. ३) | ०–६० |
| भारतीय नारी (आ. ३) | ०–६० |
| कुमारांपुढील कार्य | ०–५० |
| मोरीगाय | ०–६० |
| कावळे | ०–५० |
| आपले नेहरू (आ. ५) | ०–७५ |
| लोकमान्य टिळक (आ. २) | ०–५० |
| भगवान श्रीकृष्ण (आ. २) | ०–७५ |
| साक्षरतेच्या कथा (आ. ४) | ०–७५ |
| दारूबंदीच्या कथा (आ. ३) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग १ ला (आ. ८) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग २ रा (आ. ७) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ३ रा (आ. ७) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ४ था (आ. ६) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ५ वा (आ. ६) | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ६ वा (आ. ४) | ०–५० |

साधना प्रकाशन, पुणे

# साधना २ री आवृत्ती
ट्वेंटिएथ सेंचरि

## स्टुडन्टस् डिक्शनरी

संपादक :

प्रि. रा. प. सबनीस, एम. ए. (कॅन्टब).

प्रि. डॉ. ना. य. डोळे, एम्. ए. पीएच्. डी.

पृष्ठे ९६०    किंमत ७ रुपये

उपलब्ध असलेल्या इंग्रजी - इंग्रजी - मराठी शब्दकोशांतील उणीवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा, इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पदवी परीक्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहद्कोश.

साधना प्रकाशन, पुणे २